
ISSN 2456-656X

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

जानेवारी ते मार्च २०२२

नाटककार प्रा. वसंत कानेटकर यांना जन्मशताब्दीनिमित्त

विनम्र अभिवादन






## साहित्य परिषदेत नूतनीकरण कामाचा शुभारंभ

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माधवराव पटवर्धन सभागृह, तळघर आणि कार्यालय आदी कामांच्या नूतनीकरणाचा शुभारंभ मसापच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, कार्यकारी विश्वस्त डॉ. पी. डी. पाटील, उपाध्यक्ष विद्याधर अनास्कर आणि राजीव बर्वे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला. या वेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, वास्तू देखभाल कार्यवाह प्रमोद आडकर, कार्यवाह दीपक करंदीकर, बंडा जोशी, उद्धव कानडे, माधव राजगुरू, वि. दा. पिंगळे, शिरीष चिटणीस, डॉ. सतीश देसाई आणि वास्तुविशारद माधव हुंडेकर, आरती मोर्वेकर उपस्थित होते.

डॉ. शिवाजीराव कदम आणि डॉ. पी. डी. पाटील यांच्या पुढाकाराने हे नूतनीकरणाचे काम सुरू झाले असून जून २०२२ पर्यंत पूर्ण होणार आहे. यासंदर्भात माहिती देताना प्रा. मिलिंद जोशी म्हणाले, ''महाराष्ट्र साहित्य परिषदेचे माधवराव पटवर्धन सभागृह वातानुकूलित तसेच ध्वनिप्रतिबंधित करण्यात येणार असून त्याची आसन क्षमताही वाढणार आहे. तसेच उत्तम दर्जाची ध्वनिव्यवस्था सभागृहात करण्यात येणार आहे, त्यामुळे रसिकांची अधिक चांगली सोय होणार आहे. या कामाबरोबर तळघराचे आणि मसापच्या कार्यालयाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. या नूतनीकरणामुळे महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वास्तूला नवी झळाळी प्राप्त होईल.''

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

# महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३७७, जानेवारी ते मार्च २०२२

संपादक । **डॉ. पुरुषोत्तम काळे**

प्रकाशक । **प्रकाशक पायगुडे** प्रमुख कार्यवाह

**महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे**

४९६ सदाशिव पेठ, टिळक रस्ता, पुणे ४११०३०.

दूरभाष । ०२०–२४४७५९६३

संकेतस्थळ । www.masapapune.org

ई–मेल । masaparishad@gmail.com

कार्यालयाची वेळ ।

सकाळी ९.०० दुपारी १२.००

दुपारी ४.३० ते रात्री ८.००

येणें वाग्यज्ञें तोषावें
महाराष्ट्र साहित्य परिषद

**मसाप पत्रिका**
**जानेवारी ते**
**मार्च २०२२**
**अंक ३७७**

संपादक
**डॉ. पुरुषोत्तम काळे**

मुद्रक–प्रकाशक
**प्रकाश पायगुडे**
प्रमुख कार्यवाह
महाराष्ट्र साहित्य परिषद,
टिळक रस्ता, पुणे ४११०३०

संपादकीय संयोजन
**संदीप खाडे**

अक्षरजुळणी व सजावट
**लक कलाकल्य**

मुखपृष्ठ
**जयदीप कडू**

मुद्रितशोधन
**आरती देवगांवकर**

मुद्रणस्थळ
**एस. ए. प्रिंटर्स, एल. एल. पी.**
फ्लॅट नं. ५, ३ रा मजला,
सिद्धीविनायक अपा.,
शिवदर्शन, पुणे ४११००९

मूल्य : **१५ रुपये**

या अंकात व्यक्त झालेल्या
विचारांशी संपादक, संपादन समिती,
सल्लागार मंडळ तसेच प्रकाशक
सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

## मसाप पत्रिका । जानेवारी ते मार्च २०२२


१) एका पर्वाची अखेरः मा. कौतिकराव ठाले पाटलांची साहित्य संस्थात्मक कार्यातून निवृत्ती । **डॉ. पुरुषोत्तम काळे** । ६

२) एनडी नावाचा झंझावात । **विजय चोरमारे** । ९

३) अनिल अवचट : चिरवंचित वर्गाचा लेखक आणि तरुणाईचा सहोदर। **अरुण खोरे** । १३

४) घेतला वसा । **माधव वझे** । १९

५) वाङ्मयाचा अभ्यास हेच समीक्षाशास्त्राचे मूळ रूप आहे । **सुधीर रसाळ** । २३

६) जॉन स्टाइनबेक–ऑफ माइस अँड मेन आणि द ग्रेप्स ऑफ राथ : दशा स्थलांतरितांची । **शिरीष चिंधडे** । २७

७) स्थळपुराणांच्या अभ्यासाच्या दिशा । **डॉ. सदाशिव पाटील** । ३५

८) कादंबरी आकलनाचे व्यूह आणि कथात्म साहित्य । **डॉ. गजानन भोसले** । ३९

९) ग्रामीण साहित्यप्रवाहातील मैलाचा दगड–पाचोळा : एक लघुकादंबरी । **प्रा. डॉ. संजय नगरकर** । ४७

१०)वास्तव दर्शन घडवणारी अशोक पवार यांची 'भुईभेद' कादंबरी । **भास्कर गायकवाड** । ५३

११) शांततेचा खोलस्वर– कमबख्त निंदर । **अंजली आंबेकर** । ५७

१२) मी सावित्री जोतीराव : चरित्रात्मक कादंबरी एक मानदंड । **डॉ. दादा गोरे** । ६०

१३) अस्तित्व शोधाचा प्रवास– सरोवर । **प्रा. विद्या सुर्वे बोरसे** । ६९

१४) बा. द. सातोस्कर यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटन । **शुभांगी अनंत आसोलकर** । ७२

१५) 'अगा कवितांनो'– कवितेच्या बहुविध वैशिष्ट्यांचा साक्षेपी वेध । **सुनिता टिल्लू** । ७७

१६) मुलांच्या कल्पनाविश्वाचा खजिना : बाल कवितासंग्रह 'माझे गाणे आनंदाचे' । **प्रा. डॉ. रंजना कदम** । ८३

१७) वेणा : स्त्रीजाणिवांचा एक विस्तृत पट । **कीर्ती शशिकांत जाधव** । ८६

१८) सामाजिक हतबलतेतून जगण्याचे भान देणारी 'अविनाशपासष्टी' । **दीपक करंदीकर** । ९३

१९) स्वप्नाकडून वास्तवतेकडे घेऊन जाणारं काव्य...! 'संविधानाच्या स्वप्नातलं गाव'। **वर्षा मारुती भिसे** । ९६

२०) शेती, माती आणि शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी धडपडणाऱ्या 'भूमिनिष्ठांची मांदियाळी' । **शरद ठाकर** । ९९

२१) सत्यशोधक चळवळीचा दस्तऐवज : सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखनसमीक्षा) । **प्रा. डॉ. नाना झगडे**। १०३

२२) पालशेतची विहीर : स्त्री वेदनेचा हुंकार । **प्रा.चिन्मय घैसास** । १०७

२३) वाचक प्रसारमाध्यमे व साहित्यव्यवहार । **डॉ. देविदास मल्हारी शेटे** । १११

२४) महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ । **प्रा. डॉ. राहुल गोंगे** । ११५

२५) मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टिक्षेप । **शेख शफी बोल्डेकर** । १२१

२६) पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये मिळून साऱ्याजणी मासिकाचे स्थान । **पवार मंदाबाई सोपान** । १२६

२७) कार्यवृत्त । **१३२**

# एका पर्वाची अखेर : मा. कौतिकराव ठाले पाटलांची साहित्य संस्थात्मक कार्यातून निवृत्ती...

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष मा. प्रा. कौतिकराव ठाले पाटील यांनी मराठवाडा साहित्य संस्थेच्या कार्यकारिणीचा आणि अ. भा. साहित्य महामंडळाच्या कार्यकारिणीच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन साहित्य संस्थात्मक कार्यातून निवृत्ती घेतली आहे. आपल्या सडेतोड मतप्रदर्शनासाठी प्रसिद्ध असलेल्या ठाले पाटलांनी अनेकदा वाद ओढवून घेतले. ९५ व्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनातही मराठी-कोकणी यावरून ज्ञानपीठविजेते साहित्यिक मा. दामोदर मावजो यांच्याबरोबर ठाले पाटलांचा वाद झडला. वाद-विवाद आणि ठाले पाटील असे समीकरणच जणू जमले होते. सांगली येथे २००८ साली आयोजित केलेल्या अ.भा. मराठी साहित्यसंमेलनाच्या पहिल्या दिवशी कौतिकरावांनी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते आणि पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्याविषयी अनुदार उद्गार काढले. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यालयावर काँग्रेस कार्यकर्त्यांचा मोर्चा आला. त्याला डॉ. सतिश देसाई, महेंद्र मुंजाळ आणि मी सामोरे गेलो. डॉ. सतिश देसाई यांच्यावर शाई फेकण्यात आली. परिषदेच्या कार्यालयात आम्ही मोर्चेकऱ्यांना घुसू दिले नाही. हा प्रकार कळल्यानंतर मा. ठाले पाटलांनी आवर्जून चौकशी केल्याचे आठवते.

वादविवादांव्यतिरिक्त उत्कृष्ट प्रशासक म्हणून मा. कौतिकरावांची ख्याती आहे. ३४ वर्षे त्यांनी मराठवाडा साहित्य परिषद आणि अ. भा. साहित्य महामंडळाचे कामकाज समर्थपणे सांभाळले. १९८८ ते २०२२ या कार्यकाळात मा. कौतिकराव ठाले पाटील महामंडळाचे दोन वेळा आणि एकदा कार्यवाह राहिले. १२ अ. भा. मराठी साहित्य संमेलने आणि दोन विश्व मराठी साहित्य संमेलनाचे नेतृत्व त्यांनी केले. २२ मराठवाडा साहित्य संमेलने

आणि ९ लेखिका संमेलनाच्या आयोजनात त्यांनी नेतृत्व तर केलेच; परंतु ही संमेलने उत्कृष्ट होतील याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले. मराठवाड्यातील, महाराष्ट्रातील आणि बृहन्महाराष्ट्रातील साहित्यिकांना अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे आणि विश्व मराठी साहित्य संमेलनाचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. अमेरिकेतील सॅन होजे येथे झालेल्या पहिल्या विश्व संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत मा. गंगाधर पानतावणे यांना एकमताने देऊन पानतावणे यांचा उचित सन्मान केला. मराठी साहित्यव्यवहाराविषयी, मराठी भाषेविषयी अत्यंत सजग असलेल्या कौतिकरावांनी प्रसंगी राज्यकर्त्यांवर टीका करण्यास मागे-पुढे पाहिले नाही. महाआघाडी सरकारमध्ये मराठी भाषेसंदर्भातील खाते शिवसेनेकडे गेल्याने त्यांनी समाधान व्यक्त करून, 'आता मराठी भाषेसंदर्भातील प्रश्न मार्गी लागतील,' असा ठाम विश्वास व्यक्त केला होता. म. सा. प. पुणेच्या पदाधिकाऱ्यांनी सुचविलेल्या संमेलनाध्यक्ष-पदासाठीच्या नावांना मा. ठाले पाटलांनी पाठिंबा दिला आणि संमेलनाध्यक्ष निवडणुकीने न निवडता चर्चेने निवडण्याचा नवीन, स्तुत्य पायंडा पाडला. इतरांनी केलेल्या योग्य सूचनांना पाठिंबा देण्याचा उमदेपणा त्यांच्यात होता. मराठवाडा साहित्य परिषद आणि अ.भा. साहित्य मंडळाशी गेली ३४ वर्षे जोडले गेलेले प्रा. ठाले पाटील वयोमानानुसार निवृत्त होत आहेत. त्यांच्या संस्थात्मक कार्याची, जाज्वल्य मराठी भाषाभिमानाची आणि सडेतोड, रोखठोक, निर्भीड भूमिकांची नेहमी आठवण येईल. मा. कौतिकराव ठाले पाटलांना त्यांच्या पुढील संकल्पासाठी आणि निरामय दीर्घायुरारोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

मराठी साहित्यातील ख्यातकीर्त नाटककार मा. वसंत कानेटकर यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्यांच्या साहित्यिक कर्तृत्वाला अभिवादन करण्यासाठी या अंकाचे मुखपृष्ठ मा. कानेटकरांचे छायाचित्र केले आहे. 'रायगडाला जेव्हा जाग येते,' 'हिमालयाची सावली, ''इथे ओशाळला मृत्यू, तुझा तू वाढवी राजा,' 'अखेरचा सवाल,' 'नलदमयंती, विषवृक्षाची छाया, गगनभे' 'जिथे गवताला आले फुटतात,' 'प्रेमाच्या गावा जावे' इत्यादी ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक प्रश्न मांडणारी नाटके कानेटकरांनी लिहिली. मूलतः कानेटकर हे प्रायोगिक रंगभूमीचे नाटककार; परंतु कालांतराने त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवरही यश आणि रसिकमान्यता मिळवली. कानेटकरांनी आपल्या नाटकांची भाषा स्वतंत्रपणे घडवली. ऐतिहासिक नाटकांतून त्यांनी त्यांची स्वतःची अशी ऐतिहासिकतेचा विश्वसनीय आभास करणारी भाषा घडवली. आपल्या सर्वच नाटकांत परिणामकारकता आणि काव्यात्मता साधण्यासाठी भावनायुक्त विचार व्यक्त करणारी सुभाषितवजा वाक्ये कानेटकरांनी वापरली. लौकिक यशापयश आणि चांगली कला हे समीकरण नेहमी जुळेलच असे नाही. चांगली कला साहित्यकृतीतून देण्याची ताकद मग साहित्यविश्वाला दिली. 'नवतेचे सारे संस्कार मी पचविले आहेत तरीही मी आशावादी आहे, वैफल्यवादी नाही.' हे त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांच्या साहित्यकृतींमधून प्रत्ययाला येते. मराठी नाट्यसृष्टीवर आपल्या नाट्य लेखनाचा अमीट ठसा उमटवणाऱ्या आणि तिला समृद्ध करणाऱ्या मा. वसंत कानेटकरांना जन्मशताब्दीनिमित्त मनःपूर्वक अभिवादन!

या अंकात मा.एन. डी. पाटील, अनिल अवचट आणि कीर्ती शिलेदार यांच्या कर्तृत्वाचा वेध घेणारे श्रद्धांजलीपर लेख आहेत. प्रख्यात अमेरिकी कादंबरीकार जॉन स्टाईनबेक यांच्या 'ऑफ माईस अँड मेन', आणि 'ग्रेप्स ऑफ राथ' या कादंबऱ्यांतील 'स्थलांतरितांच्या' मध्यवर्ती सूत्राबाबत भाष्य करणारा शिरीष चिंधडे यांचा लेख

अंतर्मुख करणारा आहे. ग्रेप्स ऑफ राथमधील अमेरिकेतील पश्चिमेकडे जाणाऱ्या, महामंदीमुळे बेरोजगार झालेल्या स्थलांतरितांच्या हालअपेष्टांचे, व्यथा-वेदनांचे प्रत्ययकारी वर्णन स्टाईनबेक यांनी केले. सद्यःकालातही विविध कारणांमुळे विस्थापित, स्थलांतरित होणाऱ्या जग समूहांचे प्रश्न जगासमोर आहेत. नरेंद्र मोहन यांच्या यशोधरा काटकर यांनी अनुवादित केलेल्या 'कमबख्त निंदर' या आत्मकथेवरील अंजली आंबेकर यांचा लेख, कविता मुरूमकर यांच्या 'मी सावित्री जोतिराव' या सावित्रीबाई फुले यांच्या कादंबरीवरील दादा गोरे यांचा लेख मूळ साहित्यकृती वाचनासाठी उद्युक्त करणारे आहेत.

डोंबिवली येथे संपन्न झालेले समीक्षा-संमेलन हे उत्कृष्ट आयोजन, मराठी साहित्यसमीक्षेविषयी झालेली मूलगामी चर्चा आणि अध्यक्ष मा. सुधीर रसाळ यांनी अध्यक्षीय भाषणातून मराठी साहित्य समीक्षेच्या सद्यःकालीन स्थितीबाबत केलेले भाष्य यामुळे यशस्वी झाले. जिल्हाप्रतिनिधी मा. सुरेश देशपांडे आणि आयोजन समितीच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन! फलटण येथे विभागीय साहित्य संमेलन मा. सुधीर गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाले. मा. रविंद्र बेडकिहाळ आणि आयोजन समिती पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन!

सन्माननीय विश्वस्त मा. शिवाजीराव कदम, मा. पी. डी. पाटील आणि मा. यशवंतराव गडाख यांच्या मार्गदर्शन आणि मदतीमुळे म. सा.परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहाचे नूतनीकरण लवकरच पूर्ण होईल. प्रलंबित असलेला सरकारी अनुदानाचा प्रश्न मार्गी लागल्याने आगामी काळात म. सा. पत्रिका मुद्रित स्वरूपात प्रकाशित करणे शक्य होईल. मा. विश्वस्तांचे मनःपूर्वक आभार !

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार ख्यातकीर्त विज्ञानकथा लेखक मा. निरंजन घाटे यांना आणि भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत, साहित्यिक आणि विविध समाजोपयोगी चळवळींमध्ये सतत कार्यरत असलेले मा. किशोर बेडकिहाळ यांना जाहीर झाला आहे. मा. निरंजन घाटे आणि मा. किशोर बेडकिहाळ यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

ज्येष्ठ कवयित्री मा. रजनी परूळेकर यांचे नुकतेच निधन झाले. म. सा. परिषद आणि पत्रिकेतर्फे मा. रजनी परूळेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

या अंकाबाबत आपल्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.

**डॉ. पुरुषोत्तम काळे**

# एनडी नावाचा झंझावात

**ज्येष्ठ नेते, पुरोगामी विचारवंत, शिक्षणतज्ज्ञ आणि सर्वसामान्याच्या प्रश्नांवर रस्त्यावर उतरून आयुष्यभर संघर्ष करणारे प्रा.एन. डी. पाटील यांचे जानेवारी महिन्यात निधन झाले. त्यांच्या कर्तृत्वाचा आढावा घेणारा श्रद्धांजलीपर लेख**

**विजय चोरमारे**



प्रा. एन. डी. पाटील, गोविंदराव पानसरे यांच्यासारख्या माणसांच्या जाण्यामुळं समाजाचं जे नुकसान होत असतं, त्याची जाणीव लगोलग होत नसते. काळ पुढे सरकत जाईल तसतशी वेगवेगळ्या निमित्तांनी त्यांची आठवण तीव्रतेने येत असते. सार्वजनिक जीवनात त्यांनी जो एक मापदंड घालून दिलेला असतो, त्याचे स्मरण होत असते. साधं उदाहरण घ्यायचं, तर आजकाल अनेक प्रश्नांवर आंदोलनं होतात. धरणे आंदोलनं, रास्ता रोको, उपोषणं, निदर्शनं अशी अनेक प्रकारची आंदोलनं असतात. विविध संघटना आंदोलनं करीत असतात. विविध समाजघटक आपल्या मागण्यांसाठी आंदोलनं करीत असतात. शांततेने केलेल्या आंदोलनांची दखल ना सरकार घेते, ना प्रसारमाध्यमं घेतात. त्यामुळं अनेकदा अशी आंदोलनं हिंसक मार्गाचा अवलंब करतात; परंतु हा आपला मार्ग नव्हे, याची जाणीव आंदोलकांनाही नसते आणि आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या नेत्यालाही नसते. याबाबतीत प्रा. एन. डी. पाटील यांचे विचार खूप मोलाचे आणि मार्गदर्शक ठरतात. आपल्यापेक्षा सरकारची दमनशक्ती अधिक आहे. तेव्हा हिंसेला हिंसेनं उत्तर देणं काही ठीक नाही. सरकार जेव्हा लाठीहल्ला करते, तेव्हा हिंसेनं त्याला प्रत्युत्तर न देता संख्याबळाच्या आधारानं

आपल्या प्रश्नांवर, आपल्या विचारांवर ठाम राहणं, हे खरे उत्तर असल्याची प्रा. एन. डी. पाटील यांची धारणा होती. तुमच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला आम्ही काही भीक घातलेली नाही. आम्ही अजूनही आमच्या भूमिकेवर ठाम आहोत, हे आपल्या प्रत्येक कृतीतून दाखवणं हेच खरं उत्तर. दमनशक्तीचा विचार केला तर आपल्यापेक्षा सरकारकडे दमनशक्ती अधिक आहे, या वास्तवाचे भान त्यांनी कधी सुटू दिले नाही म्हणून त्याविरुद्धची लढाई सोडली नाही किंवा त्या दमनशक्तीपुढे कधी कच खाल्ली नाही. एनडींना माहीत होतं की, कुठंतरी दगड मारून चळवळ पुढे जात नाही. प्रश्न सुटत नाहीत. प्रश्न सुटायचे असतील, चळवळ पुढे न्यायची असेल; तर सोबत विचारानं पक्की असलेली निष्ठावान माणसं असावी लागतात. त्यांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विचारांवर पक्की निष्ठा ठेवून एकत्र वाटचाल केली पाहिजे. अशी माणसं सोबत असतील, तर चळवळ करणाऱ्याला भिण्याचं अजिबात कारण नाही, असं त्यांचं म्हणणं होतं. हिंसेला हिंसेनं प्रत्युत्तर, हे कुठल्याही प्रश्नावरचं समर्पक उत्तर होत नाही. चळवळीत काम करीत असताना उभ्या आयुष्यात आपण हिंसाचाराचा प्रचार कधीच केला नाही. मी संयमानं चालणारा, संख्याबळावर चालणारा, त्यावर विश्वास ठेवणारा माणूस आहे, असं ते जाहीरपणे सांगत.

आजच्या काळात विचार करताना असा विचार करणारा नेता कुठं आणि कसा शोधायचा? लोकांच्या प्रश्नासाठी चळवळी करणारे नेते आणि पक्षही नामशेष झाले असून धंदेवाईकपणे आंदोलने करणाऱ्या प्रवृत्ती वाढल्या आहेत. अशा परिस्थितीत एनडी किंवा पानसरे यांची उणीव तीव्रतेने भासल्यावाचून राहत नाही.

एन.डी पाटील यांनी वयाच्या चौदाव्या वर्षापासून चळवळी सुरू केल्या. हायस्कूलमध्ये असताना त्यांनी कोल्हापूर जिल्ह्यातल्या पेठवडगाव येथे जाऊन दारू दुकानाच्या विरोधात आंदोलन करू न ते दुकान बंद पाडलं होतं. त्या काळात पेठवडगावला सोमवारी जनावरांचा बाजार भरायचा. बाजाराच्या दिवशी देशी दारू दुकानाची तुफान विक्री व्हायची. दारूविक्रीला आळा घालावा, असा काँग्रेसच्या कार्यक्रमाचा भाग होता. जशी लग्नातली उधळमाधळ कमी करायची तसाच हा दारूबंदीचा भाग होता. वडगावचं हे दुकान बंद झालं पाहिजे, असं कुणीतरी सुचवलं. त्यावर शाळकरी एनडींनी चळवळ करायचं ठरवलं. त्या वेळी दारू दुकानांचे लिलाव व्हायचे. दारूचा गुत्ता म्हणायचे. वडगावला वर्षाकाठी तीन-चार हजाराचा असलेला लिलाव ६५ हजार रुपयांपर्यंत पोहोचला होता. हे दारू दुकान बंद पाडण्याचा कार्यक्रम त्यांनी घेतला. सोमवारी बाजाराच्या दिवशी गर्दी असायची म्हणून निदर्शनं करायचे. आष्ट्याच्या शाळेतले खैरमोडे सर मुलांना उत्तम रीतीने घडवीत होते. ते आंदोलनासाठी सुट्टी द्यायचे. मुलं झेंडा घेऊन उभी राहायची. आलेल्या लोकांना दारू पिऊ नका म्हणून सांगायची. त्याचं पुढारीपण एनडी पाटील करीत होते. सोबत शाळेतले विद्यार्थी मित्र होते. ढवळी, बागणी आणि शिगावचे लोकही मुलांना पाठिंबा द्यायला यायचे. दुकानासमोर उभं राहून मुलांनी पिकेटिंग करायला सुरुवात केली. कुणी घोटभर घेतलेली असायची, ते मुलांना बाजूला ढकलून दुकानात जायचे. मग मुलं दुकानाच्या वाटेत आडवं झोपायला लागली. तशातही काही बहाद्दर चुकवत चुकवत मुलांच्या अंगावर पाय न देता दुकानात जायचे. मुलं गांधीवादी सत्याग्रह करीत होती. गुरांच्या बाजारात आलेल्या काही मंडळींचं आंदोलनाकडं लक्ष असायचं. दुसऱ्या आठवड्यापासून बाजारातल्या लोकांचा पाठिंबा मिळायला लागला. मुलांच्या अंगावरून जाणाऱ्यांना लोक खांद्यावरच्या चाबकानं फोडून काढायचे. सोन्यासारखी पोरं झोपलीत, त्यांच्या अंगावरून जाताय, लाजा वाटत नाहीत का वगैरे शिव्या घालायची. एका बाजूला मुलांचा अहिंसक सत्याग्रह आणि दुसरीकडे ही चाबूकवाल्यांची राखीव फौज, असे सहा आठवडे सोमवारचे आंदोलन चालले. तोपर्यंत दारूच्या दुकानाचा पुढचा लिलाव आला. ६५ हजारांचं अबकारी उत्पन्न देणारं ते दुकान होतं. निदर्शनामुळं बोली बोलायला कुणी आलं नाही. एकानं कुणीतरी तीन हजारांची बोली सांगितली. तो काही लिलाव केला नाही. त्यानंतर मग कोल्हापूरची यंत्रणा जागी झाली. काही आंदोलक पोरांना पोलिसांनी पकडून नेलं. वडगावच्या पोलिस ठाण्यात घेऊन गेले. बाकीच्या पोरांना सोडून दिलं आणि एकट्या एन.डी पाटील यांना वडगावच्या लॉकअपमध्ये एक दिवस ठेवून कोल्हापूरच्या जेलमध्ये नेलं. अशा रीतीनं त्यांची राजकीय कारकीर्द सुरू झाली.

पेठवडगावपासून जवळच असलेलं वाळवे तालुक्यातल्या ढवळी (जि. सांगली) या छोट्या

गावातल्या सामान्य शेतकरी कुटुंबात एन. डी. पाटील यांचा जन्म झाला. त्यांचे आजोबा, वडील शेतकरी होते. दोघेही अशिक्षित होते. आजोबा – रामजी पाटील प्रतिष्ठित शेतकरी म्हणून त्यांचा गावात लौकिक होता. आजोबांना दोन मुलं. घरातला सगळा कारभार त्यांचे आजोबाच बघायचे. वडील सतत शेतातच असायचे. शेती आणि कष्ट यातच त्यांचा जन्म गेला.

सांगली जिल्ह्याची राजकीय क्षेत्रातही मोठी आघाडी होती. क्रांतिसिंह नाना पाटील, शिगावचे रंगराव दादा, पांडू मास्तर, नागनाथअण्णा नायकवडी अशी लढवय्यी मंडळी होती. नाना पाटलांवर दहा हजाराचे बक्षीस होते. पांडू मास्तरांवरही पाच हजारांचे बक्षीस होते. अशा सामाजिक जागृतीच्या प्रकाशात एनडी पाटील यांची सार्वजनिक जीवनातली पावलं पडत होती. कौटुंबिक वारसा नसला तरी असा अवतीभवतीच्या वातावरणाचा मोठा परिणाम होत होता.

चुकीच्या गोष्टींचा राग येणे, दांभिकतेची चीड येणे हा एनडी पाटील यांचा स्वभाव तरुणपणापासूनचाच आहे. त्याचमुळे राजाराम कॉलेजमध्ये शिकत असताना त्यांनी ज्येष्ठ साहित्यिक प्रा. ना. सी. फडके यांच्या विरोधात भूमिका घेतली होती. राजाराम कॉलेचचे प्राचार्य असलेल्या डॉ. अप्पासाहेब पवारांची बदली झाली. तत्कालीन बऱ्याच राजकीय घडामोडी त्याला कारणीभूत होत्या. जिथं शासकीय कॉलेज असेल तिथे बदली होणार, त्यानुसार त्यांची बदली उत्तर गुजरातमध्ये वीसनगरला झाली, एकदम आडबाजूला. तिथे ते रुजू झाले. ना. सी फडके तेव्हा राजाराम कॉलेजमध्येच प्राध्यापक होते. ते तेव्हा झंकार साप्ताहिक चालवत होते. अप्पासाहेब पवारांची बदली झाल्यानंतर झंकारमध्ये त्यांनी अप्पासाहेब पवारांवर गरळ ओकणारा लेख लिहिला. राजाराम कॉलेजची परंपरा वगैरे लिहिली. बाळकृष्णांच्या काळात कॉलेज सर्वोत्तम गणलं जायचं. खर्डेकरांनंतर थोडीफार उतरती कळा लागली. खर्डेकरांच्यानंतर डॉ. पवार या नावाचे गृहस्थ अनेक खटपटी लटपटी करून प्राचार्यपदावर आले. त्यांनी राजाराम कॉलेज हा मराठा विद्यार्थ्यांचा अड्डा बनवला असा मजकूर त्यात होता. मराठा विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी तेवढे स्वतंत्र ठेवण्याचे या गृहस्थांनी बाकी ठेवले होते, असे अप्पासाहेबांबद्दल लिहिले होते.

राजाराम कॉलेजमध्ये शेकडो विद्यार्थी होते; परंतु ना. सी. फडके यांच्या लिखाणाचा एनडी पाटील यांना प्रचंड राग आला. त्याचा प्रतिवाद करणारा लेख त्यांनी शं. बा. भोसले यांच्या 'लोकसेवक' मध्ये लिहिला. फडक्यांच्या लेखाची आणि त्यातल्या मुद्द्यांची चिरफाड केली. केवळ लेख लिहूनच थांबले नाहीत, तर फडके यांच्या निषेधाची सभा कोल्हापूरच्या नगरपालिकेच्या हॉलमध्ये घेतली. फडक्यांनी अप्पासाहेब पवार यांच्याविरोधात लिहिले हे निषेधाचे कारण नव्हते, तर अप्पासाहेब पवारांची बदली झाल्यावर त्यांनी लिहिले, हे कारण होते. अप्पासाहेब कोल्हापुरात असताना लिहिलं असतं, तर आक्षेप घेण्याचे कारण नव्हते, असे एनडींचे म्हणणे. अप्पासाहेब प्राचार्य असताना फडके म्याव मांजर होते. कधी हुंकार काढला नव्हता. बदली झाल्यावर झंकार निघू लागला याचा त्यांना विशाद वाटत होता. अप्पासाहेबही शिक्षक, फडकेही शिक्षक; परंतु फडके यांनी लिहिलेले आवडले नव्हते म्हणून त्यांनी जाहीर भूमिका घेतली. आपल्या बदली झालेल्या प्राचार्यांच्या बाजूने आणि सध्याच्या प्राध्यापकांच्या विरोधात भूमिका घेतली. निषेध सभेला विद्यार्थी, अनेक प्रतिष्ठित मंडळी आली होती. सगळ्यांनी फडक्यांच्या वर्तनाचा निषेध केला.

१९७५ मध्ये समाजवादी प्रबोधिनीची स्थापना करण्यात आचार्य शांताराम गरुड यांच्यासोबत एनडी पाटील, गोविंदराव पानसरे, प्राचार्य म. द. देशपांडे यांचाही पुढाकार होता. आचार्य गरुड यांची अभ्यासू वृत्ती, प्रश्न समजून घेण्याची, तो प्रश्न पटल्यावर त्याच्याशी तद्रूप होण्याची वृत्ती यामुळे प्रबोधिनीचे मार्गदर्शक म्हणून सर्वानुमते त्यांचे नाव निश्चित झाले. शास्त्रीय समाजवादाचं खुलं व्यासपीठ अशी समाजवादी प्रबोधिनीची ओळख आहे. प्रबोधिनीच्या इमारतीची पायाभरणी केली, तेव्हा समाजाच्या रागालोभाची पर्वा न करता देशात विज्ञाननिष्ठा निर्माण करण्याचा संदेश एनडी पाटील यांनी दिला. उदाहरण देताना म्हणाले, ''आपण सुधारणेला, प्रबोधनाला अभ्यासक्रमापासून सुरुवात केली पाहिजे. जो देव कधी पाहिला नाही तरी 'देवा किती तुझे सुंदर आकाश' असं म्हणतो. सशाचे कान लांब का झाले, कारण देवाने ते उपटले वगैरे. सशाचे कान लांब झाले, ही गोष्ट मुलांच्या मनात अंधश्रद्धा निर्माण करते. आकाश सुंदर का तर म्हणे ते देवाने निर्माण केले. क्रमिक पुस्तके मुलांना जे बाळकडू देतात तोच मुळी अवैज्ञानिक डोस आहे. क्रमिक पुस्तके

बदलली पाहिजेत. चौकसबुद्धी, विज्ञाननिष्ठा आली पाहिजे,'' अशी भूमिका त्यांनी त्या काळात घेतली. त्यानंतर वृत्तपत्रांतून एनडी पाटील यांच्याविरोधात अनेक पत्रेही छापून आली की, यांचेच कान लांब झालेत वगैरे.

शेतीमालाच्या प्रश्नावर कार्यकर्त्यांचे प्रबोधन करावं म्हणून 'शेतीमालाच्या किमती' ही पुस्तिका लिहिली. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणून त्यांनी त्यांच्यावर एक पुस्तिका लिहिली. शिक्षणाच्या प्रश्नावरची त्यांची पुस्तिका विशेष गाजली. त्याचाही एक किस्साच आहे. १९६७ साली तत्कालीन शिक्षणमंत्री मधुकरराव चौधरींचा आणि एनडी पाटील यांचा संघर्ष झाला. एस.एस.सीची परीक्षा ते दोन स्तरावर घ्यायला निघाले होते. एस.एस.सी. बोर्ड ऑर्डिनरी आणि एस.एस.सी. ॲडव्हान्स. तर ॲडव्हान्सची एस.एस.सी. म्हणजे हायर इंग्रजी, हायर मॅथेमॅटिक्स. ऑर्डिनरी एस.एस.सी. म्हणजे लोअर इंग्लिश आणि लोअर मॅथ्स. पण लोअर इंग्रजी, लोअर मॅथ्स, घेणाऱ्या पोरांचं भवितव्य काय तर झिरो, त्यांना सगळे दरवाजे बंद. अशा परिस्थितीमध्ये अनेक लोकांनी त्याचं समर्थन केलं; पण एन.डी. पाटील यांनी नाही केलं. १९६७ साली एनडी या प्रश्नावर ठामपणाने उभे राहिले. अनेकांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला की, आपल्या पोरांची कत्तल होते हो, आपल्या मुलांकरता ही सोपी परीक्षा आहे. त्यावर एनडी म्हणायचे, दुधाची गरज भागवण्यासाठी अश्वत्थाम्याची आई त्याला पाण्यात पीठ कालवून देत होती तसं करायचं आहे का? त्या वेळी एनडी मोठ्या प्रमाणावर सभा घेऊन जनजागृती करीत होते. एके दिवशी शेका पक्षाचे ज्येष्ठ नेते दाजिबा देसाई त्यांना म्हणाले, ''सभा घेतो आहेस ना, या सभा तुझ्या संपून जातील काय उपयोग आहे त्याचा? एक दिवस बसून लिहून काढ.'' मग त्यांनी एनडींना दोन दिवस कोल्हापूरला पी. जी. पाटलांच्या घरात कोंडून ठेवले. पी जी. पाटील तेव्हा कोल्हापुरात प्राचार्य होते. मग तिथं बसून त्यांनी 'श्वेतपत्रिकेचे कृष्ण स्वरूप' ही पुस्तिका लिहिली. लेखनाच्या बाबतीत एनडींचं म्हणणं असं होतं की, मी प्रचारक आहे. म्हणजे हे जे अकॅडेमिशीयन्स आहेत ना तसा मी नाही. मी ह्याचं सोंग आणत नाही. त्यामुळे माझ्या पुस्तकाचे मथळेसुद्धा त्या समोरच्या माणसाला कळावेत असे असतात.

शिक्षणाच्या प्रश्नावर शांताराम गरुड, प्राचार्य म. द. देशपांडे, पानसरे या सगळ्या मंडळींनी तगादा लावून शिक्षणावर एक पुस्तिका लिहून घेतली. त्या पुस्तिकेचा मथळा 'शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी' असा आहे. आपल्या वाचकांना केवळ टायटलमधून निम्मं अधिक कळावं, असा त्यांचा आग्रह असायचा.

प्रा. एन. डी. पाटील यांचा सामाजिक आणि राजकीय प्रवास पाहता ते एका आयुष्यात अनेक आयुष्ये जगत असल्याचा भास होतो. विधानपरिषदेत अठरा वर्षे आणि विधानसभेतील पाच वर्षे अशी सुमारे दोन तपांची त्यांची संसदीय कारकीर्द आहे. महाराष्ट्राचे सहकारमंत्री म्हणूनही त्यांनी दोन वर्षे समर्थपणे जबाबदारी पार पाडली आहे. शेती आणि शिक्षण या जिव्हाळ्याच्या विषयांवर ते सातत्याने बोलत आणि काम करीत राहिले. विधिमंडळात काम करताना महाराष्ट्र सरकारच्या श्वेतपत्रिकेचे कृष्णस्वरूप उघड केले. शेतकऱ्यांच्या लुटीचे वर्तमान सांगताना किफायतशीर शेतीची कैफियतही मांडली. कर्मवीरांच्या संस्कारात वाढले आणि पुढे रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन म्हणून काम करण्याची संधी मिळाली. रयतचे चेअरमन म्हणून काम करतानाच त्यांनी हे शिक्षण नेमके आहे तरी कोणासाठी ? या स्वतःच पूर्वी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे कृतीतून उत्तर दिले. भारतीय शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून राजकारणात कार्यरत राहिले. पक्षातील अनेक धुरिणांनी नंतरच्या काळात काँग्रेसची वाट धरली; परंतु सत्तेचा वारा त्यांना कधी मोहात पाडू शकला नाही. एका व्यक्तीने आयुष्यभर जवळपास साठ वर्षे एकाच पक्षात राहण्याचे देशाच्या राजकारणातील दुर्मिळ उदाहरण म्हणून एनडी पाटील यांच्या आयुष्याकडे पाहावे लागते. निष्ठा कशाला म्हणतात, हे त्यांच्या आयुष्याच्या वाटचालीतूनच दिसून येते.

**विजय चोरमारे**
वरिष्ठ सहाय्यक संपादक, महाराष्ट्र टाईम्स मुंबई
चलभाष : ९५९४९९९४५६
vijaychormare@gmail.com

▪▪

# अनिल अवचट : चिरवंचित वर्गाचा लेखक आणि तरुणाईचा सहोदर!

**ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार– विचारवंत दिवंगत डॉ. अनिल अवचट यांच्याविषयी त्यांचे सुहृद अरुण खोरे यांचा लेख**

**अरुण खोरे**

या वर्षीच्या २७ जानेवारीला सकाळीच साडेदहाच्या सुमारास डॉ. अनिल अवचट निधन पावल्याची बातमी समजली. मुंबईवरून लक्ष्मण गायकवाड यांचा फोन आला. पुण्यात दत्ता काळेबेरे यांच्याशी बोललो.

दुपारी अर्जुन डांगळे यांचा फोन आला. अर्जुनचे अलीकडेच दलित पँथर : अधोरेखित सत्य, हे नवे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. अर्जुनला या पुस्तकाची प्रत अनिलला द्यायची होती; पण ते राहून गेल्याची खंत त्यांच्या बोलण्यात होती.

या पुस्तकात साप्ताहिक मनोहरसाठी दलित पँथर फुटीच्या वादासंदर्भात अनिल अवचट यांनी ज्या मुलाखती घेतल्या होत्या, त्याचे संदर्भ अर्जुनने दिले आहेत. त्यामुळे हे पुस्तक त्याला द्यायचे राहून गेले, ही खंत त्याच्या बोलण्यात वारंवार येत होती.

समाजाची खोल बांधीलकी असलेला, समाजातील प्रश्नांवर आणि माणसाच्या जगण्याच्या प्रश्नांवर सतत लिहिणारा एक लेखक आपल्यातून निघून गेला. अनिल आपल्या सर्वांचा मित्र होता.

गेल्या वर्षी महाराष्ट्र साहित्य परिषदेने अनिल अवचट यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविले होते. त्या कार्यक्रमाला आम्ही गेलो होतो. पुण्यातील एस.एम . जोशी फाउंडेशनच्या सभागृहात २५ नोव्हेंबरला हा कार्यक्रम होता. पुरस्कार स्वीकारल्यानंतर अनिल थोडा लवकर निघाला होता. मी सभागृहाबाहेर त्याला गाठले आणि ''आपल्याला भेटायचे आहे,'' त्याला म्हटले. ''तू कधी येतोयस, मला सांग,'' असे त्याने आपुलकीने विचारले. त्यानंतर मग डिसेंबर महिन्यात मी त्याला भेटायला गेलो. त्या वेळी छान गप्पा झाल्या आणि नंतर महिनाभराने त्याच्या निधनाची बातमीसमोर आली.

एक लेखक, कार्यकर्ता आणि पत्रकार म्हणून अनिलच्या व्यक्तिमत्त्वाचे बहुमितीपण समजून घेणे तसे सोपे नाही; पण तो शोध मात्र घेतला पाहिजे. मी त्याच्या लेखनाचा आणि त्यातील लेखन विषयांचा विचार करतो तेव्हा एक गोष्ट लक्षात येते आणि ती म्हणजे तो समाजात फिरू लागल्यापासून, वावरायला लागल्यापासून लिहू लागला आहे आणि त्यामुळे माणसांच्या जगण्याच्या प्रश्नाचे एक खोल भान आणि त्याची वेदना त्या लेखनात आपल्याला जाणवते. आज मराठी साहित्यात अनिल अवचट यांची वेगळी ओळख आहे ती यामुळेच!

जगण्याच्या साध्यासुध्या प्रश्नांपासून ते जागतिकीकरणानंतरच्या विराट संकटापर्यंतच्या जगातील माणसांच्या जीवनातील छोटे–मोठे प्रश्न, ताण–तणाव



असा एक अफाट पसारा अनिलच्या या पुस्तकातून आपल्याला दिसतो.

हे प्रश्न त्याला कधी समजले? कधी लक्षात आले ? या प्रश्नांचे तीव्रतर अस्तित्व त्याने आपल्या लेखनातून कसे मांडले? आणि हे सर्व करत असताना आपले छंद जोपासत, समाजाची आपली नाळ न तुटता संवाद साधण्याची त्याची इच्छा अपेक्षा हा देखील एक वेगळा प्रवास आहे.

खुद्द अनिलनेच गेल्याच वर्षी डिसेंबरमध्ये प्रकाशित झालेल्या 'आणखी काही प्रश्न', या नव्या पुस्तकात आपल्या लेखन प्रवासाचा मागोवा घेतला आहे. त्यानुसार १९६६ पासून अनिल लिहीत आला आहे. १९६९ मध्ये त्याचे पहिले पुस्तक प्रसिद्ध झाले. त्याच्या सार्वजनिक जीवनाला एक सुंदर आकार दिला तो बाबा आढाव यांनी, आणि हे अनिल अनेकदा सांगत होता.

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात डॉ. बाबा आढाव यांच्यामुळे एक व्यापक असे सामाजिक आणि वैचारिक स्नेहाचे वर्तुळ निर्माण झाले आहे, या वर्तुळातील एक महत्त्वाचा घटक म्हणजे अनिल अवचट... शिवाय मराठी साहित्यातले त्याचे स्थान इतके वेगळे की, त्याची तुलना नाही करता येणार. महिन्यापूर्वीच अनिलला त्याच्या घरी जाऊन भेटलो होतो. त्याच्याशी तासभर गप्पा मारल्या होत्या. त्याने त्याचे पुस्तक मला भेट दिले होते आणि मी ही त्याला माझे गांधीजींच्या कोटेशनचे पुस्तक दिले होते.

अनिलची आणि माझी प्रत्यक्ष भेट होण्यापूर्वी 'पूर्णिया', या एका सुंदर पुस्तकातून तो मला भेटला होता. या पुस्तकाला नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना होती. या पुस्तकातून अनिलने आम्हाला बिहारमधील एका वेगळ्याच जगात नेले होते. मी पूर्णिया वाचल्यानंतर खूप भारावून गेलो होतो. एक म्हणजे अनिलची त्यातील शैली, आज मराठी पत्रकारितेत रिपोर्ताज म्हणून मान्यता पावली आहे; त्याचे एक सुंदर दर्शन मला पूर्णिया वाचताना घडले.

थोर नेते एस. एम. जोशी यांच्याबरोबर अनिलने हा बिहारचा दौरा केला होता. पूर्णिया जिल्ह्यातील गरिबी, दारिद्र्य आणि एकूण सामाजिक प्रश्न याचा शोध घेणारे ते पुस्तक जेमतेम ८० पानांचे होते. या पुस्तकाचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे त्याला नरहर कुरुंदकर यांची प्रस्तावना होती आणि त्यांनी अनिलचे कौतुक केले होते, त्याच्या लेखनाला शाबासकी दिली होती.

अनिलने या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले होते: ''ही नुसती बिहारची हकीकत नाही, सगळ्या उत्तर भारताची, खरं तर आपणा सगळ्यांची आहे. निसर्ग आणि गरीब यांना केंद्रस्थानी ठेवून राज्य करता येईल का? यांचा विकास झाला तरच देशाचा विकास झाला असं म्हणूयात का आपण? शहराकडे धावणारे असाहाय्य माणसांचे लोंढे हे प्रगतीचे लक्षण मानायचे की कसले? हे सगळे प्रश्न या पुस्तकाने माझ्यासमोर उभे केले. ते या पिढीच्या वाचकांपुढेही उभे राहिले तर मी समजेन की,चला अजून आशेला जागा आहे.''

'बिहारच्या चिरवंचित माणसाचे हे ओझरते दर्शन आहे,' असे आरंभीच कुरुंदकरांनी लिहिले आहे. 'अवचट यांचे लेखन म्हणजे एका समाजवादी निष्ठेच्या तरुणाची, प्रतिकारशून्य सामाजिक गुलामगिरीच्या समाजरचनेविषयीची ही प्रतिक्रिया आहे,' असेही ते लिहितात. ही प्रस्तावना वाचत असताना आपल्याला बिहारच्या प्राचीन इतिहासाचे, समाज रचनेचे, परंपरेचे एक व्यापक आणि सखोल दर्शन कुरुंदकर घडवतात आणि

त्यामुळे आपण अधिक अंतर्मुख होतो.

इथे एक गोष्ट नोंदवली पाहिजे आणि ती म्हणजे, हे पुस्तक अनिलने युवक क्रांती दलास अर्पण केले आहे. त्यामुळे परिवर्तनासाठी उत्सुक असलेला एक तरुण लेखक यातून आपल्याला स्पष्टपणे दिसतो. अनिलने जवळपास बावन्न वर्षांपूर्वी लिहिलेले लेखन आजही आपल्याला विविध प्रश्नांनी अंतर्मुख करते.

दोन वर्षांपूर्वी लॉकडाऊन काळात, जेव्हा १६ मजूर औरंगाबादजवळ मालगाडी खाली ठार झाले, त्या वेळी त्यांच्या भयंकर अशा जीवन प्रवासातील दुःखाचे हुंदके देखील आपल्याला ऐकायला मिळाले नाहीत.

पूर्णिया पुन्हा वाचत असताना मला मालगाडी खाली चिरडल्या गेलेल्या त्या १६ गरीब मजुरांची आठवण होत होती. रेल्वे रुळामध्ये पडलेल्या त्यांच्या अन्नपदार्थांच्या पिशव्या, त्यांचे साधे फाटके कपडे हे पाहत असताना त्यांचा साधा हुंदकाही आपण ऐकलेला नाही, हे ही मनाला टोचत होते.

अनिल अवचटांच्या पूर्णियाने बावन्न वर्षांपूर्वी बिहारच्या एका जिल्ह्यातील सामाजिक गुलामगिरीची व्यवस्था आपल्यासमोर मांडली होती. या व्यवस्थेत बदल किती झाला आहे, असा प्रश्न पुन्हा एकदा विचारावा लागेल. अनिलसारख्या लेखकांचे लेखन, त्याची पुस्तके याचे मोल महत्त्वाचे का, हे यातून आपल्या लक्षात येईल. या पुस्तकानंतर अनिल प्रत्यक्ष भेटत राहिला.

अनिलच्या नवनव्या पुस्तकांनी समाजातील कठोर प्रश्न अधोरेखित केले. तरुणांच्या जगातील समस्यांना वाचा फोडली. माझ्यासारखे अनेक पत्रकार त्याच्या संपर्कात येऊ लागले, तो आम्हा सर्वांचा सहोदर होता, मित्र होता.

काही वर्षे तो साधनेचा संपादक होता, मराठीतील विविध दिवाळी अंकांत दर्जेदार लेखन करणारा एक फिरता असा लेखक होता.

अनिलच्या अनेक पुस्तकांनी मराठी साहित्यातील विविध दालने समृद्ध झाली आहेत. हमीद दलवाई यांचा तो जवळचा मित्र होता. त्याच्यावरचे 'हमीद', हे त्याचे पुस्तक सर्वांनाच माहीत आहे. सामाजिक आणि वास्तविक जगतातले प्रश्न टिपत त्याने लिहिलेली वेध, छेद, माणसं, प्रश्न आणि प्रश्न ही पुस्तके त्याच्या नावावर आहेत. समाजातील कुप्रथा, परंपरेने पुष्ट केलेली विषमता आणि त्यामुळे स्त्रियांचे होणारे शोषण, वंचित मागास वर्गातील समाजाची कोंडी यावरही त्याची अनेक पुस्तके हळूहळू येत गेली.

संभ्रम, वाघ्या मुरळी, कोंडमारा, गर्द, धागे उभे आडवे, धार्मिक, अशी अनेक पुस्तके त्याची साक्ष देतात. तो स्वतः एक उत्तम कलावंत आहे त्यामुळे मोर हा त्याचा आवडता पक्षी मूळ हे मोराची चित्रे, मोराची कविता हा त्याच्या साहित्याचा एक भाग झाला आहे त्याचा ओरिगामीचा छंद, सुतारकामाचा छंद या सगळ्यांची ओळख छंदांविषयी, या त्याच्या पुस्तकात होते. अमेरिका दौऱ्यावरील त्याचे पुस्तकही नेहमीच्या किंवा रूढ साच्यातील प्रवास वर्णनापेक्षा खूप वेगळे आहे.

ज्या लेखकाची सुरुवात पूर्णिया या पुस्तकापासून झाली, त्याचे अखेरचे पुस्तक विविध प्रश्नांचा वेध घेणारे, 'आणखी काही प्रश्न,' हे असावे, ही सुसंगती बहुधा अनिलने आणि त्याच्या नियतीने ठरवली असावी का?

या त्याच्या पुस्तकात एड्सग्रस्त, घाणीची दुनिया, ऊसतोड कामगार आणि ट्रक ड्रायव्हर, विजेचा खेळखंडोबा, खारपड जमिनीचा प्रश्न, धरणांची वास्तपुस्त हे विषय आहेतच! याखेरीज गावांची शहरे बनताना, या संदर्भात आळेफाटा आणि चाकण या दोन गावांचा अभ्यास त्याने लिहिला आहे.

होरपळलेली माणसं, ॲक्सेस चिल्ड्रन, शेवटची लढाई हे विषय देखील त्याच्या या पुस्तकात वाचायला मिळतात. ज्यांचे जगणे अवघडले आहे, ज्यांची कोंडी झाली आहे, अशा सर्वांसाठी शोध घेत अनिल फिरायचा आणि ते सगळे जगणे, त्यांचे सगळे प्रश्न आपल्या लेखनातून पुस्तकातून समाजासमोर ठेवायचा.

भारतातीलच नाही, तर जगातील पत्रकारितेत असे काम करणारे आणि लेखन करणारे किती लेखक-पत्रकार असतील याचा शोध घेतला तर या सर्वांचा पायोनियर म्हणून अनिल अवचट याचे नावसमोर आले, तर मला आश्चर्य वाटणार नाही.

मी सकाळमध्ये विद्यार्थी बातमीदार म्हणून काम करत असतानाच बाबांच्या नाना पेठेतील कार्यालयात जात असे. तेथे अनिल आणि सुनंदाची भेट झाली आणि मग हे नाते जोडले गेले. सकाळमध्ये असलेले वरिष्ठ सह संपादक



अरुण खोरे यांच्या संग्रहातून

**अनिल अवचट आणि हमीद दलवाई**

आणि नंतर साप्ताहिक सकाळचे संपादक झालेले सदा डुंबरे हे अनिल आणि सुभाष अवचट यांचे गाववाले मित्र, म्हणजे सर्व जण ओतुरचे. त्यामुळे त्यांचे सकाळमध्ये येणे-जाणे असायचे. मी नंतर लोकसत्ताला गेल्यावर देखील आणि काही वेगळ्या बातम्यांच्या निमित्ताने अनिल भेटायला येत असे. लोकसत्ता पुणे आवृत्तीचे कार्यालय पुणे कॅम्प भागात असल्यामुळे तो बऱ्याचदा मुक्तांगण केंद्रावरून लोकसत्तेच्या ऑफिसमध्ये येत असे. त्या काळात त्याने मोठ्या प्रमाणात सुनंदासह मुक्तांगण आणि व्यसन मुक्तीसाठी काम केले. त्यांना या कार्यात पु. ल. आणि सुनीताबाई देशपांडे यांचे मोठे सहकार्य झाले होते.

एकदा अनिल दिवाळीच्या सुमारास आला आणि मी त्याला विचारले, ''सध्या काय सुरू आहे?'' त्याने मला त्याच्या शबनम पिशवीतून मोराचे चित्र आणि त्याला जोडलेली कविता अशी शुभेच्छा पत्रे दाखवली. दिवाळीसाठी ही शुभेच्छा पत्रे लोकांनी विकत घ्यावीत आणि त्यातून मुक्तांगण संस्थेला मदत करावी, असे ते आवाहन होते. मग आम्ही ती बातमी छापली.

याबाबत बोलत असताना देखील हातात कागद घेऊन अनिल ओरिगामी चित्र तयार करत होता. त्याचे हे विलक्षण असे सृजनशील हात आणि त्यात गुंतणारे त्याचे डोके आणि अंत:करण हे काहीतरी वेगळेच रसायन होते.

अनिल दरवर्षी व्यक्तिचित्रणात्मक असे लेखन मौज दिवाळी अंकात करत असे...

एकदा त्याने 'पुण्यातील तीन व्यावसायिक', असा एक लेख लिहिला होता. मौज दिवाळी अंकात तो वाचल्यावर मी चकित झालो होतो. बुधवार चौकातील रतन टॉकीजसमोर गाडी लावणारे, भागवत नावाचे चिवडेवाले यांच्यावर एक भाग त्यात होता. सकाळमध्ये असताना आठवड्यामध्ये दोन-तीन वेळा तरी मी आणि डुंबरे, कधी तरी साळुंखे असे या भागवत चिवडेवाल्यांकडे आम्ही जात असू. मौज दिवाळी अंकात वाचल्यावर मी भारावून गेलो आणि मी त्या चिवडेवाल्याकडे गेलो. रामचंद्र भागवत चिवडेवाले असे त्यांचे नाव असावे. त्यांना मी या लेखाचे सांगितल्यावर ते मला म्हणाले की, काही दिवसांपूर्वी अवचट येथे येऊन गेले होते. तिथे ते कधी तरी चिवडा पार्सल घेऊन जातात. बोहरी आळी

मधल्या एका व्यावसायिकावरही त्यांनी असेच लिहिले होते.

अगदी अलीकडच्या काळात आर्यन खान आणि समीर वानखेडे असा सामना वृत्तवाहिन्यांवर सुरू झाल्यावर मला अनिलच्या एका जुन्या पुस्तकाची आठवण झाली. 'गर्द', हे त्या पुस्तकाचे नाव. पुण्यात कुठे अमली पदार्थ किंवा ड्रगसारखे पदार्थ मिळतात आणि त्यात तरुण मुले कशी अडकली आहेत, याचा शोध त्यांनी त्या पुस्तकात घेतला होता. हे पुस्तक साधारण१९८०/८२ च्या दरम्यान पुण्यातील श्री विद्या प्रकाशनचे मधुकाका कुलकर्णी यांनी प्रकाशित केले होते. भविष्यात जी संकटे भारतातील तरुणांपुढे वाढून ठेवली होती, त्याचा दूरगामी दृष्टीने शोध घेणारा अनिल हा लेखक होता आणि त्याचे वेगळेपण आणि दूरदृष्टी या पुस्तकातून ही जाणवते, अगदी आजही!

डिसेंबर महिन्यात (२०२१) शेवटच्या आठवड्यात अनिलच्या घरी गेलो. सकाळची वेळ होती. त्याला मी संपादित केलेले गांधीजींच्या मराठी इंग्रजी कोटेशनचे पुस्तक दिल्यावर मला अनिलने  तुला माझे एक पुस्तक मी देतो, असे म्हणत तो उठला आणि त्याने समोरच्या पुस्तकांच्या कपाटातील एक  पुस्तक शोधून मला दिले.

मी सहजगत्या पुस्तकांच्या कपाटाकडे नजर टाकली आणि खरोखर नव्याने थक्क झालो. कितीतरी अनिलची पुस्तके त्यात  मला दिसत होती. अमेरिका नावाचे प्रकरण असेल, माणसं आणि अशा अनेक पुस्तकांचा एक मोठा लेखक माझ्यासमोर बसलेला होता आणि आम्ही छान गप्पा मारत होतो.

अनिलच्या आवाजात एक कायम प्रेमाचा, जिव्हाळ्याचा ओलावा असायचा आणि त्यामुळे त्याची आपुलकी आपल्या मनाला नेहमीच स्पर्श करणारी असायची.

मराठीमध्ये रिपोर्ताज हा एक लेखन प्रकार गेली काही वर्षे रुळला आहे, त्याचे मोठे श्रेय अनिलला दिले पाहिजे, असे मी वर म्हटले आहेच. प्रत्यक्ष जागेवर जाऊन, प्रश्न समजून घेऊन, लोकांशी बोलून लिहिले पाहिजे याची एक अतिशय चांगली वाट त्याने मराठी पत्रकारितेत, मराठी साहित्यात घालून दिली आणि आज त्या वाटेवरून अनेक पत्रकार व लेखक विना अडथळा जाताना आपण पाहतो, तेव्हा अनिलच्या या लेखनाला सलाम केल्याशिवाय राहवत नाही.

**मराठीमध्ये रिपोर्ताज हा एक लेखन प्रकार गेली काही वर्षे रुळला आहे, त्याचे मोठे श्रेय अनिलला दिले पाहिजे, असे मी वर म्हटले आहेच. प्रत्यक्ष जागेवर जाऊन, प्रश्न समजून घेऊन, लोकांशी बोलून लिहिले पाहिजे याची एक अतिशय चांगली वाट त्याने मराठी पत्रकारितेत, मराठी साहित्यात घालून दिली आणि आज त्या वाटेवरून अनेक पत्रकार व लेखक विना अडथळा जाताना आपण पाहतो, तेव्हा अनिलच्या या लेखनाला सलाम केल्याशिवाय राहवत नाही.**

गेल्या दोन-तीन वर्षांत बाबा आढाव, दत्ता काळेबेरे, शारदा वाडेकर, मुकेश बामणे, मोहन वाडेकर यांच्या अनेक भेटी झाल्या. त्यातून अनिल अवचट यांचीही नवी ओळख किंवा आहे तीच ओळख अधिक समृद्धपणे अधोरेखित झाली.

महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीच्या पन्नास-साठ वर्षांच्या काळात अनिलने जे योगदान दिले ते योगदान आपल्याला विसरता येणार नाही. 'पुरोगामी सत्यशोधक', या त्रैमासिकाच्या आरंभीच्या संपादक मंडळात तो होता, कार्यकारी संपादक म्हणूनही तो काम करत होता. शिवाय बाबा आढाव यांच्याबरोबर अनेक सामाजिक चळवळीच्या प्रवासात तो भ्रमंती करत असे. निपाणीतील तंबाखू कामगार महिलांचे दुःख अंधेरनगरी निपाणी, या लेखात त्याने पुरोगामी सत्यशोधक मधून मांडले होते. असे किती तरी विषय तो सतत लिहीत होता. आता परवाच्या २०२१ मौज दिवाळी अंकात त्याने बाबा आढाव यांच्यावरही एक सुंदर लेख लिहिला आहे.

महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील एक मोठे पर्व

असलेल्या, 'एक गाव – एक पाणवठा', या पुस्तकाबाबत अनिल अवचट यांनी किती आग्रह केला आणि लिहिण्याचा पाठपुरावा केला होता याचा उल्लेख बाबांनी त्यांच्या या पुस्तकात प्रस्तावनेत केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीतील अनिलचे वेगळे योगदानही विसरता येणार नाही.

बाबांची दोन्ही मुले अलीकडेच पुण्यात आली होती. त्या वेळी अंबरने आढाव आणि अवचट कुटुंबीय एकत्र आल्याचे काही फोटो समाज माध्यमावर शेअर केले होते. त्या वेळी बाबांच्या बरोबर असलेला अनिल किती आनंदात दिसत होता.

आज अनिलच्या निधनाच्या बातमीनंतर शेकडो मित्रांनी फेसबुकवर आणि व्हॉट्सॲपवर फोटोसह आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मुक्ता आणि यशोदा या आपल्या दोन्ही लेकींकडे मुक्तांगणची जबाबदारी सोपवून अनिल निघून गेला आहे. अनिलची वेगवेगळी पुस्तके आणि त्याची सामाजिक उत्तर दायित्वाची स्वच्छ अशी भूमिका आणि त्यांनी सुरू केलेले काम यामधूनच त्याची आठवण आपल्या सर्वांना राहणार आहे.

अनिलच्या अनेक गोष्टींची आज आठवण येते. फेसबुकवर मधल्या काळात तो त्याच्या आईच्या संबंधात लिहीत होता. काही दिवस तो नियमितपणे कबिराचे दोहे मराठी करून लिहीत असे. तेही आपण वाचत असू. सुंदर आणि साधे मराठी, थेट मनाला भिडणारे हे लेखन हेच अनिलचे वेगळेपण होते.

अनिलसारखा माणूस खूप मोठा असतो, तो सगळाच अवकाश आपल्याला गवसतो असे नाही. जगन्नियंता, काही साचे असे बनवतो; की ते पुन्हा निर्माण होत नाहीत. अनिल अशा दुर्मिळ वर्गातला होता.

एक शेवटची आठवण...

हा या वर्षातला शेवटचा (२२ डिसेंबर२०२२,) आठवडा. अनिलचा काल फोन आला आणि आज भेटायचे ठरले. बऱ्याच वर्षांनी त्याच्या घरी जात होतो. पूर्वी सुनंदा असताना एक दोन वेळा गेलो होतो.

त्याच्यापूर्वी डॉ. बाबा आढाव यांच्या दवाखान्यात सुनंदा काम करत असे, त्या काळात सुनंदाला नेण्यासाठी तो येत असे... त्या वेळीही कधी कधी या दोघांच्या भेटी होत असत. मराठीतला शैलीदार लेखक आणि मुख्य म्हणजे समाज आणि माणसे समजून–उमजून सातत्याने लिहिणारा हा एक वेगळा लेखक. माणसांच्या जगण्याच्या प्रश्नाभोवती रुंजी घालत ते समजून घेण्याचा प्रयत्न करत अनिल गेली अनेक वर्षे लिहीत आला आहे.

आज सकाळी थोडा वेळ गप्पा झाल्या. समकालीन प्रकाशनने काढलेले त्याचे नवीन पुस्तक आणखी काही प्रश्न, हे मला भेट दिले. मी त्याला गांधीजींच्या विचारांचे संकलन असलेले माझे एक पुस्तक या वेळी भेट दिले.

खूप पुस्तके असलेल्या त्याच्या खोलीत मी बसलो होतो. किती पुस्तके त्याने लिहिली आहेत, ती पाहायची जरी म्हटली तरी आपण थक्क होतो.

पुण्यातील पत्रकारनगरमध्ये असलेल्या त्याच्या घरी गप्पा मारत असताना सदाचा (सदा डुंबरे), विषय निघाला नसता तरच नवल! तुझी आणि सदाची कधी ओळख झाली, असे त्याने मला विचारले. मी काही सांगत होतो, मला माझ्या संग्रहात असलेला एक फोटो आठवला. मी अनिलला म्हटले,''त्या फोटोमध्ये तू पण आहेस. सदाच्या लग्नाच्या दिवशी काढलेला तो फोटो आहे.'' अनिल म्हणाला, ''अरे, अरुण, सदाचे लग्न माझ्या घरीच ठरले. दोघांनी पसंत केल्यावर मी घरूनच फोन करून पूनमचा हॉल बुक केला होता.''

असे विषय होत होत गांधींवर मी काय लिहितो आहे, अशा थोड्या गप्पा झाल्या. त्याने गांधींवर लिहिलेले लेख मौज किंवा मॅजेस्टिक प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या एका पुस्तकात आहेत असे तो म्हणाला. त्याचा लिहिण्याचा उत्साह कायम आहे. आम्ही छानशी कॉफी घेतली आणि आणि मग मी बाहेर पडलो...

**अरुण खोरे,** पुणे.
संपादक: लोकशाहीसाठी समंजस संवाद, पुणे.
vijaychormare@gmail.com

# घेतला वसा-

दिवंगत अभिनेत्री आणि गायिका
कीर्ती शिलेदार यांच्या व्यक्तिमत्त्वाचा
आणि कर्तृत्वाचा परिचय करून देणारा
श्रद्धांजलीपर लेख

माधव वझे

सहज सुंदर अभिनयाने आणि भावपूर्ण व नेटक्या गायनाने अल्पावधीत नाव मिळविलेल्या कीर्ती शिलेदारचा मधूनच डोकावणारा अल्लडपणा, तिची सभ्य आक्रमकता, लडिवाळ हट्टीपणा... वय वाढले तरी ते सगळे कसे अगदी पूर्वीसारखे होते. त्यामुळेच तर मराठी नाट्यसृष्टीमध्ये सगळ्यांना तिच्याबद्दल एक जवळीक वाटत होती. कोणीच तिला कीर्तीबाई किंवा कीर्तीताई केले नाही. ती होती कीर्ती. जशी होती भक्ती; भक्ती बर्वे.

शिलेदार कुटुंबीयांच्या मराठी रंगभूमीने १९७० च्या आसपास संगीत स्वयंवर नाटक केले. साहजिकच कीर्ती रुक्मिणीच्या भूमिकेत होती. तिला त्या भूमिकेत पाहिलेल्या प्रत्येक प्रेक्षकाची उत्स्फूर्त प्रतिक्रिया अशी होती की, अगदी बालगंधर्वांपासून ते आत्ता आत्ताच्या अभिनेत्रींपर्यंत कोणीच कीर्तीइतके त्या भूमिकेला अनुरूप नव्हते. 'दादा ते आले ना' असे लडिवाळपणे रुक्मीला सांगणारी आणि खडा मारायचा झाला तर अशा कल्पनाविश्वात क्षणभर गुंग होणारी रुक्मिणी कीर्तीने नखशिखांत उभी केली. अभिनय आणि गायनाचा मुद्दा उपस्थित करून कोणी तर-तम करू शकेल; पण भूमिकेच्या व्यक्तिमत्त्वाच्या विश्वासार्हतेचा प्रश्न असेल, (आणि तो असलाच पाहिजे) तर कीर्तीची रुक्मिणी सर्वोत्तम म्हणता येईल. प्रश्न येतो, पूर्वीच्या नट-नटींच्या तुलनेने कीर्तीच्या अभिनयाचा आणि गायनाचा. तिथेही कीर्तीचे निखालस कौतुक केले आहे ते साक्षात पं. भास्कर चंदावरकर यांनी. त्यांनी म्हटले आहे, '...आधुनिक वाटणारा गळासुद्धा हे नव्या पारंपरिक स्वरांचे मोठे शिवधनुष्य-गंधर्वधनुष्य म्हणा-उत्तमपैकी पेलतो हे शिलेदार मंडळींनी, विशेषतः कीर्ती शिलेदारांनी शंकातीत असे सिद्ध केले...'

बुजुर्गांकडून असे कौतुक होते, त्यामागे त्या कलाकाराने केलेली अविरत साधना असते. असेही म्हणता येईल, की ते कौतुक त्या साधनेचेच असते.

कीर्तीने तशी साधना अजाणतेपणाने तिच्या वयाच्या दहाव्या वर्षीच सुरू केली होती. लता आणि कीर्ती या बहिणींचे आई-वडील जयराम आणि जयमाला शिलेदार, दोघेही बालगंधर्वांचे निस्सीम उपासक. आई-वडील करत असलेली संगीत नाटके दोन्ही बहिणींना बालवयातच पाहायला मिळत होती आणि या बहिणी घरी येऊन त्या प्रयोगांची नक्कलही करीत होत्या. त्या नकलांचे योग्य तेवढे कौतुक झाल्यावर वडिलांनी बोलून दाखविले, की नकला वगैरे ठीक आहेत; पण एखादी चांगली गोष्ट घडण्यासाठी काय कष्ट पडतात त्याची जाणीव मुलांना व्हायला पाहिजे.



म्हणून या दोन बहिणी वय वर्षे अनुक्रमे बारा आणि दहा, आणि त्यांचा चुलत भाऊ रमेश-आठ वर्षांचा यांचे तीनपात्री संगीत सौभद्र नाटक बसविण्याचा घाट त्यांनी घातला. गायनाच्या आणि अभिनयाच्या अशा स्वतंत्र तालमी सुरुवातीला व नंतर एका टप्प्यावर एकत्रितपणे अशा तब्बल वर्षभर तालमी केल्यानंतर ते तीनपात्री सौभद्र सिद्ध झाले. जयराम आणि जयमाला यांच्या मराठी रंगभूमीने नाही, तर तीन शिलेदार यांनी २८ नोव्हेंबर १९६३ ला प्रयोग केल्याचे इतिहासात नोंदले गेले.

लहान मुलांना संगीत सौभद्र आणि तेही तीनपात्री सौभद्र करायला लावण्यामध्ये काय औचित्य होते, असा प्रश्न कोणालाही पडेल आणि ते योग्यच आहे. त्याची चर्चा होऊ शकते; पण अभिनय आणि गायन यांचे शिक्षण आणि सराव वर्षभर करीत राहिल्याने, त्या निमित्ताने संपूर्ण वेशभूषा घरीच तयार केल्याने जे काही विचारमंथन झाले असेल, जी काही चर्चा होत राहिली असेल, ते कुठेतरी त्या लहान मुलींच्या मनामध्ये झिरपले असेलच. कळत-नकळत त्यांना एक मर्मदृष्टी मिळाली असणार. माझा मित्र सत्यदेव दुबे म्हणायचा, की 'आधी मंत्र पाठ करा; त्याचा अर्थ योग्य वेळी ध्यानात येईल' आणि हे तर खरे, की आई-वडिलांनी या लहान मुलींच्या जीवनात जे पेरले ते पुढे चांगलेच तरारले. कीर्तीने पुढे स्वयंवर बरोबरच, संगीत सौभद्र, मानापमान, संशयकल्लोळ, कान्होपात्रा, मृच्छकटिक, ययाती आणि देवयानी इत्यादी नाटकांमध्ये नायिकेच्या भूमिका केल्या आणि ती प्रेक्षकांची आवडती झाली. फक्त 'मराठी रंगभूमी'ने केलेल्या प्रयोगांमध्येच नाही, तर इतर व्यावसायिक नाट्यसंस्थांमध्येही तिने त्या केल्या. त्या करताना मराठी रंगभूमी या घरातल्या नाट्यसंस्थेने केलेल्या संस्कारांचे भान मात्र तिने कधीही सुटू दिले नाही.

संगीत नाटकांमधील तिच्या प्रवासामध्ये प्रेक्षकांच्या आणि तिच्याही दृष्टीने अतिशय संस्मरणीय ठरले ते मराठी रंगभूमीने १९७२ मध्ये केलेले संगीत स्वर-सम्राज्ञी हे नाटक. कीर्तीला डोळ्यासमोर ठेवून आपण नाटक लिहिल्याचे नाटककार विद्याधर गोखले यांनी त्यांच्या प्रस्तावनेमध्ये म्हटलेच आहे, आणि स्वतः कीर्तीनेही तिच्या मुलाखती, भाषणे आणि लेखांमधून त्या नाटकाच्या निमित्ताने सविस्तर विवेचन केले आहे.

संगीत-सामाजिक नाटक स्वर-सम्राज्ञी हे My Fair Lady वर आधारलेले आहे. तमाशातल्या एक गायिकेचे प्रथितयश गायिकेमध्ये होणारे रूपांतर हा नाटकाचा विषय. त्यामुळे लावणी, गझल, ठुमरी, ख्याल, भावगीत अशा विविध काव्य आणि गानप्रकारांना तिथे मुबलक वाव आहे. तमाशातली गायिका मैना हिलाच शास्त्रीय गायनाचा तिटकारा. म्हणजे गावोगावीच्या प्रेक्षकांना मैना त्यांच्यापैकीच एक वाटणारी. साहजिकच मैनेचे हे नाटक लोकप्रिय झाले. कीर्तीने म्हटले आहे, की एसटी. पोहोचणार नाही अशा खेड्यातही हे नाटक बिनधास्तपणे त्यांची संस्था रंगवू शकली. कीर्तीपुरते म्हणायचे तर तिच्यातला अल्लडपणा, निरागस हट्टीपणा, सभ्य आक्रमकता, आणि मुख्य म्हणजे तिचे वय असे बरेच काही मैनाच्या प्रतिमेशी तंतोतंत जुळणारे ठरले. संगीत नाटकांमध्ये विविध प्रमुख भूमिका ती करीत आली असल्यामुळे, गायनाचा काही प्रश्नच नव्हता. या नाटकाचा प्रयोग पाहिल्यावर पं. भास्कर चंदावरकर यांनी लिहिले की उंच स्वरात, नोकदार आवाजात गाण्याची अलीकडची पद्धती आहे. कीर्तीबाईंचा आवाज त्याच जातीचा; परंतु लावणी, ठुमरी, तान, फिरत अशा सर्व ठिकाणी त्यांनी नाट्यसंगीताच्या सर्व अपेक्षा पूर्ण केल्या.

जाणकारांनी तिची अशी प्रशंसा केली असली तरी स्वतः कीर्तीचा अनुभव काही वेगळे सांगतो. आपले अभिनय आणि गायनाचे यथार्थ शिक्षण खरे तर या

**आपल्या अभिनयाने आणि गायनाने संगीत रंगभूमीला समृद्ध केलेल्या कीर्तीने त्या रंगभूमीवरचे तिचे अनुभव वेळोवेळी सांगितले आहेत आणि त्या संदर्भात तिने जे चिंतन केले आहे ते मोलाचे आहे. मराठी रंगभूमी या घरातल्या संस्थेने संगीत रंगभूमीच्या पडत्या काळामध्ये, त्या रंगभूमीला तिचे चैतन्य पुन्हा मिळवून देण्यासाठी काही प्रयत्न केले. लोकप्रिय असलेल्या नाटकांबरोबर नव्या नाटककारांचीही संगीत नाटके संस्थेने सादर केली. त्यामध्ये गो.नी. दांडेकरांचे 'मंदोदरी' हे नाटक होते, 'गा भैरवी गा' हे गुरुराव कुलकर्णी यांचे नाटक होते; हंबर्डे यांचे 'बाजीराव मस्तानी' होते; शिवाय चिं. त्र्यं. खानोलकरांचे 'अभोगी' नाटक होते. आणखीही काही नाटके संस्थेने करून पाहिली; पण त्यापैकी कोणतेच नाटक चालले नाही. ही वस्तुस्थिती मान्य करून कीर्ती म्हणते, की ''त्यांच्या संस्थेने सादर केलेल्या नव्या संगीत नाटकांपैकी बहुतेक नाटकांमध्ये मनात रुंजी घालण्याचे सामर्थ्य नव्हते. त्यांचा आत्मा संगीताचा नव्हता. पदे असलेली ती गद्य नाटकेच होती.''**

नाटकाबरोबर सुरू झाले असे तिने म्हटले आहे. नाटकातली 'कशी केलीस माझी दैना' ही बैठकीच्या बाजाची लावणी म्हणताना तानबाजी किंवा गायकीची कोणतीच करामत करण्याची गरज नाही; केवळ लयीचा तोल सांभाळून वजनदारपणे शब्द टाकले तरी रसिकांची दाद मिळते असा तिचा अनुभव; पण लयीत शब्द टाकताना श्वासाचेही खूप महत्त्व असते, हे तिला नव्यानेच कळले. गाण्यात दर्द पाहिजे असे कोणीकोणी म्हणायचे; पण म्हणजे नेमके काय ते आपल्याला माहीत नव्हते; ते आकळले त्यालाही निमित्त झाले स्वर-सम्राज्ञी नाटक, आणि हे नाटक करण्यापूर्वी आपण एक्स्प्रेशन्स देत असायचो; पण या नाटकाबरोबर ती एक्स्प्रेशन्स आपोआप उमटू लागली असेही तिने प्रांजळपणे कबूल केले आहे. (अधोरेखिते प्रस्तुत लेखकाची).

अभिनेत्री आणि गायिका म्हणून तिचा जो सर्वांगीण विकास झाला, तिला तिची स्वतःचीच ओळख नव्याने झाली याचे संपूर्ण श्रेय तिने तिचे गुरू, संगीतकार पं. नीलकंठ अभ्यंकर यांना दिले आहे. गुरूप्रति आदरभाव व्यक्त करताना ती म्हणते, ''ढोबळ गोष्टी बिनचूक करण्यात धन्यता मानणारे आम्ही ताज्या दमाचे लोक, बारकावेसुद्धा वेचायचे असतात या नव्या जाणिवेने आनंद-चकित होऊन गेलो.''

आपल्या अभिनयाने आणि गायनाने संगीत रंगभूमीला समृद्ध केलेल्या कीर्तीने त्या रंगभूमीवरचे तिचे अनुभव वेळोवेळी सांगितले आहेत आणि त्या संदर्भात तिने जे चिंतन केले आहे ते मोलाचे आहे. मराठी रंगभूमी या घरातल्या संस्थेने संगीत रंगभूमीच्या पडत्या काळामध्ये, त्या रंगभूमीला तिचे चैतन्य पुन्हा मिळवून देण्यासाठी काही प्रयत्न केले. लोकप्रिय असलेल्या नाटकांबरोबर नव्या नाटककारांचीही संगीत नाटके संस्थेने सादर केली. त्यामध्ये गो.नी. दांडेकरांचे 'मंदोदरी' हे नाटक होते, 'गा भैरवी गा' हे गुरुराव कुलकर्णी यांचे नाटक होते; हंबर्डे यांचे 'बाजीराव मस्तानी' होते; शिवाय चिं. त्र्यं. खानोलकरांचे 'अभोगी' नाटक होते. आणखीही काही नाटके संस्थेने करून पाहिली; पण त्यापैकी कोणतेच नाटक चालले नाही. ही वस्तुस्थिती मान्य करून कीर्ती म्हणते, की ''त्यांच्या संस्थेने सादर केलेल्या नव्या संगीत नाटकांपैकी बहुतेक नाटकांमध्ये मनात रुंजी घालण्याचे सामर्थ्य नव्हते. त्यांचा आत्मा संगीताचा नव्हता. पदे असलेली ती गद्य नाटकेच होती.''

संगीत नाटक उतरणीला लागले असताना, ठेकेदारांनी इकडचे-तिकडचे नटनटी गोळा करून संयुक्त नाट्यप्रयोगांचे रतीब घालायला सुरुवात केली. जयराम शिलेदारांनी स्टंट प्रयोग अशा चपखल शब्दात त्या प्रकाराची निर्भत्सना केली आहे. तोही अनुभव घेतल्यावर कीर्तीने प्रकट चिंतन केले आहे. ती लिहिते, 'मी शक्यतो

घरच्याच संस्थेत काम करते. संयुक्त प्रयोगांचा अनुभव मला काही चांगला आला नाही. माझे पद सुरू असताना शेजारचे विनोदी पात्र चक्क विंगेत गेले आणि आरामात चहा पिऊन पद संपल्यावर हजर झाले. गायनाविष्काराची काही पदे वगळता इतर पदे ही एकदाच म्हणून संपवायची असतात हे भान ठेवले नाही, तर नाटकाचे मैफलीत रूपांतर व्हायला वेळ लागत नाही. नाटकापेक्षा कलाकार महत्त्वाचा ठरणे हे संगीत नाटकाला घातक ठरले. मनाला वाटेल तितके गायन गायकनट करू लागल्याने नवी पिढी संगीत नाटकाला दुरावली, याचा कोणीही विचार केला नाही. आजकाल स्पर्धांचे पेव फुटल्यामुळे होतकरू गायक-गायिका नाट्यपदे शिकण्याचा शॉर्टकट शोधतात. संगीत नाटकांची साथ करणाऱ्या साथीदारांकडे ही मंडळी झटपट इंस्टंट सेट झालेली पदे जशीच्या तशी बसवून घेण्यासाठी जातात आणि छापाचे गणपती तयार होत राहतात. संगीत नाटक वा नाट्यसंगीत याचा सुतराम अभ्यास न करता, आत्मा न जाणता झेरॉक्स कॉप्याटाईप ठोकळेबाज व निरसपणे सादर होणारे नाट्यसंगीत ऐकून रसिकांचेही अरसिकात रूपांतर होईल की काय अशी भीती वाटते.'

कीर्तीने सांगितले ते खरे तर आपण जाणतो आणि संगीत रंगभूमीवरचे नटनटीही जाणतात; पण सगळेच मिठाची गुळणी घेऊन गप्प राहिले असताना सत्य ते बोलून दाखविण्याचे धाडस कीर्तीने केले. व्यवसाय करायचा आहे त्यांनी तो जरूर करावा असे तिने स्पष्ट केलेच आहे; पण व्यवसायाची म्हणून काही नीतिमूल्ये असतात याचे भान संबंधितांनी ठेवावे इतकेच तिचे मागणे होते. ९८ व्या अखिल भारतीय मराठी नाट्यसंमेलनाची अध्यक्षा म्हणून तिने जे भाषण केले, त्यामध्ये संगीत नाटक, संगीत रंगभूमी हा एकच मुद्दा होता. व्यावसायिक गद्य रंगभूमी, प्रायोगिक रंगभूमी, यांची दखल तिने घेतली नाही, म्हणून नाटकवाल्यांनी नाराजीही व्यक्त केली; पण कीर्तीच्या ध्यानी-मनी-स्वप्नी जर फक्त संगीत नाटकच आयुष्यभर होते, तर ती तरी काय करू शकणार होती?

अभ्यास, शिस्त, कष्ट, सचोटी, शालीनता यांचा वसा तिने आई-वडिलांकडून आणि नीलकंठ अभ्यंकर यांच्यासारख्या गुरूंकडून घेतला होता. त्यामुळे ती उतणार-मातणार नव्हतीच... आणि घेतला वसा टाकणारी नव्हती...

**संदर्भ :**


१) मराठी रंगभूमी: मराठी नाटक घटना आणि परंपरा: (संपादक, श्री. वा. रा. ढवळे, प्रकाशक मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई. (१९७१)

२) रंगयात्रा : स्वातंत्र्योत्तर मराठी रंगभूमीचे अवलोकन (संपादक, डॉ. वि. भा. देशपांडे, प्रकाशक - नाट्यसंपदा प्रकाशन, (१९८८)

३) वेध: संगीत नाटक आणि नाट्यसंगीत (संपादक, डॉ. श्रीरंग संगोराम, प्रकाशक-प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे. (१९९३)



**माधव वझे**

भ्र. ९६०४८४८०३३

७, वीणा अपार्टमेंटस, स्टेंट बॅकेमागे, कर्वे रोड, पुणे-४११००४.

# वाङ्मयाचा अभ्यास हेच समीक्षाशास्त्राचे मूळ रूप आहे.

**डोंबिवली येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या समीक्षा संमेलनाचे अध्यक्ष ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांचे अध्यक्षीय भाषण**

**डॉ. सुधीर रसाळ**

महाराष्ट्र साहित्य परिषदेने समीक्षा साहित्यसंमेलन भरवण्याचा जो उपक्रम हाती घेतला आहे तो स्वागतार्ह आहे. वाङ्मयव्यवहाराच्या आरोग्याला आवश्यक असणारा समीक्षाव्यवहार मराठी वाङ्मय जगतात नगण्य बनून चुकला आहे. तो जर प्रभावी आणि मराठी वाङ्मयव्यवहाराला उपयुक्त बनवायचा असेल तर समीक्षेच्या स्वरूपावर, त्यातील गुणदोषांवर, समीक्षेच्या उपयुक्ततेवर सतत चर्चा होणे आवश्यक आहे, आणि त्यासाठी एक कायमचे व्यासपीठ गरजेचे आहे, महाराष्ट्र साहित्य परिषदेने समीक्षा साहित्यसंमेलनाच्या रूपाने असे व्यासपीठ उपलब्ध करून दिले, ही अभिनंदनीय गोष्ट आहे.

खरे म्हणजे २०१४ साली पुणे येथे साहित्य परिषदेने भरवलेल्या दुसऱ्या समीक्षा साहित्यसंमेलनाचा मी अध्यक्ष होतो. तरीही पुन्हा एकदा ही जबाबदारी माझ्यावर टाकली याबद्दल म. सा. परिषदेच्या कार्यकारिणीचा आणि म. सा. प. च्या डोंबिवली शाखेचा मी आभारी आहे.

समीक्षाव्यवहाराची सध्याची परिस्थिती चिंताजनक आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून मराठी वाङ्मयक्षेत्रात समीक्षकांचा तुटवडा आहे. विशिष्ट साहित्यकृतीच्या स्वरूपाची चिकित्सा करून तिचे मूल्यमापन करणे हे समीक्षेचे महत्त्वाचे काम आहे. अशा लेखनाला 'परीक्षण' म्हटले जाते. कितीतरी चांगली पुस्तके दर महिन्याला प्रकाशित होतात. त्यांच्यावर मूल्यमापनपर परीक्षणे तात्काळ लिहिली जाणे आवश्यक असते. अशा परीक्षणांमुळे वाचकाच्या मनात त्या पुस्तकाबद्दल कुतूहल जागृत होऊन तो ते वाचायला प्रवृत्त होतो. अशा प्रकारे समीक्षकाच्या मार्गदर्शनाखाली केलेले वाचन वाचकाची अभिरुची विकसित करणारे असते. तसेच तात्काळ येणाऱ्या अशा परीक्षणांचा चांगला परिणाम ग्रंथविक्रीवर होत असतो. परीक्षणावलंबी वाचक परीक्षणांच्या साह्याने वाचण्यासाठी पुस्तकांची निवड करतो. त्यामुळे चांगल्या पुस्तकांच्या विक्रीवर त्याचा अनुकूल परिणाम होतो. समीक्षकाच्या अभावी काही पुस्तकांवरच (आणि तीही वाईट पुस्तकांवर) परीक्षणे येत असल्यामुळे ती वाचकाला पुस्तकांच्या निवडीत मदतनीस ठरू शकत नाहीत.

आजकाल मराठी वृत्तपत्रांत परीक्षणांसाठी अत्यल्प जागा ठेवली जाते. परीक्षणाची शब्दमर्यादा जास्तीत जास्त पाचशे शब्दांची असते. त्यामुळे पुस्तकाचा जुजबी परिचय करून देण्यापलीकडे आजच्या परीक्षणांत अधिक काही असत नाही. अशी परीक्षणे लिहिण्यासाठी वाङ्मयाचे, समीक्षासिद्धांतांचे, वाङ्मयीन परंपरांचे जुजबी ज्ञानही पुरेसे




असते. अशा जुजबी परीक्षणांचा लेखकांना, वाचकांना कसलाही उपयोग होत नाही. तसेच परीक्षणलेखकाचे 'समीक्षक' म्हणून प्रशिक्षणही होऊ शकत नाही. वृत्तपत्रांतून येणारा वाङ्मयविषयक मजकूर हा केवळ उपचार बनला आहे.

एके काळी मराठीमध्ये अनेक साप्ताहिके प्रकाशित होत होती. त्यांतून सविस्तर परीक्षणे प्रकाशित होत, त्यावर चर्चाही घडत; परंतु आता जी मोजकी साप्ताहिके प्रकाशित होतात ती सामान्य वाचकाला जगताना उपयोगी पडणारी माहिती फक्त पुरवतात. तेथेही एखाद दुसरे जुजबी पुस्तकपरीक्षण असते.

मराठी वाङ्मयीन समीक्षा प्रकाशित करणारी मासिके आज अस्तित्वात नाहीत. पूर्वी वसंत दावतरांचे एकमेव 'आलोचना' हे (छोटेखानी) मासिक होते; परंतु ते केव्हाच बंद झाले आहे. एखाद्या दुसऱ्या मासिकांचा अपवाद सोडल्यास मराठीत वाङ्मयीन नियतकालिकही नाही. अधूनमधून एखादे किरकोळ स्वरूपाचे वाङ्मयीन मासिक सुरू होते, काही काळ चालते आणि बंद पडते. तेव्हा समीक्षेचे महत्त्वाचे अंग असलेल्या मूल्यमापनपर ग्रंथपरीक्षणांची ही अवस्था आहे.

मूल्यमापनपर परीक्षणे एवढेच समीक्षेचे काम नसते. वाङ्मयाचा अभ्यास हाही समीक्षेचा एक भाग आहे. वाङ्मयीन अभ्यासाचे उद्दिष्ट साहित्यकृतीचे मूल्यमापन करणे नसते. त्यातही प्रत्यक्षाप्रत्यक्ष मूल्यमापन होत असतेच; पण त्याला गौण स्थान असते.

साहित्यकृतींची केली जाणारी परीक्षणे ही ज्याप्रमाणे सामान्य वाचकांसाठी असतात त्याप्रमाणे वाङ्मयाभ्यास हा वाङ्मयाचा अभ्यास करणारांसाठी, चिकित्सक, अभ्यासू वाचकांसाठी असतो. वाङ्मयाचा अभ्यास हेच समीक्षाशास्त्राचे मूळ रूप आहे. ती एक ज्ञानशाखा आहे. तिच्यात शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा लागतो. या अभ्यासात काटेकोर आणि नि व्याख्यित स्वरूपाच्या पारिभाषिक संज्ञांचा वापर होत असतो. यातील विवेचनात साधार आणि तार्किक स्वरूपाचे युक्तिवाद अपेक्षित असतात. यात वापरल्या जाणाऱ्या पारिभाषिक संज्ञांमागील संकल्पना ज्याला कळतात त्यालाच यातील विवेचनाचा अर्थ कळू शकतो. म्हणून परीक्षणांप्रमाणे वाङ्मयाभ्यास सर्वसामान्य वाचकाला कळेलच असे नाही. त्यासाठी सामान्य वाचकाला थोडीशी पूर्वतयारी करावी लागते. वाङ्मयाभ्यासात पुढील अभ्यासांचा समावेश होतो.

एखाद्या साहित्यकृतीच्या अंतररचनेचा अभ्यास, एखाद्या लेखकाच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास, एकाच प्रवृत्तीच्या लेखकांच्या वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास, एखाद्या कालखंडातील सर्व प्रकारच्या वाङ्मयाचा अभ्यास, वाङ्मयक्षेत्रात निर्माण झालेल्या चळवळींचा अभ्यास, विशिष्ट साहित्यकृती आणि तिच्यामागे प्रकटाप्रकट स्वरूपात असलेली सामाजिक परिस्थिती यांच्या नात्याचा अभ्यास, साहित्यकृती आणि लेखकाचे चरित्र यांच्या नात्याचा अभ्यास, हे आणि अशा प्रकारचे वाङ्मयाभ्यास समीक्षेच्या कक्षेत येतात. यांपैकी काही अभ्यासांत ऐतिहासिक दृष्टिकोनाची आवश्यकता असते. याबरोबरच वाङ्मयाचा इतिहासही सिद्ध करण्याची जबाबदारी समीक्षकावर पडते. सामान्य वाचकासाठी जे

समीक्षक परीक्षणे लिहीत असतात त्यांना वाङ्मयाभ्यासाचे अध्ययन करणे आवश्यक असते. अशा अध्ययनातून एकूण वाङ्मयाच्या स्थितिगतीचे स्वरूप त्याला ज्ञात होऊन तो अधिक नेमकी आणि डोळस परीक्षणे लिहू लागतो. काही परीक्षणलेखक हे मुळात वाङ्मयाभ्यासकच असतात.

पुस्तकाचे परीक्षण करायचे असो की कुठल्याही प्रकारचा वाङ्मयाभ्यास करायचा असो, त्यासाठी समीक्षकाला वाङ्मयविषयक सैद्धांतिक भूमिका आणि तत्संलग्न मूल्यव्यूह स्वीकारावा लागतो. अनेकदा अभ्यासविषय झालेले वाङ्मय समीक्षकाने स्वीकारलेल्या वाङ्मयीन भूमिकेच्या आधारे विश्लेषिता येत नाही. त्या वेळी समीक्षकास आपल्या वाङ्मयीन भूमिकेचा नव्याने विचार करावा लागतो. अनेकदा त्याच्या भूमिकेत परिवर्तनही घडून येते. सखोल पातळीवर होणारे वाङ्मयपरिवर्तन समीक्षेतही परिवर्तन घडवून आणू शकते.

मराठी समीक्षेत दुर्दैवाने अजून तरी वाङ्मयाभ्यासाची सलग आणि विकासोन्मुख परंपरा निर्माण होऊ शकली नाही. या प्रकारचे अभ्यासच मराठीत झालेले नाहीत. ज्या ज्या लेखकांनी आपल्या वाङ्मयनिर्मितीतून मराठी वाङ्मयात लक्षणीय परिवर्तन घडवून आणले, त्या त्या लेखकांकडे समीक्षकांनी कानाडोळा तरी केला किंवा त्याच्या निर्मितीचे कलापण तरी नाकारले. बा. सी. मर्ढेकरांच्या कवितेबद्दल तत्कालीन समीक्षकांनी घेतलेल्या भूमिका पाहिल्यास हे स्पष्ट होते. वस्तुतः वाङ्मयातील असे प्रयोग समीक्षकास आव्हान असते. मराठीतील लघुअनियतकालिकांची चळवळ, किरण नगरकर, श्याम मनोहर यांनी केलेले कादंबरीतील प्रयोग यांचा पुरेसा विचार मराठी समीक्षेने केलेला नाही.

मराठी वाङ्मयाची तेराव्या शतकापासून ते आजपर्यंत सलग अशी परंपरा नाही. ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेपूर्वीच्या वाङ्मयाची एक आणि ही स्थगित होऊन ब्रिटिश सत्तेपासून सुरू झालेली वाङ्मयाची दुसरी, अशा दोन वाङ्मयीन परंपरा अस्तित्वात आहेत. आपले मध्ययुगीन वाङ्मय धर्मसंलग्न आहे आणि अचानक आपण ब्रिटिश राजवटीत निधर्मी वाङ्मयाच्या निर्मितीला प्रारंभ केला. आपल्या वाङ्मयीन परंपरेत हा बदल जर स्वाभाविकरीत्या झाला असता, तर आपल्या वाङ्मयीन परंपरेची सलगता टिकली असती. परंपरेच्या अशा विभाजनामुळे मध्ययुगीन वाङ्मयाचे अभ्यासक– समीक्षक वेगळे आणि आधुनिक वाङ्मयाचे वेगळे. मध्ययुगीन वाङ्मयाचे समीक्षक हे प्रामुख्याने या वाङ्मयाची समीक्षा करणारे; तर आधुनिक समीक्षक वाङ्मयाची समीक्षा करताना पाश्चात्त्य साहित्यशास्त्राचे साह्य घेणारे. दोघेही एकमेकांच्या क्षेत्रांत जाणार नाहीत. हे चित्र जवळपास स्वातंत्र्य मिळेपर्यंत होते. नंतर हळूहळू मध्ययुगीन वाङ्मयाची समीक्षा होणे जवळपास थांबले आहे. अलीकडे आधुनिक वाङ्मयसमीक्षक तुकाराम या संतकवींची समीक्षा करू लागले आहेत. आजच्या काही कवींना आपल्या कवितेचे तुकारामांच्या कवितेशी नाते असल्याचे जाणवते. त्यामुळे आज तुकारामांच्या कवितेकडे विशेष लक्ष दिले जाऊ लागले आहे. यातील काहींना तुकारामाशी वाङ्मयीन नात्यापलीकडचे नाते असल्याचे जाणवू लागले आहे. त्यांचा भर तुकाराम हे त्या काळाची कक्षा ओलांडून आधुनिक मूल्ये मांडणारे संत होते, हे सिद्ध करण्यावर आहे. दिलीप चित्रे यांनी तुकारामांच्या काव्यात अस्तित्ववाद शोधला आहे. काहींनी तुकाराम हे निरीश्वरवादी असल्याचे मत मांडले आहे. हे सर्व सिद्ध करण्यासाठी ते तुकारामांच्या अभंगांचे अर्थ आपल्या मतपुष्ट्यर्थ लावताना दिसतात. उदाहरणार्थ, त्यांनी तुकारामांची 'आहे ऐसा देव वदवावी वाणी। नाही ऐसा मनी । अनुभवावा ।।' ही ओळ तुकारामांच्या निरीश्वरवादाचा पुरावा म्हणून सादर केली आहे. प्रत्यक्षात मूर्तीची भक्ती करणे आणि परमात्मा निर्गुण, निराकार असल्याचे तत्त्वज्ञान सांगणे, अशी एक विसंगती वारकरी संप्रदायासह सर्वच संप्रदायात होती. ही विसंगती कशी दूर करायची, हा वारकरी संप्रदायासमोर प्रश्न होता. निर्गुण, निराकार परब्रह्माचा साक्षात्कार होण्याचा मार्ग सगुण साकार मूर्तीच्या भक्तीतून जातो, अशी या विषयी भूमिका घेऊन वारकरी संप्रदायाने हा पेच सोडवला आहे. ज्ञानेश्वरांच्या 'पांडुरंग कांती' या विराणीमध्ये हा पेच सोडवलेला दिसतो. अलीकडे तुकारामांविषयी असे जे काही लिहिले गेलेले आहे ते भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचा अभ्यास न करताच लिहिले आहे. षट्दर्शनांचा, भक्तिमार्गामागील तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्याशिवायच असे लेखन झालेले दिसते. तेव्हा मध्ययुगीन वाङ्मय हाही आजच्या समीक्षकांचा महत्त्वाचा अभ्यासविषय व्हायला हवा आणि त्यासाठी समीक्षकाने

वाङ्मयीन परंपरेचा मध्ययुगीन आणि आधुनिक असा भेद न करता ही एकच परंपरा मानून सर्वच वाङ्मय हे आपल्या मूल्यमापनाचा विषय मानले पाहिजेत. एवढेच नव्हे तर, मूल्यमापनाचे जे कुठले निकष तो मानत असेल ते आजच्या कवीपासून ते ज्ञानेश्वर-तुकारामांपर्यंत लावून या मूल्यांची सार्थता निश्चित केली पाहिजे. ज्ञानेश्वर- तुकारामांच्या काव्यनिर्मितीची सामग्री फक्त आजच्या कवींच्या निर्मितीसामग्रीहून वेगळी होती एवढेच. बाकी त्यांच्या लेखनातही कलागुण आहेतच; आणि या कलागुणांची मीमांसा आणि मूल्यांकन करणे ही समीक्षकाची जबाबदारी आहे.

मध्ययुगीन वाङ्मयाची कितीतरी क्षेत्रे अभ्यासाविना राहिली आहेत. भाष्यकाव्य, आख्यान, चरित्र, बखर, पद, अभंग, विराणी, गौळण, लावणी, पोवाडा, भारूड, स्तोत्र, भूपाळी, आरती, पाळणा, अंगाई, अशा वाङ्मयप्रकारांच्या स्वरूपाचा अभ्यासच झालेला नाही. आख्याने आणि कादंबरी, प्रकरणे आणि कथा, भाष्यकाव्ये आणि चिंतनगर्भ दीर्घकाव्य, यांतील नाती तपासली गेली पाहिजेत. सुनीत या पाश्चात्त्य काव्यप्रकाराबद्दल मराठीत लिहिले जाते; पण 'पद' या महत्त्वाच्या काव्यप्रकाराकडे मात्र दुर्लक्ष होते. वस्तुतः हा प्रकार गीतांमध्ये अजूनही वापरला जातो. नवकाव्याच्या आधीची कविता प्रामुख्याने याच रचनाप्रकारात लिहिली गेली आहे; परंतु याच्या आकृतिबंधाचा आणि अभिव्यक्तिक्षमतेचा विचार मराठीमध्ये केला गेलेला दिसत नाही.

मराठीमध्ये आधुनिक वाङ्मयप्रकाराच्या स्वरूपाची मीमांसा करणारा-एखादा अपवाद वगळता- ग्रंथ नाही. ऐतिहासिक दृष्टिकोनातून मराठी वाङ्मयातील प्रवाहांचा, चळवळींचा अभ्यास होत नाही. विशिष्ट काळात वाङ्मयक्षेत्रात कुठलीतरी एक निर्मितीप्रेरणा प्रभावी असते आणि त्या काळातील बहुसंख्य साहित्यकृतींतून ती व्यक्त झालेली असते. आधुनिक वाङ्मयाच्या प्रत्येक कालखंडातील वाङ्मयाच्या स्वरूपाचा विचार आतापर्यंत केला गेलाच नाही. एकूण मराठी वाङ्मयाची सामाजिक, आर्थिक आणि तात्त्विक परिप्रेक्षात ऐतिहासिक मीमांसा झालेली नाही. अशी मीमांसा वाङ्मयेतिहास लेखनाला सामग्री पुरवत असते. इतिहासलेखनासाठीचा हा पायाभूत अभ्यास झालेला नसल्याने मराठी वाङ्मयाचा शास्त्रशुद्ध इतिहासही लिहिला गेलेला नाही. मध्ययुगीन आणि आधुनिक साहित्याच्या अभ्यासातील ह्या उणिवा पाहिल्या की मराठी समीक्षा अजूनही बाल्यावस्थेतच असल्याचे तीव्रतेने जाणवते. समीक्षेच्या अशा अवस्थेत तिने आजपर्यंत वाङ्मयासंबंधीचा कुठलाही नवा विचार दिला नाही, असे म्हणणे तिच्यावर अन्याय करणारे ठरते.

मग मराठी समीक्षेने प्रामुख्याने काय केले? तर ती आस्वादक समीक्षेत रममाण झाली. आस्वादक समीक्षा हे समीक्षाशास्त्राचे सुलभीकरण आहे. समीक्षा हे शास्त्रच होऊ शकत नाही, अशी शास्त्रासंबंधीची संकुचित भूमिका घेऊन आस्वादक समीक्षेचा पाठपुरावा बहुसंख्य मराठी समीक्षकांनी केला. आस्वादक समीक्षेच्या नावाने बहुसंख्य समीक्षकांनी साहित्यकृतींवर ललित निबंध लिहिले आणि आपली समीक्षा ही एका निर्मितीवरची केली गेलेली दुसरी निर्मिती आहे, असे समर्थन करायला प्रारंभ केला. आस्वादक समीक्षेच्या लालित्याला 'आस्वाद' या संकल्पनेने बळ मिळाले. एकीकडे भारतीय साहित्यशास्त्राचा रससिद्धांत नाकारायचा आणि दुसरीकडे 'आस्वाद' ही संकल्पना मात्र स्वीकारायची. वस्तुतः वाचक साहित्यकृतीचे 'आकलन' करीत असतो. हे आकलन बौद्धिक आणि भावनिक अशा दोन्ही पातळ्यांच्या संयुक्तीकरणातून होत असते. मराठी समीक्षेच्या पारिभाषिक संज्ञांमधून 'आस्वाद' ही संज्ञा बाद करणे गरजेचे आहे.

मराठी समीक्षेत पारिभाषिक संज्ञांबाबतही अराजक आहे. प्रत्येक समीक्षक स्वतःच्या संज्ञा वापरतो. या संज्ञा त्या समीक्षकाच्या असल्याने इतरांना त्यांचा बोध होत नाही. समीक्षकही स्वतःच्या संज्ञा वापरताना त्यांच्या व्याख्या देत नाही. त्यामुळे एका समीक्षकाचे म्हणणे दुसऱ्या समीक्षकाला कळत नाही. वाचकाला ते कळणे तर दूरचेच राहिले.

मराठी समीक्षेसंबंधी या (आणि इतर अनेक) त्रुटी मला जाणवलेल्या आहेत. या समीक्षासंमेलनात मी त्या आपणांसमोर मांडल्या. मराठी समीक्षा प्रगल्भ आणि समृद्ध व्हावी हीच यामागे इच्छा आहे. यांवर जाणकार गंभीरपणे विचार करतील याची मला खात्री आहे.

**सुधीर रसाळ**

■■

# जॉन स्टाइनबेक-ऑफ माइस अँड मेन आणि द ग्रेप्स ऑफ राथ : दशा स्थलांतरितांची

**विख्यात अमेरिकन लेखक आणि साहित्याचे नोबेल पारितोषिक विजेते जॉन अर्नेस्ट स्टाईनबेक यांच्या 'ऑफ माईस अँड मेन' आणि 'द ग्रेप्स ऑफ राथ' या कादंबऱ्यांतील स्थलांतरितांच्या शोषणाच्या मध्यवर्ती सूत्राबाबत भाष्य करणारा समीक्षालेख**

**शिरीष चिंधडे**

**१. मनोराज्य मूषक आणि माणसांचे**

सामाजिक-आर्थिक परिप्रेक्षातून एकाच विषयाकडे दोनवेळा एखादा मोठा लेखक वळतो तेव्हा तो विषय तेवढ्याच तोलामोलाचा असतो. नोबेल विजेते अमेरिकन लेखक जॉन स्टाइनबेक त्यांच्या ऑफ माइस अँड मेन (१९३७, मनोराज्य मूषक आणि माणसांचे) आणि द ग्रेप्स ऑफ राथ (१९३९, दूरदेशी राहिलेले...) या दोन कादंबऱ्यांमधून १९३० च्या दशकात अमेरिकेला पडलेल्या आर्थिक महामंदीच्या विळख्याचा विषय मांडतात. त्याविषयी थोडी तपशिलात माहिती घेता येईल कारण भारतानेदेखील असेच काहीसे हृदयद्रावक चित्र कोव्हिड पहिल्या लाटेच्या सुमारास अनुभवले.

करोना-कोव्हिड १९ च्या पहिल्या लाटेबरोबर तेवढीच प्रलयंकारी लाट आली ती देशभरच्या टाळेबंदीची. दूरदेशी राहिलेले दीन त्यांचे झोपडे / बापुडा अन् आज येथे पायवाटेला पडे अशा अवस्थेतल्या, हातावर पोट असलेले हजारो गरीब, बेघर, रोजगारजीवी श्रमिकांचे लोंढे मैलोनमैल स्थलांतर करून आपापल्या प्रांतांकडे पायपीट करीत निघालेले आपण पाहिले, त्याच्या बातम्या वाचल्या. त्यातले कित्येक जण तहानभुकेने व्याकुळलेले, अर्धपोटी, आजारी, एकाकी होते. लहान मुले, वृद्ध, गर्भवती स्त्रिया, यांचे अपरिमित हाल झाले. कित्येक अनवधानाने अपघातग्रस्त झाले, प्राणाला मुकले. मानवी जीवनाची एवढी दुर्दशा, विटंबना पाहून काही वृद्ध लोकांना देशाच्या फाळणीच्या वेळच्या हृदयद्रावक दृश्यांची आठवण झाली.

अमेरिकेच्या इतिहासातले १९३० चे दशक आर्थिक महामंदीच्या विळख्यात आवळले गेले आणि वरीलप्रमाणे झुंडींनी स्थलांतर करणारे विस्थापित श्रमिक रोजगाराच्या शोधात देशोधडीला लागले, प्राणास मुकले. जॉन स्टाइनबेक यांनी हे यातनापर्व आपल्या दोन कादंबऱ्यांतून तीव्रपणे चितारलेले आहे. स्टाइनबेक (१९०२-१९६८) हे अमेरिकन साहित्यातले एक प्रथम श्रेणीचे लेखक होत. त्यांनी लिहिलेल्या एकूण डझनभर कादंबऱ्यांपैकी द ग्रेप्स ऑफ राथ, ऑफ माइस अँड मेन, टॉर्टिला फ्लॅट्स, द मून इज डाउन या विशेष लोकप्रिय झाल्या. त्यांनी लिहिलेले ट्रॅव्हल्स विथ चार्ली हे एक कॅरव्हान प्रकारातली तंबू व राहण्याची सोय असलेली मोठी थोरली गाडी घेऊन अमेरिकेतील सर्व म्हणजे पन्नास राज्ये भटकून आल्याचे रोचक प्रवासवर्णन आहे. चार्ली हा त्यांचा आवडता कुत्रा! त्यांची सर्वाधिक गाजलेली कादंबरी म्हणजे 'द ग्रेप्स ऑफ राथ' ही होय. ही एका देशोधडीला लागलेल्या जोड

नावाच्या भल्यामोठ्या स्थलांतरित कुटुंबाची करुण कहाणी आहे. मानवी जीवनाची होणारी विटंबना दाखवून, आणि त्याचवेळी माणसाच्या क्रौर्याचे घृणास्पद वर्तन उघडे पाडून साऱ्या अमेरिकेचे डोळे खाडकन उघडले, असा लौकिक पुढे या कादंबरीला प्राप्त झाला. तीविषयी या लेखाच्या दुसऱ्या भागात विचार केला आहे. एकूण साहित्यसेवेबद्दल जॉन स्टाइनबेक यांना पुलित्झर आणि नोबेल सन्मानांनी गौरविले गेले.

भटक्या, स्थलांतरित शेतकामगारांच्या आणि अन्य श्रमिकांच्या अस्थिर, दिशाहीन, निराश्रित जिनगानीची बोच लेखकाच्या मनात दीर्घकाळ राहिली. आज इथे, तर उद्या तिथे, अशी त्यांची समूळ उखडलेली स्थिती. लेखक स्वतः ऐन तारुण्यात एका शेतावर कामगार म्हणून राबला होता. त्यातूनच स्टाइनबेक पुनःपुन्हा या विषयाकडे वळले. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांतून ही अशी निम्नवर्गीय, अर्धशिक्षित, किंबहुना अशिक्षित, गरीब माणसे वावरताना दिसतात. अशाच काही भणंग श्रमिकांची काहीशी नाट्यमय कहाणी सांगते स्टाइनबेकची या विषयावरची पहिली लघु कादंबरी 'ऑफ माइस अँड मेन.' तिचे कथासूत्र पुढीलप्रमाणे सांगता येईल.

कॅलिफोर्नियातल्या वीड या गावातल्या शेतशिवारात काम करणारे हे दोघे तिथून सहीसलामत सुटून निघाले आहेत दूरच्या सोल्दाद या गावाकडे. हे दोघे आहेत जॉर्ज मिल्टन आणि लेनी स्मॉल. तिथे त्यांना दुसऱ्या एका शेतावर मजुरीचे काम मिळते आहे. जॉर्ज हुशार, कल्पक आणि थोडा स्वप्नाळू आहे, तर मित्र लेनी हा पार मंदबुद्धी, बालबुद्धी; पण लेनीजवळ भीमासारखी अचाट शारीरिक शक्ती आहे. बिचारा मंदबुद्धी असल्याने आपण करीत असलेल्या कृतीचे काय परिणाम होऊ शकतात, याचं त्याला आकलन नाही. मात्र त्याला एक विचित्र, विकृत असेच आकर्षण आहे. उंदीर, ससा, शेळी, मेंढी, कुत्रा, रेशमी वस्त्र, केस, अशा मऊ मुलायम गोष्टी हाताळत, कुरवाळत बसायला त्याला भारी आवडते. अशा वेळी त्याचे अगदी भान हरपते. मात्र असे करीत असताना आपण आपली किती शक्ती वापरतो आहोत, याचे त्याला भानच राहात नाही. परिणामतः असे अनेक प्राणी त्याच्या अशा कुरवाळण्याने प्राणाला मुकलेले आहेत. म्हणून मित्र जॉर्ज त्यावर सतत बारीक लक्ष ठेवून असतो. तो जणू त्याचा पालकच आहे. दोघे नेहमी एकत्र राहतात, सर्वत्र एकत्र वावरतात. जॉर्जचा प्रत्येक शब्द लेनीला शिरसावंद्य आहे.

**भटक्या, स्थलांतरित शेतकामगारांच्या आणि अन्य श्रमिकांच्या अस्थिर, दिशाहीन, निराश्रित जिनगानीची बोच लेखकाच्या मनात दीर्घकाळ राहिली. आज इथे, तर उद्या तिथे, अशी त्यांची समूळ उखडलेली स्थिती. लेखक स्वतः ऐन तारुण्यात एका शेतावर कामगार म्हणून राबला होता. त्यातूनच स्टाइनबेक पुनःपुन्हा या विषयाकडे वळले. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांतून ही अशी निम्नवर्गीय, अर्धशिक्षित, किंबहुना अशिक्षित, गरीब माणसे वावरताना दिसतात. अशाच काही भणंग श्रमिकांची काहीशी नाट्यमय कहाणी सांगते स्टाइनबेकची या विषयावरची पहिली लघु कादंबरी 'ऑफ माइस अँड मेन.'**

वीड गावातल्या शेतावरून या जोडीने पलायन करायला तसे एक गंभीर कारण घडले आहे. शेतातल्या एका तरुण मुलीच्या अंगावरचा मऊमुलायम झगा एकदा लेनीच्या हातात येतो. त्याच्या सवयीनुसार लेनी तो कुरवाळणे सुरू करतो. ती मुलगी घाबरून जसजशी स्वतःची सुटका करायला धडपडते तसतशी लेनीची पकड अधिकाधिक घट्ट होत जाते. पोरीचा समज होतो की, हा रानटी गडी तिची अब्रू लुटायचा प्रयत्न करतो आहे. ती किंचाळू लागते, तसा लेनी घाबरून तिच्या झग्यावरची आपली पकड अजाणता आणखीनच घट्ट करू लागतो. तिचे किंचाळणे ऐकून इतर मजूर तिथे गोळा होतात. आता लेनीचे काही खरे नाही, हे जॉर्ज ओळखतो आणि कसेबसे त्याला त्यातून तात्पुरते सोडवतो; परंतु जमलेले मजूर हे प्रकरण असे सहजासहजी सोडायला तयार नाहीत. ते आता लेनीला नक्कीच जिवंत जाळणार किंवा पोलिसांच्या ताब्यात देणार, हे जॉर्ज ओळखतो, आणि त्याच रात्री दोघे तिथून पलायन करतात. सोल्दादकडे जाणारी रात्रीची बस ते पकडतात. ड्रायव्हर त्यांना गावाच्या थोडे अलीकडेच

चार-पाच मैल आधीच उतरवून देतो, या इथेच पायी जाण्यासाराखे जवळ आहे अशी थाप मारतो. एका नदीकाठी दोघे मुक्काम करतात.

नदीकाठी दाट झाडी आहे. तिथे हे दोघे विसावतात, पाणी पिऊन ताजेतवाने होतात. आता जॉर्ज लेनीची शिकवणी घेतो. 'तिकडे नवीन शेतावर गेल्यावर तू काहीएक चकार शब्द उच्चारायचा नाही. मी सांगेन तसंच वागायचं. काही भानगड झालीच तर थेट इथे या झाडीत येऊन लपायचं, आणि मी आल्यावरच नंतर काय करायचं ते ठरवू.' हे सर्व पुन्हा पुन्हा उगाळल्यावर मठ्ठ लेनीच्या डोक्यात प्रकाश पडतो. मग जॉर्ज त्याला आपले एक नेहमीचे आवडते स्वप्न ऐकवतो. एका ठिकाणी मी एक शेत पाहून ठेवलेले आहे. ते विक्रीला निघायची शक्यता आहे. पैसे साठवू आणि आपण ते शेत विकत घेऊन टाकू. आणि तिथे मालकासारखे आरामात, रुबाबात राहू. धान्य पिकवू; शेळ्या, मेंढरे, ससे-कुत्री पाळू, मात्र तू त्यांना हाताळायचं नाही. नाहीतर ती मरतील. मंदबुद्धी लेनीला हे स्वप्न फार मोहवून टाकते. जॉर्ज काहीही म्हणो; पण त्या आपल्या शेतावर आपल्याला मेंढरे, ससे हाताळायला, कुरवाळायला मिळतील, हेच त्याला मोठे आकर्षण आहे. हा स्वप्नरंजनाचा खेळ हे दोघे त्या सोल्दादच्या नव्या शेतावर रुजू झाल्यावर देखील सुरूच असतो. शेवटी दोघे त्या नव्या ठिकाणी येतात. एका गचाळ खोलीत इतरांबरोबर त्यांची राहायची सोय केली जाते. जॉर्जला ही खोली अजिबात आवडत नाही. शिवाय तिथले अन्न देखील अतिशय बेचव आणि वाईट आहे; पण सध्या गत्यंतर नाही. डोक्यावर छप्पर, पोटाला काहीतरी अन्न आणि अंग टेकायला जमीन मिळताहेत आणि वर थोडी मजुरीची कमाई होणार आहे, हे पुरेसे आहे. शिवाय आधीच्या वीड गावाच्या खुनशी लोकांच्या तावडीतून सुटका होऊन इथे तोंड लपवायला जागा गवसली आहे, हे मोठे समाधान आहे.

खोलीत इतर काही कामगार आहेत. त्यात आहे अपघातात हात जायबंदी झालेला कँडी आणि त्याचा म्हातारा, अधू दृष्टीचा, लूत भरलेला कुत्रा. कँडीला जॉर्जच्या स्वप्नाने भुरळ घातली आहे आणि तो आपली सर्व कमाई त्यासाठी द्यायला राजी आहे. स्लिम नावाचा एक कातडी कमावणारा कारागीर तिथे आहे. कोणीएक कार्लसन आहे; त्याच्या जवळ गावठी पिस्तुल आहे. व्हिट नावाचा आणखी एक शेतमजूर आहे. शेतावर अन्यत्र एक क्रूक्स नावाचा कुबडा निग्रो राहतो; तो दुसऱ्या एका गोठ्यात एकटाच राहतो आहे, कारण वर्णद्वेषाचा हा बळी आहे. त्याच्याशी गोरे मजूर संपर्क ठेवत नाहीत. गरीब मजुरांना या जगात, देशात काहीही भवितव्य नाही, हे त्याचे ठाम मत आहे. जॉर्ज आणि लेनी यांचे स्वतःची जमीन घेण्याचे स्वप्न कधीही खरे होणार नाही हे तो सांगतो. कर्ली नावाचा इथल्या बॉसचा अहंमन्य, भांडकुदळ पोरगा इथे आहे. तो बॉक्सिंग शिकलेला आहे आणि आपल्या दणकट हाताचे ठोसे तो इथल्या मजुरांना मुक्तपणे लगावत असतो. त्याचे नुकतेच लग्न झालेले असून बायको मोठी चवचाल आहे. ती सतत इथल्या कामगारांत मिसळत असते. त्यामुळे संशयग्रस्त कर्ली संतप्त असून सतत ती कुठे आहे याचा शोध घेत शेतावर फिरत असतो. असाच एकदा तो या मजुरांच्या खोलीत दमबाजी करायला येतो. त्याची नजर धिप्पाड लेनीवर पहिल्यापासूनच आहे. त्याचा तो प्रचंड देह याला मुष्टीयुद्धासाठी जणू कायमचे आव्हान आहे. शेवटी एकदाची आपली घट्ट मूठ तो लेनीच्या नाकावर आदळतोच. ठोशामागून ठोसे देणे सुरू होते. लेनीचा चेहरा, नाक रक्तबंबाळ होतात. लेनी पार बावचळून गेला आहे. काहीच प्रतिकार करायचं त्याला सुचत नाहीय. तेव्हा आपला हा बालबुद्धी मित्र आता संपणार की काय हे बघून जॉर्ज ओरडतो, 'अरे, धर त्याला.' तेव्हा कुठे लेनी भानावर येतो आणि कर्लीची उगारलेली मूठ आपल्या भव्य भक्कम वज्रपंजात अशी घट्ट पकडून आवळून धरतो की, कर्लीच्या बोटांचा चक्काचूर होतो.

खोलीत माणसांबरोबर कँडी आणि त्याचा म्हातारा, अधू दृष्टीचा, लूत भरलेला कुत्रा, हे देखील राहतात; पण इतरांना त्या रोगग्रस्त कुत्र्याच्या अंगाची दुर्गंधी सहन होत नाही. शेवटी कार्लसन त्या कुत्र्याला लांब शेतावर नेऊन गोळी घालतो. कदाचित सर्व निराधार मजुरांचा शेवट असाच होणार असावा, हे सूक्ष्म सूचन या प्रसंगात असावे. शेतावर सतत काम आणि त्यामुळे येणारा थकवा आणि कंटाळा सर्वांना नकोसा झालेला आहे. एके दिवशी सर्व जण शेजारच्या गावात मौजमस्ती करायला जातात. लेनी मात्र मागेच रहातो. काही गडबड करू नकोस असे जॉर्ज त्याला पुन्हा पुन्हा बजावून सांगतो. शेतावर आता फक्त क्रूक्स हा निग्रो आहे, कारण त्याला कोण बरोबर घेणार!

इकडेतिकडे भटकायला निघालेला लेनी या क्रूक्सच्या गोठ्यात येऊन पोचतो. गप्पा रंगतात. स्वतंत्र शेताचे स्वप्न कधीच खरे होणार नाही, हे क्रूक्स लेनीला सांगतो आणि लेनी कावराबावरा होतो. काही वेळाने लेनी चारा साठवलेल्या गोठ्यात येतो आणि तिथे मऊ चाऱ्यावर लोळत पडतो. इतक्यात कर्लीची बायको तिथे येते. लेनीला तिथे पाहिल्यावर ती त्याच्याशी अघळपघळ गप्पा सुरू करते. माझे केस बघ किती मऊ मुलायम आहेत, म्हणून त्याला उत्तेजित करते.

इथे होतो घोटाळा. त्या मऊ मुलायम केसांवर लेनी हात फिरवतो. ते त्याला इतके आवडतात की, आता तो आपला हात बाजूला करायलाच तयार नाही. आता ती देखील घाबरलीय आणि त्याच्या पकडीतून सुटायचा प्रयत्न करू लागली आहे. तिची धडपड व्यर्थ ठरते कारण लेनीचा वज्रपंजा अधिकाधिक घट्ट होत चाललेला आहे. तेव्हा ती किंचाळू लागते. लेनी बावचळतो, घाबरतो आणि तिच्या तोंडावर आपला पंजा आवळून धरतो. तिचा श्वास गुदमरतो आणि शेवटी ती गतप्राण होते. आता लेनीला समजू लागले आहे की, आपल्या हातून काय झाले आहे ते. तो पार भेदरून गेला आहे. एवढ्यात दूरवर माणसांचे आवाज ऐकू येतात. गावात मौजमजा करून मजूर पुन्हा शेतावर येताहेत. तिथे पोहोचल्यावर जॉर्जला लेनीने काय घोर कृत्य केलेले आहे याचा अंदाज येतो. आता इथे देखील आधीच्या वीड गावातला प्रसंग येणार; म्हणजे लोक या लेनीला उभा जाळणार, हे जॉर्ज ओळखतो आणि लेनीला पळून जायचा सल्ला देतो. आधी सांगितल्याप्रमाणे लेनीने नदीकाठच्या जंगलात लपून जॉर्जची वाट बघायची. त्याप्रमाणे लेनी पळून जातो. एव्हाना काय घडले आहे आणि ते कोणी घडवले आहे हे सगळ्यांना समजते आणि ते लेनीचा शोध सुरू करतात. कार्लसन तर आपले पिस्तूल शोधू लागतो; पण ते सापडत नाही. शोध घेत माणसे थेट त्या नदीकाठी येतात. जॉर्ज आधीच तिथे पोहोचलेला आहे. तो लेनीला नदीकडे तोंड करून बसायला सांगतो आणि कार्लसनचे चोरलेले पिस्तूल काढून लेनीच्या मानेवर गोळी झाडतो. इथे कथा संपते.

कादंबरीचा शेवट असा अनपेक्षित आणि एकदम झालेला वाटतो. जॉर्जने आपल्या या निरागस मित्राला असे विश्वासघाताने का मारले? (''कटप्पाने बाहुबलीको क्यू मारा? या प्रसिद्ध प्रश्नाचे इथे स्मरण होईल!'') त्याची निदान दोन उत्तरे सापडतील. एक म्हणजे, एवीतेवी तो मरणारच आहे कारण, जमलेल्या लोकांच्या हातून तो जाळून मारला जाणे अटळ आहे. समजा त्याला पोलिसांच्या हवाली केले तरी फाशी चुकत नाही; आणि दुसरे म्हणजे, त्याच्या हातून भविष्यात होणारे असे भयंकर गुन्हे थांबणार नाहीत, तेव्हा आत्ताच त्याला संपविणे आवश्यक आहे.

प्रत्येक कलाकृती कोणत्यातरी विषयाच्या केंद्राभोवती विणलेली असते. साधारणतः हा विषय कलाकृतीच्या शीर्षकातच समाविष्ट असू शकतो (असेलच असे मात्र नाही.) तिथे तो ढोबळ असतो. मात्र कविता आणि चित्र (उदा. अनिलांची 'निर्वासित चिनी मुलास,' किंवा केशवसुतांची 'स्फूर्ती' किंवा गोविंदाग्रजांची 'दसरा,' बालकवींची 'औदुंबर,' वर्डस्वर्थची 'डॅफोडिल्स' किंवा कीट्सची 'ओड टू ऑटम,' एलियट्ची 'द लव्हसाँग ऑफ जे. अल्फ्रेड प्रूफ्रॉक' या कविता किंवा चित्रकलेत पिकासोचे 'गुर्निका,' दा व्हिंचीचे 'द लास्ट सपर,' मायकल आन्जेलोचे 'द क्रिएशन ऑफ आदम' किंवा आपले 'मंदिरपथगामिनी' या चित्रांची शीर्षके विषयाचा थेट उल्लेख करतात. (आशय मात्र भिन्न असू शकतील.) कादंबरीत शीर्षकस्थ विषयाच्या केंद्राभोवती लेखक पात्रे व त्यांचे अंतरंग आणि आंतरिक संबंध, घटना, प्रसंग यांचे धागे किंवा रंग भरून तपशिलांचे जे नक्षीकाम करतो, त्यात कलाकृतीचा आशय / अर्थ दडलेला असतो. विषय (Subject) आणि आशय (Theme) यांचा असा अन्योन्यसंबंध असतो. शक्यता अशी असते की, प्रत्येक स्वतंत्र वाचकाला कलाकृतीच्या आस्वादकाला एकाच कलाकृतीचा वेगवेगळा आशय आकळू शकतो. कवितेच्या बाबतीत हे व्यक्तिनिष्ठ खाजगी आकलन, अर्थनिर्णयन, रसग्रहण अधिक प्रमाणात घडताना दिसते. (महाकवी एलियट् तर एका ठिकाणी म्हणतो, 'अ पोएम इज व्हॉट इट मीन्स टू एव्हरी इंडिव्हिजुअल रीडर.' (प्रत्येक वाचक व्यक्तीला आकळलेला अर्थ म्हणजे ती कविता.) त्यात पुन्हा वाचकाला समजलेला आशय हाच लेखकाच्या मनात असलेला आशय असेल असेही नाही. इथे लेखक आणि

वाचक यांचे कलात्मक स्वातंत्र्य सुरू होते. म्हणजे दोघांनाही आपापले आशय जपण्याचे स्वातंत्र्य आहे. कलाकृती जाहीरपणे प्रकाशित / लोकार्पण झालेली असल्याने ती उपभोगणाऱ्या प्रत्येकाचा तीवर अर्थनिर्णयन हक्क प्रस्थापित होतो. शिवाय लेखकाचा आणखीन एक लाभ म्हणजे प्रत्येक स्वतंत्र वाचकाला गवसलेल्या आशयावर लेखकाचा देखील हक्क असतो! कारण त्याने जर ती कलाकृती निर्मिलीच नसती तर मग कुठला विषय आणि कुठला आशय?

हे थोडेसे चिंतन अशासाठी की, शेवटी प्रश्न उरतो, की स्टाइनबेकच्या ऑफ माइस अँड मेनचा आशय / अर्थ काय असेल? स्थलांतरितांचे दुःख जगासमोर मांडणे? प्राणी पातळीवरचे त्यांचे जगणे अभ्यासणे? माणसांमधील क्रौर्य दाखवणे? वर्णभेदाची दाहकता उघड करणे? मैत्रीतला फोलपणा सांगणे? एकूणच मानवी आकांक्षा, इच्छा, स्वप्ने यांचे वैय्यर्थ्य उकलणे? यांपैकी एखादा किंवा सर्व त्याला अभिप्रेत असेल. स्वतः लेखक (स्टाइनबेक) तारुण्यात असे अस्थिर, दरिद्री कामगाराचे जीवन जगलेला होता. त्याचे पडसाद इथे आहेतच. आरंभी म्हटल्यानुसार तीसच्या दशकात अमेरिकेत आलेल्या आर्थिक महामंदीचा प्रभाव लेखकाच्या मनावर कोरला गेला होता. विस्थापित कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी 'लाईफ' मासिकाने त्याला अनुदान दिले होते. त्या अभ्यासाचा उपयोग त्याने (मानधन न घेता) काही लेखनात केलेला आढळतो.

लेखक आपल्या कादंबरीचे शीर्षक विचारपूर्वक निवडत असतात. कदाचित कादंबरीच्या शीर्षकातच आशयाबाबत काही संदर्भसूचन दडलेले आहे/असते का? प्रस्तुत लेखकाने ऑफ माइस अँड मेन हे शीर्षक स्कॉटलंडचा कवी रॉबर्ट बर्न्स याच्या (स्कॉट भाषेतील) टु अ माउस या कवितेच्या एका ओळीतून घेतलेले आहे. ती ओळ अशी: The best laid schemes of mice and men / Gang aft agley. (मूषक आणि माणसे यांनी काटेकोरपणे केलेले नियोजनदेखील कित्येकदा निष्फळ ठरते.) ('उलटी हो गई सब तदबीरे' सर्व योजना उलट्या-पालट्या झाल्या--ही बेगम अख्तर यांनी गायलेली मीर तकी मीर यांची एक गझल प्रसिद्ध आहे.) सापळ्यात आणि संकटात सापडलेले उंदीर आणि माणसे त्यातून सुटका करून घेण्यासाठी किती प्रकारची धडपड करतात; परंतु त्यांची सुटका होतेच असे नाही. दारिद्र्य आणि अस्थिरता यांच्या सापळ्यात सापडलेले जॉर्ज, लेनी, कँडी, कार्लसन, क्रूक्स, स्लिम, कर्लीची बायको, असे सगळेच इथे त्यातून सुटका मिळवण्याची आकांक्षा बाळगून आहेत. त्यांची आयुष्याविषयीची काही स्वप्ने आहेत. (तोही एक सापळाच आहे!) जॉर्ज, लेनी, कँडी यांना स्वतःचे शेतशिवार विकत घेऊन मालक म्हणून रुबाबात, आरामात जगायचं आहे, तर कर्लीची बायको सिनेमानटी होऊ इच्छिते आहे. क्रूक्सला वर्णद्वेष नष्ट होण्याचे स्वप्न असणार. कदाचित महान बॉक्सिंग योद्धा होण्याचे कर्लीचे स्वप्न असणार. हे सगळे लोक अमेरिकेच्या तिसऱ्या दशकात आलेल्या आर्थिक महामंदीच्या सापळ्यात अडकलेल्या गरीब, निराश्रित, विस्थापित कामगारांचे प्रतिनिधी आहेत; परंतु जो तो आपल्या सापळ्यात जखडलेला आहे; सुटकेचे स्वप्न आहे, जिवाच्या आकांताने केलीली धडपड आहे; पण सुटका नाही. वीड गावच्या सापळ्यातून कसेबसे सुटून जॉर्ज आणि लेनी येतात सोल्दादजवळच्या शेतावर. हाही एक सापळाच; पूर्वी एवढाच खतरनाक. जीवन हाच एक सापळा असून त्यात अब्जावधी माणसे उंदरांसारखी अडकून पडलेली आहेत, सुटण्यासाठी अखंडपणे धडपडत आहेत; पण व्यर्थ. बिचारा गणपत वाणी जसा माडी बांधण्याचं स्वप्न पाहत बिडी पितापिताना मरून गेला, तशी या लोकांची जिनगानी आहे. मरण हीच त्यातून सुटका आहे. 'मरणं प्रकृतिः शरीरीणां, विकृतीर्जी वितमुच्यते बुधैः,' (मृत्यू हाच शरीरधर्म, हीच प्रकृति आहे; जीवन ही विकृती आहे, असे कालिदास म्हणतो), अशी ही अवस्था आहे.

आणखी एक निरीक्षण नोंदवता येईल. इथली सगळी माणसे एकटी, सडेफटिंग आहेत; त्यांना घर नाही म्हणून गृहस्थी नाही. एकटेपणा हा संगतीप्रिय मानवी सहजप्रवृत्तींच्या विरोधात असल्याने देखील एक कराल सापळाच आहे. त्यातून तरी सुटका कुठे आहे? निसर्गाला निर्वात पोकळी, तसे माणसाला निर्मनुष्य एकाकीपण घृणास्पद, नामंजूर असते. स्वतःचे शेत मिळेल, घर मिळेल, म्हणून जॉर्ज आणि लेनी इकडे दूर स्वप्नपूर्तीच्या शोधात सोल्दादला पळून आले आहेत. तिथे वर्णद्वेषाचा बळी क्रूक्स एकाकी आहे. तो म्हणतो, 'कुणी सोबतीला नसेल तर माणसाला वेड लागण्याची वेळ येते.' कर्लीची

बायको एकाकी आहे (म्हणून तर तिने या रानवटाशी लग्न लावले आहे.) सारेच एकाकी आहेत. जॉर्ज आणि लेनी एकत्र आहेत कारण ही एकाकीपणाची भीती त्यांना एकत्र बांधून ठेवते आहे. ते येतात एका एकाकी ठिकाणाहून दुसऱ्या एकाकी ठिकाणी. स्पॅनिश भाषेत Soledad चा अर्थ एकांतवास असाच आहे! आणि असा एकांतवास ही शिक्षा आहे. सेंट हेलीना या बेटावरच्या एकांतवासात नेपोलियन वेडा झाला, आणि रंगूनच्या कारागृहात अडकलेल्या बहादूरशाह जफर याची अवस्था तरी कोणती होती? 'कितना बदनसीब है जफर...' असे एका गझलेत तो म्हणतो.

यातून आणखी एक आशय वाचता येऊ शकेल. कुटुंब, समाज म्हणजे एकत्रित सहजीवन. एकमेकांना धरून राहायचे आहे ना, मग सहनशील, समजूतदार, सहिष्णू असायला हवे; क्षमाशीलदेखील असायला हवे. आर्थिक स्तर, जात, धर्म, वर्ण, कातडीचा रंग, हे सर्व वरलीये रंग आहेत. त्यांमुळे आपसात भेदभाव येता कामा नये. याच परिपक्व वृत्तीचे जॉर्ज हा प्रतीक आहे. किती सांभाळून घेतो तो आपल्या मंदबुद्धी मित्राला! क्रूक्सला कोणीच समजून घेत नाही; कर्लीच्या बायकोला कोणीच समजून घेत नाही. समजून घेणं म्हणजेच क्षमाशील असणं (To understand is to forgive), हे कादंबरीचे एक सूत्र इथे गुंतलेले आहे.

शांत, मुक्त आणि सन्मानाचं साहचर्य जीवन मिळणे हे सर्वच माणसांचं स्वप्न, मनोराज्य असतं. सुटकेची स्वप्ने पाहणाऱ्या पिंजऱ्यातल्या उंदरांमध्ये आणि माणसांमध्ये काय फरक? दोघांचेही मनोराज्य एकच; पण परिपूर्ती नाही: कुसुमाग्रज म्हणतात, ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ती? कथेचा असा नकारात्मक, निराशाजनक शेवट मनाला विद्ध करून जातो.

**२.दूरदेशी राहिलेले...**

पण लेखकाच्या मनात ठसठस दाटून राहिलेली होती. शोषणाचे हे भेसूर चित्र त्याला स्वस्थ बसू देईना. दोनच वर्षांनी याच विषयावर स्टाइनबेकने 'द ग्रेप्स ऑफ राथ' लिहून प्रसिद्ध केली. पुलित्झर पारितोषिक मिळवणारी त्याची सर्वांत प्रसिद्ध कादंबरी द ग्रेप्स ऑफ राथ (१९३९) प्रसिद्ध होण्याआधी दोनच वर्षे ऑफ माइस अँड मेन (१९३७) ही लघु कादंबरी प्रसिद्ध झाली होती. तीसच्या दशकात अमेरिकेतल्या आर्थिक मंदीच्या काळात विस्थापित झालेल्या हजारो स्थलांतरितांच्या करुण ससेहोलपटीच्या व्यथा लेखकाने बघितल्या होत्या. ऑफ माइस अँड मेनमधे तो विषय त्याने ओझरता मांडला होता. वर्षभरातच तो पुन्हा त्या विषयाकडे वळला आणि निर्माण झाली द ग्रेप्स ऑफ राथ.

देशोधडीला लागलेल्या जोड नावाच्या भल्यामोठ्या विस्थापित आणि स्थलांतरशरण कुटुंबाची ही करुण कहाणी आहे. आजोबा, आजी, काका, तरुण मुले, लहानगी नातवंडे, आई-वडील, आणि विशीतली गर्भवती रोझ असा हा कबिला ओक्लोमा राज्यातून चौदाशे मैल दूर असलेल्या कॅलिफोर्नियाला मजल दरमजल करत, वाटेत मिळेल त्या निवाऱ्यात, प्रसंगी गोठ्यात रात्र काढत, आपल्या जुन्या ट्रकमधे सर्व संसार भरून, मूळचे घरदार, शेत सोडावे लागून निघालेला आहे. पुंजीपतींनी त्यांच्या जमिनी धाकदपटशा दाखवून, बलाचा वापर करून हिसकावून घेतल्या आहेत. कॅलिफोर्नियात हजारो मजुरांची आवश्यकता आहे, अशी जाहिरात त्यांनी वाचलेली आहे. त्या आशेवर हजारो लोकांचा हा खडतर प्रवास सुरू झालेला आहे. स्थैर्य, सुबत्ता, स्वास्थ्य यांचे प्रतीक असलेला कॅलिफोर्निया म्हणजे नंदनवन असणार, ही दृढ श्रद्धा बाळगून अशी हजारो कुटुंबे तिकडे निघालेली होती.

प्रत्यक्षात वाटेत आणि तिथे गेल्यावर एका गचाळ गोठ्यात मुक्काम आणि ठेकेदाराने केलेली हर तऱ्हेची छळणूक आणि पिळवणूक यांच्या आणि अशा अन्य अनेक मजुरांच्या नशिबी लिहून ठेवलेली आहे. ओक्लोमातून आले म्हणून त्यांना ओकीज म्हणून संबोधले, चिडविले जाते, (कादंबरीचे आधीचे नाव ओक्लोमन्स असे योजिले होते), जनावरांपेक्षादेखील वाईट रीतीने वागवले जाते आहे, मारहाण केली जाते आहे, हिशेबांची गफलत करून पूर्ण मजुरी दिली जात नाही. कादंबरीचा शेवट अत्यंत हृदयद्रावक; परंतु तेवढाच माणुसकीचे उदात्त दर्शन घडविणारा, प्रभावी आहे. शेजारी एक जख्ख म्हातारा क्षुधा आणि तृष्णेने मरणोन्मुख झालेला आहे. गर्भपात झालेली रोझ हे बघते. करुणा आणि वात्सल्य यांनी तिचा पान्हा भरून येतो आणि ती त्या म्हाताऱ्याला स्तन्य देते, जगण्याचे बळ देते.

**२४ ऑक्टोबर १९२९ या दिवशी अमेरिकन शेअर मार्केट कोसळले आणि दीर्घ आर्थिक महामंदीचे दशावतार सुरू झाले. याच सुमारास टेक्सस आणि नेब्रास्का इथे धुळीची महाप्रचंड वादळे सुरू झाली होती आणि या दोहोंमध्ये सापडलेल्या ओक्लोमा राज्यात ही धूळ जाडजूड थरांनी भरून राहिली होती. (कादंबरीचा प्रतीकात्मक प्रारंभ धुळीच्या वादळांनी झाला आहे.) मनुष्य, प्राणी, पिके आणि अन्य संपत्तीची अपरिमित हानी या वादळांनी झाली. हा प्रदेश डस्ट बाउल (धुळीचा वाडगा) म्हणून कुप्रसिद्ध झाला. यामुळे मंदीचा वणवा अधिकच भडकला. तीसच्या या दशकातला मंदीचा सगळा इतिहासच कवेत घ्यायचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. कॅलिफोर्नियातील भांडवलदार कारखानदारांची दमनशक्ती स्थलांतरित कामगारांचे नागरी अधिकारच चिरडण्याचा प्रयास करीत होती. ते असेच गतानुगतिक रीतीने शोषित, पीडित, अन्यायग्रस्त, दरिद्री अवस्थेत राहावेत, हे या दमननीतीमागचे सूत्र होते.**

परिस्थितीविषयीचा क्रोध जेवढा अनावर आहे तेवढीच माणुसकी आणि वात्सल्य देखील जिवंत आहेत. या अर्थाने रोझची स्तनरूपी द्राक्षे हे क्रोध आणि वात्सल्याची निरागस रसपूर्णता यांचे प्रतीक असल्याचा प्राथमिक बोध वाचकाला कथेच्या शीर्षकातून होऊ शकेल. शेवटचे स्तनपानाचे दृश्य अश्लील असून अनेक राज्यांनी या कादंबरीवर बंदी घातली होती; एवढेच नव्हे तर तिची जाहीरपणे होळी केली गेली; परंतु तिने मानवी जीवनाची होणारी विटंबना दाखवून, आणि त्याच वेळी माणसाच्या क्रौर्याचे घृणास्पद वर्तन उघडे पाडून साऱ्या अमेरिकेचे डोळे खाडकन उघडले, असा लौकिक पुढे या कादंबरीला प्राप्त झाला. एकूण साहित्यसेवेबद्दल जॉन स्टाइनबेक यांना नोबेल सन्मानाने गौरविले गेले. थोडी तपशिलात पार्श्वभूमी बघता येईल.

२४ ऑक्टोबर १९२९ या दिवशी अमेरिकन शेअर मार्केट कोसळले आणि दीर्घ आर्थिक महामंदीचे दशावतार सुरू झाले. याच सुमारास टेक्सस आणि नेब्रास्का इथे धुळीची महाप्रचंड वादळे सुरू झाली होती आणि या दोहोंमध्ये सापडलेल्या ओक्लोमा राज्यात ही धूळ जाडजूड थरांनी भरून राहिली होती. (कादंबरीचा प्रतीकात्मक प्रारंभ धुळीच्या वादळांनी झाला आहे.) मनुष्य, प्राणी, पिके आणि अन्य संपत्तीची अपरिमित हानी या वादळांनी झाली. हा प्रदेश डस्ट बाउल (धुळीचा वाडगा) म्हणून कुप्रसिद्ध झाला. यामुळे मंदीचा वणवा अधिकच भडकला. तीसच्या या दशकातला मंदीचा सगळा इतिहासच कवेत घ्यायचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. कॅलिफोर्नियातील भांडवलदार कारखानदारांची दमनशक्ती स्थलांतरित कामगारांचे नागरी अधिकारच चिरडण्याचा प्रयास करीत होती. ते असेच गतानुगतिक रीतीने शोषित, पीडित, अन्यायग्रस्त, दरिद्री अवस्थेत राहावेत, हे या दमननीतीमागचे सूत्र होते. या स्थलांतरितांचे एक स्वप्न म्हणजे स्वतःची शेत-शिवार जमीन असावी, तीवर पिके डोलावित, पाळीव प्राणी बागडावेत, एक घर तिथे उभे राहावे आणि जीवन अशा सुस्थिर, निरामय आनंदात व्यतीत व्हावे. खरे तर हे समग्र वसाहतग्रस्त अमेरिकेचे स्वप्न आहे. आपल्या स्वतःच्या बंधमुक्त विश्वात स्वतःच्या जमिनीवर, मेहनतीवर बरकतीचा बहर यावा आणि प्रतिष्ठित स्थिर जीवन जगता यावे, हा त्या स्वप्नाचा तपशील. काही वेळा या वृत्तीला अमेरिकेला लागलेली भूमीभूक (Land Hunger) असेही म्हटले गेले आहे. मात्र कादंबरीत प्रत्यक्षात ही माणसे जेव्हा इच्छित ठिकाणी येतात आणि एकूण परिस्थितीचा अनुभव घेतात तेव्हा त्यांचा दारुण स्वप्नभंग होतो. मूळच्या स्वतःच्या जमिनीवरून दांडग्या दमनकारी भांडवलदारांनी हाकलून दिलेल्या या दरिद्री लोकांना कॅलिफोर्निया ही स्वप्नभूमी वाटते. तिथे मुबलक जमीन, पाणी आहे म्हणजे स्वर्गीय जीवनाची निश्चिती. तिकडे निघाले आहेत हे लोंढे, घराच्या, स्थैर्याच्या, सुखाच्या, नंदनवनाच्या शोधात. मात्र येऊन पडतात मरुभूमीच्या आगीत.

अर्थनिर्णयनाच्या दृष्टीने ही कादंबरी बहुस्तरीय आहे,

असे समीक्षक लुई ओवेन्स म्हणतो. प्रथमतः ही कथा आहे जगण्याचा निकराचा संघर्ष करून इप्सित स्थैर्य, सुख मिळवणाऱ्या एका विस्थापित, साध्या, एकत्र कुटुंबाची. या कुटुंबात आजा-आजी, ते जन्माला येऊ घातलेला परंतु न जन्मलेला नातू असा विस्तार आहे. सुखाच्या शोधात ते दीर्घ प्रवासाला निघालेले आहेत. दूरदेशी राहिलेले दीन त्याचे झोपडे / बापुडा अन् आज येथे पायवाटेला पडे अशा दारुण अवस्थेला हे शेवटी येऊन पोहोचतात. थोड्या व्यापक अर्थाने ही कथा एकूणच जागतिक विस्थापित, स्थलांतरित समाजाच्या हाल अपेष्टांचे चित्रण आहे. एका देशाच्या अमेरिकेच्या--इतिहासातले हे एक यातनापर्व इथे प्रातिनिधिक रीतीने जिवंत केलेले आहे. वस्तुतः संपूर्ण कादंबरीच एक सलग रूपककथा असून ज्यू लोकांचे महाप्रस्थान (Exodus), गोठ्यात जन्मलेल्या जीझसचा शेवटचा प्रवास, नरकाकडून स्वर्गाकडे जाण्याची ओढ, अशी उकल करता येते. पूर्वी ज्यू समाजाच्या इतिहासात या सर्व जमातीलाच त्यांच्या भूमीतून हद्दपार केले गेले आणि प्रेषित मोझेसने त्यांना सुरक्षित स्वप्नभूमीकडे नेले, त्या एग्झोडसचे रूपक प्रस्तुत कथेत गुंफलेले आहे. एकूण काय की देशांतर्गत असो किंवा बाहेरून आलेले असोत, माणसाच्या नशिबातले विस्थापितपण संपलेले नाही, संपेल असे दिसत नाही. करोनाच्या हाहाकारात हे सत्य प्रकर्षाने पुढे आले आहे, आणि जगभर हीच स्थिती आहे, हाही एक विस्तारलेला अर्थ येथे लागू होतो. हे सर्व विस्थापित श्रमजीवी आहेत. खरे तर श्रमशक्ती हीच धननिर्मिती करणारी ऊर्जा असते. तिची प्रतिष्ठा जपणे महत्त्वाचे आहे, हाही संदेश या कादंबरीत वाचता येईल.

स्वप्ने पाहणे ही माणसाची जुनीच सवय आहे. स्वर्गाची स्वप्ने तर सारे जग बघते आणि देव, देश, धर्मासाठी मेलात तर स्वर्गप्राप्ती निश्चित, ही विचारसरणी आहेच. आधीची कादंबरी ऑफ माइस अँड मेनमधे देखील सर्व पात्रे काहीनाकाही स्वप्ने पाहत आहेत. त्यांत स्वतःची भूमी मिळवणे हे सर्वाधिक प्रिय स्वप्न आहे. हेच स्वप्न द ग्रेप्स ऑफ राथ मधे देखील आहे.

एका देशाच्या, अमेरिकेच्या इतिहासातले हे एक यातनापर्व आहे, असा उल्लेख वर आलेला आहे, त्याचा अधिक खुलासा कादंबरीच्या शीर्षकात आहे. वर्षे १८६१ ते १८६५ असे दीर्घकाळ अमेरिकन सिव्हिल वॉर लढले गेले. शेवटी संपूर्ण स्वतंत्र अमेरिकन संघराष्ट्र निर्माण झाले. जुलिया होव्ज या कवयित्रीने द बॅटल-हिम ऑफ द रिपब्लिक हे या स्वातंत्र्ययुद्धाचे गौरवगीत लिहिले. ध्येयपूर्तीच्या या संघर्षात निराशेचे, संकटाचे, यातनांचे अनेक पहाड येतील; पण ते उल्लंघून पुढेपुढे जात राहा, सर्व दुःखे, संताप, द्वेष सहन करा आणि विजयाची द्राक्षे चाखा, असा या गीताचा संदेश होता. प्रस्तुत कादंबरीतील जोड कुटुंबाला जणू हा संदेश दिलेला आहे, असे शीर्षकातून सूचित होते. शेवटी आपली स्वप्नातली वचनदत्त/देवदत्त (Promised Land) सुवर्णभूमी आपल्याला प्राप्त होईलच,--हम होंगे कामयाब--असा आशावादी संदेश आहे.

कादंबरीवर टीकादेखील झाली. तिच्यात अनेक दोष आहेत असेही सांगितले गेले. उदाहरणार्थ, ती जरा अधिकच भावुक, नाटकी आहे, सर्व पात्रे सपाट म्हणजे गोलाई, खोली नसलेली आहेत, तिला बळेच रूपककथेचे आवरण घातले आहे, संवाद अतिशय सुमार, अघळपघळ आहेत, वर्णनांची भरताड आहे, भरमसाठ पुनरुक्ती आहे (मूळ १००० पाने नंतर काटछाट करून सातशेजवळ आणली गेली!), इत्यादी. तरीही कादंबरीचा गाभा अतिशय संवेदनशील, मानवी, सहानुभूतीपूर्ण असून संदेश आशावादी, सकारात्मक आहे, हा तिचा ठाशीव गुण आहे. विपरीत सैतानी परिस्थितीत देखील जीवनसंघर्ष जिंकण्याच्या मानवी विजीगिषु वृत्तीला केलेला हा सलाम आहे. लाखो वर्षे मानवाने अस्मानी-सुल्तानी झेलली-पेलली आहे आणि जिवंतपणे तो सतत प्रगमनशील राहिलेला आहे. अर्नेस्ट हेमिंग्वेच्या 'दि ओल्ड मॅन अँड द सी' या कादंबरीतला म्हातारा कोळी त्याला सापडलेल्या प्रचंड मार्लिन माशाला इशारा देतो, "Fish, man will be destroyed but will not be defeated." (मानव नष्ट होईल पण पराभूत होणार नाही.) ती विजिगीषा या कादंबरीत वाचता येते. हे तिचे महानपण आहे.

**डॉ. शिरीष चिंधडे**
हे निवृत्त प्राचार्य असून इंग्रजी साहित्याचे अभ्यासक आहेत.
पत्ता: ७ नीलांबरी, मेहेंदळे गॅरेजसमोर, एरंडवणे,
पुणे:४११००४.
चलभाष: ९६६५०५०४७३

लोकसाहित्यातील स्थळपुराणांच्या अभ्यासाबाबत विवेचन करणारा शोधनिबंध

# स्थळपुराणांच्या अभ्यासाच्या दिशा

डॉ. सदाशिव पाटील

**प्रास्ताविक:**

स्थळपुराणे हे सांस्कृतिक इतिहासाच्या संशोधनाचे एक महत्त्वाचे साधन आहे. भारतीय लोक वाङ्मयातील लोककथांची परंपरा फार प्राचीन आहे. आपल्याकडे देव-देवतांच्या विधी प्रसंगी गोष्ट सांगण्याची प्रथा पूर्वीपासून प्रचलित आहे. केवळ दैवतांविषयक आख्यायिकांमधून त्या - त्या दैवतांचे सर्वांगाने दर्शन घडणे - घडविणे केवळ अशक्य असते. त्यासाठी इतर मार्गही धुंडाळावे लागतात. मौखिक परंपरेतील लोककथा, लोकगीते, पूजापद्धती, विधीविधाने, धारणा, श्रद्धा, मूर्ती याबरोबरच त्या-त्या देवतांची स्थळपुराणे या वेगवेगळ्या गोष्टींमधून या देवतांचे चरित्र शोधावे लागते. स्थळमाहात्म्यातून समाजाच्या श्रद्धांचे, चालीरीतींच्या रूढींचे, क्षेत्रस्थानांच्या प्राचीनतेचे आणि त्यातून त्या दैवतांच्या पूर्वावस्थेचेही दिशादर्शन होत असते. दैवतांविषयक पुराणकथा मोठ्या प्रमाणात त्या-त्या देवतांच्या स्थळपुराणात संग्रहित झालेल्या असतात. आज लोकदैवतांची आणि ग्रामदैवतांची स्थळपुराणे अनेक संशोधकांना उपलब्ध होत आहेत. या स्थळपुराणांची लोकप्रियता ध्यानात घेऊन त्या दैवतांचा आणि त्या क्षेत्रस्थानांच्या सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेण्याच्या दृष्टीने स्थळपुराणांचा अभ्यास मला महत्त्वाचा वाटतो.

सांस्कृतिक इतिहासाचे स्वरूप समजून घेण्यासाठी स्थळपुराणांचा अभ्यास आजवर अनेक अभ्यासकांनी केला आहे. आंतरराष्ट्रीय प्राच्यविद्या विशारद जे. होंडा, हेमचंद्रराय चौधरी, सुनितीकुमार चॅटर्जी, ना. ग. देशपांडे, शं. गो. तुळपुळे, वा. ना. देशपांडे, राजेश्वर पांडुरंग स्वामी, श्री. गो. रायचूरकर, हरी गोपाळ अंगापूरकर, दाजीबा जोशीराव, उद्धवाचार्य ऐनापुरे आदी अभ्यासकांच्या संशोधनातून स्थळपुराणांविषयीची उपेक्षा संपावी इतके या अभ्यासाचे महत्त्व सिद्ध झाले आहे. डॉ. रा. चिं. ढेरे यांनी तर आपल्या आयुष्यातील मोठा कालखंड प्रामुख्याने स्थळपुराणे आणि तत्सदृश्य साधनांच्या आधारे दैवतांच्या अभ्यासासाठी व्यतीत केला आहे. डॉ. तारा भवाळकर यांनी 'संस्कृतीची शोधयात्रा' या ग्रंथात स्थळपुराणांचा विचार केला आहे.

**स्थळपुराणांचे स्वरूप:**

भारतीय संस्कृतीत आचार-विचार व लोकांची सांस्कृतिक सभ्यता यांचा सामान्य जनतेपर्यंत प्रचार करण्याचे श्रेय पुराणांनाच दिले जाते. गावोगावी वेगवेगळ्या देवतांच्या कथा, गीते, आख्यायिका रूढ असलेल्या दिसतात. तसेच त्या देवतांच्या माहात्म्यकथा,

स्थळपुराणे उपलब्ध होतात. या सामग्रीचा त्या देव-देवतांच्या मूलोदयाचा व विकासक्रमाचा शोध घेण्यासाठी उपयोग होतो. तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक संदर्भही ध्यानात येतात. स्थळपुराणांना 'भाकडकथा' म्हणूनही काही विद्वानांनी हिणवले आहे; परंतु लोकजीवनाच्या सर्वांगीण अभ्यासासाठी, श्रद्धा-विश्वाचा शोध घेण्यासाठी स्थळपुराणे महत्त्वाची ठरली आहेत. 'पुराण साधनांची आणि स्थळपुराणांची टर उडवण्यासाठी मातब्बर विद्वान अनेकदा शे- दीडशे वर्षांपूर्वी प्रचलित झालेल्या सत्य नारायण पूजाविधीचे आणि त्याविषयीच्या कथेचे उदाहरण देतात.' (रा. चिं. ढेरेः २०१२:३१) हे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे मत खरे आहे कारण, आपल्याकडे स्थळपुराणांच्या अभ्यासाकडे म्हणावे तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही. ग्रामीण महाराष्ट्राचा सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहास शोधण्याच्या दृष्टीने स्थळपुराणे किंवा स्थळ माहात्म्ये किती उपयुक्त आहेत याची व्यापक जाणही अभ्यासकांना झालेली दिसत नाही. इतर विद्या शाखांमधील संशोधन किंवा राजकीय-ऐतिहासिक स्वरूपाचे संशोधन आणि देव-देवतांचे संशोधन याच्यामध्ये फरक असतो. या संदर्भात तारा भवाळकर लिहितात, 'राजकीय- ऐतिहासिक संशोधन आणि एखाद्या समाजात श्रद्धा विषय झालेल्या देवतेच्या उन्नयनाच्या इतिहासाचे संशोधन वेगळे असते. राजकीय इतिहास सिद्ध करण्यासाठी शिलालेख व अस्सल कागदपत्रांचा पुरावाच प्रमाण मानावा लागतो; परंतु लोक मानसातील श्रद्धांचा मागोवा घेताना केवळ वस्तुनिष्ठ पुरावा पुरेसा नसतो, तर लोक मानस अभावितपणे ज्या कथा-कहाण्यांतून, उपासना विधींतून आणि स्थळपुराणांतून अभिव्यक्त होत राहिले आहे, त्यांचा श्रद्धायुक्त मनाने धांडोळा घ्यावा लागतो.' (तारा भवाळकर२००५: ५५) एखादे दैवत निर्माण झाले की, त्याच्या दंतकथा रचल्या जातात. त्यातून त्याचे माहात्म्य वाढविले जाते. त्याची यात्रा - जत्रा सुरू होते. त्या- त्या परिसरातील सांस्कृतिक परंपरा, इतिहास, धारणा, पीक पाणी, भौगोलिक पर्यावरणातून या देवतांना आकार प्राप्त झालेला असतो. म्हणजेच देव-देवतांच्या धार्मिक परिवर्तनाची प्रक्रिया व देवतांचा इतिहास हा तेथील वस्तू-वास्तूत, शिलालेखांत, देवतांच्या उपासनेत आणि मुद्दाम निर्माण केलेल्या स्थळपुराणात शोधला जातो.

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी त्यांच्या 'महाराष्ट्राचा देव्हारा' या ग्रंथात देव देवतांसंबंधी विवेचन केले आहे. 'महाराष्ट्राचा देव्हारा नाना दैवतांनी गजबजलेला आहे. नाना आकृतीची दैवतं, नाना प्रकृतीची दैवतं. काही आकृतीनं भयानक असूनही गुणांच्या बाबतीत सौम्य झालेली, तर काही आकारहीन शिळांच्या रूपात पूजली जात असूनही गुणांच्या बाबतीत भयानक असलेली. प्रत्येक घरात नांदणारी कुलदैवतं, प्रत्येक गावातल्या देवळात नांदणारी ग्रामदैवतं आणि दारापारांवर, ओट्याचव्हाट्यावर, डोंगरमाळांवर, तळ्याच्या पाळीवर नि बांधा बांधावर ठाण मांडून बसलेली भूत-पिशाच्चं, मुंजोबा- चेडोबा, आसरा- मावलाया, म्हसोबा, जाखदेव

**डॉ. रा. चिं. ढेरे यांनी त्यांच्या 'महाराष्ट्राचा देव्हारा' या ग्रंथात देव देवतांसंबंधी विवेचन केले आहे. 'महाराष्ट्राचा देव्हारा नाना दैवतांनी गजबजलेला आहे. नाना आकृतीची दैवतं, नाना प्रकृतीची दैवतं. काही आकृतीनं भयानक असूनही गुणांच्या बाबतीत सौम्य झालेली, तर काही आकारहीन शिळांच्या रूपात पूजली जात असूनही गुणांच्या बाबतीत भयानक असलेली. प्रत्येक घरात नांदणारी कुलदैवतं, प्रत्येक गावातल्या देवळात नांदणारी ग्रामदैवतं आणि दारापारांवर, ओट्याचव्हाट्यावर, डोंगरमाळांवर, तळ्याच्या पाळीवर नि बांधा बांधावर ठाण मांडून बसलेली भूत-पिशाच्चं, मुंजोबा-चेडोबा, आसरा- मावलाया, म्हसोबा, जाखदेव यांसारखी असंख्य क्षुद्र दैवतं. त्यांच्यात जाती - जमाती आहेत. उच्चनीचता आहे. जाती गट आहेत. स्नेहसंबंध आहेत, अन् संघर्षही आहे.' (रा.चिं. ढेरे:१९७८:१६)**

यांसारखी असंख्य क्षुद्र दैवतं. त्यांच्यात जाती - जमाती आहेत. उच्चनीचता आहे. जाती गट आहेत. स्नेहसंबंध आहेत, अन् संघर्षही आहे.' (रा.चिं. ढेरे:१९७८:१६) अशा देव-देवतांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पवित्र क्षेत्राला आपण तीर्थक्षेत्र म्हणतो. पुढे त्या तीर्थक्षेत्राचे माहात्म्य रचले जाते. त्या माहात्म्यामध्ये त्या तीर्थाविषयी दंतकथा, स्तोत्रे एकत्र केलेली असतात. अशा स्वरूपाची 'तीर्थमाहात्म्ये' येथील स्थानिक क्षेत्रोपाध्यांनी रचलेली असतात. त्या तीर्थ क्षेत्राला भेट देण्यासाठी आलेल्या भक्तांना त्या संबंधित तीर्थाचे आणि तीर्थातील धार्मिक विधीविधानांचे महत्त्व सांगण्याच्या हेतूने अशी माहात्म्ये निर्माण झालेली असतात.

स्थळपुराणांचे नेमके स्वरूप विशद करताना डॉ. तारा भवाळकर लिहितात,'उपास्य देवतेचा भौगोलिक परिसर आणि उपासकांच्या मनात रुजलेला त्या दैवताचा इतिहास कथोपकथांच्या, किंवदन्तींच्या स्वरूपात संग्रहित झालेला असतो. स्थानिकांच्या जीवनात साचलेल्या कथा-दंतकथा व श्रद्धा संहिताबद्ध करण्याचे काम कोणीतरी एक व्यक्ती करते. बहुधा त्या देवतेचे महत्त्व अभिजनांत वाढू लागले की, मंदिरातील पुरोहित पुराण रचना करतात. ती देवता अधिक प्रतिष्ठित करण्यासाठी अनेकदा संस्कृत भाषेत स्थळपुराण रचले जाते आणि हे पुराण कोणत्यातरी सुप्रतिष्ठित प्राचीन पुराणाचा भाग आहे, असे सिद्ध केले जाते. अनेक स्थळपुराणेही सुप्रतिष्ठित अशा विष्णुपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण, भविष्यपुराण अशा कोणत्यातरी पुराणाचा भाग असल्याचे प्रतिपादिले जाते,

कारण तत्संबंधदैवत आणि त्याचे क्षेत्र हे प्राचीन काळापासून पवित्र- जागते असल्याचे महत्त्व भक्तांच्या, यात्रिकांच्या आणि उपासकांच्या मनात ठसविणे त्यांना आवश्यक वाटते; परंतु स्थळपुराणाच्या रचनेत लोकस्मृती समकालीन घटकांचे अवशेष ठेवून देते. अनेकदा त्या देवतेचे पुराण रचना काळाच्या पूर्वावस्थेतले रूप उमजावे अशा खाणाखुणा ठेवून देते. त्यामुळे त्या देवतेचे आणि परिसराचे आदिमरूपही स्थळपुराणांतून उलगडते.' (तारा भवाळकर:२००५:६०) खेड्यापाड्यातील लोकजीवनात महत्त्व असणाऱ्या या देवदेवतांच्या विकासक्रमाचा शोध-बोध हा स्थळपुराणांच्या अभ्यासावाचून पूर्ण होऊ शकणार नाही. एखाद्या दैवताबद्दलच्या आदिम श्रद्धांचे स्वरूप कसे होते व त्याचे कालांतराने कसे उन्नयन होत गेले अशा अनेक प्रश्नांची उत्तरे स्थळपुराणांतूनच मिळू शकतात; तसेच स्थळपुराणांतर्गत पुराव्यांतून उपासनेतील उन्नयन प्रक्रियाही ध्यानात येते.

**स्थळपुराणांच्या अभ्यासाचे महत्त्व:**

देव- देवतांविषयी व त्या देवदेवतांच्या तीर्थक्षेत्रांविषयीच्या कथा- गाथा मौखिक परंपरेत पिढ्या पिढ्या सांगितल्या जातात. या कथा- गाथांतून तेथील स्थानिक आणि परिसरातील लोकमानसांच्या श्रद्धा बळकट केल्या जातात. मौखिक परंपरेने चालत आलेल्या देव-देवतांविषयीच्या या सामग्रीतून अनेक स्थळपुराणकारांनी क्षेत्र माहात्म्यपर ग्रंथांची निर्मिती केलेली दिसते. अलीकडच्या काळात 'यडूरपुराण'- श्रीक्षेत्र यडूर, 'श्री भैरवनाथ माहात्म्य'- श्रीक्षेत्र खरसुंडी, 'श्री समुद्रेश्वर माहात्म्य'- श्रीक्षेत्र सागरेश्वर, 'सिद्धेश्वर माहात्म्य'- श्रीक्षेत्र सिद्धेश्वर, करोली अशा उपलब्ध स्थळपुराणांचा तरुण संशोधक अभ्यास करत आहेत. या

**देव- देवतांविषयी व त्या देवदेवतांच्या तीर्थक्षेत्रांविषयीच्या कथा- गाथा मौखिक परंपरेत पिढ्या पिढ्या सांगितल्या जातात. या कथा- गाथांतून तेथील स्थानिक आणि परिसरातील लोकमानसांच्या श्रद्धा बळकट केल्या जातात. मौखिक परंपरेने चालत आलेल्या देव-देवतांविषयीच्या या सामग्रीतून अनेक स्थळपुराणकारांनी क्षेत्र माहात्म्यपर ग्रंथांची निर्मिती केलेली दिसते. अलीकडच्या काळात 'यडूरपुराण'- श्रीक्षेत्र यडूर, 'श्री भैरवनाथ माहात्म्य'- श्रीक्षेत्र खरसुंडी, 'श्री समुद्रेश्वर माहात्म्य'- श्रीक्षेत्र सागरेश्वर, 'सिद्धेश्वर माहात्म्य'- श्रीक्षेत्र सिद्धेश्वर, करोली अशा उपलब्ध स्थळपुराणांचा तरुण संशोधक अभ्यास करत आहेत.**

संदर्भात डॉ. रा. चिं. ढेरे लिहितात, 'भारतात असे एकही गाजते क्षेत्र नाही की, ज्याच्याविषयी स्थळपुराण निर्माण झालेले नाही. शतकानुशतके अशी स्थळपुराणे, अशी क्षेत्रमाहात्म्ये रचली गेली आहेत. कुठल्यातरी महापुराणाचा अंश असल्याचा दावा सांगत रचल्या गेलेल्या या स्थळपुराणांचा उपयोग भाविकांच्या अंत:करणात त्या-त्या स्थळाचा- क्षेत्राचा प्रभाव रुजवण्यासाठी केला गेला आहे. यातली जी क्षेत्रमाहात्म्ये महापुराणांच्या प्रमाणीकरणापूर्वीच रचली गेली होती, त्यांचा समावेश त्या-त्या महापुराणात झालेला आहे आणि प्रमाणीकरणानंतर रचल्या गेलेल्या क्षेत्रमाहात्म्यांना केवळ अनामिक रचनाकारांच्या प्रभावी दाव्यावरच अवलंबून राहावे लागले आहे; परंतु हे अवलंबन पूर्वी कधीच ढिले पडले नाही. पारंपरिक विद्यांचे ज्ञाते असलेले विद्वानही अगदी नि:शंकपणे या क्षेत्रमाहात्म्यांची प्राचीनता स्वीकारून भक्त - भाविकांना अशा माहात्म्यांच्या आधारे त्या- त्या क्षेत्राचे, क्षेत्रस्थ वस्तू- वास्तूंचे, तीर्थजकाचे पावित्र्य पटवीत राहिले आहेत. ज्यांची उपजीविका क्षेत्रमाहात्म्यावर आधारलेली आहे, असे क्षेत्रोपाध्यायच नव्हे तर पूर्ण त्यागी- नि:स्वार्थी जाणते जनही क्षेत्रमाहात्म्यांची प्रतिष्ठा स्वीकारीत राहिले आहेत. (रा.चिं. ढेरे:२०१० : २८३)

स्थळपुराणे जरी पुराणांच्या परिवेशात रचली गेलेली असली, तरी वास्तविक सामग्री एकदा अभ्यासकाला समजली की, त्याला स्थळपुराणातून कितीतरी इतिहासाचे क्षण पकडता येतात. सांस्कृतिक परंपरेची अज्ञात पर्वे ज्ञात करून घेताना स्थळपुराणांचे साहाय्य घेतले, तर आपले सांस्कृतिक इतिहासाचे अध्ययन गतिमान झाल्यावाचून राहणार नाही. धार्मिक अंगाने जेवढे पुराणांचे महत्त्व आहे तेवढेच वाङ्मयीनदृष्ट्याही असलेले दिसते. 'पुराणांतली कित्येक आख्याने आणि स्तोत्रेही वाङ्मयाचे रमणीय आविष्कार ठरावेत, अशा योग्यतेचे आहेत. काही पुराणांचा विशिष्ट दैवत संप्रदायांवर भर असल्यामुळे त्यातील अतिशयोक्ती आणि बुद्धीला न पटणारे भरताड पाहून कित्येक पाश्चात्त्य व पौर्वात्य समीक्षक पुराणांना महत्त्व न देता त्यांची उपेक्षा करतात; पण भारतीय परंपरा व इतिहास समजण्यासाठी याच्याइतके दुसरे उपयुक्त वाङ्मय कोणतेच नाही. (महादेव शास्त्री जोशी:१९९६: ६०५) देवदेवतांचा अभ्यास करताना येथील लोकसंस्कृतीची माहिती आपणास असावी लागते. देवतांच्या माहात्म्य कथा, स्थळपुराणे या सामग्रीचा अभ्यास मराठी विषयाचा अभ्यासक समाजेतिहास, सांस्कृतिक इतिहास आणि वाङ्मयाभ्यासाच्या भूमिकेतून करू शकतो.

**समारोप:**

लोकजीवनाच्या श्रद्धा- विश्वाचा शोध घेताना, वस्तुनिष्ठ पुरावा पुरेसा नसतो, तर ते लोकजीवन ज्या कथा-कहाण्यांतून, उपासना विधींतून आणि स्थळपुराणांतून अभिव्यक्त होत असते, त्यांचा श्रद्धायुक्त मनाने धांडोळा घ्यावा लागतो. केवळ विशिष्ट देवतेचा शोध घेण्याच्या दृष्टीनेच नव्हे तर त्या दैवताच्या निमित्ताने सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाचा शोध घेण्याच्या दृष्टीने स्थळपुराणे हे अत्यंत महत्त्वाचे आणि अपरिहार्य साधन आहे. स्थळ माहात्म्यकारांना देवता फक्त लोकप्रिय करायची असते; कारण त्या देवतेच्या निमित्ताने उभी राहिलेली मठ- मंदिरे त्यांच्या उपजीविकेची, पर्यायाने आर्थिक लाभाची ठिकाणे असतात. या दृष्टीनेही अभ्यास करणे शक्य आहे. आज अनेक दैवते आणि त्यांच्या कथा, स्थळपुराणे उपलब्ध होत आहेत. ती काळाच्या पडद्या आड होण्याआधी त्या सर्व गोष्टींचे संकलन, संवर्धन करून त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची:**

१. ढेरे रा.चिं., २०१२ : श्री विठ्ठल: एक महासमन्वय, (चतुर्थावृत्ती) पद्मगंधा प्रकाशन, पुणे
२. भवाळकर तारा, २००५ : संस्कृतीची शोध यात्रा, (प्रथमावृत्ती) पद्मगंधा प्रकाशन, पुणे
३. ढेरे रा.चिं., १९७८: महाराष्ट्राचा देव्हारा, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे
४. ढेरे रा. चिं., २०१०: करवीर निवासिनी श्री महालक्ष्मी (द्वितीयावृत्ती) पद्मगंधा प्रकाशन, पुणे
५. जोशी महादेव शास्त्री, १९९६: भारतीय संस्कृती कोश खंड पाचवा (तृतीयावृत्ती) भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे

**डॉ. सदाशिव पाटील**
मराठी विभाग प्रमुख, भारती विद्यापीठ अभिमतविश्व विद्यालय, यशवंतराव मोहिते महाविद्यालय, पुणे-३८
चलभाष- ७६२०२०४६३

# कादंबरी आकलनाचे व्यूह आणि कथात्म साहित्य

**कादंबरी या साहित्यप्रकाराच्या आकलनाचे विचारव्यूह, कथात्म साहित्य आणि उत्तर आधुनिक कादंबरी यामधील परस्परसंबंधाचा मूलगामी वेध घेणारा संशोधनलेख**

**डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले**

समकालीन साहित्य व्यवहाराचे आपण सगळे जण एक घटक आहोत. या साहित्यव्यहाराचे आकलन अर्थात हे विवेचन कादंबरी साहित्य प्रकाराच्या अनुषंगाने करणे महत्त्वाचे आहे. यात प्रामुख्याने वाचक, लेखक यांना केंद्रीभूत ठेवून मांडणी करणे या लेखाचा मुख्य उद्देश असणार आहे. कादंबरी आकलन कोणत्या घटकांच्या आधारे केले पाहिजे. मुख्यतः कथानक रचना, कथनव्यवस्था, पात्रयोजना, भाषा, लेखक व संहिता ह्या घटकांच्या अनुषंगाने साहित्यकृतीचे आकलन करणे या ठिकाणी महत्त्वपूर्ण आहे. वरील घटक प्रामुख्याने केंद्रस्थानी असतील. तसेच या घटकांना कादंबरीचे आविष्कार घटक म्हणून ओळखत असतो. कथानक रचना, पात्र, भाषा, कथन व्यवस्था ह्या पारंपरिक रचना तंत्राला, रूढ संकेत व्यवस्थेला अनुसरून सिद्ध होताना दिसतात. यातून एक साचेबद्धपणा निर्माण होत असतो. याच व्यवस्थेला शह देण्याच्या भूमिकेतून कादंबरी साहित्य प्रकारात काही अंशी प्रयोग होताना दिसून येतात. तसेच कादंबरी साहित्य प्रकाराच्या एकूण रूप रचनेत कसे बदल होत गेले हे पाहणेदेखील महत्त्वाचे आहे.

कादंबरीच्या कथासूत्र, कथानक रचना, पात्र योजना तसेच कथन व्यवस्था आणि भाषेच्या उपयोजनालाही तितकेच महत्त्व आहे. या गोष्टींच्या एकमेकांवरती होणाऱ्या प्रभावातून, परिणामातून, एकमेकाचे प्रभाव पचविण्याच्या प्रक्रियेतून तसेच आकलनाच्या व्यूहातून कादंबरीचा रूपबंध आकारत असतो. या अनुषंगाने कादंबरीच्या आकलनाचे व्यूह स्पष्ट करणे हा प्रमुख उद्देश आहे. या संदर्भाला अनुसरून नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील कथन व्यवस्था आणि भाषा उपयोजन या आविष्कार घटकांतील प्रयोगशीलतेचा आढावा घेणे महत्त्वपूर्ण आहे. प्रामुख्याने या ठिकाणी कादंबरी आकलनाच्या व्यूहाची चर्चा करताना कादंबरी आणि कथन तसेच एकूण कथन व्यवस्थेत झालेले बदल आणि मराठी कादंबरी या बदलाची प्रतिक्रिया कशा स्वरूपात देते, या वेगवेगळ्या अनुषंगाने विविध घटितांच्या संदर्भात मराठी कादंबरीच्या आकलनव्यूहाची मांडणी केली जाईल.

अर्थात कथन म्हणजे सांगणे असेदेखील ढोबळमानाने म्हणता येईल. रोजच्या व्यवहारातील सांगणे या अर्थाने कथन ही संज्ञा मर्यादित नाही. म्हणजेच सांगणे ही गोष्ट संज्ञापनासाठी वापरल्या जाणाऱ्या मर्यादित संदेश वहनाला ओलांडून संज्ञापनाशी नाते सांगते. कथनामध्ये काय सांगायचे आहे, काय वगळायचे आहे, कोणती घटना आधी सांगायची आणि कोणती घटना नंतर सांगायची

याबाबत एक जंत्री कथानकामध्ये असण गरजेचे आहे. कादंबरीत कथन संज्ञा वापरणे म्हणजे कथेशी निगडित असणाऱ्या आणि घडलेल्या घटना सांगणे व वाचकासमोर ती घटना उभी करणे होय, असादेखील एक उद्देश या कथनामागे असतो. या घटनांशी संगती लावणारा म्हणून निवेदक असतो, अर्थात तो एकच एक असतो असेही नाही. निवेदक अनेक विविध निवेदनाची रूपे एकाच वेळी तयार करीत असतो. अर्थात 'गौतमची गोष्ट' ही अनिल दामले यांची कादंबरी निवेदनातील अनेक विविध प्रयोग करताना दिसते, आणि खऱ्या अर्थाने युरोपीय कादंबरीच्याजवळ जाण्याचा देखील प्रयत्न मराठी कादंबरी करते. अर्थात कादंबरी साहित्य प्रकाराची निर्मिती, उभारणी मुळात कथन प्रक्रियेतून होत असते. कादंबरीत कथन असणे ही गोष्ट प्रामुख्याने कादंबरीला प्रारूप तयार करून देते. याचाच अर्थ कादंबरीकार कादंबरीचा वाचक आणि समकालीन वास्तव यांच्यामध्ये सहसंबंध निर्माण करण्यासाठी कथन व्यवस्थेचा वापर करत असतो.

एकूण कादंबरीतील पात्रांशी वाचकाचे निर्माण होणारे संबंध त्या पात्रांच्याकडे वाचकाने कोणत्या अंगाने, कोणत्या दृष्टिकोनातून पाहायला हवे हे देखील कादंबरीकार कथन व्यवस्थेच्या अनुषंगाने ठरवून देण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा वेळी लेखक ज्या विविध प्रयुक्तांचा वापर करतो, त्याचा समावेशदेखील कथन व्यवस्थेत करता येईल. तसेच कादंबरीकार घटनाक्रमांना सौंदर्यात्मक क्रम देणे, त्यांच्या जागेची अदला बदल करणे, घटनांना तीव्र किंवा धूसर करणे, कधी त्यांना पृष्ठस्तरावर आणणे, घटना घडण्याची गती कमी-जास्त करणे यामधून प्रामुख्याने कादंबरीला त्याची म्हणून संहिता लाभते. या सगळ्या गोष्टी कादंबरीच्या कथन व्यवस्थेत मोडतात. त्याचप्रमाणे कादंबरीच्या कथनावरती काळाचा देखील एक परिणाम जाणवत असतो. कादंबरीतील निवेदकाची उभारणीही कादंबरीच्या कल्पित जगाशीच नाते सांगून येत असते. म्हणजेच निवेदक हा देखील एक कल्पित जगाचाच भाग असतो. त्याचे अस्तित्वही कल्पिततेशीच निगडित असते. ज्याच्या निवेदनाच्या कृतीमधून कथनात्मसंहिता निर्माण झालेली असते, तो वस्तुतः कथनात्म संहितेचेच अपत्य असतो.


कथनात्म संहितेच्या वाचनामधून वाचक जशी घटना आणि पात्रांची पुनर्रचना करतो, तशीच तो निवेदकाची आणि निवेदकाच्या कृतीची पुनर्रचना करत असतो. कथा आणि संहिता यांचा तार्किक अग्रक्रम निश्चित करताना जी समस्या निर्माण झाली होती, तीच येथे निवेदक आणि संहिता यांच्या संदर्भातही निर्माण होते. निवेदक आणि निवेदकाच्या कृतीची पुनर्रचना संहितेवरून केली जात असली तरी एक संकेत म्हणून, निवेदकाने कथनात्मसंहिता निर्माण केलेली असते, असे गृहीत धरावे लागते. कल्पितता आणि संकेतरूपता हे निवेदकाच्या स्वरूपाचे दोन महत्त्वाचे विशेष, निवेदक आणि त्यांच्या कृतीचे विश्लेषण करताना सतत नजरेसमोर ठेवणे आवश्यक असते. अर्थात कादंबरीचे निवेदन हे सामाजिक जीवनाचाच एक भाग असतो असे म्हणता येईल. शिवाय निवेदकाच्या आणि निवेदनाच्या काही जागादेखील यातून स्पष्ट होतात. या विविध संदर्भांतून असे म्हणता येईल की, कादंबरीकाराला निवेदक म्हणणे ही एक गफलत ठरेल. कादंबरीकाराच्या मूल्य व्यवस्थेतून कादंबरीतील कथन व्यवस्था निर्माण होत असली तरी कथन व्यवस्थेचा त्याचा म्हणून एक कथनकर्ता असतो.


याचाच अर्थ निवेदकाचे कादंबरीकारापेक्षा एक स्वतंत्र अस्तित्व मान्य करावे लागते. ह्यातूनच कादंबरीतील निवेदकाचे स्थान स्पष्ट होत असते. यातून पुढे असे म्हणता येईल, 'कथा सांगतो तो निवेदक होय. त्याच्या आवाजात वाचकाला कथा ऐकू येत असते. एके काळी कथात्मक साहित्यकृती लिहिणारा खराखुरा लेखक आणि निवेदक यांच्यामध्ये अद्वैत कल्पिले जात असे. अलीकडील बदललेल्या सैद्धांतिक वातावरणामुळे निवेदक म्हणजे प्रत्यक्षातील लेखक नव्हे, हे स्पष्ट झाले आहे. लेखक वास्तव जगात वावरणारी हाडामांसाची एक व्यक्ती असते. निवेदकाचे वास्तव्य कथात्मक साहित्यकृतीने निर्माण केलेल्या कल्पित जगामध्ये असते. या जगाचा तो माहीतगार असतो. या दोन जगांमध्ये लेखकाला अथवा निवेदकाला पार करता येणार नाही अशी दरी असते. ती ओलांडून खऱ्या लेखकाला कथात्मक साहित्यकृतीने निर्माण केलेल्या कल्पित जगात कधीच प्रवेश करता येत नाही, आणि त्याचप्रमाणे निवेदकाला कधीच कल्पिताच्या सीमा ओलांडून








वास्तवातील जगात प्रवेश करता येत नाही.'

कादंबरीतील वास्तव जग आणि कल्पित जग अशा दोन जगांतले म्हणून कादंबरीकाराचे असणे हे कसे वेगवेगळ्या पातळीवरील आहे हे खऱ्या अर्थाने वरील अवतरणातून स्पष्ट होते. प्रामुख्याने कथा ही जेव्हा कथनातून सादर केली जाते तेव्हा एक भाषिक क्रिया होत असते. या भाषिक क्रियेतूनच कथा आणि कथनातील एक भेद रेषा स्पष्ट करता येईल कारण कथन ही गोष्ट मुळात भाषिक घटकाशी जोडून येत असते; परंतु कथा किंवा त्यातील घटना याचे स्वरूप कथनासारखे भाषिक पातळीवर जाणारे नसते. कथा वाचकाला भाषिक स्वरूपात उपलब्ध नसते. भाषिक स्वरूपात उपलब्ध असते ती कथनाच्या प्रक्रियेमुळे निर्माण झालेली संहिता. तिच्यातून कथेचे अमूर्तीकरण करताना वाचक संहितेच्या भाषिक आविष्कारामधून गाळून घेऊन कथेची पुनर्रचना करत असतो. त्यामुळे कथेचा ओढा भाषेपलीकडे जातो, तर कथनाची क्रिया तिला सतत भाषेच्या प्रदेशात खेचून आणण्याचा प्रयत्न करत असते. भाषेपलीकडे जाण्याचा कथेचा प्रयत्न आणि कथनाचे अपरिहार्य भाषिक रूप, यांच्या ताणांमधून वाचकाच्या अनुभवातील कथनात्मक साहित्यकृतीचा आकार सिद्ध होत असतो. कथेमध्ये आकार धारण करण्याची संभाव्य क्षमता असते, आणि कथनाने तो प्राप्त करून दिलेला असतो.

कादंबरीतील संहितेवर एकूणच कथा आणि कथन यामध्ये भाषिक पातळीवर होणारी व्यामिश्र स्वरूपाची प्रक्रिया ही महत्त्वाची ठरते. यामध्ये भाषिक पातळीतून संहितेमध्ये एक प्रकारचे नातेसंबंध देखील तयार होत असतात. कथन हे निवेदकाने केलेल्या घटनांच्या सादरीकरणातून आकारास येत असते. नव्वदोत्तर मराठी कादंबरी आकलन आणि त्या कालखंडातील कथन असा विचार केल्यास यामध्ये प्रामुख्याने अनिल दामले लिखित 'गौतमची गोष्ट, श्याम मनोहर यांच्या 'कळ', 'खूप लोक आहेत', 'खेकसत म्हणणे आय लव्ह यु' , मकरंद साठे यांच्या 'अच्युत आठवले आणि आठवण','ऑपरेशन यमू', विलास सारंग यांच्या 'रुद्र','अमर्याद आहे बुद्ध', 'तंदूरच्या ठिणग्या', प्रवीण बांदेकर 'चाळेगत', विश्राम गुप्ते 'ईश्वर डॉट कॉम', अवधूत डोंगरे यांच्या 'एका लेखकाचे तीन संदर्भ', रंगनाथ पठारे 'नामुष्कीचे स्वगत', 'दिवे गेलेले दिवस, 'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबऱ्यांच्या अनुषंगाने अर्थाच्या प्रयोगशील कथन व्यवस्थेचे अनेक दाखले, नव्वदोत्तर कालखंडातील कादंबरीच्या कथात्म आकलनाचे अनेक व्यूह असलेले दिसून येतात. त्याचप्रमाणे कथन आणि त्याच्या व्यवस्थेत होत गेलेले बदल ध्यानात घेणे गरजेचे आहे. याचा अर्थ कादंबरीच्या संकेत व्यवस्थेत कादंबरीतील निवेदक आणि कथन व्यवस्था याविषयीच्या संकेतालाही महत्त्व असल्याचे दिसते. पारंपरिक कादंबऱ्या हा संकेत व्यूह किती आणि कशा संदर्भात वापरतात आणि त्याहून नव्वदोत्तर उत्तर आधुनिक संकेत व्यूहाचा झालेला वापर हा आपल्या विश्लेषणाचा मुद्दा आहे; परंतु पारंपरिक कादंबऱ्या वाचताना येणारा एक अनुभव म्हणजे कादंबरीतील निवेदक हाच कादंबरीकार वाटत राहतो. किंवा कादंबरीकारालाही याविषयीचं भान न राहणं ह्या गोष्टी मराठी कादंबरीबाबत सतत घडत आलेल्या आहेत.

प्रामुख्याने कथेतील घटना हा कथनात्मक साहित्यकृतीचा सगळ्यात प्राथमिक घटक म्हणून ओळखला जातो. त्यावरतीच मग विविध गोष्टी घडत कादंबरीची संहिता निर्माण होत असते. कथनकर्त्याचे मुख्य काम हे कथनाशी संबंधित असते. ते करतानाच तो अनेक गोष्टी कधी उघड तर कधी अंधारात ठेवून करत असतो. कथनकर्त्याचे संहितेतील मुख्य कार्य हे कथा सांगणे जरी असले तरी मूळ सांगण्याच्या प्रक्रियेतच तो इतक्या क्लृप्त्या करत असतो यातूनच कादंबरीतील कल्पित जगाला काही एक संदर्भ असतात म्हणता येते. निवेदकाचे संहितेच्या संदर्भातील अत्यंत महत्त्वाचे कार्य संहितेची अंतर्गत जुळणी करणारे असते. संहितेतील घटनांची एक प्रकारे सुसंगती लावण्याचे हे कार्य असते. निवेदकाची निवेदनाची कृती श्रोत्याशी संवाद साधण्याच्या हेतूने निर्माण झालेली असते.

निवेदक कथेचे नुसते निवेदन करत नाही, तर श्रोत्यावर अपेक्षित परिणाम होईल, अशा पद्धतीने निवेदन करत असतो. श्रोत्याशी संवाद साधणे या गोष्टीचा समावेशही निवेदकाच्या निवेदनोत्तर कार्यामध्ये करणे आवश्यक ठरते. कथनात्म संहितेचे निवेदन करताना स्वतःच्या अनुभवाची ग्वाही निवेदकाला द्यावी लागते. ती देण्यात आली, तर त्याचे स्वरूप अविश्वासार्ह निवेदकाचे होत जाते. अर्थात स्वतःच्या अविश्वासार्हतेची ग्वाहीही निवेदकच देत असतो. स्वतःच्या अनुभवाच्या योग्यायोग्यतेची ग्वाही देणे हे निवेदकाचे आणखी एक निवेदनोत्तर कार्य होय. कादंबरीच्या संहितेला संघटित करण्यात ज्या विविध गोष्टी कारणीभूत आहेत. कादंबरीतील कथा सांगण्याच्या प्रक्रिये दरम्यान कथनकर्त्यावरती काही एका अर्थाने परिणाम होत असतो. त्यातून कथेतील घटना – प्रसंगांकडे, पात्रांकडे पाहण्याचा कथनकर्त्याचा म्हणून एक दृष्टिकोन तयार होत असतो. त्याचा परिणाम कथा सांगताना त्यातील घटना–प्रसंगावर, कथनकर्त्याने केलेल्या भाष्यावरती होत असतो. याचा अर्थ कादंबरी संहिता संघटित होण्यात कथनकर्त्याची भूमिका महत्त्वाची ठरत असते. कथनकर्त्यामुळे कथनात्मक साहित्यकृतीची एकसंध अशी संहिता निर्माण होत असते. त्यामुळे कथात्म संहितेला एक रूप प्राप्तदेखील होत असते, असे दिसून येते.

उत्तर आधुनिक कादंबरीत कथात्मकतेचा अभ्यास करता कादंबरीकाराने अनेक वेळेस वाचकासाठी आकलनात्मक मोकळ्या/सुट्या जागा मोठ्या प्रमाणात सोडलेल्या असतात. त्यामुळे उत्तर आधुनिक कादंबरी वाचकाला विचार करण्यास प्रवृत्त करत असते. त्याचप्रमाणे आकलनाच्या विविध विचारव्यूहांच्या संदर्भातून आकलन करणे वाचकाला क्रमप्राप्त ठरत असते. त्यामुळे वाचकाला देखील संहितेमध्ये एक जागा निर्माण झाल्याचे दिसते. नव्वद पूर्व कालखंडात कथन पद्धतीशी प्रामाणिक असणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या जास्त आहे. कादंबरीतील कथन प्रक्रियेसाठी एखादी पद्धत वापरली; तर कादंबरीच्या शेवटपर्यंत त्याच पद्धतीचा वापर केला जात होता; परंतु नव्वदोत्तर म्हणजे उत्तर आधुनिक कादंबऱ्यांत याचे चित्र वेगळ्या स्वरूपाचे दिसते त्यामध्ये श्याम मनोहर यांच्या 'कळ ','खूप लोक आहेत','खेकसत म्हणणे आय लव्ह यू' तसेच अनिल दामले 'गौतमची गोष्ट,' रंगनाथ पठारे 'नामुष्कीचे स्वगत', 'भर चौकातील अरण्यरुदन', विलास सारंग 'रुद्र', 'अमर्याद आहे बुद्ध', ' तंदुरच्या ठिणग्या', प्रवीण बांदेकर 'चाळेगत', विश्राम गुप्ते' ईश्वर डॉट कॉम', मकरंद साठे 'अच्युत आठवले आणि आठवण', 'ऑपरेशन यमू', 'काळे रहस्य' ह्या सारख्या कादंबऱ्या लक्षात घेतल्या' तर या कादंबऱ्यांमध्ये कथाबाह्य आणि कथांतर्गत अशा दोन्ही कथन पद्धतींचा वापर करून कादंबरीतील आशय सूत्राला व्यापक आणि प्रभावी बनविले गेले आहे; परंतु असे चित्र पूर्वीच्या कादंबऱ्यांमध्ये नाही.

नव्वदोत्तर कादंबऱ्यांत जितक्या लवचीकतेने ही गोष्ट वापरली गेली आहे तसे चित्र यापूर्वीच्या कादंबऱ्यांत नाही. नंतरच्या काही कादंबऱ्यांमुळे दोन्ही कथन पद्धती ह्या इतक्या चपखलपणे वापरल्या गेल्या असल्याचे दिसून येते. प्रामुख्याने कादंबरी साहित्य प्रकाराचा व्याप लक्षात घेतल्यास अन्य साहित्य प्रकाराहून कादंबरीत कथन व्यवस्था व्यामिश्र स्वरूपाची आहे. कथा या साहित्य प्रकारात काही अंशी कथन व्यवस्थेला जागा असते. आपसूकच कथेतील मर्यादित भाषिक अवकाश, घटना, पात्र यामुळे अर्थातच कथनकर्त्यावर मर्यादा येतात. यापेक्षा कादंबरीचे चित्र निराळे आहे. कथन व्यवस्था आणि कथनकर्त्याची घडण कादंबरीतील मोठ्या भाषिक

अवकाशामुळे काही अन्य घटकांमुळे व्यामिश्र होते. श्याम मनोहर, विलास सारंग, राजन गवस, रंगनाथ पठारे, मकरंद साठे, अनिल दामले, विश्राम गुप्ते, प्रवीण बांदेकर, अवधूत डोंगरे, निरंजन आवटे, किरण गुरव, ह्या नव्वदोत्तर मराठी कादंबरीकारांतून वाचकाला नवे नवे व्यूह सापडताना दिसतात.

वाचकाला अर्थ निर्णयन करण्यास अनेक जागा सापडतात. ह्या कादंबऱ्यांना नुसताच शेवट नसतो. त्यामुळे वाचक विविधांगी विचार करू शकतो असे दिसते. मराठी कादंबरीच्या आकलनाच्या व्यवहारामध्ये प्रामुख्याने अनेक विविध प्रयोग झालेले दिसून येतात. आकलनाचे व्यूह समजून घेण्यासाठी पारंपरिक कादंबरीचे आकलन, आधुनिक कादंबरीचे आकलन आणि उत्तर आधुनिक कादंबरीचे आकलन या तिन्ही वेगवेगळ्या कालखंडात लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांच्या आकलनाचा व्यूह निश्चित करणे स्तुत्य ठरते. तसेच पारंपरिक व आधुनिक कादंबरीच्या आकलनाचा आधार घेत उत्तर आधुनिक कादंबरीच्या आकलनाची मांडणी करणे, अर्थात ह्या तिन्ही काळांतील कादंबरी वाचनात भिन्नता दिसून येते. त्याचप्रमाणे उत्तर आधुनिक कादंबरीकार आशय व अभिव्यक्ती या अनुषंगाने नव नवे प्रयोग करताना देखील दिसतात. उत्तर आधुनिक कथनात्म साहित्याने साहित्य शास्त्रीय व्यवस्था उभारण्याचे पारंपरिक कथन मीमांसेचे हे प्रयत्न विफल केले. याचे कारण अर्थातच उत्तर आधुनिक कथन रूपांच्या स्वरूपात दडलेले आहे. हे स्पष्ट करून घेण्यासाठी आधुनिकतावादी आणि उत्तर आधुनिकतावादी कथन रूपातील भेद स्पष्ट करून घेणे गरजेचे आहे. थोरातांच्या अवतरणाचा विचार केल्यास प्रामुख्याने हे स्पष्ट होते की, उत्तर आधुनिक कथन हे पारंपरिक कथन व्यवस्थेला नकार देत असल्याचे दिसते; परंतु आधुनिकतावादाशी काही अंशी नाते सांगताना दिसते. अर्थात आधुनिकतावाद, उत्तर आधुनिकता वाद यांच्या कथनात्मकतेमध्ये टोकाचा विरोध जरी दिसत असला तरी काही अंशी सकारात्मक बीजधारणा देखील दिसून येतात.

त्याचप्रमाणे यांच्यात काही एक कथनरूपातील भिन्नत्व दर्शविणेदेखील गरजेचे आहे. प्रामुख्याने आधुनिकतावादी कथनरूपाच्यासमोर ज्ञानशास्त्रीय

**उत्तर आधुनिक कादंबरीची कथनरूपे ही प्रामुख्याने विखंडित म्हणजेच तुकड्या–तुकड्यानी केलेली असतात, तर पारंपरिक कादंबरीत याचे स्वरूप उलट पद्धतीचे असते म्हणजे एक सलग कथानक हे पारंपरिक कादंबरीचे केंद्र असते. अर्थात कादंबरीचे आकलन करताना वाचकाला अधिकाधिक श्रम घेण्याची गरज नसते; परंतु उत्तर आधुनिक कादंबरीच्या कथनरूपाचे स्वरूप हे विखुरल्या स्वरूपात असते किंवा कधी – कधी कथनरूपे पुसट स्वरूपात जाणवतात म्हणून वाचकाला कादंबरीतून अनेक विविध अर्थरूपेदेखील दिसतात.**

स्वरूपाचे प्रश्न घेऊन कथनरूप साकार झाल्याचे दिसते, तसेच उत्तर आधुनिकतावादी कथनात्मक साहित्यापुढील जे प्रश्न निर्माण होतात ते आधुनिकतेपेक्षा वेगळ्या/ भिन्न स्वरूपाचे जाणवतात. त्यामध्ये साहित्याचे मूलभूत प्रारूप विज्ञानकथा किंवा ऐतिहासिक कादंबरीचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसते. एकूणच वरील संदर्भाच्या अनुषंगाने विचार केल्यास वेगवेगळ्या साहित्य प्रकारानुसार कथनाचे स्वरूप वाचकाच्या आकलन व्यूहातून बदलत असल्याचे दिसून येते.

उत्तर आधुनिक कादंबरीची कथनरूपे ही प्रामुख्याने विखंडित म्हणजेच तुकड्या–तुकड्यानी केलेली असतात, तर पारंपरिक कादंबरीत याचे स्वरूप उलट पद्धतीचे असते म्हणजे एक सलग कथानक हे पारंपरिक कादंबरीचे केंद्र असते. अर्थात कादंबरीचे आकलन करताना वाचकाला अधिकाधिक श्रम घेण्याची गरज नसते; परंतु उत्तर आधुनिक कादंबरीच्या कथनरूपाचे स्वरूप हे विखुरल्या स्वरूपात असते किंवा कधी – कधी कथनरूपे पुसट स्वरूपात जाणवतात म्हणून वाचकाला कादंबरीतून अनेक विविध अर्थरूपेदेखील दिसतात. त्यामुळे कादंबरीचा अन्वयार्थ लावताना वाचकाला

अधिक कसरत करावी लागते, तसेच साहित्य प्रकारानुसार देखील कथनरूपामध्ये बदल होत असतो, त्यामुळे वाचकाला सजग असणे गरजेचे असते. या संदर्भात थोरात म्हणतात, 'नव कादंबरी मेटॅफिक्शन आणि मॅजिकरियाऑलिस्ट पद्धतीने लिहिली जाणारी कादंबरी हे उत्तर आधुनिक कथनात्म साहित्याचे तिन्ही प्रवाह वाचकासमोर नव्या प्रकाराची आव्हाने उभी करतात. त्यातूनच साकार होणारे विश्वाचे स्वरूप तुकड्या - तुकड्यानी आकाराला आलेले असते. ते संदिग्ध असते. विशिष्ट नियम सूत्रांनी बांधलेले नसते. त्याचे स्वरूप अनेकदा केवळ भाषिक असते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे या विश्वाचे तुकडे जोडण्याची, त्यामधील संदिग्धता नष्ट करून त्याला सुसंबद्ध करण्याची गुरुकिल्ली कथा-कादंबरीच्या संहितेमध्ये दडवलेली नसते. ती वाचकाने स्वतः तयार करायची असते. वाचकाची मनधरणी करण्याऐवजी उत्तर आधुनिकतावादी कथा - कादंबरी वाचकाला चिंतनशील बनवत असते. त्याच्या सहनशीलतेची कसोटी पाहत असते.

अर्थात उत्तर आधुनिक कादंबरी वाचकाला अर्थनिर्णयाचे स्वातंत्र्य देत असते. वाचकावर आपली मते लादण्याऐवजी वाचकाला कथनरूपातील मोकळ्या जागा भरण्याचे एक प्रारूप समोर ठेवत असते. वाचकाला कलाकृतीच्या प्रभावाखालून मुक्त करून एक नवे प्रारूप समोर ठेवण्यास प्रवृत्त करत असते. कलाकृती सातत्याने वाचकाला वेगवेगळ्या पातळीवर फिरवत असते. यातून एक म्हणजे वाचकांच्या क्षमतेचे कळत-नकळत मूल्यमापनदेखील होताना दिसते. अर्थात साहित्य प्रकारानुसार वाचकाची अभिरुची प्रारूपे वेगवेगळी दिसतात. उत्तर आधुनिक कादंबरीत समग्र विश्वाचे स्वरूप तुकड्या-तुकड्यानी आलेले त्याचप्रमाणे यात एक प्रकारची संदिग्धतादेखील असलेली जाणवते. अर्थात अशी उत्तर आधुनिक कथनरूपे नव्या नव्या प्रयोगांतून वाचकासमोर आव्हाने उभी करत असतात.

त्यामुळे समकालीन साहित्य व्यवहाराकडे सजग व सक्षमपणे पाहण्याची दृष्टी वाचकीय व्यूहामध्ये असणे अधिक गरजेचे आहे. अर्थात हरिश्चंद्र थोरात म्हणतात, 'कथनात्म साहित्यकृतीचे वाचन करताना वाचक दोन गोष्टीवर लक्ष केंद्रित करत असतो. आपण वाचन करत असलेली साहित्यकृती कथनात्मक आहे ही पहिली गोष्ट, तर हे कथनरूप एक साहित्यकृती आहे ही दुसरी गोष्ट. या दोन गोष्टींबद्दलच्या संकल्पना या वाचकाच्या हातात असलेली वाचनातल्या प्रवासातली महत्त्वाची साधने असतात. या साधनाचा उपयोग करत वाचक अनेक रीतींनी वाचनाची प्रक्रिया प्रत्यक्षात आणत असतो. कथनात्मकतेची प्रारूपे ही सर्वच साहित्य व्यवहारात असतात; परंतु समकालीन साहित्य व्यवहारात उत्तर आधुनिक साहित्यात याचे स्वरूप निश्चितपणे वेगळ्या स्वरूपाचे जाणवत असते. वाचकाला अधिकाधिक समृद्ध करण्याचा प्रयत्न देखील उत्तर आधुनिक कादंबरी करताना दिसते.

अर्थात अनेक विविध प्रयोग कादंबरीत उत्तर आधुनिक लेखक करतो त्याचप्रमाणे वाचकालादेखील अनेक विविध संदर्भाचा अर्थ लावत वाचन प्रक्रिया पूर्ण केली जाते, असे हे प्रामुख्याने पारंपरिक आणि आधुनिक कथनरूपापेक्षा वाचकाचे वेगळे वैशिष्ट्य म्हणून उत्तर आधुनिक कादंबरी वाङ्मय प्रकाराची नोंद करता येते. यातूनच वाचकाला सक्षम करण्याचा प्रयत्नदेखील कळत - नकळत स्वरूपात उत्तर आधुनिक कादंबरी करताना दिसते. त्याचप्रमाणे विशिष्ट साहित्य प्रकार आणि त्या - त्या साहित्य प्रकाराचे संकेत व्यूह हे देखील वाचकाला व्यापकरूप प्राप्त करून देत असतात. तसेच साहित्य प्रकाराचे भान ठेवणे, संकेत व्यूहाचे भान ठेवणे वाचनात महत्त्वाचे असते. त्याचप्रमाणे कुठल्याही संहितेला साहित्यकृती म्हटले जात नाही, तर त्यात सर्जनशीलतेचा आविष्कार असणे गरजेचे असते.

नव्वदोत्तर मराठी कादंबरीत येणारी बहुसांस्कृतिकता ही देखील कादंबरीच्या एकूण भाषिक व्यवहारावर प्रभाव टाकणारी घटना आहे. यातून वेगवेगळी भाषिक रूपेदेखील सांस्कृतिक घुसळणीतून निर्माण झालेली दिसतात, अर्थात उत्तर आधुनिक मराठी कादंबरीत दिसून येतात. यातील भाषिक पातळीवरती झालेली प्रयोगशीलता एक नवे प्रारूप घेऊन समोर येताना दिसते. त्याचप्रमाणे वेगवेगळ्या साहित्य प्रकारानुसार भाषिकदृष्ट्या वेगवेगळे प्रयोग झाल्याचे दाखविता येते. प्रामुख्याने या ठिकाणी उत्तर आधुनिक मराठी कादंबरी भाषिकदृष्ट्या झालेले प्रयोग कसे पचविते हे पाहणे महत्त्वाचे वाटते. ह्या प्रयोगशीलतेतून

वाचकावर काही मर्यादा आल्या आहेत किंवा वाचकीय व्यूह समृद्ध झाला अशा दोन्ही अंगांनी विचार करणे देखील गरजेचे आहे. निकष आणि मूल्ये काही प्रमाणात साहित्यकृती कोणत्या साहित्य प्रकारात मोडते यावरही अवलंबून असतात.

वाचक वेगवेगळ्या साहित्य प्रकाराकडून वेगवेगळ्या अपेक्षा धरत असतो. उदा. कादंबरीच्या संदर्भात सौंदर्य मूल्यांपेक्षा जीवनमूल्यांना अधिक महत्त्व असते, असे समजले जाते. भावकवितेचा रूपबंध अधिक घट्ट विणीचा असल्यामुळे तिच्या संदर्भात सौंदर्यमूल्ये अधिक प्रभावी ठरतात. कवितेच्या संदर्भात रंजकतेला विशेष महत्त्व नसते. (असे समजले जाते) तर नाटकाच्या संदर्भात हे मूल्य तुलनेने अधिक महत्त्वाचे ठरू शकते. साहित्य प्रकार म्हणजे जगाकडे पाहण्याची विशिष्ट खिडकी असते. एका खिडकीतून जग दिसते तसे दुसऱ्या खिडकीतून दिसत नाही, त्यामुळे साहित्यप्रकारागणिक निकषांची व मूल्यांची पुनर्रचना होणे सामाजिक असते. एकूणच भोवतालच्या वातावरणाचा अर्थात भौतिक आणि सामाजिक साधन घटितांचा परिणाम पचवत साहित्यकृती आकार धारण करत असते. सांस्कृतिक सरमिसळीतून उत्तर आधुनिक कादंबरी सांस्कृतिक व भाषिकदृष्ट्या नवे प्रारूप आत्मसात करताना दिसते. याचीच परिणती म्हणून वाचकाला उत्तर आधुनिक कादंबरी तात्त्विक पातळीवर विचार करण्यास देखील परावृत्त करते असे एकूण चित्रण दिसते.

कादंबरीच्या आधुनिकतावादी आणि उत्तर आधुनिकतावादी कथनरूपात खऱ्या अर्थाने तसे गुंतागुंतीचे संबंध आहेत. आधुनिकतावादी आणि उत्तर आधुनिक आशयसूत्रामध्ये सरमिसळ झाल्याचे दिसून येते, तरीपण यामध्ये भिन्नत्वाचे स्वरूपदेखील स्पष्ट करता येते. या दोन्ही विचारसरणींमध्ये भिन्नत्वाच्या रेषा अधोरेखित करता येतात. कोणत्या लेखनाला उत्तर आधुनिकतावादी म्हणायचे याबद्दलची अनिश्चितता आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकता वाद यांच्यातील गुंतागुंतीच्या संबंधांमुळे निर्माण झाली आहे. या दोन प्रवृत्ती एकमेकांपासून वेगळ्या करता येतात की नाही याबद्दलच अनेकांना शंका आहे. उत्तर आधुनिकतावादामध्ये गृहीत असलेली अनेक आशयसूत्रे आधुनिकतावादामध्येही उपस्थित आहेत यात शंका नाही. उत्तर आधुनिकतावादामध्ये ती अधिक टोकाला नेलेली दिसतात, आणि काही नवी आशयसूत्रे ही प्रकटलेली दिसतात. थोरातांच्या वरील अवतरणातून आधुनिकतावाद आणि उत्तर आधुनिकता वाद यांच्यातील अंतरविरोध स्पष्ट होतो. त्याचप्रमाणे त्यातील गुंतागुंत व व्यामिश्रतादेखील दाखविता येऊ शकते. त्याचप्रमाणे आधुनिक दृष्टिकोनातून लेखन करणाऱ्या लेखकाने उत्तर आधुनिक दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो. तसेच उत्तर आधुनिक कथनरूपे ही प्रामुख्याने सत्य, वस्तुनिष्ठता, वास्तव मूल्ये यांचे स्वरूपही रचित स्वरूपाचे असते, असे एकूण कथनरूपाच्या अनुषंगाने ठरविता येईल.

प्रामुख्याने उत्तर आधुनिक कथनरूपे म्हणून मराठीतील श्याम मनोहरांची, 'कळ', 'खूप लोक आहेत', ' खेकसत म्हणणे आय लव्ह यू ', तसेच अनिल दामले यांची 'गौतमची गोष्ट ', रंगनाथ पठारे यांच्या 'नामुष्कीचे स्वगत', 'भर चौकातील अरण्यरुदन ', विलास सारंग, 'रुद्र', 'अमर्याद आहे बुद्ध', 'तंदुरच्या ठिणग्या', विश्राम गुप्ते , 'ईश्वर डॉट कॉम' , प्रवीण बांदेकर 'चाळेगत', अवधूत डोंगरे 'एका लेखकाचे तीन संदर्भ'यांचा मुख्यत्वे उत्तर आधुनिक कादंबऱ्यांच्या कथनरूपाच्या जवळ जाणाऱ्या कादंबऱ्या म्हणून समावेश करता येतो. नव्वदोत्तर मराठी कादंबरीमध्ये खऱ्या अर्थाने उत्तर आधुनिक कथनरूपे काही प्रमाणात वरील कादंबरीच्या संदर्भात सापडतात असे एकूण मराठी कादंबरीच्या संदर्भात म्हणता येईल.

प्रामुख्याने ही मांडणी समजावून घेण्यासाठी पाश्चात्त्य कथनरूपाचा आढावादेखील घेणे स्तुत्य ठरत असते. त्याचप्रमाणे पारंपरिक, आधुनिक, उत्तर आधुनिक यांच्या कथनरूपातील भिन्नत्वदेखील वरील अभ्यासाअंती स्पष्ट होताना दिसते हे नाकारता येणार नाही. ज्या प्रमाणे पारंपरिक, आधुनिकतावादी आणि उत्तर आधुनिकतावादी कादंबरीच्या विचारसरणी दिसतात. त्याप्रमाणे आकलनाचे व्यूहदेखील याला अनुरूप दिसतात. रंजनपर कादंबऱ्यांचा किंवा लोकप्रिय कादंबऱ्यांचा वाचकवर्ग आजदेखील मोठ्या प्रमाणात दिसून येतो कारण ह्या कादंबऱ्या हलक्या फुलक्या पातळीवरील स्वरूपाच्या आणि वाचकावर अधिराज्य गाजविण्याचा सातत्याने प्रयत्न करणाऱ्या असतात, असे एक चित्र समकालीन लोकप्रिय कादंबरीच्या संदर्भात नोंदविता येईल.

त्याचप्रमाणे आपण उत्तर आधुनिक कादंबरीच्या वाचकाच्या संदर्भात विचार करताना बौद्धिक पातळीवरील कसरत वाचकाला करणे या ठिकाणी भाग पडते. वाचकाला व्यामिश्र स्वरूपाच्या गुंतागुंतीची उकल करत अर्थनिर्णयन करणे भाग पडते. या सर्व गोष्टींच्या प्रवासातून वाचकाचा प्रवास चालू असतो. म्हणजेच उत्तर आधुनिक कादंबरीत वाचकाला बहुअंशी स्वातंत्र्य असते. ह्या कादंबऱ्यांचा निश्चित असा शेवट नसतो. त्यामुळे कादंबरीच्या शेवटाच्या ज्या पोकळीच्या जागा निर्माण झालेल्या असतात त्या पूर्ण करण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने वाचकाची असते व कलाकृतीला वैश्विक स्वरूप प्राप्त करून देण्याचे कामदेखील कलाकृतीतून घडताना दिसून येते.

त्याचप्रमाणे वरील विवेचनाला पुष्टी देताना असे म्हणता येईल की, कथन मीमांसेला सुसंगत व्यवस्था निर्माण करता येऊ नये अशा प्रकारचे उत्तर आधुनिक कादंबरीच्या संदर्भात दिसून येते. याच अनुषंगाने उत्तर आधुनिक साहित्यशास्त्राची देखील मांडणी केली जाते. त्याचप्रमाणे उत्तर आधुनिक कादंबऱ्या अनेकावाजी असू शकतात. त्यामुळेच उत्तर आधुनिक कादंबरीमध्ये अनेक प्रयोग केले जातात. त्यातूनच तुकड्या-तुकड्याचे कोलाजदेखील उत्तर आधुनिक मराठी कादंबरीतून तयार केले जातात. त्यामुळे वाचकाला अनेकविध पातळ्यांवरील बौद्धिक कसरती उत्तर आधुनिक कादंबरी समजावून घेताना कराव्या लागतात. यातूनच एक सक्षमपणे विचार करणारी वाचन व्यवस्था तयार होताना देखील दिसून येते. त्याचप्रमाणे अनेकविध पातळ्यांवर जाऊन उत्तर आधुनिक कादंबरीचा अर्थ लावण्याची कसरत वाचकाला करावी लागते. यातूनच वाचन संस्कृतीकडे पाहता येते. अलीकडच्या कादंबरीने वाचकापुढे आव्हाने उभी केलेली दिसतात. लेखकाने केलेल्या या प्रयोगातून वाचकाच्या कथात्म साहित्य संदर्भातील क्षमता विकसित होण्यास मदत होईल. यातून लेखन व वाचनव्यवहारा संदर्भातील संस्कृती राजकारण लेखातून नमूद केले आहे.

**संदर्भग्रंथ:**


१. थोरात हरिश्चंद्र, कथनात्म साहित्य आणि समीक्षा, शब्द पब्लिकेशन, मुंबई,प्रथमावृत्ती २०११

२. थोरात हरिश्चंद्र, कादंबरी : एक साहित्य प्रकार, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती, २०१०

३. डहाके वसंत आबाजी, मराठी साहित्य इतिहास आणि संस्कृती, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती २००४

४. खोले विलास (संपा.) गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, लोक वाङ्मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती २०११

५. मालशे मिलिंद, जोशी अशोक, आधुनिक समीक्षा सिद्धांत, मौज प्रकाशनगृह, मुंबई, द्वितीयावृत्ती २०१३

६. थोरात हरिश्चंद्र, मूल्यभानाची सामग्री, शब्द पब्लिकेशन, मुंबई, प्रथमावृत्ती २०१६

७. करंदीकर गो .वि. – साहित्य मूल्यांची चिकित्सा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००४

८. पठारे रंगनाथ–आजची कादंबरी : नांदी आणि निरीक्षणे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २००४

९. पवार गो.मा.– हातकणंगले करम.द. (संपा.) निवडक मराठी समीक्षा, साहित्य अकादेमी, प्रथम १९९९


(प्रस्तुत लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात विद्यावाचस्पत्युत्तर शिष्यवृत्तीधारक (पोस्ट डॉक्टरेट फेलो) म्हणून संशोधन करीत आहेत. सदरचा संशोधन– लेख हा त्यांच्या संशोधन प्रकल्पांतर्गतच्या काळात लिहिलेला आहे.


**डॉ. गजानन विठ्ठलराव भोसले**

मराठी विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

# ग्रामीण साहित्यप्रवाहातील मैलाचा दगड - पाचोळा : एक लघुकादंबरी

**ज्येष्ठ कादंबरीकार, समीक्षक डॉ. रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' या पन्नास वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या लघुकादंबरीचे ग्रामीण साहित्यप्रवाहातील स्थान अधोरेखित करणारा समीक्षालेख**

**प्रा. डॉ. संजय नगरकर**

**प्रस्तावना :**


मराठी साहित्यात कादंबरीची वाटचाल एकशे पन्नास ते साठ वर्षांची. या कालखंडात मराठी कादंबरीने विविध विषयांना हात घातला. विविध उपप्रकारांमधून वाट काढत व पारंपरिकतेचे टप्पे पार पाडत मराठी कादंबरी आज पुन्हा वाचकांच्या शिरावर कौतुकाने राज्य करीत आहे. त्यातील मराठी लघुकादंबरीचे दालन समृद्ध नसले तरी, काही विशिष्ट लघुकादंबऱ्या श्रेष्ठ ठरल्या आहेत. श्रेष्ठ-कनिष्ठतेचे अनेक निकष आहेत. नियम आहेत. कोणाला एखादी कादंबरी आशयदृष्ट्या चांगली वाटते, तर कोणाला तंत्रदृष्ट्या; परंतु खरे पाहता मानवी जीवनाला हात घालणारी साहित्यकृतीच श्रेष्ठत्वाच्या पातळीवर पोहोचू शकते. याचा अर्थ इतर विषय तिला वर्ज्य आहेत असा नाही; परंतु त्यातल्या त्यात जीवनाचा विशाल पट कलात्मकतेने उलगडून दाखविण्यातच साहित्यकृतीची यथार्थता ठरते.

सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय, पौराणिक, प्रादेशिक, चरित्रात्मक, आत्मचरित्रात्मक, पत्रात्मक, ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, मनोविश्लेषणात्मक, संज्ञाप्रवाही अशा विविध प्रकारांमधून मराठी कादंबरीने प्रवास केलेला दिसतो. १९७० नंतर ग्रामीण साहित्याने जी मुसंडी मारली, त्यामागे परिस्थितीचे स्थित्यंतर आणि बदललेली जीवनमूल्ये जितकी कारणीभूत ठरली, तितकेच ग्रामीण भागातील लेखकांना आलेले आत्मभानही कारणीभूत ठरले. त्यातीलच 'पाचोळा' ही अशीच कथालेखनाकडून कादंबरी लेखनाकडे होत्सातू रा. रं.बोराडे यांची एक ग्रामीण लघुकादंबरी.

१९७१साली प्रसिद्ध झालेली ही कादंबरी. नुकतीच पन्नाशीची उमर गाठल्यानंतरदेखील स्वतःचे वेगळेपण राखून आहे. या कादंबरीला 'लघुकादंबरी' मानावे की नाही? याबाबतीत टीकाकारांमध्ये मतभेद होऊ शकतील. कोणी तिला 'कुटुंबकथा' म्हणते, तर कोणी 'लघुकादंबरी.' ९४ पृष्ठांची ही कादंबरी कोणत्या प्रकारात समाविष्ट करावी? हा प्रश्न डोळ्यासमोर ठेवूनच येथे चर्चा करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासाठी साहित्यकृतीचा घाट किंवा आकृतिबंध हा लघुकादंबरीचा ठरविण्यासंदर्भातील निकषांची चर्चा करणे आवश्यक वाटते.

**साहित्यप्रकाराची संकल्पना :**

साहित्यप्रकाराची संकल्पना मांडताना सर्वप्रथम 'फॉर्म' म्हणजे काय? हे पाहणे उचित ठरते. पौर्वात्य,






पाश्चात्त्य आणि मराठी साहित्यात याविषयी विचारमंथन झालेले दिसते. संस्कृत साहित्यशास्त्रात 'फॉर्म' ला जवळची संज्ञा म्हणून 'रूप' ही संज्ञा वापरलेली दिसते. संस्कृत साहित्य हे बहुतांश काव्यरूप असल्याने व काही नाट्यरूप असल्याने त्यासंदर्भातच 'रूप' या संज्ञेचा विचार केलेला आहे. संस्कृतात साहित्याचे विश्लेषण करणारे जे लेखन आढळते, त्यात 'साहित्यदर्पण' कार विश्वनाथाने सहाव्या परिच्छेदात काव्याचे दोन विभाग 'दृश्य' व 'श्राव्य' पाडून प्रथम दृश्यकाव्याचा म्हणजेच नाटकाचा विचार केलेला आहे. नाटकाला तो 'रूपक' म्हणतो.

**'दृश्य श्रव्यत्वभेदेन पुनः काव्यम् द्विधा मतम् ।**
**दृष्य तत्रभिनेयं तद्रुपारोपात तु रुपकम्।।'**

श्राव्य काव्याचे त्याने दोन प्रकार मानलेले आहेत. 'गद्य' व 'पद्य.'

''श्रव्यम् श्रोतव्यं मात्रं तत पद्यगद्यमयं द्विधा'' असे तो म्हणतो. पुढे त्याने महाकाव्य, खंडकाव्य, कोश, गद्य, कथा, आख्यायिका, गद्यपद्यमिश्रित चंपू, बिरूद आदी अनेक प्रकारांची लक्षणे सांगितली आहेत. अनेक भाषांतून आविष्कृत झालेल्या 'करम्भक' या साहित्यप्रकाराची लक्षणेही त्याने नमूद केली आहेत. संस्कृत साहित्यशास्त्रात 'रूप' हा एक गुण मांडलेला आहे. रूप म्हणजे रंग, आकार, अवयवांची ठेवण असे अर्थ दिलेले दिसतात. म्हणजे संस्कृतात साहित्यातील रूपसौंदर्याची, रचनेच्या सौष्ठवाची काहीशी कल्पना होती असे दिसते.

शॉर्टर ऑक्सफर्ड डिक्शनरीने दिलेला 'फॉर्म' या शब्दाचा अर्थ असा...

"Visible distant aspect such as shape, size, arrangement of parts, colour, light and shade, surface texture"

मराठीत 'रूप' असा अर्थ घेता येईल. 'सौष्ठव' असेही म्हणता येईल. कलाकृतीचे अंतिम रूप, आकार, बांधणी असे अर्थही घेता येतील.

साहित्याच्या घाटाची व्याख्या करताना ल्युकबने म्हटले आहे,

"the best form is that which makes the most of its subject. The well made book is the book in which the subject and the form coincide and are indistinguishable the book is which the matter is all used up in the form, in which the form express all the matter"

'सौंदर्यमीमांसा' या ग्रंथावरील टिपणात प्रा. अशोक केळकर यांनी 'फॉर्म ' या शब्दाचे पाच अर्थ दिलेले आहेत. पहिला अर्थ – रूप किंवा सौष्ठव , दुसरा अर्थ – आकृती, तिसरा अर्थ – आकार, निर्मित वस्तूचा आराखडा, घाट,

तिची रचना, चौथा अर्थ – अभिव्यक्ती, मांडणी आणि पाचवा अर्थ – सत्त्व

व्युत्पत्तीदृष्ट्या किंवा कोशातून दिलेले 'फॉर्म' या शब्दाचे विविध अर्थ विचारात घेता, त्याबद्दलच्या नेमक्या संकल्पना नाहीत, असे दिसते. एकंदरीने 'फॉर्म' या शब्दाचे आकार, आकृती, सौष्ठव, रूप, रचना, आराखडा, मांडणी, अभिव्यक्ती, सत्त्व, घाट, आकृतिबंध असे अनेक अर्थ नोंदविले गेले आहेत. या सर्व शब्दांमध्ये 'आकृतिबंध' हा शब्द जास्त सयुक्तिक वाटतो, आणि हा शब्द इतर कलांनाही लागू पडेलच; पण साहित्याच्या संदर्भात हा शब्द जास्त योग्य ठरेल.

मराठी साहित्यात आकृतिबंध किंवा साहित्याच्या घाटाची जाणीव साधारणतः १९२० नंतरच आलेली दिसते. 'कलागर्भाला उपजत स्वतःचा आकार असतो. अनुभवाचे पहिले अवतरण असा आकार घेऊनच जन्मते' असे मत प्रा. सु. रा. चुनेकरांनी मांडलेले आहे, तर रा. भा. पाटणकरांनी कोलरीजच्या मताचा उल्लेख करून 'झाडातून गळणारा चिक घट्ट झाला म्हणजे त्याचा आकार कसा असेल हे आपल्याला आधी माहीत नसते. तीच गोष्ट कलाकृतीच्या फॉर्मविषयी खरी आहे' असे प्रतिपादन केले आहे. आकृतिवादाचा पुरस्कार करताना बा. सी. मर्ढेकर यांनी आपल्या कलामीमांसेत फॉर्म किंवा सुसंघटनेला अत्यंत महत्त्व दिलेले आहे. साहित्याचे विविध प्रकार मानले गेलेले आहेत. त्यांच्या मुळाशी आकृतिबंधासंदर्भातील संकल्पनांची सरमिसळ होऊ नये म्हणून, साधारणपणाने कथात्मक, काव्यात्मक आणि नाट्यात्मक अशा माध्यमभिन्नतेनुसार वेगवेगळे साहित्यप्रकार कल्पिले गेलेले आहेत. त्यातील 'लघुकादंबरी ' हा स्वतंत्र साहित्यप्रकार मानावा की मानू नये? याविषयी मतभेद असू शकतील. 'लघुकादंबरी ' हा 'दीर्घकथा' आणि 'कादंबरी' यांच्या सीमारेषांना भिडणारा प्रकार असून, 'दीर्घकथेपेक्षा मोठी परंतु दीर्घकथा नव्हे आणि कादंबरीपेक्षा लहान ती लघुकादंबरी' अशी एक व्याख्या आपणास करता येईल. इंग्रजीमध्ये 'Novelate' ही संज्ञा त्यासाठी वापरली गेली आहे.

मराठी कादंबरीविश्वात दि. के. बेडेकरांची 'रणांगण', पु. शि. रेगे यांची 'सावित्री', व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'सत्तांतर' व 'बनगरवाडी', नामदेव

**मराठी साहित्यात आकृतिबंध किंवा साहित्याच्या घाटाची जाणीव साधारणतः १९२० नंतरच आलेली दिसते. 'कलागर्भाला उपजत स्वतःचा आकार असतो. अनुभवाचे पहिले अवतरण असा आकार घेऊनच जन्मते' असे मत प्रा. सु. रा. चुनेकरांनी मांडलेले आहे, तर रा. भा. पाटणकरांनी कोलरीजच्या मताचा उल्लेख करून 'झाडातून गळणारा चिक घट्ट झाला म्हणजे त्याचा आकार कसा असेल हे आपल्याला आधी माहीत नसते. तीच गोष्ट कलाकृतीच्या फॉर्मविषयी खरी आहे' असे प्रतिपादन केले आहे. आकृतिवादाचा पुरस्कार करताना बा. सी. मर्ढेकर यांनी आपल्या कलामीमांसेत फॉर्म किंवा सुसंघटनेला अत्यंत महत्त्व दिलेले आहे.**

ढसाळांची 'हाडकी हाडवळा ', अनिल बर्वे यांची 'थँक यू मिस्टर ग्लाड' किंवा मनोहर शहाणे यांच्या 'लोभ असावा' आणि 'एखाद्याचा मृत्यू' यांसारख्या अनेकविध कादंबऱ्यांना लघुकादंबरीचा घाट प्राप्त झालेला दिसतो. 'पाचोळा' हीदेखील या परंपरेतील एक मैलाचा दगड असलेली ग्रामीण साहित्यातील लघुकादंबरी आहे.

९४ पृष्ठे असलेल्या या कादंबरीचा आशयदृष्ट्या विचार करता कथेतील एकसंस्कारित्व, 'पाचोळा' मध्ये निश्चितच नाही. ग्रामीणतेवर आलेले यांत्रिकतेचे मळभ व त्यात एका कुटुंबाची उडालेली धूळधाण हा या साहित्यकृतीचा केंद्रबिंदू असला तरी, ही एकच घटना लेखकाला सूचित करावयाची नाही तर, त्याबरोबरीनेच नियतीची क्रूर चेष्टा, ग्रामीण माणसांच्या स्वभावदोषांमुळे निर्माण झालेला संघर्ष, ग्रामीण स्त्री व तिचे कुटुंबातील स्थान, नव्याने शिकणाऱ्या व स्वविकासाकडे झेप घेणाऱ्या ग्रामीण भागातील मुलांची गळचेपी, आधुनिकतेचे महत्त्व अशा विविध सूत्रांमधून वेगवेगळे संस्कार वाचकांच्या

मनावर करण्यात ही साहित्यकृती यशस्वी झालेली आहे. त्यामुळेच ती निश्चितच कथा किंवा दीर्घकथा ठरत नाही.

तंत्रदृष्ट्या विचार करता पसरटपणा, संथ कथानक, प्रसंगांची रेलचेल, निवेदनाचे विस्तृत उतारे, वा पात्रांची रेलचेल ही कादंबरीची घटकसाधने सदर साहित्यकृतीत कोठे आढळत नाही. 'पाचोळा' चे कथानक हे वेगवान आहे, पात्रमुखी निवेदनामुळे तर ते वाचकाच्या मनाची चांगलीच पकड घेते व साहित्यकृती वाचून हातावेगळी कधी होते ते कळतही नाही. निवेदनही ओघवते, संवाद संघर्षमय आहेत. पात्रेदेखील भारंभार नाहीत. ही सर्व वैशिष्ट्ये पाहता व अनेकसंस्कारित्वाचा विचार करता, सदर साहित्यकृतीला एक लघुकादंबरी म्हणण्यास काही हरकत नाही. अर्थात 'लघुकादंबरी' असे शिक्कामोर्तब करून तिची चर्चा थांबविणे व तंत्राच्या साच्यात ढकलून मोकळे होणे हा एकमेव उद्देश येथे नाही. तिचे मर्म उकलून दाखविणे, जाणवलेल्या प्रश्नांचा शोध घेणे व साहित्यकृती समजून घेणे या हेतूने चर्चा होणे अपेक्षित आहे, कारण या साहित्यकृतीने वयाची ५० वर्षे पूर्ण करूनदेखील आजही मराठी साहित्यात एक मैलाचा दगड म्हणून स्वतःचे एक वेगळेपण जपलेले आहे.

**'पाचोळा' आकलन आणि मूल्यमापन :**

'पाचोळा' ही रा. रं. बोराडे यांची कथालेखनानंतरची पहिलीच कादंबरी. ग्रामीणतेच्या बदलत्या जीवनावर ही कादंबरी प्रकाश टाकते. अर्थात कादंबरीचा विस्तृत पट, संथ कथानक यांचा अभाव असल्यामुळेच तिला 'लघुकादंबरी' म्हणून उल्लेखता येईल.

तसे पाहता ही मराठवाड्यातील कोणा एका गावातील (शेवटपर्यंत गावाचे नाव नाही) शिंपी कुटुंबाच्या झालेल्या फरफटीची कथा. स्थलैक्य व कालैक्य ही या लघुकादंबरीची बलस्थाने. वेगवान कथानक, मोजकी पात्रे संघर्षात्मक प्रसंग, आणि आत्मनिवेदनात्मक व पूर्णतः बोलीभाषेतून आकार घेत घेत मृत्यू या मानवी जीवनातल्या शाश्वत सत्याजवळ ही कादंबरी येऊन थांबते, आणि अनेक प्रश्न मनात निर्माण करते.

खाऊन पिऊन सुखी असलेलं पार्वतीचं कुटुंब... गंगारामचा शिंप्याचा व्यवसाय... भानाची शाळा व्यवस्थित चाललेली... आणि जेवण करता करता शेवटच्या घासात खडा लागावा व साऱ्या जेवणाच्या आनंदावर पाणी फेरले जावे तशी या सुखी कुटुंबावर पडलेली नियतीची काळछाया साऱ्या कुटुंबाला ऱ्हासाकडे घेऊन जाते. कारण अगदी साधे, गरडाच्या जुन्या धोतराला दंड मारण्यास गंगारामने दिलेला नकार. बस्स हा नकारच या कुटुंबाच्या मागे इतका हात धुऊन लागला की, जिथं तिथं आपटी खावी लागली. बाप-लेकाचा ( गंगाराम - भाना) स्वाभाविक संघर्ष, गंगारामचा हेकट संघर्ष, एक कुटुंब आणि नियती यांचा दैववादी संघर्ष, या सर्व संघर्षात पार्वतीची होणारी ओढाताण, ससेहोलपट आणि मुसंडी मारून तितक्याच वेगाने उसळी मारणारा गंगारामचा मृत्यू हा या लघुकादंबरीचा शोकात्म शेवट. असे वेगवान कथानक व त्यात घडणाऱ्या तितक्याच वेगवान घटना असलेली ही लघुकादंबरी.

कादंबरीची सुरुवातच ''बरं चाल्लं होतं'' या पार्वतीच्या निवेदनातून होते, आणि वाचकाचे मन आकर्षून घेते. बरं चाल्लं होतं म्हणजे अचानक असं नेमकं काय घडलं? असा प्रश्न मनात येऊन उत्कंठा वाढते. हळूहळू सर्व कथानकाचा पट डोळ्याखालून सरकू लागतो.

काळाच्या तीन टप्प्यांतून 'पाचोळा'चा प्रवास होताना दिसतो. वर्तमान-भूत आणि वर्तमान. सुरुवातीचे निवेदन, काल-परवा घडलेल्या घटनेचा उल्लेख व सदर घटनेमुळे कुटुंबाच्या मागे लागलेली पीडा याद्वारे होते.(१ पृष्ठ ते ४९)

४९ क्रमांकाचे पृष्ठ कादंबरीचा मध्यबिंदू. गंगाराम हा सावत्र मुलगा. पार्वतीशी लग्न झाल्यानंतर त्या घराला घरपण प्राप्त झालेली परिस्थिती; परंतु घरात पार्वतीचा पाय पडल्याबरोबर गंगारामच्या वडिलांना झालेली देवाज्ञा, गंगारामच्या घराची पुढे जी 'पाचोळ्या' गत स्थिती झाली त्याची सूचक तर नाही ना? असा प्रश्न मनात येतो. आपल्या कर्तृत्वाने उकिरड्यासारख्या घराची रया बदलून टाकणारी पार्वती; परंतु नियतीच्या मनात काय असावे की काय म्हणून 'कवा काय वाटलं न्हाई' ( पृ.४९ ) म्हणणारी पार्वती हताश होताना दिसते. ''घुस शिरल्यावानी झालतं घराला. इतं बीळ पडलं म्हणून बुजवायला जावं तर लगेच दुसरीकडे दुसरं बीळ तयार.'', ''भुंगा लागल्यावानीच झालंय मनाला'' (पृ. ४९-५०) असं म्हणून कादंबरी पुन्हा वर्तमानात प्रवेश करते, आणि पुन्हा तानीच्या रूपानं नियती पुढे येऊन उभी राहते व या साहित्यकृतीचा तिसरा

टप्पा सुरू होतो, तो गंगारामला पोलिसांनी पकडून नेल्याच्या बातमीनं आणि भरभर एकामागे एक दुष्ट घटना घडत जातात. गंगारामला अटक, मिसनीच्या डोक्याची झालेली चोरी, गंगारामला झालेला क्षयरोग, आणीबाणीच्या काळात पार्वतीला आलेले गर्भारपण, आर्थिक ओढाताण व शेवटी गंगारामचा मृत्यू आणि कथानक संपते. भविष्याचा प्रश्न पुढे ठेवूनच.

तसे पाहता लेखकाने अनेक तडजोडी स्वीकारून कथानक रंगवलेले आहे. 'पाचोळा' च्या जन्मकथेसंदर्भातला बोराडे यांचा निर्वाळाच यावर प्रकाश टाकतो. मुळात लेखकाला जाणवलेले सोनाराचे रूप आणि मागाहून लेखकाने सोनाराचे शिंप्यात केलेले रूपांतर यामुळे अनेक ठिकाणी तडजोडी कराव्या लागल्या. काल्पनिक घटना – प्रसंग, पात्रे उभी करावी लागली व त्यावरच लक्ष केंद्रित केल्यामुळे लेखकाचे भान सुटते, व सदर साहित्यकृती फसवी होते की काय? असे वाटायला लागते. याबाबत गं.ना. जोगळेकरांनी दिलेला संदर्भ पाहण्यासारखा आहे, 'गरडासारखी गावातील बडी धेंड असणारी व्यक्ती धोतराला दंड मारून ते धोतर वापरणारच नाही; कारण दंड मारून धोतर नेसण्या इतपत परिस्थिती येते कोणावर? तर सामान्य माणसावर. आता धोतराला दंड मारून आणणे गरडाला शोभणारे नसल्यामुळे तो आपल्या मुलालाच पाठविणार, असे लेखक जरी मानत असले तरी, वास्तवाचा विचार करता हे मनाला पटतच नाही. त्यामुळेच ही साहित्यकृती आरंभीच फसलेली आहे.' (भूमी : दिवाळी अंक,१९५०) या मताचा विचार बारकाईने करता त्यात तथ्यांश दिसतो. समजा ते धोतर गड्याला दिलेले दाखवले असते व नंतर गडी ते धोतर घेऊन गंगारामकडे आला असता तर गोष्ट निराळी. मग पुढे घडणारे कथानक येथेच थांबले असते. असो जर–तरचा मुद्दा जास्त चघळीत बसणे सयुक्तिक ठरत नाही. लेखकाने मुळातला अनुभव वा जाणवलेली कल्पनाच चित्रित केली असती, तर शक्यतो हा उणेपणा राहिलाही नसता, कारण विशिष्ट जाती–जमातींचे जीवनसंदर्भ वेगवेगळे असतात. येथे सोनाराचे शिंप्यात केलेले रूपांतर यासंदर्भात खूप विचार करूनही लेखक एक छोटी गोष्ट विसरून गेले आहेत, असे वाटते. लेखकाचे हे अपयश मान्य करूनही सदर साहित्यकृती उठाव घेते हे मात्र खरे कारण संघर्ष हाच तिचा केंद्रबिंदू आहे. मग तो शहरीकरणाचा खेड्यावर झालेल्या आक्रमणातून उद्भवलेला संघर्ष असो, गंगाराम आणि गरडाच्या स्वभावगुणांमुळे निर्माण झालेला संघर्ष असो, पिता–पुत्रांच्या स्वभाववैचित्र्यामुळे निर्माण झालेला संघर्ष असो किंवा नियती व जीवन यामधील संघर्ष असो.

लघुकादंबरीच्या निकषांचा विचार करता व्यक्तिरेखा आणि प्रसंगांच्या सीमित संख्यांचा निकषही ही लघुकादंबरी पूर्ण करते.

पार्वती ही सदर साहित्यकृतीची मध्यवर्ती व्यक्तिरेखा लेखकाने यशस्वीपणे उभी केली आहे. ग्रामीण भागातील कष्टाळू, सोशिक, सहनशील, दूरदृष्टी असलेली, व्यवहारज्ञान असलेली, पिता–पुत्राच्या संघर्षात गळचेपी झालेली, संसाराची घडी बसवता बसवता अयशस्वी ठरलेली. पतीच्या स्वभावाचा उल्लेख करून जणूकाही त्याचा विचित्र स्वभावच आपल्या सर्वांची दैना होण्यास कारणीभूत ठरलेला आहे, अशी तिची भावना झालेली दिसते. तरीही त्याच्या विचित्र स्वभावाला तोंड देत देत ती सांभाळून घेते. आपली परिस्थिती व कुवत त्याच्या ध्यानी आणून देण्याचा प्रयत्न करते. मुलाच्या भवितव्याचा चोळामोळा होताना पाहून हळहळते. नियतीला दूषणे देते आणि सारं घर सावरता सावरता शेवटी 'वाळूचा कट्टा फुटल्यावनीच' तिची स्थिती होते. त्यातल्या त्यात पार्वतीच्या तोंडूनच सारे निवेदन केलेले असल्यामुळे ग्रामीण भागातील स्त्रीच्या बोलण्यातील बोलीचा प्रवाह बारीक–सारीक तपशिलांसह वाहताना दिसतो, व हे आत्मनिवेदन सदर साहित्यकृतीचे सामर्थ्य ठरते.

तापट, हेकट, स्वाभिमानी गंगाराम आपल्याच हाताने आपल्या पायावर कुऱ्हाड मारून घेतो. स्वभाववैचित्र्यामुळे त्याच्यावर, त्याच्या कुटुंबावर 'पाचोळ्या' गत होण्याची स्थिती येते. यामागे परिस्थिती जितकी कारणीभूत ठरते, तितकाच गंगारामचा स्वाभिमानी स्वभावही नडतो; परंतु 'म्हारा–मांगाच्या अंगावर टाकल्यावाणी टाकलं धोतर. न्हाई राग यायचा का मानसाला? (पृ. ६ ) असं म्हणणारा गंगाराम जेव्हा भानाच्या बाबतीत 'का उलटं बोललास त्येला' (पृ. ३१), 'गरज हाय आपली. काय म्हणला तरी घ्यावं लागतं आयकून (पृ. ३२) असं जेव्हा म्हणतो, तेव्हा त्याच्यातील मूळचा स्वाभिमानी स्वभाव व मुलाच्या बाबतीत बदललेला स्वभाव यातील तफावत लक्षात येते.

शिवाय इतका स्वाभिमानी, हेकट गंगाराम लाचार का व्हावा? हा प्रश्नही मनात निर्माण होतो. स्वतःचंच खरं करून दाखविण्यासाठी मुलाच्या भविष्याचा चक्काचूर करतो. तीच गोष्ट भानाच्या शिक्षणाविषयी त्याला असलेली कळकळ (पृ.२१) किती अनाठायी ठरते ते 'ल्हेनं' शिकून आसे काय दिवे लावणार हाय म्हणावं (पृ.१५) या वाक्यातून.

भानाच्या बाबतीतही लेखकाचा प्रयोग काहीसा फसल्यासारखा वाटतो. मान्य आहे की, बापाच्या हेकटपणामुळे, हेतूसिद्धीपोटी त्याच्यावर झालेल्या अन्यायामुळे बापाविषयी त्याच्या मनात अढी असेल. त्याच्या शालेय वयावरून व वास्तवाचा विचार करता त्याच्यावर लादल्या गेलेल्या गोष्टीखाली तो गुदमरला असेल; परंतु या वयात तो घरात इतका उद्धट वागेलच कसा? एक प्रकारची प्रौढता समजा लहान वयात आलेल्या अनुभवांमुळे त्याच्या अंगी आलेली असेल, तरीही आईविषयी संशय घेण्याइतपत तो बापाला उत्तर देतो. येथे काहीशी अतिरंजितता आल्यासारखे वाटते. लेखकांनी भानाची व्यक्तिरेखा हुशार, कष्टाळू, आईवर खूप प्रेम करणारा, बहिणीविषयी कणव असणारा, विनयशील, समजूतदार अशी रंगविली, आणि बापाविषयी मनात अढी घेऊन, त्यांना पावलोपावली तिढ्यात बोलणारा भाना सरतेशेवटी तर आईच्या चारित्र्यावरच येऊन घसरतो. हा धक्का असह्य होऊन मरणासन्न अवस्थेकडे झुकलेल्या गंगारामचा अंत होतो. येथेच भानाच्या व्यक्तिरेखेतली तफावत लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

'तानी' या पात्राची योजना लेखकाने प्रतीकात्मक पद्धतीने केल्याचे दिसते. 'पाचोळा' च्या जन्मकथेतच ते तसे स्वतः सांगतात. नियतीच्या रूपाने तानी म्हणजे डोंब उसळलेली त्या कुटुंबाच्या पोटातील आगच आहे. तिचा प्रवेश जिथे जिथे होतो तिथे तिथे काहीतरी संघर्ष वा दुःखद घटना उद्भवल्याचे दिसते. सुरुवातीलाच गरडाचा मुलगा आणि गंगाराममधील शाब्दिक चकमक, भाना अनिच्छेने शिंपीकाम शिकायला जाण्याअगोदर, पळून आल्यानंतर जो प्रसंग येतो त्या अगोदर, गंगारामला झालेली अटक, क्षयरोग यांच्या अगोदर, गंगारामच्या चिडचिड्या वागण्याचा कडेलोट झाल्यानंतर, आणि शेवटी गंगारामच्या मृत्यूनंतर... फुटक्या नशिबाप्रमाणे फुटलेली वाटी आपटीत बसलेली तानी, येणाऱ्या बाळापुढे काय वाढून ठेवले आहे? हा प्रश्न तर विचारीत नाहीना, असे वाटल्यावाचून राहत नाही. एकूण कुटुंबाचेच पुढे काय होणार? हा प्रश्नही येथे उद्भवतो.

गरड व गरडाचा मुलगा या दोन व्यक्तिरेखा तशा नावापुरत्याच येतात; परंतु सर्व कथानकाचे संघर्षबीज रुजते ते त्यांच्या बेरकीपणातूनच. गंगारामच्या कुटुंबाला देशोधडीला पाठवूनही त्यांचे अस्तित्व राहते ते दशांगुळे.


**समारोप :** 'पाचोळा' या ग्रामीण लघुकादंबरीची चर्चा करताना, तिचे यशापयश, उणे अधिकपणा यांचा विचार करताना, एक मात्र खरे आहे की, एक वेगळी वाट चोखाळणारी साहित्यकृती म्हणून तिचा उल्लेख करावा लागेल. ग्रामीण साहित्याच्या चळवळीचा प्रारंभ खऱ्या अर्थाने इथून पुढे सुरू झालेला दिसून येतो. हा विचार करता 'पाचोळा' चे यशच विचारात घेणे महत्त्वाचे ठरते. रा. रं. बोराडे यांच्या लेखनविकासाचे प्रत्यंतर या साहित्यकृतीतून येते. कथालेखनाकडून-लघुकादंबरीकडे आणि लघुकादंबरीकडून – कादंबरीकडे असा त्यांच्या लेखनाचा झालेला विकास पाहता, ही लघुकादंबरी एक मैलाचा दगड ठरलेली आहे. आज पन्नास वर्षे उलटून गेल्यानंतरदेखील ग्रामीण साहित्यप्रवाहातील तिचे स्थान व महत्त्व अबाधित आहे.

**प्रा. डॉ. संजय नगरकर**
प्रभारी प्राचार्य,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत.
९०९६८७४७३७
sapan.09@rediffmail.com

अशोक पवार यांच्या 'भुईभेद'
या कादंबरीवरील
परीक्षण लेख

# वास्तव दर्शन घडवणारी अशोक पवार यांची 'भुईभेद' कादंबरी

**भास्कर सखाराम गायकवाड**




पुस्तकाचे नाव: **'भुईभेद'**
लेखकाचे नाव : **अशोक पवार**
प्रकाशनाचे नाव: **संधिकाल प्रकाशन**, मुंबई
पृष्ठ संख्या :२८८
मूल्य : ३००/– रुपये

बिराड आत्मकथेचे लेखक कादंबरीकार अशोक पवार यांची 'भुईभेद' कादंबरी नुकतीच वाचण्यात आली आणि खूप अस्वस्थ झालो. या कादंबरीतील पात्रांनी... आनंदा, अनिता, आनंदाचा बाप रामा कोंबडे खंडागळे, जाधव सर, या पात्रांनी माझी झोपच उडवली. ही पात्रे सतत नजरेसमोर यायला लागली. यांच्या व्यथा वेदना जर अशाच छातीत दडवून ठेवल्या तर, त्यांना लेखणीतून मोकळा श्वास घेऊ दिला नाही तर ते शब्द छाती फोडून बाहेर पडतील. अरुण कांबळेच्या भाषेत 'जर उच्चारलाच नाही तर त्वचेलाही फुटतील शब्दांचे धुमारे!' भटक्या विमुक्तावर लेखन करणारे अशोक पवार एक कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध आहेत. या आधी त्यांचे बिराड आत्मकथन, पडझड, दरकोस दरमुक्काम, इळनमाळ आणि तसव्या ह्या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. 'भुईभेद' अशोक पवार यांची समकालीन प्रश्नावर सडेतोड घणघात करणारी श्रेष्ठ अशी कादंबरी आहे. या कादंबरीतील समस्या विविधांगी आहेत. वृद्धांच्या समस्या, दैनंदिन जगण्याचा प्रश्न, बेरोजगारीची समस्या, दारूची व्यसनाधीनता, शोषणवादी राजकारण, दुष्काळ, मजुरीचे प्रश्न, खेड्यातील बकालपणा, सुशिक्षितांची लूट, दिशाभूल करणारा काळ, पोलिसाकडून होणारा छळ असे अनेक

प्रश्न अशोक पवारांनी भुईभेद कादंबरीमध्ये विस्ताराने मांडले आहेत. आनंदा हा कादंबरीचा नायक, त्याच्या निवदेनातून कादंबरीचं कथानक उलगडत जाते. सुरुवातच आनंदाचे कुटुंबाचं गाव सोनापूर अतिशय समृद्ध होते. आजूबाजूच्या खेड्यातील लोक यांच्या घरी साला महिन्याने नोकर म्हणून राहायचे. शेती बक्कळ पिकायची; पण पूर्णा नदीवर येलदरी धरण बांधले गेले व सोनापूर गाव विस्थापित झाले. शेत तळ्यात गेले आणि या लोकांनी टेकडीच्या पायथ्याशी दगडवाडी हे गाव वसविले, आणि येथूनच दगडवाडीच्या चित्तरकथेची सुरुवात झाली.

आनंदाचा बाप रामा कोंबडे म्हणून ओळखला जाऊ लागला. ही दगडवाडी म्हणजे सर्व समस्यांचे माहेरघर. बरडाची शेती, सतत दुष्काळ, उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. वीज नाही, शाळा नाही, रस्ते नाहीत, सर्वार्थाने विकासापासून कोसो दूर. रामा कोंबडे पहिली शिकलेला. गावात तोच थोडाफार हुशार, सही करणारा, अडीअडचणीत धावून जाणारा. आपला मुलगा चांगला शिकला पाहिजे. मोठी नोकरी करून दारिद्र्याचे जीवन संपवले पाहिजे. गावात चांगले घर, पाण्याखाली शेत, व शहरातही बंगला, सुशिक्षित मुलगी सून म्हणून मिळाली पाहिजे ही त्याची माफक अपेक्षा आहे. कोंबड्या पाळून आनंदाला शिकवितो, बायको गोंद वेचून संसाराला हातभार लावते. आनंदा शिकून प्राध्यापक होण्याचे स्वप्न पाहतो. तुकाराम दाभाडेची मुलगी अनिता ती सुद्धा जिंतुरला राहून शिक्षण घेते. दुष्काळामुळे तरुण लोक गाव सोडून कामासाठी पुण्या-मुंबईचा रस्ता धरतात. म्हाताऱ्या कोताऱ्यांची जबाबदारी राम कोंबडेच्या खांद्यावर येते. कुणाच्याही समस्येला, प्रत्येकाच्या विश्वासास रामाच पात्र ठरतो. पुण्या मुंबईला गेलेल्यांच्या म्हाताऱ्या कोताऱ्याचा अंत्यविधी, त्यांचे खाणे-पिणे, बैठका रामा कोंबड्यांच्या मांडवात असायच्या.

गावात दारू बंदीसाठीही रामानं मोर्चे काढून दारू बंद केली. कंगाल बँकवाल्याने गावातील लोकांना अवाच्या सव्वा कर्ज देऊन लोकांना अधिकच कंगाल केले. कर्जाच्या भीतीने लोक गाव सोडून पुण्या-मुंबईला गेले. एके दिवशी कर्जाची परतफेड न केल्यामुळे ते गावातल्यांना मारहाण करत असताना गाववाल्यांनी कंगाल बँकवाल्यांना चांगलाच चोप दिला. आठ एक दिवसांनी पोलिसामार्फत रात्री गावावर हल्ला करुन काही स्त्रियांची बेअब्रू केली. पोलिसांना धडा शिकविण्याच्या नादात गाव कांबळे लिडरच्या जाळ्यात अलगद सापडले. कांबळे लिडर शिवाजी महाराज, म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे फोटो लावून लोकांना, गरिबांना दिवसा ढवळ्या लुबाडतो व दगडवाडीला कायम दहशतीत ठेवतो.

भुऱ्या भगताने शेतीवाडी विकून मुलाला शिकविले. नोकरी लावली; पण मुलगा व सून त्यांना त्यांच्या बंगल्यात राहू देईना. तुम्ही घाण राहता. तुम्ही घाण करता म्हणून छळ करीत होते. ते गावाकडे येऊन झोपडी बांधून राहतात. खायला काहीच नसल्यामुळे फाशी घेऊन जीव देतात. ज्ञानेश्वर पाटील शेतीवर फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन मुलीचे लग्न थाटामाटात करतात. दोन-तीन वर्षं शेती पिकतच नाही. कंपनीच्या तकाद्याने ज्ञानेश्वर पाटील शेतात जाऊन आत्महत्या करतात. किसन पाटील यांनीही शेत विकून मुलांना नोकरीला लावले. मुलासोबत शहरात गेले, तर मुलगा सून विचारीनात, त्यांना उपाशी ठेवायला लागले. २० हजारांच्या कुत्र्याला स्वतंत्र खोली, परदेशी बिस्किटे. घरी पाहुणे आले, तर मायबापाची लाज वाटते म्हणून त्यांना एका एका खोलीत कोंडून ठेवले तर पाहुणे गेल्यावरच खोलीचे दार उघडले. हा अपमान सहन न झाल्याने ते गावी येऊन दारूच्या दुकानासमोर भाजलेले शेंगदाणे विकायला लागले. अशा उद्‌ध्वस्त झालेल्या खेड्यांच्या मन पिळवटणाऱ्या कहाण्या भुईभेद कादंबरी मध्ये अशोक पवारांनी रेखाटून ग्रामीण भागातील दुःख उजागर केले. म्हणून समकालीन प्रश्नावर भाष्य करणारी ही महत्त्वाची कादंबरी आहे. आनंदाचे नोकरीसाठी फॉर्म भरणे सुरूच असते; पण डोनेशन शिवाय कुठेच डाळ शिजत नाही. वडिलांच्या सल्ल्यावरून एकनाथ पाटील गुरुजी यांची मुलगी माधुरीशी लग्न करून चार लाख रुपये भरून एकनाथ मास्तर आनंदाला विनाअनुदानित संस्थेवर प्राध्यापक म्हणून नोकरीवर लावतो. आनंदाचे आवडते सर मनोहर पाटील कॉलेजचे प्राचार्य असतात. फुले, आंबेडकरांवर भाषणं देतात; पण अध्यक्षांच्या विधवा बहिणी सोबत लग्न करून प्राचार्य पद मिळवतात. नीतिमत्तेचे पाठ सांगून विद्यार्थ्यांनाच लुबाडतात. संस्थेचे अध्यक्ष शिवाजी महाराज म. फुलेंना मानतात. प्राध्यापकांना कायम करण्यासाठी दिवसाढवळ्या लाखो

रुपयांनी लुटतात. टेबलावर अण्णा हजारेंचा फोटो लावून त्याखाली 'भ्रष्टाचार थांबवा देश वाचवा' असे सुभाषित लिहून डोळ्यात धूळफेक करतात. आनंदाला या कॉलेजवर पगार नाही. तो प्राचार्यांकडे जाऊन वारंवार विचारणा करतो, मला कायमची ऑर्डर कधी मिळेल, पूर्ण पगार कधी मिळेल? त्याला आश्वासनाचे गाजर सतत दाखविले जाते. पगार नसल्यामुळे पत्नी माधुरी जवळ राहत नाही. पूर्ण पगार मिळाल्याशिवाय जवळ राहायला तयार होत नाही. त्याच्याशी नीट बोलत नाही. तुमच्यापेक्षा पगारीवाला चपराशी बरा होता, अशी घालून पाडून बोलते. माझ्या आयुष्याची बरबादी केली म्हणून वडिलांशी भांडते. हुंड्यात दिलेले भांडेकुंडे आनंदाच्या बापाच्या घरून घेऊन येते. आनंदाकडून फारकत घेते. आनंदाच्या जगण्यातील आनंदच हिरावून घेण्यास कारणीभूत ठरते. डोनेशनचे चार लाख परत मागते. आनंदा अध्यक्षाकडे जाऊन पैसे मागतो. तर अध्यक्ष म्हणता, 'दोन लाख रुपये पुन्हा दिले तर नोकरीत कायम करतो.' आनंदाचा बाप रामा कोंबडे आनंदाला ठावं न होऊ देता स्वतःची एक किडनी विकून टाकतो व दोन लाख रुपये आनंदाला देतो. 'मी मातीत गेलो तरी तू उगवला पाहिजे.' ही वडिलांची इच्छा ऐकून काळीजच दुभंगते. प्राध्यापक होण्याच्या स्वप्नाने आनंदाच्या आयुष्याचा धिंगाणा होतो. तशीच अवस्था प्रा. जाधव सरांची होते. ते दहा-बारा वर्षं नोकरी करतात; पण त्यांनाही पर्मनंट करत नाहीत. उधारही कोणी देत नाही. वडिलांचा गळा घोटून अनुकंपा तत्त्वावर वडिलांच्या जागेवर तरी नोकरी लागेल असे अतिरेकी विचारही जाधव सरांच्या मनात येतात. हे ते आनंदालाही बोलून दाखवतात. नियतीच्या चक्रात अडकलेली ही पात्रे जगताना उरात किती दुःखाचा डोंगर पेलत असतील याची जाणीव अशोक पवार वाचकाला करून देतात. जाधव सरांना त्यांचा विद्यार्थी म्हणतो, 'तुम्ही मपले मास्तर नसते ना तर जोड्यानं हानून पैसे वसूल केले असते.' यापेक्षा मानधनावरील प्राध्यापकांची मानहानी ती कोणती?

दुःखापोटी शेवटी आनंदा फाशी घेण्याच्या निर्णयापर्यंत पोहोचतो. या निर्णयापासून परावृत्त करणारी नायिका अनिता, गोंद विकून घर चालवणारी माय, कांबळेच्या हाताखाली काम करून परिपक्व कवी सारीपुत्र यांच्या जगण्यातील संघर्ष वाचकाला एका वेगळ्याच अनुभूतीच्या पातळीवर नेऊन सोडतो. 'घर फिरले की, घराचे वासेही फिरतात.' मुलांच्या नोकरीपायी दारूबंदीसाठी मोर्च काढून दारू बंद करणारा रामा कोंबडे स्वतः दारू काढून विकतो. स्वतःच्या अंगणातील झाडावरील पक्षीही अनिताच्या अंगणातील लिंबाच्या झाडावर जाऊन बसतात तर म्हातारेकोतारेही अनिताच्या अंगणात जाऊन बसतात. २६ जानेवारीला महापुरुषांवरच्या ढोंगी भाषणामुळे आणि भ्रष्टाचाराच्या उद्रेकामुळे आनंदा अध्यक्ष आणि प्राचार्यांना फाटक्या जोड्यानं बडवून काढतो. त्याला जाधव सरांचीही मूक संमती असते. आनंदाची नोकरी यामुळे सुटण्यात जमा असते. गावाकडे आनंदाचा बाप रामा कोंबडे अतिशय आजारी असतो. दवाखान्यात नेण्यासाठी आनंदाजवळ एक खडकू सुद्धा नसतो. अतिशय विकलांग अवस्थेतील रामा कोंबडेचा मृत्यू वाचकांच्या मनाला चटका लावून जातो.

शहरात गेलेली अनिता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातून एम. ए., एम. फिल, पीएच.डी. पदवी प्राप्त करून आंधळ्या झालेल्या मायबापांना घेऊन गावात येते. शेळ्या राखून दगडवाडीचा आमूलाग्र विकास घडवून आणते. स्वयंपूर्ण खेडे अशोक पवारांनी अनिता ह्या महानायिकेच्या माध्यमातून उभे केले. म्हाताऱ्या कोताऱ्या माणसांत आत्मविश्वास निर्माण करून खूप मोठी विहीर खोदली. तिला पाणी ही भरपूर लागले. पाण्याची टाकी बांधून लिफ्ट इरीगेशनने सर्व दगडवाडीत पाणी खेळवले. शिवार भाग सुजलाम सुफलाम बनविला. गावात रस्ता मंजूर करून लालपरी मुक्कामाला गावात ठेवली. वृद्धांना मानसन्मान मिळवून दिला. गाव स्वयंपूर्ण बनविले. समाजमंदिर, वाचनालय, गावात वीज आणली. गाव सोडून शहरात मजुरी करून पोट भरायला गेलेले लोक गावात यायला लागले. व्यसनाधीनता नष्ट केली. शेवटी ब्लडकॅन्सरने अनिताचा बळी घेतला. ज्या व्यवस्थेने आनंदाच्या आयुष्याचा सत्यानाश केला त्या व्यवस्थेविरुद्ध लढण्याचे आनंदा ठरवतो व तेथूनच सायकल रॅली गावोगाव नेऊन भ्रष्टाचार उघडकीस आणण्याचा चंग बांधतो, या सकारात्मक विचारावर कादंबरी थांबते. या कादंबरीत काही ओंगळ, किळसवाण्या प्रवृतीचे दर्शन, दुष्काळामुळे रोजगारहमींची कामे खेड्यापाड्यात सरू

होतात, त्यामध्ये राजरोसपणे भ्रष्टाचार होताना दिसतो. चौकीदार पूर्ण मजुरीवर अंगठे घेऊन अर्धीच मजुरी देतो. त्या विरोधात कोणी आवाज उठविला, तर कामावरून कमी करण्याची धमकी देतो. श्रमाचे व शारीरिक शोषणही करतो. आडगावच्या कांबळे लिडरच्या बापाने याच परिसरात लोकांचे चपला जोडे शिवलेले; पण हा कांबळे महापुरुषांच्या आडून गोरगरिबांच्याकडून लाचलुचपत खाऊन गब्बर बनतो. मनोहर पाटील अध्यक्षांच्या विधवा बहिणीसोबत लग्न करून प्राचार्य पद मिळवून भ्रष्टाचाराचे कुरण बनवतो. याबद्दल रामा कोंबडे म्हणायचा 'सर्व एकाच वस्तऱ्याने भादरलेले आहेत.' सुशिक्षित बेरोजगारांचे हाल. तासिका तत्त्वावर प्राध्यापकांचे लक्तरलेले जगणे.

शैक्षणिक संस्था शिक्षकांचे करत असलेले शोषण, वयोवृद्ध लोकांचे खडतर जीवन, शेतकऱ्याचं, कलावंताचं, मायबापाचं, मुलांचं, गल्लीछाप लिडर लोकांचं, व्यसनाधीनतेचं, महिलांचं अशा उद्ध्वस्त झालेल्या लोकांचं जगणं भुईभेद कादंबरीत आलेले आहे. स्त्री ही सृजनाची निर्मिती आहे. तिची पाळेमुळे खोल जमिनीत मुरलेली आहेत. स्त्री आणि पृथ्वी सारख्याच आहेत यावर अशोक पवार यांचा दृढ विश्वास आहे म्हणून गाव परावर्तित करणाऱ्या अनिताची ही महायशोगाथा आहे. ही कादंबरी स्त्री प्रधान आहे. काम नसल्याने पुणे-मुंबईला कामाला जाणाऱ्या माणसांच्या व्यथा, गावात राहणाऱ्या वृद्धांचे हाल, नोकरीवर लागलेले मुलं मायबापाकडे ढुंकूनही पाहत नाहीत. निराधार योजनेवर जगणारे म्हातारे, त्यांच जगणं, समाजाने समजून घेतले तर भुईभेद कादंबरीचे सार्थकच होईल. त्यासाठी प्रत्येकाने एकदा ही कादंबरी वाचावी ही अपेक्षा वाचकांना करतो. उत्तमोत्तम कलाकृतीची निर्मिती अशोक पवार यांच्या लेखणीतून प्रसावी ही अपेक्षा व पुढील लेखनासाठी शुभेच्छा!

**भास्कर सखाराम गायकवाड**
माजी प्राचार्य/सेवानिवृत्त
मु. पो. व्याड ता. रिसोड जि. वाशीम
भ्र. ९७६३४२२५१८





**भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य**

प्रकाशक ।
महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे
पृष्ठे । ४६०
मूल्य । ८००/-

# शांततेचा खोलस्वर : कमबख्त निंदर

**नरेन्द्र मोहन लिखित आणि यशोधरा काटकर यांनी अनुवादित केलेल्या 'कमबख्त निंदर' या आत्मकथेवरील अंजली आंबेकर यांचा परीक्षण लेख**

**अंजली आंबेकर**




पुस्तकाचे नाव : **कमबख्त निंदर (आत्मकथा )**
लेखक : **नरेन्द्र मोहन**
अनुवाद : **यशोधरा काटकर**
प्रकाशक : **मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
पृष्ठसंख्या :**१७४**
मूल्य: २५० /– रु.

ज्येष्ठ भारतीय साहित्यिक डॉ नरेन्द्र मोहन यांच्या आत्मकथेबद्दल. काव्य, नाटक, साहित्यशास्त्र, समीक्षा, चरित्र, आत्मचरित्र, संपादन आणि डायरी लेखन अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये मोलाची कामगिरी करणारे डॉ नरेन्द्र मोहन हे हिन्दी साहित्यातले महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. नरेन्द्र मोहन हे भारत – पाकिस्तान फाळणीच्या दाहात प्रत्यक्ष होरपळलेल्यांपैकी एक. त्याबद्दल कविता आणि कथा लिहून आत्मलुब्ध होणाऱ्या साहित्यिकांना समकालीन असूनही, नरेन्द्र मोहन व्रतस्थ राहून आजीवन साहित्यसेवेत गुंतलेले सर्जनशील व्यक्तिमत्त्व होते, हे त्यांच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य मानावे लागेल. डॉ नरेन्द्र मोहन यांच्या 'कमबख्त निंदर' या हिंदीमधल्या आत्मकथेचा यशोधरा काटकर यांनी केलेला अनुवाद मराठी भाषा आणि साहित्याची समृद्धी निश्चितच वाढवणारा आहे.

नरेन्द्र मोहन यांनी जन्मघडी, फाळणी आणि आणीबाणी दरम्यान अनुभवलेला काळ, त्यात

केलेली साहित्यनिर्मिती याबद्दलचा दस्तऐवज त्यांच्या कमबख्त निंदर या त्यांच्या आत्मकथेच्या पहिल्या खंडातून समजून घेता येतो. भारत –पाकिस्तान विभाजनापूर्वीच्या लाहोर शहरातील अतिशय साधारण कुटुंबात जन्माला आलेल्या मुलापासून दिल्लीत स्थायिक होत साहित्य क्षेत्रातील ख्यातनाम व्यक्तिमत्त्व बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास इथे चित्रित झाला आहे. या प्रवासाबद्दलचे कुतूहल शमवण्याचे ही आत्मकथा हे उत्तम साधन आहे. फाळणीपूर्वी रोवल्या गेलेल्या अस्वस्थतेच्या बीजांमधून धुमसत गेलेला काळ कालांतराने भारतीय स्वातंत्र्याचा अभिशाप ठरला. तो धुमसता काळ, त्यातली अस्वस्थता, त्यात सर्जनशील आत्म्याचे घुसमटणे नरेन्द्र मोहन यांनी अनुभवले आहे, या अनुभवाशी समानधर्मा असणारा मंटोही त्यांना त्यामुळेच त्यांना जवळचा होता. दोघांच्या काळाशी संबंधित दुःखाची जातकुळी एकच होती. मंटोशी असणाऱ्या त्यांच्या आत्मीय आणि साहित्यिक नात्याला अशी किनार होती हे इथे सतत जाणवत राहते.

भारत–पाकिस्तान फाळणीसारखाच पूर्व पाकिस्तान स्वातंत्र्य आणि मुक्तीसाठी झालेला संघर्षही नरेन्द्र मोहन यांच्या मनावर दीर्घकाळ ओरखडे ओढवणारा ठरला. या युद्धात अंबाला आणि लाहोरसारख्या अनेक शहरांना विध्वंसाचा फटका बसला. दोन्हीकडे भावनांचे एकसारखे चित्कार उमटत राहिले; पण हवाई हल्ल्यांच्या गोंधळात कुणालाही ते ऐकण्यासाठी सवड नव्हती. त्या पार्श्वभूमीवर नरेन्द्रना अंबाल्याला जाण्याची शक्यता वाटत होती; पण लाहोरला ते कसे जाणार होते ? त्यांच्या प्रिय रावीला कसे भेटणार होते ? त्यांचे मूळ माय मातीशी असणारे बंध आणि तिथे जाऊ शकत नसल्याने येणारी व्याकुळता इथे व्यक्त झाली आहे. भारतीय इतिहासातील असा विशिष्ट कालखंड बघून, त्याविषयी नाट्यपूर्ण लिहिणे, स्वतः सिद्धहस्त नाटककार असणाऱ्या नरेन्द्र मोहन यांना सहज शक्य होते; परंतु तसे न करता त्यांनी सहज आणि साध्या शैलीत आपले जीवनानुभव व्यक्त केले आहेत. नरेन्द्र मोहन यांनी जन्म घडी –फाळणी –आणीबाणी या तीन कालबिंदूंमधल्या राजकीय–सामाजिक–वैयक्तिक परिस्थितीचे विश्लेषणच नव्हे तर पंजाब –हरियाणा मधील त्यांचे विद्यापीठीय सहकारी, वरिष्ठ किंवा दिल्लीतील प्रथितयश साहित्यिक, राजकारणी यांच्या बरोबरच्या अनुभवांची दाहकता अत्यंत संयमाने व्यक्त केली आहे.

नरेन्द्र मोहन यांनी इथे स्वतःच्या अंतर्मनाचे विश्लेषणही केले आहे. वडिलांच्या तापटपणामुळे त्यांच्यात निर्माण झालेल्या अंतर्विरोधाच्या भावनेमुळे मनात ज्या क्रिया–प्रतिक्रिया उमटत राहिल्या, त्या त्यांच्या काव्य आणि नाटकांमधून विविध रूपांत व्यक्त होत गेल्या. त्यांच्या भावनाप्रधान स्वभावात वसलेल्या विद्रोहाला आणि काव्यातल्या शांत रूपकांमधून अभिव्यक्त झालेल्या संरचनात्मक आणि मानसशास्त्रीय पैलूंना या पार्श्वभूमीवर समजून घेणे आवश्यक असल्याची भावना त्यांनी इथे व्यक्त केली आहे.

माझ्यातल्या 'मी' ला स्वतःपासून वेगळे करून पारखण्यासाठी वेगळी दृष्टी आणि कौशल्य गरजेचे असते, अशा पद्धतीचे अनुभव कथन प्रत्यक्षात फार होताना दिसत नाही; पण कमबख्त निंदर त्याला निश्चितच अपवाद आहे. हा कमनशिबी निंदर नरेन्द्र मोहन यांचा सखा, सहोदरच आहे. नरेन्द्र बरोबर श्वास घेणारा, जन्मघडीपासून सहप्रवासी असणारा निंदर मोठा बहुरूपी आहे. तो कधी त्यांच्या बीजींची भूतकाळाच्या अंधारातून येणारी वात्सल्यमय साद आहे, तर कधी गांधीजी ज्याला अंतर्यामी म्हणतात तो आहे, हे रूपक जितके मनोज्ञ आहे, तितकेच अर्थवाही देखील. आंतरिक आघात आणि बाहेरचे आघात, या दोहोंमध्ये होरपळले जाणारे निंदरचे अंतरंग नरेन्द्र मोहन यांनी आपल्या साहित्यातून पृष्ठभागावर आणण्याचा प्रयत्न केला. लेखनाची ऊर्मी, मनातल्या विचारांचे वादळ, त्यातून ते व्यक्त होण्यासाठी किंवा शब्दात मांडण्यासाठी करावी

लागणारी कसरत हे सगळे मांडताना नरेन्द्र मोहन यांनी आपले लेखकीय व्यक्तिमत्त्व  उलगडून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. हा सृजन-प्रवास मुळातूनच वाचण्यासारखा आणि समजून घेण्यासारखा आहे .

बालपणी शरणार्थी अवस्थेत भारतात आलेला, लुटीपुटीचे नाटक खेळणारा निंदर पुढे दिल्लीपर्यंत मजल मारत मोठा कवी, नाट्य लेखक, समीक्षक बनला. त्याला दिल्लीतील प्रत्येक घटनेतले दृश्यनाट्य जाणवले, दिल्लीतील राजनैतिक घटनाक्रम आणि रंगमंचीय नाट्य यांच्यामध्ये अद्भुत साधर्म्य जाणवत तिचे रंगमंचीय स्वरूप दिसले त्यातून नरेन्द्र मोहनची मंच अंधेरे में, मिजिन्ना, कहे कबीर सुनो भई साधो, हद हो गयी, यारो अशी नऊ नाटके, कवितांचे खंड, साहित्य विचार, समीक्षात्मक लिखाण आकाराला येत गेले. दुसरीकडे फैज अहमद फैज यांचे  'बोल किलब आझाद है तेरे' हे काव्य त्यांना आणीबाणीच्या घुसमटून टाकणाऱ्या कालखंडात जोम धरून व्यक्त व्हायला, त्या विरुद्ध प्रतीकात्मक कृती करायला प्रेरित करत गेले. या सगळ्या घटनाक्रमाला नरेन्द्र मोहन यांनी तीव्रतेने अनुभवले, त्यातून त्यांची ऊर्जा त्यांना सृजनात्मकतेकडे घेऊन गेली. त्या काळाला, काळातील घटिताला त्यांनी इथे संक्षिप्त तथा हृदयस्पर्शी पद्धतीने व्यक्त केले आहे. स्वतःच्या सतत पलीकडे जात, या लेखकाने भारतातले राजकीय - सामाजिक वास्तव ज्या संवेदनशील पद्धतीने टिपले आणि विविध साहित्य प्रकारातून व्यक्त केले, ते उल्लेखनीय आहे म्हणून त्यांना केवळ हिंदीतले साहित्यिक एवढ्या मर्यादित कंसात ठेवणे योग्य नाही कारण त्यांना देशस्तरावरचे वास्तव टिपणारी, त्याचे विश्लेषण करून वाचकांपर्यंत पोहोचवण्याची व्यापक दृष्टी लाभली आहे हे या आत्मकथेत पदोपदी जाणवत राहते.

नरेन्द्र मोहन यांच्या संदर्भातील अजून एक उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यांनी साहित्यिक म्हणून जी कीर्ती प्राप्त केली ती केवळ आणि केवळ त्यांच्या सृजनात्मक निर्मितीच्याच बळावर, त्यामागे कुठलीही ही क्लृप्ती किंवा राजकीय-साहित्यिक नातेसंबंधांचा आधार नाही. या बाबतचे भावनिक आणि वैचारिक द्वंद्व ते वारंवार अधोरेखित करतात. या द्वंद्वात परिस्थितीचा आणि आकांक्षांचा ही समावेश होतोच होतो.

कमबख्त निंदर ही साहित्यकृती, नरेन्द्र मोहन यांनी मिळवलेले नायकत्व, त्यांच्या जगण्यातला सहज भाव, बनते-बिघडते नातेसंबंध, बदलत्या कौटुंबिक, सामाजिक आणि राजकीय संकल्पना यामधील साधारण माणसाचा होणारा स्वतःशी आणि परिवेशाशी संघर्ष याचा लेखाजोखा म्हणून खडी ठाकते. फाळणीच्या घटनेने विद्ध होऊन लिहिते झालेले सगळे भारतीय लेखक आज काळाच्या पडद्याआड गेलेले असताना, त्या फळीतल्या ज्येष्ठ साहित्यिकाचे असे एक वेगळे आत्मकथन मराठीत येणे हीच एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना आहे. हिंदीतील सगळी भाषिक वैशिष्ट्ये आत्मसात करून, या आत्मकथेतली तथ्ये,  मराठीतीलच पुस्तक वाटावे अशा बेमालूमपणे पोहोचवण्यात यशोधरा काटकर यशस्वी ठरल्या आहेत. अनुवादक म्हणून त्यांचे हे मोठे यश आहे.

**अंजली आंबेकर**


पत्ता -बी, एजवेअर, शिवसाई पॅराडाईस,
फातिमा चर्चच्या मागे, माजिवडे, ठाणे
भ्र : ९८२०९००२४२
ईमेल : anjaliambekar@gmail.com

▪▪

सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील कविता मुरूमकर लिखित 'मी सावित्री जोतीराव' या चरित्रात्मक कादंबरीवरील डॉ. दादा गोरे यांचा समीक्षालेख

# मी सावित्री जोतीराव : चरित्रात्मक कादंबरी एक मानदंड

डॉ. दादा गोविंदराव गोरे




पुस्तकाचे नाव : **मी सावित्री जोतीराव**
लेखकाचे नाव : **कविता मुरुमकर**
प्रकाशक : **अन्वी प्रकाशन, सोलापूर**
प्रथम आवृत्ती : **९ ऑगस्ट २०१०**
पृष्ठे :
मूल्यः **५९९ /–** रुपये

मी सावित्री जोतीराव ही कविता मुरुमकर यांची सावित्रीबाईंच्या जीवनचरित्रावर लिहिलेली कादंबरी. ही कादंबरी नायिकामुखी आहे. एका व्यापक अर्थाने ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे; पण तशी ती आत्मचरित्रात्मक नाही, ती चरित्रात्मकच आहे; परंतु निवेदन आत्ममुखी असल्यामुळे प्रत्यक्ष सावित्रीबाई आपली कथा स्वत:च सांगतात असा आभास निर्माण होतो. एकोणिसावे शतक म्हणजे समाजसुधारकांचे, विचारवंतांचे, सामाजिक चळवळींचे क्रांतिकारी पर्व आहे. १८१८ ला मराठ्यांचे राज्य संपले. पेशवाई लयास गेली आणि इंग्रजी अंमल सुरू झाला. याच शतकात परिवर्तनीय काळाला गती देणारे महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले या व्यक्तिरेखा होत. या दोन्ही व्यक्तिरेखा साध्या, सोप्या समकालीन भाषेच्या माध्यमातून समर्थपणे आत्मनिवेदन पद्धतीने या कादंबरीत उभ्या केलेल्या आहेत. चरित्र हा एखाद्या व्यक्तीचा जीवनवृत्तांत असतो. हा जीवनवृत्तांत समकालीन व्यक्तीने लिहिलेला असेल तर त्यात बरीच सत्यता असते. ऐतिहासिक साधनसामुग्रीचा आधार घेऊन, अभ्यास करून एखाद्या व्यक्तिरेखेचे चरित्र जेव्हा लिहिले जाते तेव्हा त्या व्यक्तीच्या जीवनातील घटना, प्रसंग अन्वयार्थ लावून ती व्यक्तिरेखा रेखाटली

जाते. दोन सत्य घटनांमधील दुवा कल्पनेचा आधार घेऊन जुळवला जातो. हा कल्पनाविस्तारही त्या व्यक्तीच्या जीवनातील घटनांसारखाच सत्य उतरवणे महत्त्वाचे असते; पण तो लेखकाच्या कल्पनेतून उभा राहिलेला असतो. हा महत्त्वाचा असला तरी तो सत्य घटना प्रसंग बाधित होणार नाही याची काळजी घ्यावी लागते; पण हे चरित्र जेव्हा आत्मनिवेदनातून साकार होत जाते आणि लेखिका चरित्र नायिका नसून ती चरित्र नायिकेच्या भूमिकेत जाते तेव्हा त्यातील सत्य घटना, तो कालखंड आणि त्यात आलेल्या व्यक्तीव्यक्तीचे साकार झालेले चित्र सत्य मानावे लागते; पण ते कादंबरीतील सत्य असते. हे सत्य त्या व्यक्तीच्या वास्तवजीवनातील सत्याशी प्रतारणा तर करत नाही ना हे लक्षात घ्यावे लागते. या कादंबरीत लेखिकेने असे सत्य उभारण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला दिसतो. हे चरित्र स्वत: सावित्रीबाईच आपणास सांगते. स्वत:च्या जीवनातील घटनांकडे त्रयस्थाच्या भूमिकेतून तटस्थ राहून त्याचे लेखन आत्मचरित्रकारकासारखेच कविता मुरुमकर यांनी केलेले आहे. निवेदिकाच सावित्रीबाई होते. त्यांच्या स्वत:च्या जीवनातील घटनाप्रसंग चितारणे तसे अवघड असते. लेखिकेचा स्व तसाच सतत हे लेखन करताना बरोबर असतोच. हा स्व बाजूला ठेवून सावित्रीबाईची जीवनकथा लेखिकेने संवेदनशीलतेने समर्थपणे सांगितली आहे. लेखिका संवेदनशील मनाच्या असल्यामुळे आणि स्त्री असल्यामुळे सावित्रीबाईच्या भूमिकेत सहजपणे वावरताना दिसतात. अर्थात त्या अभ्यासू, सुसंस्कारित आणि सुशिक्षित मनाच्या असल्यामुळे स्वत:च्या शतकाच्यामागे जाऊन सावित्रीबाईच्या शतकात त्या सहजपणे वावरताना दिसतात. समकालीन सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि जातीय पातळीवरील समाजपरिवर्तनात फुले कुटुंबीयांचे चरित्र आणि व्यक्तींना समजून घेऊन स्व बाजूला सारून आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिणे, समजून घेणे मला महत्त्वाचे वाटते. या विषयी कविता मुरुमकर म्हणतात– 'आत्मनिवेदनातून सावित्रीला जे व्यक्त करायचे आहे, ती केवळ स्वत:ची कहाणी नाही. एकोणिसाव्या शतकातला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत क्रांती करणारा इतिहास आहे. तसेच महात्मा जोतीराव यांचे क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आणि त्यांच्या सोबतीने जगलेल्या उत्कट सहजीवनातील बारीक सारीक जाणिवाही तितक्याच संवेदनशीलतेने व्यक्त करावयाच्या आहेत. इतिहासाच्या पार्श्वभूमीवर अनेक घटना, प्रसंग, व्यक्तींना सजीव करणाऱ्या सावित्रीबाईलाच एक देखणे व्यक्तिमत्त्व देऊन उंचीवर नेताना माझ्या अंतर्यामी असलेल्या सावित्रीने मला आपल्या अनुभूतीशी एक जीवन करून टाकले आहे...' पुढे त्या म्हणतात 'चरित्रात्मक कादंबरी लिहिताना ते निखळ चरित्र होणार नाही, कलेचं सौष्ठव हरवणार नाही याची मी दक्षता घेतली आहे. सावित्रीबाईची जीवनकहाणी शोककथा नाही तर शौर्यकथा आहे. सावित्रीबाईंच्या व्यक्तित्वातून स्त्रीत्वाच्या संवेदनशील शोधाची माझी उत्कट अनुभूती म्हणजे मी सावित्री जोतीराव ही मुरुमकरांची भूमिका लक्षात घेतली तर त्यांच्या संवदेनशील मनाला आकलन झालेली, भावलेली वास्तवतेच्या पातळीवर सावित्रीबाईंच्या जीवन इतिहासाच्या आधारे मोठ्या कल्पनेने सावित्रीबाई उभी केली आहे. कादंबरी लिहिताना सावित्रीबाईंच्या

**'आत्मनिवेदनातून सावित्रीला जे व्यक्त करायचे आहे, ती केवळ स्वत:ची कहाणी नाही. एकोणिसाव्या शतकातला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रांत क्रांती करणारा इतिहास आहे. तसेच महात्मा जोतीराव यांचे क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व इतिहासाच्या पार्श्वभूमीवर आणि त्यांच्या सोबतीने जगलेल्या उत्कट सहजीवनातील बारीक सारीक जाणिवाही तितक्याच संवेदनशीलतेने व्यक्त करावयाच्या आहेत. इतिहासाच्या पार्श्वभूमीवर अनेक घटना, प्रसंग, व्यक्तींना सजीव करणाऱ्या सावित्रीबाईलाच एक देखणे व्यक्तिमत्त्व देऊन उंचीवर नेताना माझ्या अंतर्यामी असलेल्या सावित्रीने मला आपल्या अनुभूतीशी एक जीवन करून टाकले आहे...'**

जीवनातील सर्व घटनांची निवड करणे योग्य नसते. काही घटना वगळून एक सुसंगत सूत्रबद्ध व्यक्तिरेखा उभी करण्याचा प्रयत्न मुरुमकर येथे करताना दिसतात. व्यक्तिरेखांच्या जीवनातील घटनांचा अन्वयार्थ लावणे तसे कठीण असते. बऱ्याचदा तो चुकीचाही लावला गेलेला असतो कारण लेखकाला स्वत: आकलन झालेली व्यक्तिरेखा रेखाटायची असते. हे जीवनसत्य आत्मकथनाच्या रूपात सांगताना कविता मुरुमकर यशस्वी झाल्याची अनुभूती आपणास देतात.

अंगावर हिरवंगार नऊवारी लुगडं, कपाळावर लालभडक कुंकवाची आडवी रेघ, टचटच वाजणारी पायातली जोडवी, कानात कर्णफुलं अन् बुगडी, डोक्यावर पदर आणि हातात पुस्तकं घेऊन नेहमी जोतीबांच्या मागून जोडव्याच्या टचटच आवाजात आत्मविश्वासानं अन् खंबीरपणे पावलं टाकीत जाणारी मी सावित्री आज......... सारे काही तसंच पण............. जोतीबांच्या मागून चालणाऱ्या सावित्रीच्या पावलांना ध्येयाकडं ओढावणारा एक स्वप्नवेग असायचा..... नेहमी जोतीबांच्या मागून चालणारी सावित्री आज............... जोतीबांची सावित्री पुढं अन् जोतीबा मागे होते. सावित्रीच्या हातात पुस्तकाऐवजी टिटवं होतं.

अशी जोतीबांच्या अंतिम यात्रेपासून कादंबरीची सुरुवात होते, असे बोलणारी सावित्री कविता मुरुमकर उभी करतात. त्या सावित्री जोतीबांच्या जीवनातील वास्तव उभे करताना सावित्रीच्या कायेत प्रवेश करतात आणि आत्मनिवेदनातून कल्पकतेचा आधार घेत एक जीवनसत्य उभे करतात. या विषयी लेखिकेची भूमिका पुढीलप्रमाणे आहे.

'माझ्या परीने सावित्रीबाई या एक युगप्रवर्तक स्त्रीला माझ्या वकुबाप्रमाणे उभी करण्याचा प्रयत्न केला आहे. निव्वळ चरित्र होणार नाही, कलेचे सौष्ठव हरवणार नाही याची दक्षता घेतली आहे.' हे सांगताना लेखिकेच्या मनात कलेचे सौष्ठव म्हणजे कादंबरीचे रूप बाधित होणार नाही याची दक्षता त्यांनी घेतली असली तरी ती बऱ्याच प्रसंगात ही बंधने सैल झालेली आहेत. लेखिकेने स्वातंत्र्य घेतलेले आहे. ते स्वाभाविक आहे कारण ही कादंबरी आहे आणि कादंबरीकाराला त्याच्या आकलनानुसार चरित्रात्मक कादंबरीला आकार द्यायचा असतो अन् तो मुरुमकरांनी कलात्मकतेने दिलेला आहे.

तेराव्या वर्षी लग्न झालेली सावित्री वयात आल्यावर कशी रेखाटायची याचे स्वातंत्र्य घ्यावे लागते. ते त्यांनी घेतलेलेही आहे. दुबळी आणि हळवी सावित्री जोतीबांना कधीच आवडली नसती. जोतीबांना गर्व असायचा तो खंबीर अन् कणखर सावित्रीचा. या चिंतनातूनच सावित्री कशी रेखाटणार आहे याची नकळत जाणीव मुरुमकर देतात. तिला बघायला गोविंदराव फुले येतात तेव्हा, त्याचं पोर चवदा वर्षाचं आहे. आपल्या माळी समाजात फुले घराण्याचा नाव लौकिक हाय बरं का... गोविंदरावांचे वडील पेशव्याकडं फुलं वाढवायचं काम करत होते. ते पेशव्याचे फुलवाले होते, असे सावित्री लिहिते, बोलते. ह्या पोरी चिमण्यावानी असत्यात, आईबापाच्या अंगणात थोड्याच वकुत बसत्यात अन् भुरर्कन सासरी उडून जातात हे स्त्रीवास्तव लेखिका ज्या बोलीभाषेत मांडतात, तेव्हा त्या समकालीन भाषेची खुमारी वास्तव व्यक्तिरेखा उभ्या करण्यासाठी योग्य असते. शिरवळच्या यात्रेत गोऱ्या साहेबानी ब्रेव, ब्रेव गर्ल म्हणणं आणि बुक भेट देणं. या प्रसंगातून पुढे भविष्यात सावित्री लेखिका होणार, शिकणार हे जीवनसत्य बालपणीच दाखवणे आवश्यक असते. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ते अशाच प्रसंगातून दाखवावे लागते.

त्या बुकात असलेले येशूचे खिळे ठोकलेले चित्र पाहून हा माणूस कोण ? कुणी ठोकले हे खिळे ? हे चित्र सावित्रीलाच काय पण कुणाच संवदेनशील माणसाला आवडणारे नसणार; परंतु त्या येशूचे मायाळू डोळे, त्यातील करुणा सावित्रीला काही तरी सांगू पाहतात. ही अनुभूती पुढे दत्तक मुलगा यशवंताला येशू संबोधणे आणि जोतीबाने त्यास यशवंत संबोधणे यातून सावित्रीच्या मनावर झालेला येशू ख्रिस्ताच्या शिकवणीचा परिणाम जसा दिसतो तसाच सावित्रीच्या मनातून व्यक्त होणारा आदर, त्यांची शिकवण प्रेरणदायीसुद्धा ठरत गेल्याची अनुभूती आपणास येते. सावित्रीबाई आणि जोतीबांच्या मनभावनेतील फरकही जाणवत राहतो. लहानपणी गोऱ्याकडून मिळालेले बुक वाचता येत नसले तरी खोलवर पेटीत लपवून ठेवणे, लग्नानंतर जोतीरावांना त्याविषयी सांगणे, बुक वाचून दाखविण्याची इच्छा व्यक्त करणे, यातून सावित्रीबाईच्या मनात असलेली शिक्षणाबद्दलची

ओढ आणि त्यांना मिळालेली प्रेरणा कविता मुरुमकर मोठ्या कल्पकतेने दर्शवितात. जोतीरावांना आऊ सांगते, ''मी जन्मदात्री आई नाही, पण बाईला आई होण्यासाठी मूल जन्माला घालावं लागतं असं नाही,'' असे स्त्री जातीचे सत्य मुरुमकर सांगतात. पुढे त्या म्हणतात –

''गोऱ्याकडून इंग्रजी शाळेत शीक, आपल्या धर्मातल्या वाईट गोष्टीशी तू झगडा कर, धर्म बदलू नको. गोऱ्याकडून चांगल्या गोष्टी शिकायच्या. हाती घेतलेल्या कामासाठी किती आणि कसं कष्ट करावं ते गोऱ्याकडूनच शिकावं.'' ही सारी शिकवण, संस्कार लहानपणीच दाखवावे लागतात, याची सुरेख मांडणी मुरुमकर करतात कारण त्यांना पुढे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तिरेखा उभ्या करावयाच्या आहेत. अशा प्रेरणादायी, संस्कारदायी घटना त्या व्यक्तीच्या बालवयातच दाखवाव्या लागतात. हे सारे मोठ्या कल्पकतेने भाषेची ओढाताण न करता लेखिका करताना दिसते कारण, येथे वाल्या कोळीचा वाल्मिकी झालेला नाही तर सामान्य समाजातील सावित्री, जोतीराव या व्यक्तिरेखा आहेत. ही सावित्रीच्या शिक्षणामागील प्रेरक म्हणून प्रथम इंग्रजी बुक भेट देणारा इंग्रज अधिकारी, जोतीला ''तू रोज शाळेत जे शिकशील ते मला अन् सावित्रीला शिकवत जा'' असे म्हणणारी आणि पांढरा खडू, फडक्यात गुंडाळून आणलेली दगडी पाटी ''यावर काय आणि कसं लिवायचं ते तुला जोती शिकवलं'' हे आऊचे प्रेरणादायी शब्द सावित्रीला प्रेरणा आणि संस्कार देणारे वाटणारच. सावित्री मोठी होते, वयात येते तेव्हा ती जोतीरावांच्या पाया पडू पाहते. तेव्हा ते म्हणतात, ''अशी विनाकारण का म्हणून झुकतेस. बायकांनी पुरुषांच्या पायावर झुकायचं हे नाही पटतं.''

''पण तुम्ही माझे धनी आहात.'' ''म्हणून काय झालं. पती – पत्नी समान असतात. तू माझ्या पायावर झुकणार असशील तर समानतेच्या न्यायाने मलाही तुझ्या पायावर झुकायला हवं सावित्री.''

स्त्री–पुरुष संबंधीची जोतीरावांची ही समानतेची वागणूक फक्त वैचारिक पातळीवरची नव्हती तर ती प्रत्यक्ष त्यांच्या कृतीतून होते, हे विशेष.

सावित्री शहाणी होते तेव्हा आऊ म्हणते, ''अगं सावित्री इतक्या दिसाची गोष्ट येगळी. इतके दिस तू लहान व्हतीस, आता शहाणी झालीस. आता जोतीची खोली, तुझी खोली. रोज तिथ तू नीज, अन् रोज रोज हे सांगायाला लावू नगस.'' हा प्रसंग मोठा काव्यात्म पातळीवर कविता मुरुमकर रेखाटतात. त्यात लेखिकेचा तोल जाण्याची शक्यता अधिक होती, तरी तो अत्यंत संयमाने उभा केला जातो. एखाद्या घरंदाज, संयमी, संस्कारक्षम संवेदनेने या साऱ्या घटना मुरुमकर मांडतात. त्या सावित्री आणि जोतीबांच्याही स्वभावात्मक व्यक्तिरेखा आपल्यासमोर उभ्या करतात. ही लेखिकेच्या लेखनाची मनोज्ञशक्ती दिसते. त्या रात्री –

''सावित्री माझ्या शूद्राति शूद्र बांधवांचे आणि माझ्या समस्त माय बहिणींच्या जगण्याचे हक्क हिरावून आणि त्यांना गुलामीत ठेवणाऱ्या भटा ब्राह्मणांच्या या उद्दाम शक्तीविरुद्ध मी लढा पुकारणार आहे. या लढ्यात तू मला साथ देशील ?''

जोतीरावांनी त्यांच्या उजवा तळहात माझ्यासमोर पसरला.

जोतीरावांच्या त्या हातावर माझा उजवा हात ठेवत म्हणाले,

''जी मंजूर, दिलं वचन'' पुढे एका प्रसंगात– ''आज मी मुळीच थकले नाही. आज मला वेगळंच काही तरी वाटतंय.....'' ''ते मी बघतोच हाय. कोपऱ्यातली अंथरुणाची वळकटी आज आमच्या अंथरुणाशेजारी आलीय.'' ''चतुर हायसा तुमी...........'' गळ्या भोवतीच्या काळ्या पोतीच्या दोन पळ्या बोटांत धरून मी लाजून म्हणाले. ''बिचाऱ्या वळकटीवर अन्याय करता तुम्ही सावित्रीबाई, आमच्या अंथरुणा शेजारीच ती चांगली वाटते. रोज असं अंथरूण टाकायला काय हरकत नाही.'' ''जी मंजूर,'' मी लाजले.

मोठ्या सूचक शब्दांत अत्यंत संयमाने स्त्री – पुरुषांचे एकरूप होणे कविता मुरुमकर रेखाटतात – तो प्रसंग येथे देण्याचा मोह टाळता येत नाही. या प्रसंगातून लेखिकेने संयमाने केलेल्या प्रणय चित्रणातून त्यांची भाषाशैली आपल्या लक्षात येते आणि घरंदाज स्त्री जेव्हा लेखन करते, तेव्हा त्या लेखनाची पातळी आणि संयमी लेखन कसे असावे हेही लक्षात येते. म्हणून जाणीवपूर्वक परिच्छेद मोठा असला तरी तो मी देतो.

.... समई मंद पेटत होती, पिवळसर प्रकाशाने खोली न्हाऊन निघाली होती. जोतीरावांनी माझा चेहरा ओंजळीत

घेतला. डोळे भरून मला पाहिलं. मूळचेच गौरवर्णीय असल्याने जोतीरावांचे ते पातळ ओठ नेहमीच गुलाबी दिसायचे. आता समईच्या पिवळसर उजेडात तर जोतीराव अधिकच देखणे वाटत होते. आपल्या ओठांचा चंबू करून माझ्या कपाळावर रेंगाळणाऱ्या केसांच्या बटांना जोतीरावांनी हलकीशी फुंकर घातली अन् माझ्या तनामनात एक अनोळखी लय झिरपू लागली. माझ्या कानाच्या पाळ्या तप्त झाल्या. कर्णफुलं गरम वाटू लागली. सैल केलेला केसांचा अंबाडा केव्हाच निसटला होता. जसजशी समईची ज्योत मंद होत गेली, तसतशी माझ्या तनामनातली ती अनोळखी लय अधिक तीव्रतेने झिरपू लागली. भ्रमर पाकळ्यात येताच फुलानं हळुवारपणे स्वत:ला मिटून घ्यावं तसं जोतीरावांनी आपल्या बलदंड बाहूत अलवारपणे मला समीप घेतलं......... समीप ! अतिशय सूचक संयमी शब्दांत काव्यात्मकतेच्या पातळीवर जाणारे असे प्रसंग या कादंबरीत योग्य वेळी योग्य ठिकाणी आलेले आहेत. कुठंही बटबटीतपणा न येऊ देता सावित्रीबाई आणि जोतीरावांच्या रात्रीचा एकात्म होण्याचा क्षण मुरुमकर यांनी टिपलेला आहे. त्यांची शब्दरचनेची ही शैली ताकदीची आणि मोठी मनोवेधक आहे. कुठंही किंचितसुद्धा गालबोट या प्रसंग रेखाटनात दिसून येत नाही. ही संवेदनशील; परंतु संयमी कवयित्रीची भाषाभिव्यक्ती आहे. चरित्रात्मक कादंबरीत स्त्री-पुरुषांचे संबंध कल्पनेचा आधार घेऊन प्रसंग चित्रण करायचे असते. त्यात कल्पनेबरोबर संयमही महत्त्वाचा असतो. वास्तवतेला बटबटीपणा न येऊ देता स्त्री - पुरुष संबंधातल्या मधल्या रिकाम्या जागा भरावयाच्या असतात. त्यात लेखकांची कसोटी असते. त्या कसोटीला कविता मुरुमकर उतरल्याची प्रचीती कादंबरी वाचताना आपणास येते.

सावित्रीबाई शाळेत जाते तेव्हा, तिचा विविध पातळीवर झालेला अपमान आणि त्यावर जोतीरावांनी सावित्रीबाईला समजावणे, दोघांची भविष्यातील कामगिरीच सूचित करते.

''आपलं ध्येय हेच की माळ्या कुणब्यांना, महार मांगांना, ब्राह्मण दास्यातून मुक्त करायचं, शिक्षणाची गंगा त्यांच्यापर्यंत पोहोचवायची आणि समस्त स्त्री जातीला शिक्षित करायचं. ब्राह्मणांचा पहिला बळी ही स्त्री आहे. समस्त स्त्रीजात!''

सावित्रीबाई आणि जोतीरावांचा सुधारक म्हणून झालेला प्रवास लक्षात घेतला तर टॉमस पेनची बुकं वाचून त्यांनी सुधारणावादी मताचा अंगीकार कसा केला हे तपासून पाहता - लिजिट आणि मिचेलबाई यांच्यामुळे मानवतावाद त्यांना समजला आणि त्यांनी त्याचे पुढे आकलन केले हे महत्त्वाचे वाटते. त्यांनी केलेला निग्रोंच्या गुलामगिरीचा निषेध लक्षात घ्यावा लागतो आणि त्यांच्या तुलनेने भारतीय समाजरचनेतील दलित, पददलित समाज आणि या साऱ्याचा परिणाम म्हणून जोतीराव आणि सावित्रीबाईची व्यक्तिरेखा कविता मुरुमकरांनी उभ्या केलेल्या आहेत. मिचेलसाहेब जोतीरावांसमोर ख्रिस्ती धर्म स्वीकारण्याचा प्रस्ताव मांडतात तेव्हा, ''सावित्री ख्रिस्ती धर्माचा मला आत्यंतिक आदर आहे; पण हिंदू धर्मात राहून मला इथल्या समाजव्यवस्थेला सुरुंग लावायचाआहे.....

''हिंदू धर्मातील असहिष्णुतेविरुद्ध, कर्मकांडाविरुद्ध लढण्याचं बळ मला ख्रिस्ती धर्मानेच दिलं आहे; पण हिंदू धर्माच्या समाजव्यवस्थेतल्या अन्यायाविरुद्ध लढायचं म्हणजे तटाच्या आतून हल्ले करून मुळावर घाव घालणं गरजेचं आहे. हिंदू धर्मात राहूनच मला ही लढाई लढणं गरजेचं आहे.'' सावित्री आणि जोतीरावासंबंधीची व्यक्तिरेखा अधिक उजळ करण्याच्या दृष्टीने ही भूमिका स्पष्ट करणारे संवाद लेखिकेला देणे महत्त्वाचे वाटते.

वैऱ्यावर प्रेम करा, जे तुमचा द्वेष करतात त्यांचे भले करा, तुमचा पिता परमेश्वर जसा दयाळू आहे तसे तुम्ही दयाळू व्हा असे वागणाऱ्या येशू ख्रिस्ताचा भावनिक पातळीवर सावित्रीबाईवर परिणाम होणे स्वाभाविक होते. मानवतेचा संदेश घेऊन आलेला हा काटेरी मुकुट धारण करून, क्रूरतेने अंगावर ठोकलेल्या खिळ्यांच्या असह्य वेदना घेऊन सुळावर गेला. शेवटी येशूच्या करुणाघन डोळ्यांत क्षमा होती, क्षमा! असा साक्षात्कार सावित्रीला होतो. म्हणून तर सावित्री या कादंबरीत तिच्यावर अन्याय करणाऱ्या ब्राह्मण वर्गाकडे येशूच्या करुणामय भावनेतून पाहते, वागताना दिसते. म्हणून तर तो प्रसंग लेखिकेने सावित्रीबाईच्या जीवनप्रक्रियेत जाणीवपूर्वक रेखाटला आहे.

खिळे टोचल्यामुळे रक्तबंबाळ झालेला येशू आपले दोन्ही हात पसरवून मला काय सांगण्याचा प्रयत्न करत

होता..... क्षणार्धात येशूच्या अंगावरून ओघळणारे रक्ताचे थेंब माझ्या अंगावर, गालावर पडू लागले. टप टप टप रक्त येशूच्या रक्ताचे थेंब माझ्या अंगावर, गालावर पडत असलेले येशूच्या रक्ताचे थेंब मला मरणप्राय वेदना देतील, त्या विचाराने मी गालाला हात लावून जोरात किंचाळले. ''येशू प्रभू येशू..........''

आपल्या दयाघन नजरेनं मला डोळे भरू पाहणारा येशू पुटपुटला 'दया, करुणा, क्षमा, शांती, प्रेम!' मी येशूच्या पायी झुकायला खाली वाकले. माझ्या हाताला धरणीमातेचा स्पर्श झाला. मी पटकन आकाशाकडं पाहिलं एक तारा तुटताना दिसला. मी पटकन खाली बसले. ओंजळीत चेहरा घेऊन असह्यपणे ढसढसा रडू लागले.

सावित्रीबाईला मूल होत नाही म्हणून जोतीराव दुसरे लग्न करीन असे आईला म्हणते, पाळी चुकली की मी सांगावा धाडीन, तेव्हा ''सांगावा धाडायचं जाऊ दे. पर ती बुकं घाल चुलीत, मेली ती गोरी लोकं. माझ्या सोन्यासारख्या जावयाला अन् लेकीला बुकाच्या नादी लावलं,'' असे म्हणून आई निघून जाताना सावित्रीला भास होतो. क्षणभर मला भास झाला, की प्रभू येशू हळुवारपणे माझ्या केसांवरून हात फिरवत होता. जणू माझी आईच ! ही अनुभूती येशूच्या दया, करुणा, क्षमा, शांती, प्रेम, या संवेदनेने प्रभावित झालेली सावित्रीबाई तिच्या आयुष्यात अशीच वागली. शाळेत जाते, शिकवते, शिक्षिका होते, लेखन करते. जोतीरावांनाही विरोध करणाऱ्यांकडे क्षमाशीलतेने पाहते. एवढा परिणाम येशू या व्यक्तिमत्त्वाचा झालेला सतत जाणवत राहतो. ही जी भावनिक पातळीवरील सावित्रीबाईची व्यक्तिरेखा कविता मुरुमकर यांची स्वतंत्र नवनिर्मिती असते, म्हटलं तर ती वास्तव असते कारण ती कादंबरीभर या तत्त्वाचा अंगीकार करताना दिसते.

मूळ सावित्रीची व्यक्तिरेखा तशी वास्तवरूपात प्रत्यक्ष कुठेही वर्णिलेली नाही, आलेली नाही म्हणून कादंबरीकाराचे हे काल्पनिक वास्तव सत्यरूप घेऊन या कादंबरीत अवतरलेले दिसते.

या विषयी कविता मुरुमकरांची भूमिका ही स्पष्टपणे आलेली आहे. सामर्थ्यालाही मर्यादा असतात. जगाच्या दु:खाचा क्रूस ज्याला जमेल तेवढा त्यांनी आपल्या खांद्यावरून वाहिला अन् पुढं गेले. त्याच्या विषयी तक्रार करणारे आपण कोण ? प्रत्येकाच्या खांद्यावर सारखाच क्रूस कसा असेल ? बंडखोरी ज्ञानेश्वरानेही केली आणि तुकारामानेही केली. गीते अगोदर वैश्विक परंपरा ज्ञानेश्वरांनी बंडखोरीनेच नाकारली. बंडखोरीनेच एका कुणब्यानं हातात टाक (बोरू) घेऊन अभंग रचना केली. संतत्व मिळवले. कुणाचा क्रूस सामाजिक दु:खाचा होता, तर कुणाचा आत्मिक अन् या विचारानं जोतीराव भारावतात, ती जोतीराव फुले यांची प्रेरणा होते. हे सावित्रीचे व्यक्तिमत्त्व भावनिक पातळीवर योग्य असले तरी जोतीरावांच्या पातळीवर ते सत्य तपासावे लागते. जोतीरावांनी सावित्रीची कवयित्री सावित्रीबाई केली, हे सामाजिक वास्तव शेवटी शिल्लक राहतेच. ते टाळून कसे चालेल ?

सावित्रीबाईवर जोतीरावांचे विलक्षण प्रेम असल्याचे प्रत्यय ही कादंबरी देते. सावित्रीला मूल होणार नाही हे समजूनही जोतीरावांनी सावित्रीच्या बहिणीशी विवाह करावा म्हणून सारे आप्त प्रयत्न करतात; पण जोतीराव जगाच्या पाठीवर सावित्रीशी तुलना करण्याइतक्या योग्यतेची कुणीच स्त्री नाही. हे जोतीरावांचे नुसते मतच नाही तर त्यांचे सावित्रीविषयी वागणेही तसेच सच्चे आहे. त्यांच्या या वागण्याने सावित्रीबाई स्वाभाविकपणे भारावून जातात.

शूद्र आणि अतिशूद्र अज्ञानाने पछाडलेले शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षण मार्ग हा शिक्षणाने मनुष्यत्व पशूत्व हाटते पहा

या कवना विषयी सावित्री सृजनाचा तो दाहक शब्द माहेर होता यावर ज्योतीरावांची प्रतिक्रिया तितकीच सावित्रीला भारावून टाकणारी आहे. ती सावित्री स्वयंप्रेरित आहे, अशी सावित्रीबाईच्या व्यक्तिमत्त्वाची उभारणी करताना कविता मुरुमकरांची शब्दकळा काव्यात्म अनुभूती देते.

तुम्ही म्हणताय, काटेरी रस्त्यावर सावित्रीची रक्त बंबाळ पावलं आहेत; पण ती कुणाची सावित्री ? कुणी शिकवलं तिला. कुणी टाकलं तिच्या ओंजळीत विद्येचं ते तेजस्वी दान ? ..... या साऱ्या प्रश्नांना एकच उत्तर आहे, ते म्हणजे जोतीराव फुले आणि यावर सावित्रीबाईची भावना पुढीलप्रमाणे मांडली जाते –

''माझ्या जीवनात जोतिबा स्वानंद, जैसा मकरंद

कळीतला''
असे जेव्हा चितारले जाते मग प्रश्न उभा राहतो येशू ख्रिस्ताविषयी सावित्रीबाईच्या मनात असलेल्या भावनांचा. या फक्त पददलिताविषयी येशूच्या मनात असलेली करुणा या पुरतीच मर्यादित आहे का ? होती का? देशबांधवांच्या उद्धारासाठी जोतीरावांनी शिक्षण क्षेत्रात जे कार्य केले त्याची नोंद सरकारला घ्यावी लागली. १६ नोव्हेंबर १८५२ साली विश्रामबागवाड्यात त्यांचा जो सत्कार केला गेला तो कौतुकास्पद होताच; पण त्या सत्कारानंतर याचे श्रेय ते सावित्रीबाईला देतात, ते म्हणतात.'

''गेली दहा वर्षं माझ्या कांतेत मी माता शोधत आलोय, माझ्यासाठी माझी कांता हीच माझी माता आहे.'' एकदा ते असेच म्हणतात –

आऊ आणि सावित्री या दोन स्त्रिया माझ्या आयुष्यात आल्या नसत्या, तर मी माझं ध्येय साध्य करू शकलो नसतो. हे पती – पत्नीचे नाते कधीच विरून गेलेले असते. येथे असतात ते एकमेकांना जीवापाड सांभाळणारे अद्वैत हे कविता मुरुमकर त्यांचे हे जीवनचरित्र लिहिताना मनाच्या पार आतल्या भावनेतून चितारतच नाहीत, तर त्या स्वत: प्रेमळ जिवलग सखी, आई होतात याची अनुभूती पुढील भावनेत मांडली गेली आहे.

'नंतर उरलेल्या क्षणासाठी तू माझी आई असतेस. ज्या माझ्या जन्मदात्या चिमण्या आईला मी कधीच बघितलं नाही. त्या माझ्या चिमण्या आईला मी तुझ्या डोळ्यात पाहिलं. तुझ्या स्पर्शातून अनुभवलं.' यावर सावित्रीबाईच्या मनातील भावना –

'जगासाठी वांझोटी असलेली सावित्री आज आई झाली होती. जोतीबाची आई होऊन मला बिनआईचं लेकरू जिवापाड सांभाळायचं होतं.' अशी भावनिक आंदोलने मोठी मनोवेधक होतात. ते आत्मनिवेदनात्मक शैली स्वीकारल्यामुळे.

जोतीरावांनी केलेल्या कार्याची ओळख करून देताना सावित्री आणि जोतीरावांच्या जीवनात निर्माण झालेली भावनिक पातळीवरील आंदोलनाची नोंद, सावित्री आणि जोतीबांची वैचारिकता, ख्रिस्ती धर्माबद्दलची त्यांची ओढ, हिंदू धर्माबद्दलचे त्यांचे प्रेम, सावित्रीबाई आणि जोतीरावांची ग्रंथ साहित्य निर्मिती, सच्च्या समाज सुधारकांशी त्यांचे असलेले मैत्रीपूर्ण संबंध, त्यांनी प्रत्यक्ष

> **जोतीरावांना विरोध करणारे विष्णूशास्त्री चिपळूणकर फुले यांना कुचेष्टेने शूद्र जगत गुरू, शूद्र कवी व शूद्र धर्मसंस्थापक अशा पदव्याही देतात. हिंदू धर्माचे वैरी म्हणून त्यांचा धिक्कार करतात. ब्राह्मण कितीही लबाड असले व दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही की, ज्ञानभांडाराच्या किल्या त्यांच्या कंबरेला आहेत. याच विष्णूशास्त्र्यांच्या निधनानंतर त्यांचे शव नैसर्गिक मृत्यूचा दाखला असल्याशिवाय उत्तरक्रियेला परवानगी मिळेना, तेव्हा केरूनानांच्या विनंतीवरून विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या मृतदेहाची विटंबना होऊ नये म्हणून १७ मार्च १८८२ या दिवशी डॉ. घोलेंकडून जोतीरावांनी दाखला मिळवून दिला. तेव्हा चिपळूणकरांच्या मृतदेहाची विटंबना थांबली.**

केलेल्या समाजसुधारणा, इंग्रज अधिकाऱ्यांबरोबर असलेले संबंध, त्यांनी सुरू केलेले बालहत्या प्रतिबंधक अनाथालय, वाड्यातील विहीर शूद्रांना खुली करून देणे, सुरू केलेल्या शाळा, परमहंस सभा, प्रार्थना समाज, १८७७ व्हिक्टोरिया बालाश्रम इत्यादी बाबींची अत्यंत महत्त्वपूर्ण अशी नोंद लेखिकेने या कादंबरीत घेऊन सावित्री आणि जोतीबांच्या जीवनातील घटनांचा लेखिकेच्या अभ्यासपूर्ण चिंतनातून जे एक विश्व या कादंबरीत उभे केले आहे, ते कमालीचे अस्वस्थ आणि बेचैन करणारे जसे आहे तसेच एकोणिसावे शतक वास्तव रूपात आपल्यासमोर उभे केले आहे. हे लेखिकेच्या आत्मनिवेदन पद्धतीने मनोवेधक झाले आहे.

जोतीरावांना विरोध करणारे विष्णूशास्त्री चिपळूणकर फुले यांना कुचेष्टेने शूद्र जगत गुरू, शूद्र कवी व शूद्र धर्मसंस्थापक अशा पदव्याही देतात. हिंदू धर्माचे वैरी म्हणून त्यांचा धिक्कार करतात. ब्राह्मण कितीही लबाड असले व दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे ती ही की, ज्ञानभांडाराच्या किल्या त्यांच्या कंबरेला आहेत. याच

विष्णूशास्त्र्यांच्या निधनानंतर त्यांचे शव नैसर्गिक मृत्यूचा दाखला असल्याशिवाय उत्तरक्रियेला परवानगी मिळेना, तेव्हा केरूनानांच्या विनंतीवरून विष्णूशास्त्री चिपळूणकरांच्या मृतदेहाची विटंबना होऊ नये म्हणून १७ मार्च १८८२ या दिवशी डॉ. घोलेंकडून जोतीरावांनी दाखला मिळवून दिला. तेव्हा चिपळूणकरांच्या मृतदेहाची विटंबना थांबली. कट्टर समाजवादी असलेल्या हुकूमशाही वृत्तीच्या लॉर्ड लिटन यांनी वर्नाक्युलर प्रेस ॲक्ट कायदा करून वृत्तपत्रांची गळचेपी केली. त्यांचा पालिकेने सत्कार करू नये म्हणून एकटे जोतीराव विरोधात होते. कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात टिळक, आगरकर यांच्यावर अब्रू नुकसानीचा खटला भरवला गेला तेव्हा जामिनासाठी रामशेट उरणवेंना जोतीरावांनीच तयार केले. यावर टिळक आणि आगरकर हे जातिभेद व धर्म श्रद्धांच्या बाबतीत सत्यशोधक विचारांच्या बाजूचे नाहीत तरी ते दोघे सत्याच्या व न्यायाच्या बाजूने लढले म्हणून संकटात त्यांना मदत करणं माझं कर्तव्य समजतो, असे म्हणणारे जोतीरावांचे मानवतेच्या पातळीवर अतुलनीय व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर लेखिका उभे करतात. अशा अनेक घटनांची नोंद या निवेदनातून घेतली गेलेली आहे. त्यांच्या या सुधारक वृत्तीची, कार्याची नोंद घेऊनच पुणे पालिकेवर सरकारने त्यांची नेमणूक केली होती. पुढे त्यांचा सत्कारही केला. एलफिस्टनने सुरू केलेली ब्राह्मणांना मिळणारी दक्षिणा बंद करावी आणि ग्रंथकारांना मिळावी म्हणून जोतीरावांनीच प्रयत्न केले होते. सत्यशोधक चळवळ फक्त सुरू केली नाही तर प्रत्यक्ष कृती करून २५ डिसेंबर १८७३ रोजी हरी आणि गंगा यांचा विवाह सत्यशोधक चळवळीच्या पद्धतीने लावून दाखविला. ७ मे १८७४ रोजी ग्यानोबा ससाणे यांचा फुले वाड्यात दुसरा विवाह करून दिला, असे ते कर्ते सुधारक होते.

सामाजिक सुधारक म्हणवून घेणारे या काळात खूप होते. ब्राह्मण समाजावरही ते टीका करत होते; पण स्वत: सुधारक म्हणून त्यांचा अंगीकार करत नव्हते. शिवाजी दुसऱ्यांच्या घरात जन्मावा या भूमिकेत ते वावरत होते. त्यांचा हा बुरखा जोतीरावांनी प्रत्यक्ष कृतीने फाडला. कारण ते बोलघेवडे समाज सुधारक नव्हते. 'बोले तैसा चाले' अशा कृतीचा अंगीकार करणारे जोतीराव होते. लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, माधवराव रानडे हे त्यातीलच. जर विधवा बहिणीचा पुनर्विवाह केला तर माझ्या वडिलांना अपार दु:ख होईल आणि पुण्यातील ब्राह्मण माझ्यावर बहिष्कार टाकतील, रानडे म्हणाले. तेव्हा जोतीराव त्यांना म्हणतात, ''रावसाहेब मग सुधारकाचे ढोंग करू नका.''

याच माधवरावांनी पत्नीच्या निधनानंतर वयाच्या ३२ व्या वर्षी अवघ्या अकरा वर्षांच्या कोवळ्या मुलीशी विवाह केला होता.

माधवराव रानडे, गोपाळराव देशमुखांच्या वागण्याचे जोतीरावांना खूप वाईट वाटले. ज्ञानदीपच्या लेखनात, रानडे, देखमुखांनी समाज सुधारणेची चळवळ शेकडो मैल मागे नेली. अशा निराशा देणाऱ्या समाजसुधारकांची स्पष्ट शब्दांत मांडणी करत. त्यांना साथ देण्याचा वासुदेवराव नवरंगे, सदाशिव केळकर, विष्णूशास्त्री पंडित इत्यादी धैर्याने समाजसुधारणा करीत होते. विष्णूशास्त्री पंडितांनीही एका विधवेशी विवाह केला होता. यांची नोंदही लेखिका घेताना दिसते.

या काळात ज्ञानोदय, ज्ञानप्रकाश, ज्ञानपक्षू, प्रभाकर यांसारखी बरीच ज्ञान पाजळणारी वृत्तपत्रे निर्माण झाली होती; पण ही वृत्तपत्रे ब्राह्मणशाहीला घाबरत असत. समाजावर स्पष्टपणे टीका करणारे लेख छापण्यास कचरत असत. त्यामुळे कृष्णराव भालेरावांनी १ मे १८७० मध्ये 'दिनबंधू' सुरू केले. गुलामगिरी जून १८७३ मध्ये प्रकाशित झालेला ग्रंथ अमेरिकेतील निग्रोंना मुक्त करणाऱ्या वीरांना अर्पण जोतीरावांनी केला. त्या काळात जागतिक पातळीवरील समाजसुधारकांची जाणीवपूर्वक नोंद फुलेंना घ्यावीशी वाटली हे विशेष महत्त्वाचे वाटते. फुलेंचे सारेच रचना ग्रंथ सामाजिक सुधारणेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. रायगडावर जाऊन शिवाजी महाराजांच्या समाधीची जागा शोधून स्वच्छ करणे आणि शिवाजी महाराजांवर पोवाडा लिहिणे यातून महात्मा फुले यांच्या कार्यमग्नतेची, विचारांची आणि सुधारकांची व्यक्तिरेखा समजून घेऊन, अभ्यास करून तत्कालीन काळाचे भान कादंबरी लिहिताना ठेवणे आणि कविता मुरुमकर यांनी कादंबरी लिहिणे मला विशेष महत्त्वाचे वाटते. अवघ्या वयाच्या पंचविशीत लिहिलेली ही कादंबरी लेखिकेच्या संशोधन वृत्तीचे आणि अभ्यासाचे प्रतीकच आहे.

जोतीरावांची व्यक्तिरेखा रेखाटताना वास्तवात असलेली एक धाडसी व्यक्तिरेखा रेखाटणे तसे कठीणच; पण लेखिकेच्या अभ्यासूवृतीने हे साध्य झाले असे वाटते.

शिवाजी महाराजांचा पोवाडा, तृतीयरत्न, ब्राह्मणांची कसब, शेतकऱ्याचा असूड, गुलामगिरी व त्यांची खंड रचना आणि इतर त्यांच्या लेखनाची मांडणी कादंबरीत करणे तसे अवघड; पण सावित्री जोतीरावांची सावली होऊन उजेडाच्या अर्थातच सुखाच्या समाधानाच्या क्षणी जोतीरावांच्या रूपात एकरूप होऊन अद्वैत रूपात वावर असल्याचे, आधार देत एकमेकांना समजून घेत आणि धर्मोपदेश प्रार्थना करून अध्यात्म उन्नती साधण्यापेक्षा धर्माचा सत्यशोध घेऊन, समाज जागृती करून, सामाजिक उन्नती करणं हे जोतीरावांचे ध्येय आणि महाराष्ट्राला आध्यात्मिक उन्नतीपेक्षा समाजसुधारणेची गरज होती, अशा भूमिकेतून लेखिका या साऱ्या घटनांकडे पाहते, त्यामुळे उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचे जोतीराव फुले जिवंतपणे या कादंबरीत वावरताना दिसतात, असे सावित्रीबाईच्या आत्मनिवेदनातून हे आपणास लक्षात घ्यावे लागते.

जोतीरावांना सामान्य माणसांच्या जीवनाकडे पाहण्याची एक विवेकी वृत्ती होती. ते खऱ्या अर्थाने शूद्र पददलितांचे प्रतिनिधी होते. इंग्लंडचे राजपुत्र ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या सन्मानाच्या वेळी अंगावर फाटके कपडे, काठी, फाटक मुंडासं, खांद्यावर घोंगडी या रूपात व्यासपीठावर जोतीराव जेव्हा बसतात तेव्हा त्यांच्या या धाडसाची नोंद राजपुत्रालासुद्धा घ्यावी लागली. हे सारे चित्रण करताना लेखिका कुठंही कमी पडत नाही.

११ मे १८८८ रोजी मांडवीच्या कोळीवाडा सभागृहात जनता त्यांना महात्मा ही पदवी बहाल करते. ही त्यांच्या जीवनकर्तृत्वाची फलश्रुती असते. शूद्रादी अतिशूद्रांस दासानुदास मानणाऱ्या आर्यभटब्राह्मण जातीसह त्यांच्या अनुयायांचीसुद्धा माझ्या शवावर व तत्संबंधीच करीत असलेल्या विधीवर सावलीसुद्धा पडू देऊ नये असे मृत्युपत्रातसुद्धा लिहिणारे जोतीराव. जोतीरावांच्या मनातील भाव टिपताना क्षणभर का होईना आपणा समोर जोतीरावांचे सारे आयुष्य उभे राहते. हे सारे लिहिताना लेखिका सावित्रीबाई आणि जोतीरावांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करताना किती झपाटली असावी याची कल्पना येते.

कविता मुरुमकर यांची भाषाशैली तर बोली भाषेचा आविष्कार वाटते. साईत्री, टकुऱ्यात, चिपटंभर, लक्कन, शॉविट्री, बारबंदी, इसाळ, इसराळी, वंगाळ, रणरणतं असे किती तरी शब्द तत्कालीन भाषेतून योग्य ठिकाणी योग्य वेळी सहजपणे उपयोजिले जातात त्यामुळे भाषेची खुमारी वाढते. आत्मनिवेदन पद्धतीने चित्रमय प्रसंग चित्रण करण्यात लेखिका कुठंही कमी पडताना दिसत नाही.

एकोणिसावे शतक अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण आहे. पेशवाईत ब्राह्मणांचे माजलेले धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक स्तोम, सतीची चाल, केशवपनपद्धती, बाल जरठ विवाह आणि जात ही उच्चनीचतेची मानदंड ठरवणे, इंग्रजांची राजवट सुरू होणे, इंग्रजांच्या राजवटीमुळे झालेली जगाची ओळख आणि या सर्वांच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेला सुधारणावाद, यामुळेच निर्माण झालेले वैचारिक सुधारक या सुधारणावादातून शूद्रातिशूद्रांच्या दु:खांना समजून घेऊन, त्यांचे दु:ख कमी व्हावे म्हणून प्रयत्न करणाऱ्या सुधारकांत सावित्री, जोतीरावसारख्या व्यक्तिरेखा अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या कालखंडाचा इतिहास समजून घ्यायचा असेल, तर तो महात्मा फुले यांचे कार्य आणि व्यक्तिमत्त्व समजून घेणे महत्त्वाचे आहे. हे कार्य आपल्या लेखन शैलीने लेखिका कविता मुरुमकर यांनी केलेले आहे.

वास्तविक पाहता सावित्रीबाई आणि जोतीबांसारख्या बहुआयामी समाजसुधारकाच्या जीवनावर कादंबरी लिहिणे ही सावित्रीबाईंचीच इच्छा असल्याचे कविता मुरुमकर सावित्री होऊन म्हणतात –


''धनी.... मी लिहिणार आहे. आपण जगलेले ते सारे क्षण मी पुन्हा जिवंत करेन. महात्मा जोतीराव फुले नावाचा महासूर्य कोणत्याही गैरसमजाच्या आणि आरोपाच्या झाकोळाने झाकला जाणार नाही, तो तळपता महासूर्य मी माझ्या लेखणीतून उतरवेन. माझ्या शब्दांच्या सामर्थ्यातून तुमच्या कर्तृत्वाचे तेज झळाळत राहील. मी लिहू लागले, वेदनेची अक्षरं होऊ लागली.'' हे कविता मुरुमकरांचे सावित्री होणे, हे मनोरम पडले मोठे स्वप्न वास्तवात येणे आहे. चरित्रात्मक कादंबरी लेखनाच्या दृष्टीने मी सावित्री जोतीराव मानदंड ठरावी. हे यश कविता मुरुमकरांचे आहे. हे मराठी चरित्रात्मक कादंबरीच्या दृष्टीने नोंदनीय आहे.

**डॉ. दादा गोविंदराव गोरे**
अक्षर, ४९, जयनगर, न्यु उस्मानपुरा, औरंगाबाद
चलभाष : ९४२२२०६८२०

मिलिंद बोकील यांच्या 'सरोवर' या कादंबरीतील सौंदर्यस्थळे उलगडून दाखवणारा प्रा. विद्या सुर्वे बोरसे यांचा समीक्षालेख

# अस्तित्व शोधाचा प्रवास - सरोवर

**प्रा. विद्या सुर्वे बोरसे**




पुस्तकाचे नाव : **सरोवर** (कादंबरी)
लेखकाचे नाव : **मिलिंद बोकील**
प्रकाशक : **मौज प्रकाशन गृह,** मुंबई
प्रथम आवृत्ती : **फेब्रुवारी २०१८**
पृष्ठे : **१०८**
मूल्यः **१५०/–** रुपये

मिलिंद बोकील हे १९८० नंतरच्या पिढीतील महत्त्वाचे कादंबरीकार आहेत. शाळा, गवत्या, समुद्र, एकम, रान, दुर्ग, मार्ग या त्यांच्या कादंबऱ्या व लघुकादंबऱ्यांनी स्वत:चा वाचक निर्माण केला आहे. कथा, साहित्य समीक्षा, संपादन आदी क्षेत्रातही बोकील यांचा स्वतंत्र ठसा आहे. समाजशास्त्रीय संशोधक म्हणून त्यांचे 'जणांचे अनुभव पुसता', 'कातकरी: विकास की विस्थापन', 'गोष्ट मेंढा गावाची', 'कहाणी पाचगावची' हे ग्रंथ उल्लेखनीय आहेत. सरोवर ही १०७ पृष्ठांची कादंबरी आहे. तिला लघुकादंबरीही म्हणता येईल. एकच एक सलग अनुभव, गाभ्यापर्यंत जाण्याचा जैविक स्पर्श ही कादंबरी देते.

एकाच बैठकीत 'सरोवर' वाचून हातावेगळी होते. वाचक म्हणून आपणही पाण्यात पाय सोडून ऐसपैस बसतो. डोळे मिटतो. कादंबरीच्या नैसर्गिक अवकाशात एकरूप होतो. 'आणि मग डोळे मिटलेले असताना तिला ते दिसलेः आपल्या मनाच्या अवकाशात तुडुंब भरलेले ते सरोवर. अपार, विस्तृत, सखोल. त्यावर चहूबाजूंनी ओठंगलेला निळाशार पाचूचा घुमट. सभोवताली हिमाच्छादित शिखरे. पाण्यात उमटलेली त्यांची शुभ्र प्रतिबिंबे. दूरवरुन येणारा सुगंधित वारा. पृष्ठभागावर

झिरझिरीत लाटा उमटत होत्या; पण त्याचा अंतर्भाग मात्र अथांग अमृताने भरलेला. तिला जाणवले, की ते शीतल द्रव्य आपल्या धमन्यांमधून पसरतेय. रंध्रारंध्रातून पाझरतेय. सगळे शरीरच त्या द्रव्याने भरून जातेय, आणि मग तिला कळले की तो साठा आपल्या अंतःकरणात भरलेला आहे आणि जोवर तो तसा भरून आहे तोवर आपल्याला कसलाच रितेपणा नाही. कसलीच पोकळी नाही. काहीच हरवून जाणार नाही आणि हा साठा अक्षय आहे. कधीही न संपणारा. भरभरुन देऊनही परत उरणारा' मिलिंद बोकील यांची 'सरोवर' ही 'तिची' कहाणी आहे. तिच्या अस्तित्व शोधाची कहाणी. ही जी 'ती' आहे, ती अनामिक आहे. तिला नाव नाही. गाव नाही. विशिष्ट असा ठाशीव चेहराही नाही. म्हणून 'ती' सर्वत्र आहे. धावणाऱ्या गर्दीत 'ती' आहे, स्वयंपाकघरातील कोंदट वातावरणात 'ती' नक्कीच भेटू शकते, भाजीबाजारातील धावपळीत 'ती' अंग चोरून उभी असेल, कुटुंबाच्या चिंतेत 'ती' हरवलेली असेल. ती सर्वत्र आहे; पण आजूबाजूला सदासर्वकाळ सर्वत्र असूनही कधीही न दिसणाऱ्या अदृश्य व्यक्तीची कहाणी 'सरोवर' ही कादंबरी कथन करते.

अभयारण्याच्या निर्मनुष्य अवकाशात या कादंबरीतील व्यक्तिरेखा दोन दिवस एकमेकांसोबत घालवतात. ही सोबत त्यांना बोलकं करते. सोबत असणे म्हणजे नेमकं काय असतं? सहप्रवासी असणं म्हणजे नेमकं काय असतं? काय आहे जे प्रत्येक व्यक्ती शोधत असते? देहाच्या भुकेपलीकडे न संपणारा कशाचा शोध एक स्त्री घेत असते? अशा कित्येक प्रश्नांची उत्तरे या 'बोलण्यातून' मिळत जातात. अर्थात 'ती' आणि 'तो' असे दोघे हे कथानक घडवत असले तरी मुख्य संवाद तिच्या एकटीच्याच बाजूने होत राहतो, या संवादाला त्याचा होकारार्थी प्रतिसाद आहे त्यामुळे संवाद प्रवाहित होत जातो, वाहत राहतो, त्यात संथ पाण्याची निसर्गदत्त ऊब आहे. ऊब, प्रेम, माया यातून वाचकाला त्या दोघांतील संबंधांची उकल होत जाते.

बँकेच्या कुठल्याशा ट्रेनिंगला आठवड्यासाठी घराबाहेर पडलेले दोन कर्मचारी. आडबाजूच्या अभयारण्यात जातात. या कर्मचाऱ्यांपैकी एक 'ती' आहे आणि दुसरा 'तो' आहे. 'तो' यापूर्वीही कधीतरी या अभयारण्यात येऊन राहून गेलेला आहे. आता जेव्हा ते

**अभयारण्याच्या निर्मनुष्य अवकाशात या कादंबरीतील व्यक्तिरेखा दोन दिवस एकमेकांसोबत घालवतात. ही सोबत त्यांना बोलकं करते. सोबत असणे म्हणजे नेमकं काय असतं? सहप्रवासी असणं म्हणजे नेमकं काय असतं? काय आहे जे प्रत्येक व्यक्ती शोधत असते? देहाच्या भुकेपलीकडे न संपणारा कशाचा शोध एक स्त्री घेत असते? अशा कित्येक प्रश्नांची उत्तरे या 'बोलण्यातून' मिळत जातात. अर्थात 'ती' आणि 'तो' असे दोघे हे कथानक घडवत असले तरी मुख्य संवाद तिच्या एकटीच्याच बाजूने होत राहतो, या संवादाला त्याचा होकारार्थी प्रतिसाद आहे त्यामुळे संवाद प्रवाहित होत जातो, वाहत राहतो, त्यात संथ पाण्याची निसर्गदत्त ऊब आहे. ऊब, प्रेम, माया यातून वाचकाला त्या दोघांतील संबंधांची उकल होत जाते.**

दोघे एकत्रित अभयारण्यात आले आहेत पर्यटनाचा मोसम नाही, शिवाय आडबाजूचं अभयारण्य, म्हणून टुरिस्ट नाहीत. त्यामुळे कुणाचा अडथळा नाही. आडकाठी नाही. संबंध कथानकात 'माणूस' म्हणून कॅन्टीनचा वेटर दोन-तीन वेळा तेवढा डोकावून जातो. बाकी इतर माणसांचा मागमूस नाही. अभयारण्याच्या बफर झोनमध्ये उभं असणारं गेस्ट हाऊस. तिथून फुटणाऱ्या रानवाटा, आटून गेलेली नदी, मोकळी गवताळ मैदानं, दाट राई, नकाशात दाखवलेलं पण न सापडलेलं तळं, हरणांचा कळप, पायवाटेवर निर्धास्त बसलेला सरडा, पक्ष्यांचे थवे, कोअर झोनमधून येणारे दूरचे आवाज, रात्रीचं चांदणं, झाडांच्या सावल्या, मोहाची फुलं आणि त्याचा गंध, रानभर पसरलेला उन्हाचा पिवळा प्रकाश आणि गवताचे, मातीचे, हिरवाईचे, कशाकशाचे वास-सुवास यांच्या सोबतीने कथानक पुढेपुढे सरकत जातं. एखाद्या वाहत्या

नदीच्या संथ पाण्यात पडून, झोपून राहिल्यासारखा हा अनुभव आहे. काळ वाहतो आहे, पुढे सरकत जात आहे; पण त्याचा जराही आवाज नाही, तो पुढे जात असल्याची चाहूल नाही. आपलाच आपल्याशी संवाद व्हावा अशी जागा 'सरोवर'च्या कथानकात आहे.

कादंबरीत फार घटना नाहीत. घडणे अथवा घडविण्याची प्रक्रिया जाणीवपूर्वक होत नाही. यात बाह्य, दृश्य ताणतणाव किंवा संघर्ष नाही. अभयारण्यात जोडगोळीचं पोहोचणं, त्यांनी गेस्ट हाऊस गाठणं, सायंकाळी– दुसऱ्या दिवशी सकाळी, दुपारी आणि परतीच्या दिवशी पुन्हा एकदा जंगलात भटकंती करणं या कालपटावर कादंबरी आकार घेते. हा कालपट अगदीच दोन दिवसांचा आहे. त्यातही लक्षवेधी काहीच घडत नाही, दोघे जण एकतर चालत आहेत नाहीतर निवांत बसलेले आहेत; पण तरीही 'सरोवर' वाचकाचा ताबा घेते.

दोघांचे भूतकालीन जगणे संबंध कादंबरी साकार करते. अरण्याच्या, तेथील हिरव्या रासवट झाडांच्या, पिवळ्या सोनेरी उन्हाच्या पार्श्वभूमीवर आणि एखादवेळी चांदण्यांच्या साक्षीने हे उकलत जाणे, उमलून येणे आणि मोहरून जाणे भयंकर सुंदर आहे. ते जराही व्यभिचारी नाही. विवाहबाह्य संबंध दाखवताना जसे ओरखडे उमटत जातात तसे अंगावर येणारे नाही.

कादंबरीत असणारे 'ती' आणि 'तो' हे दोघे नवरा बायको नाहीत. मित्र आहेत. ते विवाहित आहेत. दोघांनाही त्यांची त्यांची कुटुंबं आहेत. तिला नवरा आहे, मुलगा आहे. त्यालाही लेखिका असणारी बायको आणि जुळ्या मुली आहेत. ज्या मोसमात कादंबरीतील काळ साकारला जात आहे त्याच्या अगोदरच्या जूनपर्यंत या दोघांची एकमेकांशी साधी ओळखदेखील नव्हती. 'तो' बदली होऊन गावात आला. तिच्या सोसायटीत किरायेदार म्हणून राहू लागला. सकाळी 'तो' खेळायला जाई तेव्हा सकाळची कामे करणाऱ्या तिला दिसू लागला. पुढे सोसायटीच्या बैठकीत त्यांची ओळख झाली. ते एकाच बँकेत आहेत हे कळालं, पुढे एकवेळ ट्रेनिंगच्या निमित्ताने 'ती' त्याच्या शाखेत आठवडाभर राहून गेली. दोघे एकत्र येत गेले. मित्र झाले. प्रेमात पडले. हे असं प्रेम चूक आहे हे कळूनही सोबत राहिले. एकमेकांची वास्तपुस्त करत गेले. एकमेकांना सावरत राहिले, मदत करत राहिले. तिचा नवरा हॉस्पिटलमध्ये होता तेव्हा तो भावासारखा तिच्या पाठीशी उभा होता. कुठल्याशा निमित्ताने मुंबईला गेल्यावर भर पावसाळ्यात हे दोघेच समुद्राकाठानं भटकत राहिले. त्यांची एकमेकांची ओढ वाढत गेली. ते एकमेकांची काळजी घेत गेले. त्यांचं नातं समाजमान्य नाही. उघड उघड जाहीर करता येणारं नाही. असे नाते शब्दातून व्यक्त करणे ही कसरत म्हणता येईल. मिलिंद बोकील यांनी ते खूप पारदर्शक आणि स्वच्छपणे मांडलं आहे.

भूतकाळात डोकावताना तिला लक्षात येतं की, आपण त्याच्या प्रेमात पडलो आणि काय काय घडलं? तिला लक्षात येतं की त्याच्या प्रेमानं तिची भीती संपवली, संकोच संपवला, तिला व्यक्ती म्हणून उभं केलं आणि तिला 'माणूस' केलं. सर्वांत महत्वाचं म्हणजे त्याच्यावरील प्रेमामुळे ती 'प्रेम' करू लागली. लग्नाच्या नवऱ्यावर प्रेम करू लागली. शेजाऱ्यापाजाऱ्यांवर, सर्वांवर प्रेम करू लागली. प्रेम आपल्या आत तुडुंब भरून आहे याचा तिला प्रत्यय आला आणि म्हणून जेव्हा गवत खात अगदी जवळ आलेली हरणं तिला जराही न भिता, जरासुद्धा न बिचकता, तिच्या डोळ्यात डोळे घालून निर्धास्तपणे चरत राहिली तिला सर्वस्व सापडल्यासारखं वाटलं. आपल्याला हरणं भ्यायली नाहीत ही जाणीव तिला मोहरून टाकत राहिली. या अलौकिक आनंदात तिला 'सरोवर' सापडलं. तिच्या आतलं सरोवर. अगदी सुरुवातीला जो परिच्छेद नोंदवला ती अनुभूती तिच्या आत विस्तारत राहिली.

मिलिंद बोकील यांच्या या कादंबरीतील नवे शब्द, आवाज, प्रकाश, वास, शांतता, रंग यांच्या संदर्भातील प्रतिमा या विलक्षण आहेत. या सगळ्यांनी कादंबरीचा अवकाश ठळक केला आहे. निःस्तब्ध, निराकार आकाशात तिच्या अस्तित्वाचा पिवळा प्रकाश त्यामुळे अधिक तेजस्वी झाला आहे.

**प्रा. विद्या सुर्वे बोरसे**
मराठी विभाग प्रमुख, लोकनेते व्यंकटराव हिरे महाविद्यालय, पंचवटी, नाशिक.
भ्र.९४०५५४७००२

बा. द. सातोस्कर यांच्या कथांमधील स्त्री–पात्रांबाबत भाष्य करणारा संशोधनलेख

# बा. द. सातोस्कर यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटन

**शुभांगी अनंत आसोलकर**

**१. प्रस्तावना**

आधुनिक कालखंडात मराठी साहित्यामध्ये एक महत्त्वाचा कथात्म साहित्याचा प्रकार म्हणून कथेचे स्थान असाधारण आहे. मराठी कथेत ग्रामीण कथा, दलित, आदिवासी, स्त्रीवादी, विज्ञान, महानगरीय जीवनातील विविध विषय चित्रित झालेले आहेत . बा. द. सातोस्कर हे एक सव्यसाची गोमंतकीय साहित्यिक आहेत. त्यांनी साहित्याच्या अनेक प्रांतांत मुशाफिरी केलेली आहे. प्रस्तुत शोधनिबंधात सातोस्कर यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटनाचा अभ्यास केला आहे. यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटनांचा अभ्यास करताना सातोस्कर यांचे कथालेखन, त्यांच्या लेखनातील प्रादेशिकता आणि त्यांच्या लेखनाच्या पार्श्वभूमीचा विचार केला आहे. त्यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटनाचे स्वरूप, पोर्तुगीजकालीन गोमंतकीय स्त्री, तत्कालीन सुधारकांचा स्त्री विषयक दृष्टिकोन आदी अंगाने विचार प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे .

**२. बा. द. सातोस्कर यांचे कथालेखन**

गोमंतकीय साहित्यसृष्टीमध्ये अत्यंत दर्जेदार साहित्य निर्मिती करणारे जे लेखक आहेत त्यातील एक महत्त्वाचे नाव म्हणजे बा. द. सातोस्कर हे आहे. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, ललित निबंध, आत्मचरित्र आदी वाङ्मयप्रकार हाताळले आहेत. सातोस्करांनी विविधांगी लेखन केले आहे. त्यांनी असीम निष्ठेने शारदेची अखंडित उपासना केली आहे. या साऱ्या अथक प्रयत्नांमागे वाङ्मयाचा निदिध्यास ही एकमेव प्रेरणा असलेली दिसते. खडतर साधनेतून त्यांनी विपुल व बहुमोल साहित्यनिर्मिती केली आहे.

सातोस्करांनी आपल्या कार्य–कर्तृत्वाने मराठी कथाविश्वात स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. सातोस्करांचे जीवनानुभव समृद्ध आहे. आपल्या अवतीभोवतीचा परिसर आणि माणसे यांच्या सखोल चिंतनातून त्यांच्या व्यक्तित्वाला अनेकविध पैलू लाभले आहेत. ते जीवनातील अनेक घटना–प्रसंगांना धैर्याने सामोरे गेले, त्यांना भिडले. त्यातूनच त्यांना साहित्यनिर्मितीची प्रेरणा मिळत गेली. त्यांचा जीवनवास्तवाकडे बघण्याचा विशिष्ट दृष्टिकोन असल्यामुळे जीवनानुभवाचा विविधांगीपणा जाणवतो. मानवी जीवनाचा शोध घेणे हाच त्यांच्या कथा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे त्यांचे लेखन जीवनवास्तवाच्या जीवनानुभूतीत रुजून आलेले आहे असे वाटते.


बा. द. सातोस्कारांनी मोजकेच कथा लेखन केले

असले तरी ते मराठी कथेच्या प्रवाहातील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांनी गोमंतकाचा प्रदेश, तेथील माणसे व समाजवास्तव याचा शोध कथालेखनातून घेतला आहे. त्यांचे कथालेखन दोन प्रकारांत विभागता येते. एक फ्रेंच, पोर्तुगीज यांसारख्या युरोपीय भाषांतील कथांचे अनुवाद आणि दोन स्वतंत्र कथालेखन. 'द्राक्षांचे घोस' आणि 'पंचविशीतले पाप' हे दोन अनुवादित कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत. मात्र येथे त्यांच्या स्वतंत्र कथालेखनाचा विचार केला आहे. त्यांचा पहिला 'प्रीतीची रीत व इतर कथा' हा १९७८ मध्ये तर दुसरा 'अभुक्ता' १९६१ मध्ये कथासंग्रह प्रकाशित झाला आहे . बा. द. सातोस्करांचे समकालीन कथाकार वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, पंडित महादेवशास्त्री, जयवंतराव सरदेसाई हे आहेत. त्यांनी मराठी कथेवर आपली एक नाममुद्रा उमटविली आहे. सातोस्करांच्या कथेचा विकास या समकालीन लेखकांना समांतर जसा झालेला आहे तसा तो महाराष्ट्रातील लघुकथाकारांनाही वाट पुसत झालेला दिसतो.

सातोस्करांनी स्वतंत्र कथालेखनाला १९४९ पासून प्रारंभ केला. 'टेम्परन्स हॉटेल', 'ॲटमबॉमचे गुपित' यांसारख्या कथा १९४९ मध्ये 'हंस' मासिकातून प्रसिद्ध झाल्या. सातोस्करांच्या 'प्रीतीची रीत व इतर कथा'मधील कथा ह्या बहुधा मध्यमवर्गीय कौटुंबिक कथा आहेत. सातोस्करांचा दुसरा कथासंग्रह 'अभुक्ता' (१९७८) हा आहे . यातील 'मेलिंद', 'दर्याचा पुत्र', 'फिलूची मुदी', 'मोल' आणि 'जग बदलते आहे' यांसारख्या कथांतून लेखक गोमंतकाच्या बदलत्या सामाजिक जीवनाचा वेध घेताना दिसतात. तसेच मनोरंजनाबरोबरच वाचकाला अंतर्मुख होऊन विचार करायला लावणारी आशयसूत्रे त्यांच्या कथेत आली आहेत. एकंदर सातोस्करांची कथा अशा विविध विषयांना स्पर्श करत मध्यमवर्गीय जीवनाचा वेध घेते.

**३. व्यक्तिरेखाटन संकल्पना व स्वरूप**

कथेचा अवकाश चिंचोळा असला तरी कथा हा अत्यंत सुटसुटीत, लवचीक असा साहित्यप्रकार आहे. या त्याच्या अंगभूत वैशिष्ट्यपूर्ण रचनेमुळे त्याचा अनेक प्रकारे व अनेक पद्धतीने वापर होऊ शकतो. त्यामुळेच एका विशिष्ट स्थलकालाचे आणि त्यात वावरणाऱ्या माणसांचे,



छायाचित्र : ह. म. कु

**बा. द. सातोस्कर**

त्याच्या भाव-भावनांचे, नातेसंबंधाचे चित्रण कथेत केलेले असते. कथेतील व्यक्तिचित्रणाचे महत्त्व विशद करताना ना. सी. फडके लिहितात, 'लघुकथा ही कथानकप्रधान अथवा व्यक्तिप्रधान असते; पण यात व्यक्तिचित्रणालाच जास्त महत्त्व असते कारण व्यक्तीशिवाय प्रसंग अथवा घटना घडू शकत नाहीत. म्हणूनच व्यक्तीचे विशिष्ट स्वभाव ही मुख्य गोष्ट होय व पेचदार प्रसंग म्हणजे केवळ त्या व्यक्तींच्या प्रतिक्रियांतून निघणारे स्फुल्लिंग होतं.'[१] कथा ह्या साहित्यप्रकारातील व्यक्तिरेखाटन हा कथनात्मक अभिव्यक्तिरूपाचा एक महत्त्वाचा घटक आहे हे ना. सी. फडके यांच्या विवेचनातून अधोरेखित होते.

व्यक्तीच्या बाह्य आणि अंतरंगाचे दर्शन, तिच्या रेखाटनाची वर्णनात्मक, दर्शनात्मक पद्धती, तिच्या स्वभावातील बारकावे, त्यानुसार बनणारे तिचे व्यामिश्र रूप, तिच्या अंतर्मनाचा शोध आदी अंगाने कथा अभिव्यक्तिरूपातील व्यक्तिरेखाटनाचे स्थान महत्त्वाचे असलेले दिसते. असे असले तरी व्यक्तीचा संपूर्ण जीवनपट कथेमधून आविष्कृत करण्यास वाव नसतो. व्यक्तित्वाच्या संपूर्ण विकासाची नोंदही कथेत घेता येत नाही. व्यक्ती जीवनातील काही विशिष्ट घटना अथवा क्षण

हे व्यक्ती दर्शनाला पुरेसे असताना दिसतात. व्यक्तीच्या अंतर्मनातील भावनांची आंदोलने किंवा तिची चिंतनशीलता यातून व्यक्तिरेखाटन साकार होते. या विषयी मदन कुलकर्णी लिहितात, 'मानवी स्वभाव – मानवी वर्तन हा नेहमीच वाङ्मयाचा विषय मानला गेला आहे. या मानवी स्वभावाचा तळ गाठण्याच्या प्रक्रियेतून वाङ्मयनिर्मिती झालेली आहे. वाङ्मयातील व्यक्तींच्या स्वभावगुण–वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकणे म्हणजे त्या व्यक्तीचे (पात्राचे) व्यक्तिदर्शन घडविणे होय.'[२] लेखकांनी आपल्या कथा साहित्यात विविध वृत्ती–प्रवृत्तींच्या विविधरंगी व्यक्तींचे चित्रण केलेले दिसते .

सत्य आणि असत्य प्रवृत्ती मानवी स्वभावात उपजत असलेल्या दिसतात. नीतिसंमत व समाजानुकूल आचरण करणाऱ्या व्यक्तीस आपण सत्प्रवृत्ती मानतो, तर समाज व सामाजिक नीतिमूल्ये यांच्या विरुद्ध आचरण करणाऱ्या व्यक्तीस आपण असत्य प्रवृत्ती समजतो. या दोन्ही प्रवृत्ती मानवाच्या ठिकाणी कमी–अधिक प्रमाणात असतात. मात्र या प्रवृत्तींचा टोकाचा परिणाम आढळणाऱ्या व्यक्ती समाजात अगदी अल्प प्रमाणात असतात. अशा प्रवृत्तीच्या, स्वभावाच्या व्यक्तीचे चित्रण साहित्यात व्यक्तिरेखाटनातून लेखक करतो. व्यक्तिरेखाटनाच्या माध्यमातून लेखक मानवी नातेसंबंधाचा सूक्ष्म, सखोल आणि सर्जनशील धांडोळा घेत असतो.

### ४. बा. द. सातोस्करांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखाटन

१९८९ मध्ये हरिभाऊ आपटे यांनी 'करमणूक' नियतकालिकामध्ये लिहिल्या स्फुटगोष्टींतून स्त्री व्यक्तिरेखा मराठी वाचकांसमोर विविध रूपात आल्या. 'काळ तर मोठा कठीण आला', 'थोड्या चुकीचा घोर परिणाम' 'उपकाराची फेड उपकारानीच' यांसारख्या कथांमधील पात्रातून नणंदेचा हेवा, मत्सर करणारी, नवऱ्याला तिच्या विरुद्ध चिथवणारी राधाबाई, भावजयीचा जाच मुकाट्याने सहन करणारी गंगुबाई, गरिबीत राहताना नेटका संसार करणारी व मुलांवर चांगले संस्कार करणारे स्त्री व्यक्तिदर्शन घडविले आहे. 'करमणूक' तसेच 'मनोरंजन' मासिकांतून प्रकाशित झालेल्या कथांमधून आलेल्या स्त्री व्यक्तिरेखाटनांत हुंडा, सासुरवास, स्त्री शिक्षणाचा प्रश्न असे स्त्री जीवनाशी निगडित विषय आलेले दिसतात. एकंदर मराठी कथेच्या सुरुवातीच्या कालखंडापासून व्यक्तिरेखाटनांतून महत्त्वपूर्ण विषय हाताळलेले दिसतात .

सातोस्कर यांनी 'मुलखावेगळी मुलगी' या कथेत मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करताना एक मानसशास्त्रीय समस्या चित्रित केली आहे. यातून माणसाच्या मनाचा खोल वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. या कथेत मिस संपत हे स्त्री पात्र मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. मिस संपत ही मुलगी दिसायला सामान्य होती. मात्र टवाळ मुले आपल्या मागे लागली आहेत, आपला पिच्छा पुरवत आहेत असे वाटून ती नागपूर, पुणे आणि सध्या मुंबईत शिक्षणासाठी आलेली असते. प्रत्येक ठिकाणी सारखाच अनुभव आल्याचे ती सांगते. ती निवेदकाला म्हणते, ''... या बघा, आमच्या या घराच्या खिडक्या नेहमी बंद असतात. का? माहीत आहे तुम्हांला? समोर एक गुजराथी राहतो. चांगला प्रौढ आहे; पण त्याची वखवखलेली नजर सारखी इकडे वळलेली असते. कॉलेजला जाण्यासाठी म्हणून मी बाहेर पडले आणि कोपऱ्यावर वळले म्हणजे छातीत धडधडू लागते. तिथल्या पानाच्या गाडीवर पान खायला म्हणून जे टोळभैरव जमतात, ते पान खाऊन माझ्याकडे पाहून पचकन थुंकतात. बसमध्ये तेच. मी ज्या ठरावीक बसमधून जाते त्याच आपल्या कॉलेजमधील काही पोरेही जातात. मवाल्याप्रमाणे अचकट विचकट बोलतात आणि धक्के मारून उतरतात...''[३] मिस संपतला आपण सुंदर आहोत आणि रोमियो आपल्या मागे लागले आहेत असे वाटत राहाणे मोनोमॅनिया रोगाची लक्षणे आहेत. या कथेतील मिस संपत या कॉलेजकुमारीला मोनोमॅनिया या आजाराने पछाडले आहे. मिस संपत कथेच्या निवेदकाशी कधी फटकून वागते, तर कधी त्याच्यावर खूप प्रेम करू लागते. मिस संपतच्या व्यक्तिरेखाटनातून लेखकाने एका मानसशास्त्रीय समस्येला स्पर्श केला आहे .

'मेलिंद' या कथेत स्वत:ला पोर्तुगीज म्हणवणाऱ्या दोतोर ब्रागान्साची नात ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा आहे. ती गोमंतकातील केणी नावाच्या सारस्वत हिंदूशी लग्न करते. या कथेतील दोतोर ब्रागन्सा स्वत:ला शंभर टक्के पोर्तुगीज समजतात, तर त्यांची नात १०० टक्के इंडियन. ''आय लव्ह, माय कंट्री, आय कॅन प्राऊड टू बी ॲन इंडियन'' म्हणणारी. डॉक्टर केणींच्या नातवाशी म्हणजे हिंदू मुलाशी

लग्न करण्याचे धाडसाने सांगणाऱ्या नातीचे व्यक्तिचित्रण लेखकाने उठावदारपणे चित्रित केले आहे. आपण धर्मानं ख्रिश्चन जरी असलो, तरी मनानं हिंदुस्थानी आहोत, आपण अवधूतबरोबरच लग्न करणार, हे ती ठणकावून सांगते. हिंदू म्हणजे जमिनीवर बसून पत्रावळीवर जेवणारे, गणेशाची पूजा करणारे ही ब्रागन्साची कल्पना तर हिंदूंच्या कट्टर कर्मठपणाचा तिरस्कार करणाऱ्या आपल्या आजोबांच्या विचारांना छेद देत जात, पात, धर्म यापलीकडे जाऊन त्यांचे बंधन झुगारून आपल्या मुलांना माणूस म्हणून वाढविण्याची प्रतिज्ञा करणारी नात मेलिंद म्हणते, ''भारताचा सेक्युलॅरिझम प्रत्यक्ष अंमलात आणायचा तर जात, धर्म, वंश यांचे बंध तोडायला नकोत का ग्रँडपा?''[४] मेलिंदच्या बोलण्यात, तिच्या अश्रूंत आणि प्रेमात दोतोर ब्रागन्साची कट्टर धर्मनिष्ठा व अभिमान गळून जाते. नव्या मूल्यव्यवस्थेत आदर्श निर्माण करणारे नातीचे व्यक्तिचित्रण वाचकांच्या मनाचा ठाव घेते. स्त्री व्यक्तिचित्रणातून भारताचा सेक्युलॅरिझम प्रत्यक्ष अंमलात येत आहे. जात, धर्म, वंश यांचे बंध तोडले जात आहेत हे लेखकाने सूचित केले आहे .

'जग बदलते आहे' कथेतील स्त्री चित्रण हे अत्यंत धाडसी आहे. प्रमिला आणि प्रमिलाची आई देवकी या दोन पात्रचित्रणातूनही दोन पिढ्यांतील अंतर प्रकट केलेले दिसून येते. प्रमिला ही अत्यंत सामान्य कुटुंबातील आहे. प्रकृतीने नाजूक आणि रंगाने गोरी असलेल्या प्रमिलेला शेतीची कामे झेपणार नाहीत म्हणून तिच्या आई देवकीने तिला पणजी येथील एका सरकारी अधिकाऱ्याच्या घरी घरकाम करण्यासाठी ठेवले होते. ती एका सरकारी अधिकाऱ्याच्या घरी घरकाम करून आपल्या कुटुंबाचा आणि स्वतःचा उदरनिर्वाह करीत होती. पणजीत राहायला गेलेल्या प्रमिलाचे राहणीमानही पूर्ण बदलून गेले होते. केश आणि वेशभूषेपासून अगदी इंग्रजी वाक्यांच्या वापरापर्यंत तिच्यात बदल झाला होता. शहराच्या संपर्काने बदललेली प्रमिला ही व्यक्तिरेखा बंडखोर विचारांची बनते. तिची आई देवकी आपल्या नात्यातील मुलगा नवरा म्हणून साजेशा शोधण्यात मग्न होती. मात्र प्रमिला मावशीचा मुलगा विश्वास याच्याशी लग्न करून संसार थाटण्याचे स्वप्न आई देवकीला बोलून दाखवते आणि देवकीला धक्काच बसतो. 'मावसभावाशी लग्न केल्याचे एकतरी उदाहरण आपल्या जातीत आहे का ?' असा प्रश्न देवकी प्रमिलाला करते. मग प्रमिला जग किती सुधारले आहे या विषयावर एक मोठे व्याख्यानच ऐकवते. प्रमिला आणि विश्वास यांच्यातील नव्या प्रेमाची नवी भाषा पाहून देवकीची गलितगात्रे थरथरून उठतात. सरते शेवटी ती त्यांच्या प्रेमाला संमती दर्शविते. 'जग बदलते आहे' या कथेत गोमंतकीय सांस्कृतिक जीवनात होत चाललेला बदल प्रमिला या स्त्री व्यक्तिरेखेतून लेखकाने आविष्कृत केला आहे. प्रमिला ही धाडसाने आपल्या मावसभावाशी विवाह करण्याचे बोलून दाखवते. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात झालेले बदल मानवी नात्यांवर सुद्धा कसे परिणाम करीत आहेत हे प्रमिला या पात्रचित्रणातून लेखकाने प्रकट केले आहे.

'दर्याचा पुत्र' या कथेतील दर्याला देव मानणारा आंतोन आणि रूजाय यांच्या आगळेवेगळे व्यक्तिमत्त्वाचे दर्शन लेखकाने घडविले आहे. आंतोन आणि रूजाय यांचे एकमेकांवर प्रेम आहे. आंतोन हा मध्यमवर्गीय कुटुंबातील खाऊन पिऊन सुखी असणाऱ्या घरातील होता, तर रूजाय आंतोनच्या मानाने गरीब घरातील होती. रूजायच्या बापला हाती घेतलेल्या कामात यश येत नसे आणि त्यातूनच त्याला दारूचे व्यसनही लागले होते. रूजाय ही चारचौघींसारखी तरुणी नाही, तिच्या व्यक्तिमत्त्वाचे रसायन वेगळे आहे. ती स्वतंत्र बुद्धीची तरुणी आहे. ती स्वतंत्र विचाराने जगू पाहते. सामान्य कुटुंबातील रूजायच्या आई वडिलांना रूजायच्या लग्नात हुंडा देण्यासारखी आर्थिक परिस्थिती नसते. तर आंतोन आणि रूजाय दोघे कष्ट करून लग्नासाठी पैसे जमवितात आणि हुंडा देण्याच्या प्रथेला छेद देतात. रूजाय आपल्या प्रेमाची कबुली देते आणि हुंड्याविषयीची भूमिका मांडते. हुंडा देण्याच्या अनिष्ट प्रथेविषयीचा सुधारणावादी दृष्टिकोन व्यक्त केला आहे. रूजायच्या पात्रातून नव्या पिढीचे चित्रण केले आहे.

'प्रीतीची रीत' कथेमधील भाटकार, शेवंती कलावंतिणीची मुलगी चंचला हिला शिक्षण देऊन तिचे लग्न करून देण्याची इच्छा व्यक्त करतो. तत्कालीन गोमंतकीय भाटकारांच्या प्रवृत्तीच्या विरोधात जाणारा आदर्शवादी भाटकार आहे. दुर्दैवाने चंचलेच्या लग्नाचे पाहिलेले स्वप्न अपूर्ण राहते आणि देवदासीची प्रथा चालू

ठेवण्याचेच चंचलेच्या नशिबी येते. कथेत चित्रित झालेले चंचलेचे आत्मबलिदान हेसुद्धा कलावंत समाजातील स्त्री प्रवृत्तीच्या विरोधात जाणारे आदर्शवादी असेच आहे. मेलोड्रॅमॅटिक पद्धतीने रंगविलेले हे कथानक बा. भ. बोरकर यांच्या 'भावीण' कादंबरीची आठवण करून देते.

सातोस्करांच्या कथेतील पात्रे ही जीवन वास्तवाला सहजपणे सामोरी जातात. अशा सातोस्करांच्या व्यक्तिरेखांविषयी नारायण महाले लिहितात, 'त्यांच्या कथेतील पात्रे ही जीवनातील वास्तवाला सामोरी जाताना दिसतात. ती परिस्थितीमुळे मोडत नाहीत. तशीच वाकत नाहीत. जीवनातल्या वास्तवाशी जुळवून घेतात.'[५] सातोस्करांच्या पात्रचित्रणाविषयीचे प्रा. महाले यांचे विचार योग्य वाटतात कारण सातोस्कर आपल्या कथेतील व्यक्तिरेखाटनातून एक आदर्श निर्माण करताना दिसतात.

सातोस्करांच्या कथांची पार्श्वभूमी, प्रसंग व पात्रे गोव्याची आहेत. त्यामुळे कथेतील पात्रे गोमंतकीय जीवनाचे, तेथील आचार-विचारांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. सातोस्करांच्या कथेतील पात्रचित्रणाविषयी डॉ. सोमनाथ कोमरपंत लिहितात, 'अभुक्तामधील कथात प्रादेशिकतेची पार्श्वभूमी आहे. पात्रे गोमंतकातील आहेत. समकालीन गोमंतकीय कथाकारांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला नाही.' कोमरपंत यांचे मत सातोस्करांच्या कथेला तंतोतंत लागू पडते. 'मेलिंद', 'दर्याचा पुत्र', 'पिलूची मुदी' या कथांची पार्श्वभूमी, प्रसंग व पात्रे गोव्याची आहेत.

### ५. समारोप व निष्कर्ष

बा. द. सातोस्कर हे मराठी कथेतील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. त्यांनी मोजकेच पण वैशिष्ट्यपूर्ण कथालेखन केले आहे. त्यांचे कथाकार म्हणून स्थान वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई यांच्याबरोबरीचे पहिल्या रांगेतील नसले तरी त्यानंतरच्या दुसऱ्या रांगेत मात्र ठळकपणे आहे हे निश्चितपणे सांगता येते. ते कथालेखनात विविध विषयांना स्पर्श करतात. काही कथांचे कथानक गोव्याबाहेर मुंबईत घडत असले तरी कथेतील पात्रे ही बहुधा गोमंतकीय समाजाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात. बा. द. सातोस्कर यांच्या कथालेखनातील स्त्री व्यक्तिरेखाटनाचा अभ्यास करताना हाती आलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे-

१. मध्यमवर्गीय कौटुंबिक समस्या हेच सातोस्करांच्या कथेच्या केंद्रस्थानी असलेले सूत्र आहे.
२. त्यांच्या कथेतील व्यक्तिरेखा वास्तववादी वाटत असल्या तरी चित्रण आदर्शवादाकडे झुकणारे आहे. यात आदर्शपणाचे, मेलोड्रामाचे रंग मिसळलेले दिसतात.
३. मध्यमवर्गीय स्त्री व्यक्तिरेखांचे चित्रण करीत असताना लेखकाने माणसाच्या मानसशास्त्रीय समस्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या कथांमधून त्यांनी मानवी मनाचा खोल शोध घेतला आहे.
४. सातोस्करांच्या कथांची पार्श्वभूमी, प्रसंग व पात्रे गोव्याची आहेत. त्यामुळे कथेतील पात्रे गोमंतकीय जीवनाचे, तेथील आचार-विचारांचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.
५. कथांमधील व्यक्तिरेखा जरी सारस्वत अथवा गोमंतकीय असल्या तरी त्या बहुधा पुणेरी मराठीत बोलताना दिसतात. याला अपवाद 'अभुक्ता' मधील किरिस्तावी कथा आहे. त्यांच्या या कथांचे स्थान गोवा आहे. येथे मात्र त्यांनी बोलीभाषेचा, पोर्तुगीज, फ्रेंचचा उपयोग करून पात्रचित्रणात जिवंतपणा आणला आहे.

### संदर्भ


१. फडके, ना. सी,१९६०, प्रतिभासाधन, पुणे, कल्पना मुद्रणालय, पृ. १०२
२. कुलकर्णी, मदन, १९८४, मराठी प्रादेशिक कादंबरी : तंत्र आणि स्वरूप, नागपूर, पृ. १६६
३. बा. द. सातोस्कर, अभुक्ता, पणजी सागर साहित्य प्रकाशन, पृ. ४६
४. बा . द. सातोस्कर, अभुक्ता, उनि, पृ. ७२
५. महाले नारायण, नाडकर्णी, एस. एस., कोमरपंत, सोमनाथ, (संपा) गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड, दुसरा पणजी, गोमंतकीय मराठी अकादमी प्रकाशन, पृ. ६७
६. कोमरपंत, सोमनाथ, २००९, लोकभूमी डॉ. लोहिया- बोरकर-सातोस्कर विशेषांक, पृ. ५५



**शुभांगी अनंत आसोलकर**
(पी एच्. डी.) संशोधक विद्यार्थी, गोवा विद्यापीठ, गोवा

हेमंत जोगळेकर लिखित
'अगा कवितांनो'
या कविताच्या वैशिष्ट्यांवरील
पुस्तकावरील समीक्षा लेख

# 'अगा कवितांनो'- कवितेच्या बहुविध वैशिष्ट्यांचा साक्षेपी वेध

सुनिता टिल्लू


केशवसुतांनी कवितेतील शब्दांना, 'शब्दांनो मागुते या' अशी साद घातली होती. ज्येष्ठ कवी हेमंत जोगळेकर यांनीही स्वतःच्या व इतरांच्याही कवितांना, 'अगा कवितांनो' अशी प्रेमळ साद घातली आहे. याच शीर्षकाच्या पद्मगंधा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या पुस्तकातून गेली चार तपे ते कवितांनी दाखवलेल्या वाटांवरून कवितेच्या मागे मागे चालत राहिले आहेत; कवितेची अनेक रूपे, अनेक तऱ्हा, रंग-ढंग समजून घेण्यासाठी तिने अंतरंगात उजळलेल्या प्रकाशात स्वतःला भेटण्यासाठी, स्वतःला शोधण्यासाठी कवितेचे जे जे विशेष त्यांना भावले, आवडले आणि ज्या विशेषांनी त्यांना विचार-प्रवृत्त केले त्या त्या विशेषांनी नटलेल्या कवितांचा वेध घेत एकूणच कवितांच्या जवळ जाण्यासाठी कविताप्रेमी वाचकांना उद्युक्त करावे, त्यांना या प्रक्रियेत लाभलेल्या आनंदाचा प्रत्यय वाचकांनाही लाभावा, या उद्देशाने जोगळेकरांनी या पुस्तकाचा प्रपंच मांडला आहे.

कवितेतील स्पर्श-रस-गंध संवेदना, कथात्मकता, भक्तिमयता, गीतात्मकता, अद्भूतता, अतर्क्यता, विडंबनात्मकता, कवितेतील 'मी', कवितेतील प्रतिमा, कवितेपलीकडची कविता अशा बहुविध अंगांनी कविता या साहित्यप्रकाराविषयी जोगळेकरांच्या सौंदर्यवादी, प्रगल्भ मनाने केलेले चिंतन या पुस्तकातील लेखांतून प्रकगटले आहे.

कविता ही निबंधाप्रमाणे विचार मांडत नाही, तर तो विचार ती वाचकाला प्रतीत करून देते. यासाठी उदाहरणादाखल जोगळेकरांनी नरेंद्र बोडके यांची 'कागद' ही कविता उद्धृत केली आहे. कागद तयार करण्यासाठी होणारी वृक्षतोड हा पर्यावरणविषयक विचार नरेंद्र बोडके यांना या कवितेतून व्यक्त करायचा आहे.

कुठल्या झाडाचे शोक असतील या
मूक कोरेपणामागे ?
आता लिहिताना
कागदाच कोरेपण भळभळ वाहतं मनात
आणि शब्द वाहून जातात.

या ओळींतून झाडांचे शोक आणि कागदाचे दुःख वाचकांच्याही मनात जखमेप्रमाणे भळभळू लागते. कवितेतील झाडावर चाललेल्या करवतीचा उल्लेख, नदीत भिजत पडलेल्या ओंडक्यांचा उल्लेख वाचकाला श्रुतीप्रत्यय, स्पर्शप्रत्यय घडवतो, हे जोगळेकरांचे त्या




कवितेवरील भाष्य वाचकाला कवितेत व्यक्त झालेल्या विचाराचा प्रत्यय देते. (पृ. ७१)

याच वैशिष्ट्यांची दुसरी बाजू म्हणजे कवितेत व्यक्त झालेला विचार त्याविरुद्धही विचार करायला भाग पाडतो; जसे की जोगळेकरांच्या 'त्याची इच्छा' या कवितेतून गृहिणीने दिवसभर किंबहुना आयुष्यभर करण्याच्या कर्तव्यांची यादी सांगितली आहे; पण ती कर्तव्ये तिने नवऱ्याच्या इच्छेनुसार पार पाडावीत, केवळ त्याची इच्छा म्हणून तिने स्वतःचे व्यक्तिमत्त्व विकसित करावे हा विरोधाभास कवितेतून प्रभावीपणे सुचवला आहे.

कवितेतील कथात्मकता या वैशिष्ट्याचे उत्तम उदाहरण म्हणजे जोगळेकरांची 'होड्या' ही कविता. यात एका कुमारवयीन मुलाच्या आयुष्यात घडणाऱ्या एका प्रसंगाचे कथन येते. कथेमध्ये कथाकार जेव्हा घटनांचे कथन करतो तेव्हा तो आणि श्रोते (वाचक) यांच्यात अंतर असते. कवितेत मात्र हे अंतर लोप पावते. कवितेतून कथनाच्या अंगाने कवीने सांगितलेले आणि न सांगितलेलेही (सुचवलेले) कवीशी एकरूप झालेले असते. या कवितेतील कुमारवयीन मुलाचा 'ती' च्याशी संवादच न घडल्याने झालेला विरस, शेवटच्या

**पाऊस ना पडलाच नाही**
**पाणी ना वाहिलंच नाही**
**होड्या ना सोडल्याच नाहीत**
**होड्या ना केल्याच नाहीत**

या ओळींतून व्यक्त होतो आणि त्याने

पण मला पुष्कळ होड्या येतात अशी स्वतःची घातलेली समजूत वाचकाला अस्वस्थ करते आणि हे फक्त कवितेतच घडू शकते अशी धारणा जोगळेकरांनी व्यक्त केली आहे आणि ती महत्त्वाची आहे.

कवितेचे शब्द सोपे, नेहमीचे असले तरी काहीवेळा त्यांची मांडणी कवीने अशा पद्धतीने केलेली असते की, वाचकाला अर्थसंगती लावणे कठीण जाते. त्यामुळे त्याला ती दुर्बोध वाटते. उदा. ग्रेस यांची 'आई' ही कविता–

यातील आईच्या जाण्याने कवीच्या वाट्याला आलेले पोरकेपण, त्याची सैरभैर मनःस्थिती व्यक्त करता करता आलेल्या शेवटच्या कडव्यातील

**वर–आत द्रौपदीच्याही**
**तो कृष्ण नागडा होता**

या ओळींची संगती लागणे अवघड होऊन बसते; परंतु जोगळेकर अतिशय अप्रतिम रीतीने ती उलगडून दाखवतात. कृष्ण आणि द्रौपदी यांच्यातील सख्यभाव सर्वज्ञात आहे. येथे येणारा उल्लेख द्रौपदीचा मातृभाव दर्शवणारा आहे. जसे आईच्या वर–आत मूल सुखेनैव नागडे असते तसा कृष्णही द्रौपदीशी वागताना सहज, मोकळा आहे. अशा प्रकारे जोगळेकर या ओळींतील आशय–संगती आई–मूल अशा सनातन लोभस नात्याशी आणून ठेवतात. आशयाचा बोध वाचकांच्या मनात उमलून येण्यासाठी वाचकांचे हृदयही कवितेच्या पावलांचा आवाज ऐकू येण्याइतके सजग, संवेदनशील हवे अशी कलात्मक निकड व्यक्त करतात.

कवितेच्या भाषेबाबत विवेचन करताना जोगळेकरांनी उद्धृत केलेल्या कविता कवितेच्या भाषेच्या विविध अंगांचे दर्शन घडवतात. पंडित कवीची संस्कृतप्रचुर, भारदस्त भाषा, पोवाड्याची वीररसप्रधान भाषा, भावकवितेची भाषा आणि नंतर काळानुसार बदलत गेलेली २१ व्या शतकातील संगणकीय प्रभावाखाली गुदमरलेल्या, चंगळवादाने भ्रष्ट झालेल्या भोवतालाची भाषा अशी भाषेची बदलत गेलेली रूपे जोगळेकरांनी वर्णन केली आहेत. अनुभवाच्या बदललेल्या पोतानुसार आशयानुसार भाषा बदलणे स्वाभाविकच असते. जोगळेकरांनी उद्धृत केलेली रजनी परूळेकर यांची, 'दोन्पाय' ही कविता या दृष्टीने चपखल आहे. मरणाची ओढ लागून राहिलेल्या निवेदिकेची सैरभैर मनःस्थिती व्यक्त करताना लाटेजवळ असलेले तिचे 'दोन पाय' हे दोन्पाय होतात. हा कवयित्रीने यथार्थपणे घडवलेला नवीन शब्द. तिच्या निराश मनःस्थितीचा अन्वय उलगडतो. जुने शब्द मोडून नवे घडवण्याचा खेळ, मर्ढेकर, पु. शि. रेगे आदिंनीही केला आहे. 'अरुणोदय' ऐवजी 'गिरिणोदय' झननझांजरे, ठिबक–ठाकडे इ. शब्दांतून भाषेचा विलास वेगळे काही सुचवण्याची ताकद यावर जोगळेकरांनी समर्पक भाष्य केले आहे.

भाषेतून कवीचे व्यक्तिमत्त्व, त्याची जीवनदृष्टी वाचकाला प्रतीत होत असते ही जोगळेकरांची धारणा महत्त्वाची व सुयोग्य आहे.

काव्यनिर्मितीच्या गूढ, विलक्षण प्रक्रियेविषयी जवळजवळ सर्वच कवींनी कवितेतून लिहिले आहे. हे म्हणजे कवितेपलीकडची कविताच. कवितेच्या अनेक तऱ्हा, कवीशी असलेले अनेकपदरी नाते याविषयी लिहिताना जोगळेकरांनी कविता कवीशी कशी अल्लडपणे खेळतही असते हेही सांगितले आहे. त्यासाठी त्यांनी आरती प्रभू यांची

ती येते आणिक जाते
येताना कधी कळ्या आणिते
जाताना पण फुले मागते

ही अत्यंत समर्पक कविता निवडली आहे. कवितेचे अस्फुट स्फुरण, तिचे कवीच्या निकट येणे व क्षणात विरूनही जाणे, काही सुचवू पाहणाऱ्या अर्थाने प्रियेप्रमाणे संकोचाने नाही नाही म्हणणे असे कवितेचे विभ्रम रेखाटणारी ही कविता सहृदय वाचकाला कवितेपलीकडच्या कवितेकडे घेऊन जाते; पण त्यासाठी वाचकाने कवितेच्या अंतरंगात उतरले पाहिजे असे जोगळेकर म्हणतात.

गीतात्म कवितेविषयी जोगळेकर ठामपणे म्हणतात की, प्रत्येक चांगले गीत ही चांगली कविता असतेच. त्यासाठी त्यांनी उदाहरणे, 'खेड्यामधले घर कौलारू' (गदिमा), 'मेंदीच्या पानावर'(सुरेश भट), 'कितीक हळवे कितीक सुंदर'(संदीप खरे) व त्यांनी उलगडून दाखवलेली त्यातील काव्यात्मकता विलोभनीय आहे. कवीपासून समजूतदार अंतर राखून असली तरी कविताच कवीला अनुभवातील सौंदर्य टिपायला शिकवते, त्यासाठी योग्य शब्दांची निवडही करते आणि निघताना कवीचे अस्तित्वच सुगंधित करून जाते, हा इतका भावाशय दडलेल्या गीतात संदीप खरे शेवटी म्हणतात–

वाटेवरच्या फुलास माझ्या
लावून जाते हळूच अत्तर

या ओळींचा यथोचित वापर करून जोगळेकरांनी लेखाचा शेवट केला आहे.

कवितेतील संवाद, मग तो, तो आणि ती मधील असो, 'तू' म्हणजे प्रेयसीशी किंवा प्रियकराशी असो, परमेश्वराशी असो, निसर्गाशी असो, मनाशी असो किंवा खुद्द कवितेशी असो, त्यामागे उभा असतो तो कवीच. म्हणजेच तो संवाद अखेर कवीचा स्वतःशी, स्वतःतील 'मी' शी असतो. तो अनुभव कवीने प्रत्यक्ष भोगलेला असो वा नसो, त्याने तो आपल्या अंतरंगात भिनवून घेऊन 'मी' चाच केलेला असतो. अशा प्रकारे कवितेत व्यक्त होते ते कवीचे व्यक्तिमत्त्व व कवीत सामावलेले असते कवितेचे व्यक्तिमत्त्व! कवीचे व कवितेचे इतके एकजीवत्व जोगळेकर, कवितेतील 'मी' या लेखात अधोरेखित करतात.

कवितेची सुरुवात व शेवटची ओळ हे दोन अत्यंत

लक्षणीय असे लेख या पुस्तकात आहेत.

कवितेची सुरुवात याविषयी लिहिताना, किती विविध तऱ्हेने ती वाचकाला आकर्षून घेते (किंवा क्वचित् दिशाभूलही करते) याची अनेक उदाहरणे जोगळेकर वाचकांसमोर ठेवतात. कवितेचे मर्म सुचवणारे शीर्षक हे कधी कवीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले एखादे स्थळ असेल किंवा तेथे घडलेली घटना असेल. एखाद्या विशिष्ट व्यक्तीचे नाव असेल (उदा. बकी, धोंड्या न्हावी– विंदा) तर कधी कवितेच्या पहिल्या ओळीनेच निर्देशित केलेला काव्यविषय असेल– मात्र कवितेची सुरुवात वाचकाला आत ओढून घेते.

प्रत्येक मुद्द्याची मांडणी करताना त्याचे अगदी सूक्ष्म कंगोरे जोगळेकर उलगडून दाखवतात. 'शेवटची ओळ' या लेखात कवितेची शेवटची ओळ किती तऱ्हांनी कवितेला उठावदार करू शकते (किंवा उलट तिचा प्रभाव कमी करू शकते), अनपेक्षित कलाटणी येऊ शकते, कथात्म कविता असेल तर उत्कर्षाच्या उंचीपर्यंत नेऊ शकते हे त्यांनी अनेक उदाहरणांनी स्पष्ट केले आहे. 'आणीबाणी' या अनिलांच्या कवितेतील शेवटची ओळ–

तसे काही जवळ नव्हते

नुसते हाती हात होते– अशी आहे. या ओळीमुळे आधीच्या ओळींमध्ये निवेदकाने भोगलेल्या विपरीत परिस्थितीतून तो कसे निभावून गेला याची हृद्यता मनाला स्पर्शून जाते. जोगळेकरांच्या 'होड्या' या कवितेचे उदाहरणही या संदर्भात हृदयस्पर्शी आहे.

मला पुष्कळ होड्या येतात

बंबी होडी, नांगर होडी, शिडाची आणि सायी होडी.

या कविताभर प्रत्येक कडव्यानंतर पुनरावृत्त झालेल्या आणि शेवटीही आलेल्या ओळींना शेवटी मात्र एक वेगळाच अर्थ प्राप्त होतो. 'ती' बरोबर घडूनच न आलेल्या संवादानंतर कुमारवयीन निवेदकाने हिरमुसलेल्या मनाने स्वतःची घातलेली समजूत या ओळी अधिक अर्थपूर्णतेने स्पष्ट करतात.

जोगळेकरांनी याविषयी अतिशय सुंदर शब्दांत भाष्य केले आहे. ते त्यांच्याच शब्दांत सांगण्याचा मोह आवरत नाही.

''एकेका ओळीचे पाऊल टाकीत कविता अवतरत असते. शेवटची ओळ वाचून झाल्यानंतर पुस्तक मिटल्यानंतर ती वाचकाच्या नजरेसमोरून नाहीशी होणार असते; पण हे शेवटच्या ओळीचे शेवटचे पाऊल कवितेला वाचकांच्या मनात–त्यांच्या हृदयात टाकायचे असते. तिथे अढळपद मिळवायचे असते. निटवळ चमकदार शेवटच्या ओळीने हे साधणार नसते. तिला या ओळीने आपले अवघे सत्त्व वाचकापर्यंत पोचवायचे असते.''

कवितेला किती आत्मीयतेने समजून घेतले आहे जोगळेकरांनी!

केशवकुमारांनी (आचार्य प्र. के. अत्रे) 'झेंडूची फुले' या विडंबन कवितासंग्रहात तत्कालीन रविकिरण मंडळाच्या काव्य–वैशिष्ट्यांचे (विशेषतः माधव ज्युलियन यांच्या कवितांचे), कवींच्या कृतक लकबींचे, प्रेमविषयक कल्पनांचे, शब्दकळेचे केलेले विडंबन सुप्रसिद्ध तर आहेच; पण विडंबन– कविता या साहित्यप्रकारात एक मानदंड प्रस्थापित करणारे आहे. अर्वाचीन मराठी कवितेत विडंबन कवितेचे तोरणच बांधले झेंडूच्या फुलांनी!

सर्कशीतील विदूषक हा कसरतपटूंच्या कसरतीची नक्कल करीत असतो. करता करता लोकांना हसवण्यासाठी पडतोही; पण तो स्वतः कसरतपटूंपेक्षाही उत्तम कसरतपटू असल्यामुळेच तो हे करू शकतो, तसेच विडंबनकाराला विडंबनविषय झालेल्या कवितेस स्वतःत मुरवून घ्यावे लागते, तिला चहू अंगांनी जाणून घ्यावे लागते हा जोगळेकरांनी मांडलेला काव्यविचार त्यांच्या सूक्ष्म अभ्यासाची साक्ष देतो.

कधी कधी विडंबन–कविता मूळ कलाकृतीला गौरवितही असते याचे उदाहरण म्हणून जोगळेकरांनी उद्धृत केलेली नितीन दादरावाला यांची 'सर' ही कविता सदानंद रेग्यांना वाहिलेली अनोखी श्रद्धांजलीच आहे. जोगळेकरांनी विडंबन या काव्यप्रकाराचा किती सांगोपांग व सूक्ष्म अभ्यास केला आहे याचे या लेखातून प्रत्यंतर येते. जोगळेकरांचा स्वतःचाही 'बेहद्द नाममात्र

घोडा' हा विडंबन कवितांचा संग्रह प्रसिद्ध आहे.

कवितेतील अद्भभूताविषयी लिहिताना जोगळेकर वेगळा विचार मांडतात. अद्भभूत म्हणजे दैवी किंवा अतिमानवी असे न मानता अचेतन वस्तूंनी माणसाप्रमाणे वागणे हे अद्भभूतच असे त्यांचे मत आहे. त्यासाठी त्यांनी निवडलेल्या त्यांच्याच 'घर' या कवितेत, घर निवेदकाशी खट्याळपणे वागतं. कधी रुसतं, निवेदक कामावर निघाल्यावर त्याला टाटा करतं आणि घट्ट दार लावून घेऊन एकटंच घर घर खेळत राहतं. यात घराला त्यांनी लहान मुलांचे लोभस विभ्रम बहाल केलेयंत. ते न्याहाळताना वाचकांना अद्भभूतच वाटतात.

कवितेच्या निर्मिती–प्रक्रियेत जाणिवेइतकीच नेणीवही गुंतलेली असते. कवीच्या 'चंद्रभारल्या' जीवाला वेढणारी नेणीव अद्‌भुतानेच भारलेली असते हे जोगळेकरांचे म्हणणे कवितेच्या गाभ्याशी नाते सांगते.

जेव्हा कवितेतील दृकप्रत्यय प्रभावी असतो तेव्हा त्या कवितेला चित्रदर्शी कविता म्हटले जाते. शब्दांच्या माध्यमातून कागदावर दोन मितीत अवतरलेली कविता वाचताना वाचकाला आशयाची तिसरी मिती जाणवत असते. कधी रंग प्रतिमांतून तर कधी कवीने विशिष्ट प्रकारे योजलेल्या शब्दांच्या– रेषांच्या आरेखनातून, कधी चलत्‌चित्रवत लिहिलेल्या ओळींतून चित्रदर्शित्वाचे असे अनेक आयाम जोगळेकरांनी 'कवितेतील चित्र' या लेखातून मांडले आहेत.

कित्येकदा काही कवितांतील ओळी, शब्द किंवा कल्पना, प्रतिभा किंवा मिथकांचे संदर्भ कवीच्या मनात घर करून राहिलेले असतात. कवी ते आपल्या कलाकृतीत इतक्या अर्थपूर्ण रीतीने वापरतो की, ती अधिक सौंदर्यपूर्ण बनते. उदाहरण म्हणून जोगळेकरांनी उद्‌धृत केलेली इंदिरा संतांची 'कुब्जा' ही कविता– यातील राधेच्या संदर्भासह आलेली, अवेळी यमुनेच्या पाण्यात उतरलेली कुरूप कुब्जा, तिला ऐकू येणारा मुरलीरव वाचकांच्याही मनात गुंजत राहतो. तिची कृष्णमयता वाचकांना भारावून टाकते.

पूर्वीच्या गद्य वाचनाचे किंवा काव्यपंक्तींचे लेखकाने आपल्या लेखनात केलेले पुनर्योजन म्हणजेच श्रुतयोजन–याची शांता शेळके यांनी आळंदीच्या साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेली भलावण जोगळेकरांनी, 'कवितेतील इतर कलाकृतींचे संदर्भ' या लेखात मांडली आहे. अशा अनेक उदाहरणांमधून, कवितेतील स्पर्श–रस–गंध संवेदनांविषयीच्या लेखातूनही जोगळेकरांच्या सांस्कृतिक श्रीमंतीचे मनोज्ञ दर्शन घडते.

या लेखमालिकेचा निरोप घेताना, 'राम राम पाव्हणं' या लेखात जोगळेकरांनी कवितेतील 'प्रतिमेबाबत' ऊहापोह केला आहे. वर्ण्य विषयासाठी उपमेय आणि उपमान यांचा पूर्वी उपयोग केला जात असे. काळानुसार ही सांकेतिक पद्धत बदलत गेली. आधुनिक मराठी कवितेत प्रतिमेची योजना केली जाऊ लागली व ती कशासाठी आहे हे समजून घेण्याची जबाबदारी वाचकांवर येऊन पडली. कधी कधी एखादा घटक, व्यक्ती, प्रसंग किंवा तपशील प्रतिमा होण्याऐवजी संपूर्ण कविताच एक प्रतिमा कशी होऊन जाते यासाठी जोगळेकरांनी उद्‌धृत केलेली त्यांचीच कविता–

आपण तुमच्या मागच्या अंगणात
एक पैसा पुरला होता–

हे उत्तम उदाहरण ठरते. जोगळेकरांनी उलगडून दाखवलेली या कवितेतील अनेक अर्थवलये विलक्षण आहेत. अनेकार्थता हा महत्त्वाचा काव्यगुण धारण करणाऱ्या या कवितेचे उदाहरण देऊन जोगळेकरांनी 'प्रतिमा' या काव्यवैशिष्ट्याला अधिक उंचीवर नेले आहे.

अगदी साधी सहज वाक्यरचना, सोपे शब्द वापरूनही भावनावाही कवितेचा आशय कसा उकलत नेता येतो याचे सुंदर उदाहरण म्हणजे 'मेंदीच्या पानावर.' या गीतातील निवेदिकेच्या कोवळ्या, नाजूक मनासाठी सुरेश भटांनी योजलेल्या मेंदीच्या पानाची प्रतिमा उलगडताना जोगळेकरांनी त्यातील तरलता अजिबात न गमावता केलेले भाष्य. उताऱ्याच्या शेवटी त्यांनी सुरेश भटांच्याच एका गीतातील शब्द योजून– निवेदिकेला 'प्राजक्तासम टिपले' आहे. असे म्हणून

प्रतिमेचे उलगडणे अतिशय श्रीमंत केले आहे.

प्रस्तुत पुस्तक वाचून झाल्यावर वाचकांच्या मनात उमटते ते कवितेचे विविधरंगी इंद्रधनुष्य! जोगळेकरांच्या व्यक्तिमत्त्वातच असलेली कवितेविषयीची आस्था, नितांत प्रेम, त्यापोटी सहज घडून आलेला अभ्यास, सूक्ष्म व सखोल जाण, तीव्र संवेदनक्षमता, तरलता, मनःपूर्वकता बहुश्रुतता, कमालीची संदर्भसंपन्नता या वृत्तीविशेषाचं मनोरम, आल्हाददायक दर्शन घडते.

या लेखांमागील जोगळेकरांची भूमिका एका कविताप्रेमी आस्वादकाची व कवितेविषयीच्या प्रत्येक अंगाचे योग्य भान असणाऱ्या सजग कवीची आहे. रसग्रहणात्मक वृत्तीच्या अभ्यासकाची आहे. मूल्यमापनाचा हेतूच नसल्यामुळे लेखांच्या भाषेला समीक्षकीय, विद्वज्ज्ड बाज नाही, क्लिष्टता नाही. ती कुठलाही अभिनिवेश नसलेली, वाचकांशी सहज संवाद साधणारी आहे.

इतक्या अनेकविध अंगांनी कवितेविषयीचे विचार मांडणारे मराठी साहित्यातील हे एकमेव पुस्तक असावे. यातील प्रत्येक लेख कवितेचे एकेक वैशिष्ट्य स्वतंत्रपणे मांडणारा असला तरी प्रत्येक पुढचा लेख आधीच्या लेखातून सहजपणे उगवून आला आहे. त्यामुळे ही लेखमालिका कवितेच्या बहुविध अंगांचा आंतरसंबंध सहजच प्रस्थापित करते.

हे लेखन म्हणजे रूढार्थाने समीक्षा नसली तरी जोगळेकरांनी सम–ईक्ष–म्हणजे सर्व बाजूंनी कवितेला न्याहाळत, जाणून घेत तिच्या नाट्यरंगाचा, अंतरंगाचा साक्षेपाने वेध घेतला आहे. आगामी काळात 'कविता' या साहित्यप्रकाराविषयी लिहिताना वाङ्मयेतिहासकारांना प्रस्तुत पुस्तकाची दखल घेणे अपारिहार्य ठरावे इतके हे पुस्तक मोलाचे आहे.

**सुनीता टिल्लू**
मो. ७७७४०४१९२५
इ मेल– suntillu@gmail.com

## जाहिरातीचे दरपत्रक

**सप्रेम नमस्कार!**

महाराष्ट्र साहित्य पत्रिका हे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे मुखपत्र असून मराठी साहित्य–संस्कृतीचे प्रतिनिधित्व करणारे त्रैमासिक आहे. म.सा.पत्रिकेला १०४ वर्षांची दीर्घ परंपरा लाभली आहे. म.सा.पत्रिकेत मराठी साहित्याच्या विविध प्रवाहांचा आणि प्रकारांचा परामर्श घेतला जातो. पत्रिकेने विशेषांकही प्रकाशित केले आहेत. साहित्यसंशोधनविषयक लेख पत्रिकेतून नियमितपणे प्रकाशित केले जातात.

ग्रंथपरीक्षणे आणि वाङ्मय समालोचन करणारे लेख पत्रिकेमध्ये प्रसिद्ध होतात. समकालीन साहित्य व्यवहारावर म. सा. पत्रिकेतून भाष्य केले जाते. संशोधक, विद्यार्थी आणि मराठी रसिक यांनी सदैव पत्रिकेला उदंड प्रतिसाद दिला आहे. महाराष्ट्रातील सर्व थरांतील रसिक वाचक पत्रिका वाचतात. १३,५०० प्रती इतक्या संख्येने पत्रिका छापली जाते आणि आजीव सभासदांना अंक मोफत पाठविला जातो. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेला आपल्या व्यवसायाची, प्रकाशनांची अथवा शुभेच्छापर संदेशांची जाहिरात देऊन पत्रिकेला आर्थिकदृष्ट्या सक्षम करावे, ही विनंती.


**– प्रकाशक आणि संपादक**
**(म. सा. पत्रिका)**

| जाहिरातीचे दरपत्रक | |
|---|---|
| कव्हर २ (रंगीत) | रु. १०,०००/– |
| कव्हर ३ (रंगीत) | रु. १०,०००/– |
| मलपृष्ठ ४ (रंगीत) | रु. १०,०००/– |
| आतील पान (कृष्णधवल) | रु. ४,०००/– |
| आतील अर्धे पान (कृष्णधवल) | रु. २ ,०००/– |
| आतील पाव पान (कृष्णधवल) | रु. १,०००/– |

कैलास दौंड यांच्या 'माझे गाणे आनंदाचे'
या बाल कवितासंग्रहाची
सौंदर्यस्थळे उलगडून दाखवणारा लेख

# मुलांच्या कल्पनाविश्वाचा खजिना-बाल कवितासंग्रह 'माझे गाणे आनंदाचे'

प्रा. डॉ.रंजना मधुकर कदम




पुस्तकाचे नाव : **'माझे गाणे आनंदाचे'**
लेखकाचे नाव : **डॉ. कैलास दौंड**
प्रकाशक : **अनुराधा प्रकाशन, पैठण**
प्रथम आवृत्ती : **१४ नोव्हेंबर २०२०**
मूल्यः ५० /– रुपये

ख्यातकीर्त साहित्यिक कैलास दौंड यांच्या कविता, कथा, कादंबरी इ. वास्तवदर्शी साहित्य वाचकांना आनंद तर देतेच त्याचबरोबर अंतर्मुख करते, विचार करायला भाग पाडते. त्यांनी लिहिलेला बालकवितासंग्रह 'माझे गाणे आनंदाचे' हा मुलांच्या बाल मनाला सहज आकर्षित करणारा, रमवणारा, आनंदमय विश्वात घेऊन जाणारा, त्यांचा उत्साह वाढवणारा आणि त्यांना सहजरीत्या खूप काही शिकवणारा आहे. लहान मुलांना नवनवीन, मनोरंजक, आकर्षक कल्पना आवडतात म्हणूनच लहान मुले या कविता मनापासून वाचतात कारण या कवितासंग्रहातून लहान मुलांचे उत्साही, खेळकर, काल्पनिक, चित्रमय विश्व साकार झालेले आहे. ते बाल मनाला रमवणाऱ्या विश्वात अगदी सहजतेने घेऊन जातात.

उदा. **गच्चीवर जेव्हा झोपली मुलं**
**आकाश अलगत खाली आलं**
**अनोखं विश्व मग झालं खुलं**
**चांदण्यांची झाली मोहक फुलं**

यातून दिसून येते की, यात कवीने मुलांच्या परिचयाच्या, त्यांना माहित असणाऱ्या गोष्टी मनोरंजकपणे, मुलांना गंमत-मौज वाटेल, आनंद होईल व तेही विचार करायला लागतील अशा व्यक्त केल्या आहेत. त्या कविता वाचताना लहान मुलेही त्या कल्पना नगरीत एकरूप होतात आणि नकळतपणे तीही विचार करायला लागतात. कवीच्या मांडणीतील वेगळेपणा त्यांना समजतो. आपण नेहमीच करत असणाऱ्या गोष्टीमध्ये काय काय दडलंय हे पाहून त्यांना मज्जा तर येतेच तसेच त्यांना आश्चर्यकारक, सुंदर, मन खेचून घेणाऱ्या विश्वाचे प्रचंड आकर्षण वाटते. त्या मन उल्हसित करणाऱ्या कल्पना त्यांनाही सहज विचार करायला शिकवतात, त्यातून लहान मुलेही आपल्या मजेशीर भावना व्यक्त करायला शिकतात.

जसे खिडकी मुलांना आवडते कारण खिडकीतून बाहेरची दृश्य दिसतात. ती पाहत पाहत त्याचा आनंद मुले लुटत असतात. त्यातूनच कवी पुढे नवा विचार देतात, ते म्हणतात,

**शाळा आपुली असते**
**जीवनाची खिडकी**
**शोध असा लागतो**
**मजलाच एकाएकी**

म्हणजे खिडकी जसा आनंद देते. तसेच शिक्षणही आनंद देत, ज्ञान-विचार देत मुलांना हुशार बनवते. तसेच पाऊस मुलांना आवडतो कारण पावसात त्यांना मनसोक्त भिजायचे, उड्या मारायच्या, ओरडायचे, मस्ती करायची आणि भरपूर धिंगाणा घालायचा असतो; मात्र आईला वाटणारी मुलांची काळजी या कवितेतून कवीने मुलांना स्वाभाविकरीत्या दाखवून दिली आहे. म्हणूनच ती म्हणते, ''जसा सूर्य थकून झोपी गेला तसाच आता तू सुद्धा झोप,'' असे आई निसर्गातीलच उदाहरण देऊनच कल्पकतेने समजावून सांगते. कवी हसत-खेळत मुलांना आईच्या भावना समजून घ्यायला शिकवतात.

आजूबाजूच्या गोष्टींकडे पाहण्याची वेगळी दृष्टी लहान मुलांमध्ये कवी सहजतेने रुजवतात. ही समज मुलांना खूप आनंद देऊन जाते.

उदा. **फूल म्हणाले आभाळा**
**रंग माझे पहा जरा**
**आभाळाला निळाईचा**
**गर्व होता खराखुरा**

ही कविता बालमनावर ती योग्य संस्कार करते. इतरांना मदत करण्यातील समाधान, देण्यातील आनंद, सहकार्याची वृत्ती निसर्गातील विविध घटकांच्या आधारे कवी मुलांवर हळुवारपणे बिंबवतात. तसेच लहान मुलांच्या मनातील वाईट सवयी, गर्व, अहंकार, इतरांना कमी लेखण्याची वृत्ती सहज काढून टाकण्यास त्यांची कविता मदत करते.

उन्हाळ्यात झाडाची सावली शरीराला-मनाला कशी शांती, गारवा, आल्हाददायकता देते, याचे सुंदर वर्णन करून झाडांचे महत्त्व कवीने बालमनावर ठसवले आहे. सूर्य सर्वांना प्रकाश देतो, झाडे सावली देतात. पाऊस निसर्गाची तहान भागवतो, वारा सर्व सृष्टीला जगवतो, देण्यातील आनंद, समाधान, त्यांनी मुलांवर रुजवले आहे.

उदा. **'झऱ्याची झुळझुळ**
**कानात गुंजते**
**पाणी स्वच्छ ठेवा**
**आम्हाला सांगते**

यातून निसर्गातील विविधता, सौंदर्य, पशू-पक्षी, झाडे, नदी, आकाश, वारा, झरे, डोंगर, फुले, फळे इत्यादींचे महत्त्व, त्याविषयी जिव्हाळा, आपलेपणा, प्रेम, जवळीक, ओढ हे जगण्यातील अत्यंत आवश्यक-महत्त्वाचे घटक आहेत, यांचे भान मुलांच्या मनात हसत, खेळत आकर्षक भाषेत कवी बालवयातच रुजवतात. स्वतः साठी जगण्यापेक्षा इतरांसाठी जगले पाहिजे, हे नदी कसे शिकवते? हे कवीने दाखवून दिले आहे. देण्यामुळेच माणसाला खरे सुख मिळते. नदी फक्त इतरांना देत असते. दातृत्वाचे

सुख ती मनसोक्त अनुभवते. आपले काहीच नाही जे आहे ते सर्व देवाने दिलेले आहे. त्यामुळे आपण स्वतःला मोठे समजून इतरांना कमी लेखू नये. उलट इतरांना मानाने, सन्मानाने वागवावे व आपण जे करतो ते देवाचरणी अर्पण करावे, हे आपल्या कवितेतून ते सहजरीत्या पटवून देतात. जसे कवी त्यांच्या कवितेचे श्रेय स्वतःकडे न घेता देवाला देतात. तसेच आपले काहीच नसण्याची भावना बालवयातच कवी बालकांच्या मनावर रुजवतात.

झाडांमुळे आपण चांगले जगतो. झाडे आपल्याला जगवतात मग आपणही झाडांना जगवलं पाहिजे, त्यांची काळजी घेतली पाहिजे. त्यांना पाणी-खत घातले, तर ते झाड डेरेदार होईल व आपल्याला शांत, शीतल, आनंददायी सावली देईल. याचे तालात, ठेक्यात, लयबद्धपणे, आकर्षक वर्णन कवीने केले आहे.

उदा. '**पाला बाई पाला , थांबेल उन्हं**
**हसतील तेव्हा' पानांत फुलं**

कवीची ही सुंदर कल्पना लहान मुलांना प्रचंड आवडते. बालमनही कवीने सहजरीत्या रेखाटले आहे. लहान मुले ही निरागस असतात. त्या त्या क्षणाचा मनमुराद आनंद ती लुटतात. त्यांचे भांडण-रुसवा हा तेवढ्यापुरता असतो. नंतर ती सर्व विसरून जातात. त्यांचा रुसवा जास्त वेळ टिकत नाही. त्यांना लगेच एकमेकांशी बोलायचे असते. भरपूर खेळायचे असते; पण मित्र-मैत्रीण रुसलेली असेल तर ती अस्वस्थ होतात. एकमेकांशी बोलण्यासाठी धडपड करतात. हा अबोला त्यांना सहन होत नाही. परत भांडायचे नाही असे ती ठरवून टाकतात. एकंदर रुसवा-रुसवी झाल्यानंतरची लहान मुलांची तगमग, घुसमट, कोंडी कवीने अचूक रेखाटली आहे. प्राणी, पक्षी मुलांचे सोबती कसे होतात याची अफलातून कल्पना मुलांना खेचून घेणारी, अवाक् करणारी, मजा वाटणारी आहे. त्यांच्या कवितेतील ससा मुलांना शांत बसा म्हणतो, वाघ दुकानदार बनतो व हवे ते माग म्हणतो, तर हरीण चिमणीचे कान धरीन म्हणतो. एकंदर मुलांना मज्जा, आनंद, आश्चर्य वाटेल अशा भन्नाट कल्पना कवीने या कवितासंग्रहात रंगवल्या आहेत. उगवत्या दिवसावर मोहक रमणीय भाष्य कवीने आपल्या कवितेतून केले आहे. जेथे झाडे नाहीत तेथील भकास, उजाड, तापदायक, रुक्ष, कोंदट वातावरण व जेथे झाडे आहेत तेथील सुखदायी, चैतन्यमय, सौंदर्याने नटलेले मनोवेधक वातावरण कवीने टिपून कवीने झाडाच्या रक्षणाचे महत्त्व पटवून दिले आहे. एकंदर हा कवितासंग्रह बालकांना आनंद देणारा, त्यांच्यावर योग्य ते संस्कार करणारा आहे.

**प्रा. डॉ. रंजना मधुकर कदम**
अगस्ती महाविद्यालय, अकोले जिल्हा अहमदनगर

■■

# वेणा : स्त्रीजाणिवांचा एक विस्तृत पट

**ख्यातकीर्त कवयित्री नीरजा यांच्या 'वेणा' या काव्यसंग्रहातून मुखर होणाऱ्या स्त्रीजाणिवांचा विस्तृत परिचय करून देणारा लेख**

**कीर्ती शशिकांत जाधव**

नव्वदीच्या दशकात जागतिकीकरणाला सुरुवात झाली. स्त्रीशिक्षणाचा प्रसार होऊ लागला. अर्थार्जनाची संधी मिळाल्याने स्त्रियांना स्वतःच्या सामर्थ्याची ओळख होऊ लागली. या कालखंडात भारतीय समाजरचनेनुसार स्त्री-पुरुष असमानता, स्त्रीशिक्षणाचा अभाव, पुरुषी मक्तेदारी, स्त्रियांचा मानसिक व शारीरिक छळ असे अनेक प्रश्न कवयित्रींच्या मनाला स्पर्श करत होते. भौतिक प्रगतीमुळे स्त्रीच्या जगण्याचा स्तर उंचावू लागला. एकीकडे समाजातील प्रस्थापित स्त्रीप्रतिमा आणि दुसरीकडे तिला येऊ पाहणारे आत्मभान यामध्ये ताण निर्माण होऊन स्त्रीच्या मनात भावनिक आंदोलने निर्माण होऊ लागली. स्त्रियांच्या कवितेतून हे ताणतणाव प्रतिबिंबित होऊ लागले. कविता हे स्त्रीमुक्ती चळवळीचे महत्त्वाचे अंग असल्याने कवितेमधून स्त्रीवादाचे वेगवेगळे पैलू दृष्टीस पडू लागले. स्त्रियांची कविता अस्तित्वाबद्दल, तिच्या माणूस असण्याबद्दल बोलू लागली.

प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरुणा ढेरे, रजनी परुळेकर, अश्विनी धोंगडे, ज्योती लांजेवार, हिरा बनसोडे, मलिका अमर शेख, नीरजा, आसावरी काकडे, अंजली कुलकर्णी इत्यादी कवयित्री स्त्रीजाणिवांचे चित्रण आपल्या कवितेतून करत होत्या. नव्वदोत्तर कवितेत स्त्रीवादी कवितेचा विचार करायचा झाल्यास कवयित्री नीरजा यांचे नाव ठळकपणे समोर येते. स्त्री हा काव्याचा केंद्रबिंदू ठेवून नीरजा यांनी काव्यलेखन केले. आयुष्यात येणाऱ्या सर्व अनुभवांना काव्यरूप देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. नीरजा यांचा 'वेणा' हा कवितासंग्रह १९९४ मध्ये नीलकंठ प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केला. ''आई/ तुझा हट्ट जिद्द आणि कौतुक/ यामुळेच मी इथवर'', असे म्हणत हा संग्रह त्यांनी आईला अर्पण केला आहे. प्रत्येक स्त्री माप ओलांडून जेव्हा सासरी येते तेव्हा सगळ्या नजरा तिने सती सावित्री व्हावे अशीच पारंपरिक अपेक्षा ठेवून असतात. समाजाचा हा अदमास असतानाही आईने कधीच आपल्याला स्त्रीत्वाच्या चौकटीत बंदिस्त न करता भावभावना व्यक्त करण्याचे स्वतंत्र निर्णय घेण्याचे मुक्त अवकाश दिले. त्यामुळेच आपण आज इथवर आलो आहोत अशी कृतज्ञतेची भावना कवयित्री व्यक्त करते. पितृसत्ताक समाज व्यवस्थेने रचलेली पुरुषप्रतिमा आणि त्यातून स्त्रीला मिळणारी दुय्यम स्थानाची वागणूक कवयित्रीला अस्वस्थ करते. कवी शंकर वैद्य 'वेणा' या संग्रहाच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''म्हणूनच तिच्या वेदना या नुसत्या वेदना न राहता त्या वेदनांची मिरवणूक तयार होते.'' अर्थात स्त्रीला आपली दुःखे ही समाजव्यवस्थेने

लादली आहेत याचे भान आल्याने ती निर्भीडपणे या व्यवस्थेला जाब विचारण्यासाठी या वेदनांचे दमन न होऊ देता त्यांची मिरवणूक काढते. पुरुषधार्जिण्या समाजासमोर आपल्या व्यथा मांडण्याचे धाडस करते. या संग्रहाचे आणखी एक वेगळेपण म्हणजे स्त्रीवादाची यत्किंचितही ओळख नसताना स्त्रीविश्वासाच्या अंतःस्थ सखोल जाणिवेतून या कविता स्फुरलेल्या आहेत. सर्वांत प्रथम गणोरकर यांनी नीरजा यांच्या कवितेत स्त्रीवाद असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर स्त्रीवाद समजून घेईपर्यंत माझी कविता स्त्रीवादाच्या दिशेने खूप पुढे निघून गेली होती, असे नीरजा म्हणतात. या संग्रहात एकूण ९३ कविता असून कवी शंकर वैद्य यांची प्रदीर्घ प्रस्तावना या संग्रहाला लाभली आहे.

'कविता-रती' या अंकात नीरजा यांच्या कवितेवर भाष्य करताना वसंत पाटणकर म्हणतात, 'नीरजा यांची कविता व त्यांच्या पहिल्या 'वेणा' या संग्रहापासून स्त्रीनिष्ठ अनुभवांचा आविष्कार करते. तिच्या वाट्याला तिच्या देहाशी निगडित वेगवेगळ्या अवस्था, स्थिती असतात. त्या निसर्गानेच निर्माण केलेल्या असतात. हे तिच्या वाट्याला अपरिहार्यपणे येणारे, टाळता-नाकारता न येणारे असे विश्व असते. उदाहरणार्थ, ऋतुप्राप्ती, गर्भधारणा इत्यादी गोष्टींना खास स्त्रीदेहनिष्ठ अनुभव म्हणता येईल. ते सर्व काळात, सर्व ठिकाणी, सर्व समाजांमध्ये सारखेच असतात. म्हणजेच ते एका प्रकारे समाजसंस्कृती निरपेक्ष असतात. मात्र या व्यवस्थेत स्त्रीच्या वाट्याला एक स्त्री म्हणून येणारे सामाजिक. सांस्कृतिक असे स्थानदेखील असते आणि ते बहुधा दुय्यम, गौण स्वरूपाचे असते.'[१] नीरजा यांची कविता स्त्रीदेहाधिष्ठित अनुभव अधोरेखित करत जाते. 'ती वयात येते तेव्हा' (२६), 'वेणा' (५०), 'तिच्या गर्भातून' (८३), उन्हे (८५) या कविता उदाहरणादाखल विचारात घेता येतील.

'वेणा' या कवितेतील स्त्री प्रसववेदना असह्य झाल्याने त्याला दोष देऊ लागते. तिच्या या अवस्थेचे वर्णन करताना नीरजा लिहितात, ''वेणा असह्य झाल्या/ तेव्हा तिने शिवी हासडली/ त्याच्या नावाने/ शरीराशी नेहमीच वचनबद्ध मनाला हवा तेवढा/ वनवास/ तिची अगतिक धडपड / सुटकेसाठी,/ तो बाहेर/ अधिक-वजाचा हिशेब करीत'' ('वेणा' पृ. ५०) निसर्गाने स्त्रीला



मातृत्वाची देणगी दिली असली तरी ती अनुभवताना शेवटी ती माणूस आहे, तिलाही शरीर असल्याने वेदना असह्य होणे, हे नैसर्गिक आहे; परंतु ती यासाठी सर्वस्वी त्याला जबाबदार धरते. हा विरोधाभास कवितेत अनपेक्षितरीत्या प्रकट झाला आहे. 'ती वयात येते तेव्हा' या कवितेतील 'पांढऱ्या शुभ्र पातळावर/लाल किनार पेटून उठते' या ओळींमधून स्त्रीचे शरीर ऋतुप्राप्ती होऊन तारुण्यात पदार्पण करत असतानाचा अनुभव अतिशय सूचक ओळींमधून व्यक्त झाला आहे. 'उन्हे' या कवितेत प्रणयोत्सुक स्त्रीला येणारे अनुभव पेटलेला गुलमोहर, लालचुटूक जास्वंदी, प्राजक्ताची फुले अशा प्रतिमांमधून साकारले आहेत.

वयात येताना स्त्रीचे बदलते भावविश्व आणि समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन 'ती वयात येते तेव्हा' या कवितेतून आपल्याला जाणवतो. ''ती वयात येते तेव्हा/ तिच्या डोळ्यातल्या / रंगीबेरंगी स्वप्नांवर/बोली लावली जाते (वेणा, पृ.क्र. २६) स्त्रीचा अनेक भूमिकांमधून होणारा प्रवास कवितांमधून अधोरेखित होत जातो. त्या वेळी मग देहविक्रय करणाऱ्या स्त्रीची भूमिकाही याला अपवाद नसते. 'अनपेक्षित' या कवितेत देहविक्रय करणाऱ्या स्त्रीचे मनोगत उलगडताना तिच्या चेहऱ्यावरचे नटवे रंगही सन्मानित होतात. असे कवयित्रीला वाटते.''इथे येणारा/असतो नवरा/एका रात्रीचा/त्याचे भोग तोच भोगतो/स्वतःचे अपराध/ माझ्या अंगभर गोंदून/ येत नाही भरदिवसा/हिशेब मागायला'' (वेणा, पृ.क्र. २९)

पुरुषप्रधान समाजात स्त्रियांवर कितीही अत्याचार झाले तरी पतीला परमेश्वर मानणे हे पिढ्यानपिढ्या स्त्री

मनावर रुजत आलेले आहे. पुरुषार्थापुढे नतमस्तक होणे यामध्ये स्त्रीला कोणताही कमीपणा वाटत नाही. उलट स्वतःला पतिव्रता म्हणून घेण्यात तिला धन्यता वाटते. जेव्हा एखादी स्त्री ही तिच्यातले पुरुषी अंमलाखालील झाकोळलेले स्त्रीत्व उजळवण्याचा प्रयत्न करते तेव्हा स्त्रियांचा समूह तिला परावृत्त करण्याचा कसा प्रयत्न करतो हे 'कोंडमारा' या कवितेत व्यक्त होते. ''परत एकदा धुवून पुसून/ साऱ्या पुरुषांना ताम्हणात/ प्रतिष्ठापना केली त्यांची देव्हाऱ्यात/माझ्या हातात दिली निरांजने/डोळ्यांची/ अन् रचले अभंग/ त्यांच्या पुरुषार्थाचे (वेणा, पृ. ३१) स्त्रीने कितीही प्रपंचात स्वतःला गुंतवून घेतले तरी मोकळा श्वास घेण्याची तिची आस कमी होत नाही. किंबहुना आपले जडावलेले श्वास तिला समाजापासून लपवावेसे वाटत नाहीत. 'कोठवर सोसायचे' या कवितेत कवयित्री म्हणते, ''आता उघडायलाच हवेत/ सारे झरोके ह्या घराचे/ ओल्या मातीचा सुगंध/ श्वासात साठवताना/ आता ह्या खिडक्यांना/ पडदे लावून शोभिवंत/ मी लपवणार नाही/ माझे जडावलेले श्वास'' (वेणा, पृ. ३८,३९) आता स्त्रीला तिची घुसमट असह्य होते आहे. तिला आपले दुःख लपवायचे नाही त्यामुळे ती भवतालाशी संवाद साधण्याची इच्छा व्यक्त करते.

लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीचा आपल्या आईशी होणारा पत्ररूपी संवाद 'प्रिय आईस' या काव्यशृंखलेतून आपल्यासमोर उलगडत राहतो. पिढ्यानपिढ्या चालत आलेले स्त्रीचे भाग्य भोगाच्या रस्त्यावरून वाटचाल करत जाते, असे मांडताना कवयित्री आईला म्हणते, ''हे सारे तुझ्याहून/वेगळे आहे असे नाही/ फक्त विटंबनांचे/ संदर्भ बदलत असतात एवढेच'' (वेणा, पृ.४१) मनाचा कोंडमारा होईल असे, पूर्वापार चालत आलेले किंबहुना संस्कार म्हणून तिच्यावर बिंबवलेले अशा प्रकारचे स्त्रीचे आयुष्य कवयित्री नाकारते. त्या वेळी 'प्रिय आईस' या काव्यशृंखलेचा शेवट ती या ओळींनी करते. ''पांढऱ्या शुभ्र आभाळाच्या कागदावर/विसावणारे माझे शब्द/मला कोंडायचे नाहीत/ मनाच्या गाभाऱ्यात''(वेणा, पृ. ४६) कवितेतील स्त्री पारंपरिक स्त्रीची भूमिका नाकारत नव्या मुक्त विचारांचे सूतोवाच करते.

ज्या कवितेने कवयित्री नीरजा यांना स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण करून दिली ती कविता म्हणजे 'सावित्री' या कवितेला प्रसिद्ध समीक्षक म. सु. पाटील यांनी नीरजा यांचे वडील म्हणून नाही तर एक समीक्षक म्हणून पहिल्यांदाच दाद दिली. या कवितेत पातिव्रत्याचे धडे आणि प्रेमाच्या कसोट्या समस्त स्त्रीवर्गावर लादून सावित्री गेली; परंतु आताच्या काळातील सत्यवान खरे तर आता या कसोटीला उतरतील का? अशी शंका कवयित्रीला वाटते. ती सावित्रीला पुन्हा येण्याचे आवाहन करते. ''सावित्री! बाई/ पुन्हा एकदा येऊन जा / ह्या मतलबी सत्यवानांनी / केली आहे होळी/ आमच्या आयुष्याची/ त्याचे वाढू द्यायचे/ हे अनाठायी तण/ की संपवायच्या ह्या वेदना/ जिवंत मरणाच्या/ ते एकदा सांगून जा,/ते एकदा सांगून जा. (वेणा, पृ. ४९) अर्थात प्रस्थापित समाजाच्या विरुद्ध बंड करण्याची तयारी या कवितेतील स्त्री दर्शवते.

'वेणा' या संग्रहातील शीर्षक कवितेत स्त्रीचे मातृत्व हे संस्कृतीने कितीही उदात्ततेला नेऊन ठेवले असले तरी शेवटी ती एक माणूस आहे. असह्य प्रसववेदना साहताना तिची प्रतिक्रिया सर्वसामान्य माणसासारखीच असते. या कवितेतून तिच्या वेदनांची तीव्रता आणि त्याची अनभिज्ञता हे दर्शवण्याचा कवयित्रीने प्रयत्न केला आहे. 'मृत्यू असाही असतो;' 'दयाघना', 'ओशट पहाट' या कवितेतून स्त्री-पुरुष नात्यांमध्ये असलेले परंपरेहून भिन्न परिप्रेक्ष्य कवयित्रीला दिसते. स्त्री-पुरुषांचे एकरूप होणे हे एखाद्या अंत्ययात्रेपेक्षा तिला वेगळे दिसत नाही. किचनपासून बेडरूमपर्यंत तिच्या मनाची निघणारी अंत्ययात्रा कवयित्रीला अस्वस्थ करते. पिढ्यानपिढ्या स्त्रीची विटंबना मातृत्वाच्या लेण्याने शृंगारत आली आहे, असे खदखदणारे वास्तव कवयित्री मांडते.

स्त्रीच्या वाट्याला आलेल्या उदात्त भूमिकेचे अर्थात आईपणाचे दर्शन 'आई' या कवितेत घडते. प्रपंचासाठी स्वतःच्या शरीराचा कोणताही विचार न करता खस्ता खाणारी आई कवयित्रीला अस्वस्थ करते. मृत्यूपश्चातही तिचा आत्मा मुलांमध्ये घुटमळत राहतो. स्वतःसाठी काहीही राखून न ठेवता सगळं सर्वस्व ती मुलांसाठी अर्पण करते. आत्ताच्या आयुष्यात ती जरी संपून गेली असली तरी वारसा म्हणून तिच्या वेदना ती देऊन गेली आहे, असे कवयित्रीला वाटते. म्हणून ती म्हणते, ''ती केव्हाच संपून गेली/ टप्प्याटप्प्यांनी;/ उरल्या आहेत/ फक्त वेदना/

जाताना तिने दिलेल्या / वारसा म्हणून (वेणा, पृ. ६१) आईने वारसा म्हणून जाताना आपल्याला फक्त वेदना दिल्या आहेत, अशी भावना कवयित्री व्यक्त करते.

आत्तापर्यंत रूढी, परंपरांमध्ये गुंतलेला समाज स्त्रीच्या भावभावनांचा कोणताही विचार न करता तिला आलेले वैधव्य एक प्रथा म्हणून कसे पार पाडतो, याकडे 'चुडा फुटला तेव्हा' ही कविता लक्ष वेधून घेते. नीरजा यांच्या कवितेतून स्त्री-पुरुष यांच्यातील प्रेमाचे भावविभोर नाते तितक्याच तन्मयतेने उमलून येते. प्रेमानुभवाच्या विविध उत्कट भावछटा कवितेतून दृग्गोचर होतात. स्त्री आपल्या प्रेमासाठी आसुसलेली असते. तिची आर्त साद 'प्रिय' या कवितेत आपल्याला ऐकू येते, ''खरेच, सख्या!/ तू यायला हवे होतेस/ भर दुपारी/ नुसत्या आठवाने पेटलेला/ माझ्या दारातला/लालभडक गुलमोहर पाहायला (वेणा, पृ. ७५) नीरजा स्त्रीशोषणाचा पट ज्या तळमळीने मांडतात त्याच उत्कटतेने स्त्री-पुरुष नात्यातील प्रेमबंधही त्या उलगडू पाहतात.

नीरजा आपल्या कवितेतून परिस्थितीने हतबल झालेली स्त्री परमेश्वराशी संवाद साधते आहे, असे चित्र रंगवतात, 'हे दयाघना' या कवितेत त्या म्हणतात, ''हे दयाघना/ तू कोणत्या वस्तीत राहतोस?/ विझलेल्या स्वप्नांच्या/ गल्लीच्या तोंडाशीच माझे घर.'' ('वेणा'पृ. २०) या कवितेत संसाराच्या चक्रात अडकलेली, जिची स्वप्ने या रूढी, परंपरावादी विचारसरणीने धुळीस मिळवली आहेत. अशी स्त्री नीरजा आपल्या कवितेतून उभी करतात. आयुष्याची परवड असह्य होऊन ही स्त्री शेवटी परमेश्वराला साद घालते. स्त्रीच्या मनातील अतिशय उत्कट भाव या कवितेतून व्यक्त होतात. जेव्हा सगळे पर्याय संपतात तेव्हा माणूस परमेश्वराची याचना करू लागतो. त्याप्रमाणे या निर्ढावलेल्या समाजव्यवस्थेकडून आता काहीही होणार नाही, असे कवयित्रीला वाटते आणि परमेश्वराची याचना करण्यासाठी ती उद्युक्त होते.

नीरजा आपल्या कवितेतून विविध प्रकारची स्त्रीरूपे, त्यांना येणारे अनुभव रेखाटतात. स्त्री जेव्हा विवाहानंतर अनेक नाती निभावू लागते तेव्हा हे नातेसंबंध कृत्रिमपणे जोडले जात आहेत, असे कवयित्रीला वाटते. हा नात्यांचा आणि त्याआडून येणारा कर्तव्यांचा ताण असह्य होतो आणि कवयित्री म्हणते, ''आभाळाचेही पडदे फाटून जातील/ अशी फोडावी प्रचंड किंकाळी/ अन् मरून जावे कायमचे/ जगण्याला आता काय नाव द्यायचे?/ की चिकटवायची लेबले/ आपल्या शरीरावर/प्रत्येक नात्याच्या नावाची? ('वेणा' पृ. ५१) या कवितेतील स्त्रीप्रतिमा पारंपरिक स्त्रीप्रतिमेप्रमाणे विवाहानंतर जोडले जाणारे नातेसंबंध सहजासहजी स्वीकारत नाहीत. या नातेसंबंधाचा तिला इतका ताण येतो, की जगूच नये असे तिला वाटू लागते. नवीन नाती जोडताना आपण कितीतरी गोष्टींपासून दुरावत आहोत, अशी खंत कवयित्री व्यक्त करते.

नीरजा यांच्या कवितेत पाऊस, पूर, आभाळ अशा निसर्ग प्रतिमांचा वापर करून स्त्री-पुरुष मीलनाचे चित्रण प्रभावी पद्धतीने साकारले आहे. स्त्री-पुरुष संबंधांकडे त्या जितक्या सकारात्मक दृष्टिकोनातून पाहतात तितकाच स्त्रीला येणारा हा अनुभव मृत्यूइतका भयावह त्यांना वाटतो. 'मृत्यू असाही असतो' या कवितेत त्या म्हणतात. ''मृत्यू असाही असतो/ अंधारात लपलेला/ कातरवेळी जेव्हा त्याची / थाप पडते दारावर/ तेव्हा निघते अंत्ययात्रा/ मनाची/ किचनपासून बेडरूमपर्यंत''('वेणा' पृ. १९) स्त्रीला तिच्या मनाविरुद्ध येणारा अनुभव हा किती भयप्रद असतो, याची तीव्रता या ओळींमधून जाणवते. 'पूर ओसरल्यानंतर' या कवितेतही स्त्री-पुरुष समागमाचा क्षण कवयित्रीला एखाद्या प्रलयाप्रमाणे भासतो. ती म्हणते, ''पाऊस उधाणतो डोळ्यांत/ तेव्हा फुटतात धुमारे/ उजाड शरीरातही/ विजेचा कल्लोळ/ आणि वादळलेले आभाळ;/ आता प्रलय अटळ आहे,'' ('वेणा', पृ. ३४) या ओळींमधून स्त्री-पुरुष नात्यातील भावनिक चढ-उतार स्पष्ट होतात.

'अक्षरयात्रा' च्या अंकात प्रभा गणोरकर नीरजा यांच्या कवितेवर भाष्य करताना म्हणतात, 'नीरजाच्या कवितेत स्त्रीकडे पाहण्याची पुरुषाची भोगलोलुप नजर काहीशी तीव्र करकरीत शब्दांत व्यक्त होते. 'ती वयात येते तेव्हा- देवाच्या पुरुषत्वाचा माज चढतो, आभाळ तुडुंब भरते गिधाडांच्या सावल्यांनी.. ती वयात येते तेव्हा संपून जाते उंच उंच झोके अन् सागरगोटे मागील दारी आणि पुढ्यात भरजरी साडी पुढील आयुष्याच्या लक्तरांचे आमंत्रण म्हणून' हे सत्य भडकपणाची तमा न बाळगता

सांगितले जाते''[२] पुरुषीवृत्तीतून स्त्रियांचे होणारे लैंगिक शोषण नीरजा नैतिकतेचे संकेत बाजूला ठेवत प्रखर शब्दांमधून व्यक्त करतात. पुरुषकेंद्रीय समाजव्यवस्थेत स्त्रियांच्या होणाऱ्या शोषणाचा रोखठोक उच्चार नीरजा यांची कविता करते. लग्नसंस्थेच्या नावाखाली घराघरातून होणाऱ्या स्त्रियांच्या लैंगिक शोषणाकडे लक्ष वेधताना नीरजा 'पुनर्वसन' या कवितेत म्हणतात, ''शेवटी उघड्या वक्षावरून फिरणारा दहा रुपयांचा हात/ आणि काळ्या मण्यात गुंतलेली/ हक्काची वासना/ यात मी कोठे?'' ('वेणा,पृ, ३२,३३) स्त्रीला तिच्या मनाविरुद्ध शरीरसंबंधांना सामोरे जावे लागते, हे भयाण वास्तव या कवितेतून स्पष्ट होते.

देहविक्रय करणाऱ्या स्त्रियांच्या व्यथा मांडताना 'विझलेली घरे' या कवितेत नीरजा म्हणतात,'' प्रत्येक घराच्या वळचणीला/ टांगून ठेवली आहेत/ लक्तरे/ पहिल्या बलात्काराची/ अन्/ पलंगाच्या वर/ पोस्टरे/ प्रतिष्ठित बुरख्यांनी/ भुईसपाट केलेल्या आयुष्यांची.'' ('वेणा पृ. ६२) वेश्याव्यवसाय या नावाखाली प्रतिष्ठित समाजाकडून स्त्रियांवर होणारे अत्याचार इतके भयानक असतात की, या स्त्रियांची आयुष्ये उद्ध्वस्त होतात. या स्त्रियांबद्दल कवयित्रीच्या मनामध्ये करुणभाव जागृत होतो आणि ती प्रतिष्ठित समाजाला या स्त्रियांच्या उद्ध्वस्त झालेल्या आयुष्यासाठी जबाबदार धरते. कधी हीच स्त्री कवयित्रीला पारंपरिक कुटुंब पद्धतीत गुंतलेल्या स्त्रीपेक्षा मोकळी वाटू लागते. 'गुंते' या कवितेत नीरजा म्हणतात, ''तिचे एक बरे होते/ ह्या अनोळखी/ ठशांचे गुंते/ ती सोडत होती/ वाहत्या पाण्यावर/ नियमित/ चुरगळलेल्या शरीराचा कागद/ पुन्हा एकदा/ कोरा करकरीत / नवीन ठसे/ ठसवून घ्यायला.''('वेणा'पृ. ६४) या ओळींमधून तिला रोज येणारे अनुभव नवे असतात. ती नव्याने त्यांना सामोरे जाते. पुन्हा पुन्हा त्याच गुंतल्यात अडकून पडत नाही, असे कवयित्रीला वाटते.

लोकसत्ताच्या 'चतुरंग' पुरवणीत डॉ. वंदना बोकील कुलकर्णी 'मी माणूस, माणूस आधी' या लेखात नीरजाच्या कवितेबद्दल म्हणतात,''माणसाची ग्राहककेंद्री ओळख, त्याची तुटलेपणाची जाणीव हे नीरजांच्या चिंतनाचे विषय आहेत. ''बाईला केवळ शरीर असतं/ हे तुमचं तत्त्वज्ञान नाही पोचू देणार/ तिच्या मेंदूपर्यंत तुम्हाला/या ग्लोबल गावातही,''असा त्या माणसांच्या भोगवादी वृतीचा दंभस्फोट करतात.''[३] या आधुनिक जगात सगळे ग्लोबल होत असताना स्त्रीकडे केवळ उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलत नाही. तिच्या बुद्धीची क्षमता हा बुरसटलेला समाज मान्य करत नाही. हे कटू सत्य यामधून समोर येते. नीरजा या समाजाची ही भोगवादी वृती आपल्या कवितेतून परखडपणे व्यक्त करतात. निर्भीडपणे पुरुषकेंद्री समाजाच्या वृत्तींवर प्रहार करणे, हे नीरजांच्या कवितेचे बलस्थान म्हणावे लागेल.

पुरुषनिष्ठ समाजरचनेवर आपल्या कवितेतून प्रहार करत असताना स्त्रीसुलभ प्रेमभावनाही नीरजा यांना महत्त्वाची वाटते. स्त्री-पुरुष नात्यातील प्रणयभाव त्या नाकारत नाहीत. 'तेरीरूओसाठी' या कवितेत त्या म्हणतात, ''तुझ्या ओठांच्या पाकळ्या/ जेव्हा दरवळल्या/ माझ्या अंगांगातून/ तेव्हा माझ्या प्रत्येक श्वासाने/ गायली अगणित गाणी/ तुझ्या नावाची/ आज मी/ हजारो वर्षांनी/ जेव्हा चाळत बसले/ माझ्या आयुष्याची पाने/ तेव्हा कळले./ तू भेटल्यानंतरचे सारे रकाने/ तुझ्या नावाने/ तुडुंब भरले होते.'' स्त्रीच्या आयुष्यातील पुरुषाचे अस्तित्व अतिशय महत्त्वाचे मानते. ती ते कधीच नाकारत नाही, असे कवयित्रीला वाटते.

नीरजा यांच्या कवितेतील स्त्री-पुरुष संबंधाबद्दल बोलताना वसंत पाटणकर लिहितात, 'नीरजा यांच्या 'वेणा' या पहिल्या संग्रहात एका विशिष्ट प्रकारच्या ताणांचा, विरोधांचा आविष्कार केला जातो. त्यातून या कवितेतील स्त्री-पुरुषांमधील संबंध हे सर्वसाधारण, सामान्य संबंधापेक्षा खूपच वेगळ्या प्रकारचे आहेत असे चित्र दिसते. त्यामुळे साहजिकच येथे स्त्री-पुरुषांच्या नात्यांमध्ये अनुभवांचा हळुवारपणा, त्यातील तरलता, कोमलता जवळपास नसतेच. क्वचित ती दिसलीच तर ती अपवादानेच दिसून येते. येथे स्त्री आणि पुरुष यांच्यातील संबंध हे बहुधा वेगवेगळ्या प्रकारे सत्ता संबंधांच्या स्वरूपाचे तर असतातच, साहजिकच त्याबरोबरीनेच या संबंधांमध्ये वेगवेगळे ताणतणावांचे आविष्कार पाहावयास मिळतात, ते रूक्ष, कठोर आहेत. निखळ प्रेमानुभवाचा आविष्कार येथे विरळ स्वरूपाचा आहे. हे चित्र अर्थातच सहज स्वाभाविक स्वरूपाचे आहे असे म्हणण्यापेक्षा हेतुतः ताणलेले आहे. असाच प्रत्यय येतो.'[४] नीरजा यांची

कविता स्त्री-पुरुष संबंधांतील ताण-तणावाचे अनेक कंगोरे दर्शवत मार्गक्रमण करताना दिसते.

नीरजा आपल्या कवितेतून पूर्वापार चालत आलेल्या, स्त्री दुःखाचे अनेक पदर उलगडत जातात. पुरुषधार्जिण्या समाजामुळे, संस्कृतीच्या अनाठायी अट्टाहासामुळे स्त्री वर्षानुवर्षे अन्याय सहन करत राहिली. वेदनेचे रूप बदलले तरी आजच्या स्त्रीची वेदना तशीच कायम आहे. हे दर्शवताना 'जखमा' या कवितेत नीरजा लिहितात, ''अनिश्चित हातांच्या पालख्या/ तू सजवल्यास/ ओळीने लावलेल्या/ तुझ्या दुःखांसाठी, / तेव्हाच माझे/ अगतिक स्पर्श/ कोसळून पडले/ ही मिरवणूक/ तुझ्या वेदनांची/ आणि त्यामागे/ फरफटत निघालेले/ माझे आयुष्य,'' ('वेणा'पृ. ९६) नीरजा यांच्या कवितेचा हा पट म्हणजे वेदनांची त्यांनी मिरवणूक काढली आहे. त्यामुळे तरी समाजाला स्त्री दुःखाची तीव्रता कळेल, असे त्यांना वाटते. हा वेदनांचा पट उलगडत असताना आजच्या स्त्रीच्या आयुष्याची फरफटही कवयित्री निदर्शनास आणते. निर्ढावलेल्या समाजाकडून शतकानुशतके झालेले आघात, जखमा यांची कवितेतून उकल करण्याचा प्रयत्न करते.

नीरजा यांच्या कवितेबद्दल ज्येष्ठ काव्यसमीक्षक रा. ग. जाधव म्हणतात, ''नीरजाची स्त्री-पुरुष नात्याची अभिज्ञता ही पूर्णपणे समग्र वैफल्याची आणि विद्रोही सवालाची आहे. स्त्रीच्या जीवनातील सर्व भूमिका या दृष्टीने पुरेपूर ग्रासलेल्या आहेत.'' शेवटी उघड्या वक्षावरून फिरणारा/ दहा रुपयांचा हात/ आणि काळ्या मण्यांत गुंतलेली हक्काची वासना/ ह्यात मी कोठे?'' ('वेणा' पृ. ३२,३३) असा या कवयित्रीचा सवाल आहे. बंधमुक्त होऊ लागलेल्या स्त्रीची अवस्थाही त्रिशंकूसारखी आहे कारण ''एका अंधाऱ्या आयुष्याची सुरुवात/ प्रकाशाला सामोरी जात असतानाच'' ('वेणा'पृ. ३७) परंपरागत स्त्री-पुरुष नात्याचा सर्व दृष्टीने निषेध करणारी ही स्त्री आपल्या भवितव्याबद्दल आशा राखून असली, तरी अंधाऱ्या वर्तमानाबद्दल मात्र साशंक आहे. प्रमाथी, रोखठोक व विद्रोही स्त्रीवादाचा हा धगधगता आविष्कार आहे.''[५] नीरजा यांच्या कवितेतून उलगडणाऱ्या स्त्री-पुरुष नात्यासंबंधी असलेल्या स्त्रीजाणिवा या वैफल्यग्रस्त अनुभवातून आलेल्या आहेत. हे अनुभव स्त्री-पुरुष नात्याची चिकित्सा करण्यास भाग पाडतात. प्रसंगी परखडपणे प्रश्न विचारून तत्कालीन समाजव्यवस्थेसमोर त्यांची कविता पेच निर्माण करते.

नीरजा यांची कविता म्हणजे एक महानगरीय संवेदन आहे. जागतिकीकरण, फोफावलेला चंगळवाद यामुळे विचलित होऊन स्त्री-पुरुष संबंधांचे बदललेले संदर्भ कवयित्रीला अधिक ठळकपणे जाणवू लागतात. स्त्री-पुरुष संबंधांची बीभत्स वास्तववादी चित्रे आपल्याला 'ही तांबूस संध्याकाळ' या कवितेत दिसते. एकीकडे देहविक्रय करणाऱ्या व पुरुषांना आकर्षित करणाऱ्या स्त्रिया कवयित्रीला दिसतात. सोज्ज्वळतेचा बुरखा पांघरलेल्या समाजात स्त्री-पुरुष यांच्यातील व्यावहारिक संबंधांची चित्रे ती रंगवते. त्याच वेळी पूर्वायुष्यातील एखाद्या प्रियकराशी असलेले संबंध एखादी स्त्री विवाहानंतरही कसे अनैतिकतेने निभावून नेते याचे अस्वस्थ करायला लावणारे चित्र कवयित्री रेखाटते, ''घरी आल्यावर/ पोह्यांच्या बशीला/ सेंटचा वास/अन्/ चोळीच्या बटणांची अस्ताव्यस्त धांदल (वेणा, पृ. ११७) स्त्रीच्या आयुष्याचा प्रवास तिला कधी चौकटीच्या बाहेर जाऊनही करावा लागतो. त्याचे सूचक वर्णन वरील ओळींमधून येते.

नीरजा देवाच्या नावाखाली चालत आलेल्या देवदासीसारख्या प्रथा, त्यामुळे उद्ध्वस्त होणारी स्त्रियांची आयुष्ये याकडे आपल्या कवितेतून लक्ष वेधतात. 'रात्र अंधारी' या कवितेत त्या म्हणतात, ''शरीराच्या पालख्या/ अशावेळी सजवलेल्या/ हिरव्या हळदी रंगांनी/ देवाच्या पायाशी/ सश्रद्ध समर्पण/ आणि मग सुरू/ अव्याहत व्यभिचार/ प्रत्येक सावलीचा/ मुकाट शरीराशी,'' ('वेणा' पृ. १२९) या कवितेतून देवाच्या नावाखाली चाललेल्या अनेक अनैतिक गोष्टींकडे निर्देश केलेला आहे. अनेक परंपरा निर्माण करून स्त्रीशरीराकडे पाहण्याची भोगवृत्ती या दांभिक समाजाने तशीच चालू ठेवली आहे, असे कवयित्रीला वाटते. रूढी परंपरेचा पिढ्यानपिढ्या चालत आलेला पगडा मनावर असल्याने स्त्रियाही हा अत्याचार मूकपणे सहन करतात, असे कवयित्रीला वाटते.

स्त्री आणि पुरुष यांच्या नात्यातील कंगोरे शोधताना कवयित्रीला अनेक प्रश्न पडतात. जुनाट विचारांनी ग्रासलेला समाज, संस्कृतीच्या नावाखाली होणारा

भडीमार, पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने पुरुषवर्गाला दिलेले झुकते माप नीरजा यांची कविता अशा अनेक प्रश्नांची उकल करू पाहते. 'बंद दार' या कवितेत त्या म्हणतात, ''त्या घराचे दार बंद आहे/ तसे ते नेहमीच असते बंद/ घर खच्चून भरलेले/ प्रश्नांनी/ आणि तो केव्हाच संपलेला/ चिरडून/ या प्रश्नांच्या महापुराखाली;/ तरीही बंद दाराबाहेर/ प्रश्नांचा भडीमार अव्याहत चालूच,'' ('वेणा' पृ. १४३) बंद दारासमोर कितीही प्रश्न मांडले तरी काहीच उपयोग होणार नाही, असा निराशेचा सूर या कवितेतून उमटत राहतो.

नीरजा आपल्या कवितेतून पुरुषाच्या शेवटच्या श्वासानंतरही स्त्रीप्रश्न त्याच्यासमोर आ वासून उभे असतात. याचे वर्णन करताना 'गोष्ट– तो गेला तेव्हाची' या कवितेत त्या म्हणतात, ''रक्ताच्या थारोळ्यात/ त्याच्या चिमण्या लेकीने/ रेखाटलेले हुंडाबळीचे / आणखी एक चित्र/ अन् बायकोच्या डोळ्यांतले/ भगभगीत प्रश्न,'' हुंडाबळी, विधवा, परित्यक्त्या स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांवरील मानसिक, शारिरीक अत्याचार अशा प्रश्नांचा ससेमिरा कायम पुरुषवर्गाच्या पाठीमागे लागलेला असतो. पुरुष कितीही मुक्त जीवन जगत असले तरी मृत्यूपश्चातही स्त्रीप्रश्न त्यांची पाठ सोडत नाहीत, असे कवयित्रीला वाटते.

डॉ. नीलिमा गुंडी 'लाटांचे मनोगत' या पुस्तकात स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या कवितेवर भाष्य करताना म्हणतात, '' स्त्रीवादी जाणिवा व्यक्त करणाऱ्या कवितांतील अनुभवाचा पोत पारखण्यासाठी त्यांच्या आविष्काराचाही विचार करावा लागतो. या कवितांमधील एकांगीपणा, वक्तृत्वपूर्णता, तार्किक रचना, सरधोपट प्रसंगनिवेदन आणि क्वचित कर्कश्श बहिर्मुख सूर या त्यांच्या ठळक मर्यादा ठरतात. तसेच सामाजिक, नैतिक प्रश्नांचे भान केवळ स्त्रियांवरील अन्यायाच्या संदर्भातच येणे हेही पुरेशा जागरूकतेचे द्योतक ठरत नाही.''[६] स्त्रीवादी कवितेचा विचार करताना अतिशय सूक्ष्मपणे स्त्रीवादी कवितेच्या मर्यादा त्यांनी दर्शवल्या आहेत, हे दिसून येते. नीरजा यांच्या कवितेतही स्त्रीदुःखाचे चित्रण करताना एकसुरीपणा जाणवण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता होती; परंतु त्यांनी विविध भारतीय, पाश्चात्त्य संस्कृतीतल्या मिथकांची चमत्कृतीपूर्ण योजना केल्याने हा धोका टळला आहे. नीरजा यांची संवेदनशीलता, जाणिवेचे क्षेत्र नागरी आणि आधुनिक आहे. स्त्री ही नीरजा यांच्या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. स्त्रीशोषण हा नीरजा यांच्या आस्थेचा विषय आहे. नीरजा यांच्या कवितेत भारतीय आणि पाश्चिमात्य मिथकांचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला दिसून येतो.

पाश्चिमात्य मिथकथा आणि मिथकांच्या वापरामुळे नीरजा यांची कविता काहीअंशी दुर्बोधतेकडे झुकते. नीरजा यांची कविता आधुनिक काळातील नागरी स्त्रीचे प्रतिनिधित्व करते.

स्त्रीजाणिवांच्या अशा अनेक छटा, स्त्रीत्वाने पार पाडलेल्या विविधांगी अनेक भूमिका मग त्या नीतिमत्तेला धरून असोत नाहीतर समाजाने घातलेल्या नैतिकतेच्या मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या असोत; सगळ्याच भूमिकांना योग्य न्याय देण्याचा कवयित्रीचा प्रयत्न अतिशय प्रगल्भ आहे. या कवितांतून अनुभवांचा व्यापक पट समोर उलगडत जातो. या कवितेतून नीरजांना स्वतःचा असा एक परिप्रेक्ष्य निश्चित सापडला आहे हे प्रकर्षाने जाणवते. नीरजा यांच्या कवितेची शैली प्रखरतेकडे झुकत असली तरी स्त्रीविश्वातील स्त्रीजाणिवांची अनेक कवाडे उघडण्यात हा संग्रह यशस्वी झाला आहे असे वाटते.

**साधनसूची :**

नीरजा, 'वेणा', नीलकंठ प्रकाशन, पुणे १९९४

**संदर्भसूची:**


१. पाटणकर वसंत, 'नीरजा यांची कविता', कविता-रती, मार्च-एप्रिल व मे-जून २०२१ पृ. १७
२. गणोरकर प्रभा, 'तीन समकालीन कवयित्रीः काही निरीक्षणे,'अक्षरयात्रा' २०२१-१३, पृ. ३७
३. बोकील-कुलकर्णी वंदना, 'मी माणूस, माणूस आधी', लोकसत्ता, चतुरंग, २ ऑक्टोबर २०२१ पृ. ९
४. पाटणकर वसंत, 'नीरजा यांची कविता', कविता-रती, मार्च-एप्रिल व मे-जून २०२१ पृ. १६
५. जाधव रा. ग.., 'आधुनिक मराठी कवयित्रींची कविता', प्रतिमा प्रकाशन, पुणे १९९६, पृ. ५१,५२
६. गुंडी नीलिमा, 'लाटांचे मनोगत, पद्मगंधा प्रकाशन, पुणे २००८

**कीर्ती शशिकांत जाधव.**
माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे
भ्र. ९८८१८९७८२५
इ-मेल : kirtijadhav1976@gmail.com

**ज्येष्ठ गझलकार डॉ. अविनाश सांगोलेकर यांच्या अविनाशपासष्टी या गझल**

# सामाजिक हतबलतेतून जगण्याचे भान देणारी अविनाशपासष्टी-

## दीपक करंदीकर




**पुस्तकाचे नाव:** अविनाशपासष्टी
**कवीचे नाव :** डॉ.अविनाश सांगोलेकर
**प्रकाशनाचे नाव:** ग्रंथाली, मुंबई
**पृष्ठ संख्या :** ९६
**मूल्य :** १०० रुपये /-

ज्येष्ठ समीक्षक कै.डॉ.द.भि. कुलकर्णी आपल्या समीक्षेत कविश्रेष्ठ सुरेश भटांना स्वत:चा संप्रदाय निर्माण करणारा कवी म्हणून मान्यता देताना दिसतात. आधुनिक मराठी कवितेत 'केशवसुत संप्रदाय' आणि 'मर्ढेकर संप्रदाय' आधीच निर्माण झाले होते; पण त्यांच्यानंतर फक्त आणि फक्त सुरेश भट या कवीनेच स्वत:च्या कविकर्तृत्वातून 'सुरेश भट संप्रदाय' निर्माण केला आहे, अशी पुष्टी डॉ.द.भि.कुलकर्णी याबाबत जोडतात.

सुरेश भट संप्रदायात साधारणत: १९७८ पासून त्यांच्या अनुयायांची भर पडत गेली. ती आजही थांबत नसल्याचे चित्र मराठी काव्यपटलावर दिसते.

ह्या अनुयायांमध्ये साधारण १९८४ मध्ये निष्ठेने भटांना गुरुस्थानी मान देणाऱ्या एका ताज्या दमाच्या शिष्याची भर पडली. भट संप्रदायात स्वेच्छेने सामील होणाऱ्यात डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी पदार्पणातच जणू सिक्सर ठोकली. त्यांनी भटांच्या मार्गदर्शनात संशोधन करून 'मराठी गझल: १९२०-१९८५' हा डॉक्टरेट पदवीसाठीचा ग्रंथ सिद्ध केला व मराठी गझलेवर 'डॉक्टरेट' मिळविणारा पहिला प्राध्यापक म्हणून कीर्ती संपादन केली. या कीर्तीत भर टाकणारी आणखी एक घटना डॉ. सांगोलेकर यांच्याबाबतीत घडली. ती म्हणजे स्वत: गझलसम्राट सुरेश भट यांनी संपादित केलेल्या 'काफला'

ह्या पहिल्यावहिल्या मराठी प्रातिनिधिक गझलसंग्रहाचे 'सहसंपादक' होण्याचा मान डॉ. अविनाश सांगोलेकर यांना मिळाला. ह्या दोन्ही कामात डॉ. सांगोलेकर यांना सुरेश भटांचा प्रदीर्घ सहवास व मार्गदर्शन मिळाले व भटांच्या सान्निध्यात त्यांच्यातील 'गझलभाव' साहजिकपणे जागृत होऊ लागला. परिणामी भटांच्या संप्रदायातील इतर गझलकार शिष्यांच्याप्रमाणे डॉ. सांगोलेकरसुद्धा मराठी गझला लिहू लागले.

हा काळ होता १९८२ ते १९९० पर्यंतचा. या काळात सांगोलेकरांच्या गझला संग्रहात समाविष्ट करण्या इतपत संख्येने निश्चितच तयार झालेल्या असल्या पाहिजेत; पण म्हणून डॉ. सांगोलेकरांनी आपल्या मराठी गझलांचा संग्रह प्रकाशित करण्याची अजिबात घाई केली नाही. चांगदेव जसा प्रदीर्घ आयुष्य लाभलेला ज्ञानेश्वरकालीन योगी होता, तसेच डॉ. सांगोलेकर हे सुद्धा विद्याभ्यासासाठी प्रदीर्घ वाट पाहणारे कविलेखक होते. आपल्या वयाच्या पासष्टीपर्यंत डॉ. सांगोलेकर थांबले व पुष्कळ विचारांती त्यांनी गुरुपश्चात जवळजवळ वीस वर्षांनी म्हणजे १५ जानेवारी २०२२ रोजी 'अविनाशपासष्टी' हा त्यांच्या निवडक ६५ गझलांचा समावेश असलेला पहिलावहिला मराठी गझलसंग्रह प्रकाशित केला.

ह्या संग्रहातील अनेक गझला दैनिके, साप्ताहिके, दिवाळी अंकांतून वेळोवेळी प्रकाशित झालेल्या आहेत. हे करत असताना 'पूर्णवेळ गझलकार' म्हणून करियर करण्याची त्यांना 'हाव' किंवा 'असोशी' नसल्याने ते भट-नाडकर्णी प्रणीत मराठी गझल चळवळीच्या काठाकाठावरूनच चालले. त्या प्रवाहात मनात आणलं असतं, तर आकंठ बुडवून घेऊन 'भट संप्रदायातील' पहिल्या फळीतील नामवंत शागीर्द म्हणून डॉ. सांगोलेकर यांनी नावही कमावले असते; पण ते स्वत: शिक्षकी पेशामुळे गझलवाचन, गझलचिंतन, गझलशिकवण ह्याच व्यापात आयुष्यभर गुंतले.

ह्या सर्व त्यांच्या कृतीचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांच्या गझललेखनावर साहजिक परिणाम झालेला दिसतो. भट व नाडकर्णी आणि शागीर्दांची पहिली फळी साथ द्यायला असूनही गझलरचनेच्या सखोल समुद्रात हा गझलकार पोहला नाही, असे म्हणावे लागते.

ह्या गोष्टीचे फायदे-तोटे यांचे परिणाम त्यांच्या गझलरचनांवर उमटलेले दिसतात. गझल चळवळीच्या सेतुबंधन कामी हा 'पाषाण' कोरडा राहण्याची शक्यता निर्माण झाली असती; पण अतिशय कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर डॉ.सांगोलेकरांनी गझलेच्या भाषेचे, गझलेच्या तंत्र-मंत्राचे, गझलेच्या सौंदर्याकर्षणाचे, गझलेच्या अंगभूत धीटपणाचे, गझलकार म्हणून आत्मचिंतनाचे, तसेच समाजचिंतनाचे शिंतोडे मात्र अंगावर मनमुराद उडवून घेतले आहेत. त्यामुळे त्यांच्या गझलेला इतर शागीर्दांप्रमाणे 'गुरुस्पर्श इस्लाह ट्रीटमेंट' फारशी झालेली दिसत नाही, तर स्वतंत्र, स्वानुभवउद्‌भवी, तंत्रशुद्ध, गझल त्यांच्याकडून लिहून झालेली दिसते

गझलेच्या भाषेच्या दर्जाच्या संदर्भात म्हणूनच डॉ. सांगोलेकरांची गझल भट संप्रदायाहून थोडी वेगळी दिसते. मराठीत फारसी-उर्दू गझलेचा प्रवेश झाल्यापासून अशी गझल लिहिणे फार थोड्यांना जमले आहे, त्यात पासष्टीमुळे डॉ. अविनाश यांचे नाव अग्रभागी चमकेल अशा ताकदीची संभावना निर्माण करणारा हा अविनाशपासष्टी झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

**झटकू आता सारी मरगळ**
**चला उभारू नवीन चळवळ**

१९८० च्या दशकात मराठी कवितेत 'अतिरेकी' मुक्तछंदामुळे छंदोबद्ध रचना करू इच्छिणाऱ्या संभाव्य कवींमध्ये एक प्रकारची मरगळलेली, धास्तावलेली अवस्था निर्माण झाली होती; पण सुरेश भटांनी पुकारलेल्या 'एल्गार'मुळे निर्माण झालेल्या 'झंझावाता'मुळे ही मरगळ नाहीशी झाली. आकाशात उडून गेली. त्यातून छंदोबद्ध कविता लिहू इच्छिणाऱ्या कवींची लाट समाजात निर्माण झाली. त्यांना छंदांच्या शिस्तीतून किनाऱ्यावर आणण्याचे काम 'गझले'ने केले. अविनाशसारखे त्या काळातले कवी म्हणूनच ह्या झंझावाताकडे आकृष्ट झाले; पण अविनाश यांच्या हाती गझल संशोधनाचे भरभक्कम शीड असल्याने ते ह्या झंझावातात स्वतंत्रपणे 'तग' देऊन उभे राहिले व वादळ थोडेसे शमल्यावर किनाऱ्याला अलगद लागले. ही त्याची भाषा पद्धत स्वतंत्र त्याची होती. तो भाषेचा लहेजा तर भटप्रणीत निश्चितच नव्हता. तरुणपणाच्या वादळामुळे झालेल्या 'सुगंधी' जखमांची वीण त्यांनी तंत्रशुद्ध पण समजप्रेम/मानवतेबद्दलचा कळवळा यांच्या सुईधाग्याने विणण्याचा स्वतंत्र 'कुटिरोद्योग' केला. गुरुशरणता, तंत्रशणता यांची कांस न धरता त्यांनी हुशारीने 'संतुलनाची

कांस' धरली. म्हणून त्यांची रचना वेगळ्या अंशावर, वेगळ्या ध्रुवावर झुकलेली दिसते.

भटांच्या सान्निध्यात राहूनही म्हणूनच सांगोलेकर निसर्गप्रेम, प्रेयसी हितगुज, पत्नीप्रेम ह्या फंदात मुळीच पडले नाहीत. गझलेच्या फारसी उर्दू प्रणीत मूळ व्याख्येला अनुसरून सांगोलेकरांनी प्रेयसीशी, निसर्गाशी किंवा पुढे जाऊन पत्नीशी हितगुज न करता आणि त्याही पुढे जाऊन स्वातंत्र्य देवतेला प्रेयसी मानून तिच्याशी हितगुज वगैरे करण्यापासून अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला व ह्या मूळ व्याख्येशी केव्हाच प्रतारणा करण्याचे धाडस केले. गझलविधा (डॉ. राम पंडित यांच्या भाषेत) प्रवाह हयाहीमुळे जिवंत राहिला आहे. गझलेच्या व्याख्या कालानुरूप बदलत गेल्या किंवा विस्तारत चाललेल्या आज दिसत आहेत ते अशा वेगळ्या प्रयत्नाने !

सुरेश भटांनी माधव जुलीयनांच्या कैक योजने पुढे जाऊन समाजातील तथाकथित संभावितांची पोलखोल केली व त्याच समाजातील तळागाळातील हीन दु:खितांची, दलितांची दु:खे, व्यथा, अन्याय अत्याचाराला गजलेतून थेट वाचा फोडली. विचारांच्या ह्याच बेसलाईनवरून डॉ. सांगोलेकरांसारखे गझलकार

**किती पारखी नजर तयांची**
**ते बैलाला गाय म्हणाले**

असे थेट निरीक्षण नोंदवू लागले.

१९९० च्या दशकापासून समाजातील अनेक चळवळी थंडावलेल्या दिसतात. अविनाश विचारतात–

**लढत का नाहीत आता माणसे ?**
**मारती का व्यर्थ बाटता माणसे ?**

आजचा समाज प्रत्यक्ष कृतीपेक्षा बढाईखोरी करण्यात व्यग्र आहे. हेच समाजचिंतन त्यांनी अशा शेरातून 'पासष्टी' मध्ये मांडले आहे. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारा 'सोळभोग' (सुरेश भटांचा शब्द) बोका तापून बसले त्याच्याकडे सांगोळेकर लक्ष वेधतात; पण दडपल्या गेलेल्या समाजाने आपली दु:खे, व्यथा मांडायची तरी कोणासमोर? असा प्रश्न त्यांना पडतो. तोच धागा पकडून निष्कर्ष काढतात की पातथारी, दगडी हृदयाचे विश्व चहूकडे पसरले असताना आम्ही आमचे अत्याचार कोणापुढे मांडावेत ? ह्या समाजात नीतिमूल्यांचा इतका चिखल झाला आहे की, नकलीच बाप आहे आणि फसवाच लेक (पुत्र) आहे. तिथे कोण कुणाला सुधारणार? ह्या प्रश्नावर नेमके बोट धाडसाने ठेवतो. म्हणूनच त्यांची रचना वेगळी ठरते.

एकीकडे ओसाड माळराने आणि एकीकडे पिकलेल्या पिकांचे सोने असा परस्परविरोधी दृश्यांचा माणदेश गझलकाराला व्यथित करतो. पुरोगामी म्हणविणाऱ्या समाजातील दुभंगलेली एकात्मता, वाढतच चाललेले जातीजातीतील वैमनस्य, आरक्षणाची फुसकी पिपाणी, ही विदारक चित्रे गझलकाराला अस्वस्थ करतात. 'अति तेथे माती' हे तत्त्व आजच्या रोगजर्जर झालेल्या लोकशाहीला लागू पडते असे ह्या राष्ट्रवादी गझलकाराच्या व्यथित मनाला वाटते. एकाच महापुरात सर्वच तत्त्ववादी, सत्यवादी वाहून गेले. समाज नेताविहीन 'गोंधळी' झाला. ह्या विचार प्रक्रियेत भविष्यातील गझलेत हा गझलकार नक्कीच प्रश्न विचारणार की 'अच्छे दिन' कुठे गेले ? कधी येणार? अच्छे दिन येत येत राहिले बाजूला आणि हा 'ड्यांबीस' करोना अवतरला आणि आम्हाला 'बुरे दिन' दाखवून गेला त्याबद्दलही डॉ. सांगोलेकर 'पासष्टीत' भाष्य करतात. कवीने भूत, भविष्य, वर्तमान या तीनही घटितांना शब्दकवेत असेच पकडले पाहिजे. जीवनाचा संघर्ष करताना अर्ध्यावर आयुष्य झाल्याची जाणीव जेव्हा गझलकाराला होते तेव्हा त्याच्या ओंजळीत फुलांच्याऐवजी काटेच आलेले दिसतात व युगानुयुगांच्या मानवी वंचनांपुढे हा गझलकारसुद्धा हतबल होतो.

तरीही ज्योतिबा, आंबेडकर, गांधीरूपी दीपस्तंभ त्याला पुन्हा जगण्याचे भान व शक्ती देतात.

'अविनाशपासष्टीतून' डॉ. अविनाशरूप ज्ञानोबा माउली समाजरूपी योगी चांगदेवाला गुरुवर्य सुरेशच्याच प्रेरणा–आज्ञेने पत्र पाठवतात. म्हणून ही गझल वेगळी !


गझलेच्या तंत्रशुद्धतेनुसार 'अविनाशपासष्टी' मधील सर्व गझला तंत्रशुद्ध, वृत्तबद्ध आहेत. शिवाय शिक्षकी पेशाला अनुसरून डॉ. सांगोलेकरांनी प्रत्येक गझलेच्या तळाला त्या त्या गझलेचे वृत्त नाव, वृत्त प्रकार, मात्रा संख्या, आवर्तनक्रम ह्या वाचक व अभ्यासकाला उपयुक्त होतील अशा तळटीपा दिल्या आहेत. तसेच प्रत्येक गझलात अविनाश ही तखल्लुस वापरली आहे. अशी दोन ठळक वैशिष्ट्ये ह्या गझल संग्रहाची सांगता येतील.

**दीपक करंदीकर**
भ्रमणध्वनी क्र.: ९४२३००७०३५

सुभाष वाघमारे यांच्या
'संविधानाच्या स्वप्नातलं गाव'
या काव्यसंग्रहावरील परीक्षण लेख

# स्वप्नाकडून वास्तवतेकडे घेऊन जाणारं काव्य ..! संविधानाच्या स्वप्नातलं गाव

**वर्षा मारुती भिसे**




काव्यसंग्रहाचे नावः **संविधानाच्या स्वप्नातलं गाव**
कवीचे नाव : **प्रा. डॉ. सुभाष वाघमारे**
प्रकाशक : **साहित्यविश्व प्रकाशन, पुणे**
पृष्ठेः
मूल्यः **२५०/–** रुपये

प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांचं संविधानाच्या स्वप्नातलं गाव हे अतिशय देखणं पुस्तक माझ्या हाती आलं आणि मला कळेचना या पुस्तकाबद्दल कौतुक कुणाकुणाचं करावं... या पुस्तकातल्या अप्रतिम कवितांबद्दल कवीचं कौतुक करावं की पुस्तकाच्या उत्कृष्ट छपाईबद्दल प्रकाशकाचं कौतुक करावं. सुबक अक्षरजुळणी केल्याबद्दल कौतुक करावं की पुस्तकातल्या आकर्षक व रेखीव चित्रांबद्दल कौतुक करावं. एकंदर हे पुस्तक म्हणजे मराठी साहित्यविश्वालाच पडलेलं एक सुंदर स्वप्न आहे आणि ते सत्यात आणल्यामुळे ज्या ज्या कुणाकुणाचा हे पुस्तक बांधण्यात हात आहे त्या सर्वांचंच मनापासून अभिनंदन!

या संग्रहाचे मुखपृष्ठच इतके सुंदर आहे की, संग्रह हातात घेतल्याबरोबर प्रथम त्यावरील चित्रच आकर्षित करते. चित्रात भारताच्या संविधानाच्या पुस्तकावर ठामपणे उभा असलेला मानवतेच्या विचारांनी बहरलेला एक हिरवाकंच पिंपळवृक्ष दिसतो. त्या वृक्षाच्या खोडाजवळ असलेल्या समता,

न्याय आणि विश्वबंधुत्वाच्या तत्त्वप्रणालीवर आधारलेल्या गावाकडे नवपरिवर्तनाच्या विचारांनी प्रेरित होऊन जाणारी माणसे येताना दिसतात. आतल्या पानावर तथागत गौतम बुद्धापासून ते रयत शिक्षण संस्थेचे सर्व रयत सेवक यांना अर्पण केलेली प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांची अर्पणपत्रिका लक्ष वेधून घेते... ते पान पलटताच ज्यांच्याकडे पाहताच मान आदराने झुकते अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो आणि त्यांचे लोकशाहीबद्दलचे प्रेरणादायी विचार समोर येतात. त्यानंतर या संग्रहाबद्दल परीक्षकांनी कवितासंग्रहाबद्द्ल विचार मांडले आहेत. डॉ. सुभाष वाघमारे यांचे जवळजवळ अकरा पानांचे विस्तृत मनोगत त्यांच्या संवेदनशील मनाचे कंगोरे हळूहळू उलगडू लागते. कवीच्या मनाची पार्श्वभूमी त्यांची जडणघडण कळल्यावर त्यांच्या कवितांबद्दल उत्सुकता दाटून आल्याशिवाय राहत नाही आणि त्यांची एक कविता वाचता वाचता त्या आपल्या मनाचा कधी ठाव घेतात ते कळत नाही असं हे देखणं पुस्तक मग सर्वांच्या प्रयत्नातून सत्यात उतरलेले आहे यावर विश्वास बसतो.

या संग्रहात काव्यातले बरेचसे प्रकार कवीने हाताळलेले आहेत. जशा मनात रुंजी घालणाऱ्या लयबद्ध बालकविता आहेत तशाच मुक्तछंदातल्या वैचारिक कवितादेखील आहेत, जशा प्रेम कविता आहेत. तशाच गझल सदृश रचनाही आहेत, काही चार तर काही दोन ओळींच्याही रचना आहेत. तसेच पुस्तकाच्या पानापानावर रेखाटलेली सूचक चित्रे कवितांचा रंग अधिकच गहिरा करतात.

प्रा.डॉ.सुभाष वाघमारे यांचा हा काव्यसंग्रह म्हणजे त्यांच्या संवेदनशील मनाने उभे केलेले स्वप्नवत तरीही भविष्यात प्रत्यक्ष होऊ शकणारे समाजाचे एक वास्तव रूपच आहे जे समानतेवर विश्वबंधुत्वावर आधारलेले आहे, आणि जे प्रत्येकाला हवेहवेसे वाटत आहे. डॉ सुभाष वाघमारे यांचे बालपण अशा काळात गेले आहे की, जेव्हा गावागावातील जातीचे प्रश्न जनसामान्यांच्या मनात स्वतःच्याच माणूसपणाबद्दल संभ्रम निर्माण करीत होते. गावकुसाबाहेरील शरमिंदे जगणे, सरंजामशाही, घरचे दारिद्र्य, निरक्षरता अशा एक ना अनेक प्रश्नांच्या कचाट्यात सापडून भरकटत जात असताना डॉ. सुभाष वाघमारे यांना साथ दिली ती फक्त शिक्षण आणि कवितेने. त्या अगतिक जगण्याचा त्यांच्या मनावर खोलवर झालेला आघात त्यांच्या कवितांमधील शब्दाशब्दातून व्यक्त होताना दिसतो.

गाव पातळीवरील आयुष्य हे शहरातील आयुष्यापेक्षा खूप वेगळे संदर्भ घेऊन जगावे लागते. तिथले जातिभेद, रीती परंपरा, त्यांच्या श्रद्धा –अंधश्रद्धा, संस्कृती या मानवी जीवनातले माणूसपणच झाकोळून टाकतात. संपूर्ण मुक्तपणे जगण्याचा आनंद ते जगण्याच्या कुठल्याही पातळीवर घेऊ देत नाहीत आणि हेच तिथले आज ही वास्तव आहे म्हणूनच हे दुःख व्यक्त करताना कवी म्हणतात

**एक इच्छा माझी, दैववाद जावा निघून**
**अंधारलेल्या गावात पडावं समतेचे ऊन...**

कधी गावातली सरंजामशाही, तिथल्या वाडवडिलांपासून चालत आलेल्या घराणेशाहीविरुद्ध कवीचा संताप अनावर होतो, तर कधी गावाचे नेतृत्व करणाऱ्या या गावगुंडांची भाषणे ऐकून कवीला अनेक प्रश्न पडतात. कवी म्हणतात,

**'टाळ्यांच्या गजरात यांची गाजली जरी भाषणे**
**वास्तविक समतेचे यांनाच कसे वावडे ?**

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या तत्त्वावर प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांचा दृढ विश्वास आहे; पण समाजात मात्र हे चित्र धूसर आहे. म्हणून ते खेदाने म्हणतात...

**चांदण्या होत्या दुसऱ्याकरिता**
**प्रकाश होता पण दुसऱ्या करिता..'**

आणि वर्षानुवर्षांच्या अंधारात प्रकाशाची वाट पाहणारं हे गाव मात्र प्रकाशाच्या आशेने अजूनही त्याच अंधारवाटा चाचपडताना दिसत आहे. गावाकडे जातीपातीची ही विषवल्ली माणूस नावाच्या झाडाला

एवढी घट्ट वेढून बसली आहे की, त्याची भयानकता वर्णन करताना कवी म्हणतात,

**'जातीच्या कालव्यातून जीव पण दिसते**
**माणसाला माणूस, पाहता येईना'**

माणसातलं माणूसपण खऱ्या अर्थाने ओळखणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटलांबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना प्रा.डॉ. सुभाष वाघमारे म्हणतात,

**रयतेची प्रयोगशाळा उभी करून**
**स्वाध्यायाचे नवे जग निर्मिले**

या दोन ओळींत केवढा तरी आशय कवी व्यक्त करून जातात. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था नुसती उभी केली नाही तर तिथे शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात स्वावलंबनातून त्यांनी स्वाभिमान जागृत केला. म्हणूनच त्या शिक्षण संस्थेतून बाहेर पडलेला प्रत्येक विद्यार्थी मग तो जगाच्या पाठीवर कुठेही असला तरी त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केल्याशिवाय राहत नाही

डॉ. सुभाष वाघमारे अनेकांचे ऋण व्यक्त करत असताना आपल्या शिक्षणासाठी आग्रही असणाऱ्या आपल्या आईचे उपकारही विसरत नाहीत. स्त्री ही माणसांची जन्मदात्री आहे अशी विश्वव्यापक भावना ते नम्रतेने व्यक्त करतात आणि निर्मात्याने निर्मिलेले माणूस नावाचं एक झाड अशी सुंदर उपमा ते स्त्रीला देतात.

कवी डॉ. सुभाष वाघमारे हे हाडाचे शिक्षक आहेत म्हणूनच त्यांच्यातला शिक्षक हा आजकालच्या शिक्षणाची झालेली दुरावस्था पाहून अस्वस्थ होतो. स्वतःच्या स्वार्थासाठी धनदांडग्यांना हाताशी घेऊन शिक्षणाशी खेळणारे शिक्षक पाहून अशा शिक्षकांचीही ते त्याच अधिकाराने शिकवणी घेतात. एका कवितेत ते म्हणतात,

**शिक्षकाची जात नसावी, मोठ्याला सामील**
**मोठेपणाच्या नादात इज्जत जाईल...!**

शिक्षणाचं सध्याचं हे चित्र असं दिसत असताना विद्यार्थ्यावर माया, प्रेम आणि संस्कारांची पाखर घालणारं, त्याचं हळवं मन आपल्या विद्यार्थ्यांजवळ मात्र काहीतरी मागत आहे. कवी म्हणतात,

**'तुमच्या उत्सुक चेहऱ्यावर समाधान भरलेलं**
**मला हवंय.... तेवढं सुख द्याल का'**

त्यांच्यासारख्या एका संस्कारक्षम शिक्षकाला विद्यार्थ्यांकडून याहून वेगळं ते काय हवं असणार?

अशा प्रकारे या संग्रहातील प्रत्येक कवितेतून व्यक्त होताना समतेचे, शांततेचे गाव कवीला हवे आहे. विश्वशांतीचे द्योतक आम्ही, पुजूया मानवतेला धर्म जात ना पंथ, इथे तर शांतीचा चेला.

असे म्हणता म्हणता मग शेवटी आज असे शांततेचे गाव जेव्हा कधी सत्यात उतरेल तेव्हा त्या सुवर्णमयी दिवसांचे वर्णन करताना कवी भावुक होतो आणि अशी एकच इच्छा व्यक्त करतो.

**अश्रू आनंदाचे सारे, माझ्या डोळ्यामध्ये येवो**
**संविधानासारखा, आता माझा गाव होवो**

असे हे सुंदर स्वप्न उद्याच्या स्वातंत्र्य, समता, न्याय आणि विश्वबंधुत्वावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला पडावं आणि ते सत्यात यावं हीच मनोकामना व्यक्त करून उद्याचा आशावाद आमच्यात निर्माण केल्याबद्दल प्रा. डॉ. सुभाष वाघमारे यांचे मनापासून आभार मानून मी त्यांना शुभेच्छा देते.

**वर्षा मारुती भिसे**
भ. ९९२०९७०१३७

■■

भूमिनिष्ठ समाजसुधारकांच्या जीवनचरित्रांवर आधारित प्रा. इंद्रजित भालेराव यांच्या दीर्घकवितासंग्रहावरील परीक्षण लेख

# शेती, माती आणि शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी धडपडणाऱ्या 'भूमिनिष्ठांची मांदियाळी'

**शरद ठाकर**




पुस्तकाचे नाव : **भूमिनिष्ठांची मांदियाळी**
लेखकाचे नाव : **इंद्रजित भालेराव**
प्रकाशन : **आदित्य प्रकाशन,** औरंगाबाद
पहिली आवृत्ती : – ५ जानेवारी २०२२
पृष्ठ : **१५६**
मूल्य : **२५०/–** रुपये

इंद्रजित भालेराव यांच्या साहित्याचा एकंदरीतच विचार केला तर त्यांनी शेती, शेतकरी आणि ग्रामीण जीवन जाणिवा प्रकर्षाने व्यक्त करणारे साहित्य लेखन केलेले आहे. त्यांच्या साहित्यातून भूमिनिष्ठांचा उद्गार दृग्गोचर झालेला दिसून येतो. 'भूमिनिष्ठांची मांदियाळी' हा अशाच पद्धतीने भारतातील साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्य करणाऱ्या सोळा भूमिनिष्ठ कर्त्या समाजसुधारकांचे जीवन चरित्र इंद्रजीत भालेराव यांनी दीर्घ कवितांच्या माध्यमातून मांडले असून, त्यात या व्यक्तिमत्त्वांची शेती, माती आणि शेतकऱ्यांबद्दल असणारी आस्था, आपलेपणा आपुलकी या दीर्घ कवितांमधून स्पष्टपणे दिसून येते.

चक्रधर स्वामींचे गाई–गुरे राखणे, गुराख्यांशी खेळणे, नांगर हाकायला काय विद्या लागते अशांना नागरी विद्येचा अनुभव देणे यातून शेतकऱ्यांबद्दल असणारी कणव दिसून येते.

संत ज्ञानेश्वरांनी वैचारिक दृष्टीने पडीक झालेली इथली भूमी अक्षरांचा पेरा करून कशी वहितीत आणली, ही वैचारिक पेरणी करण्यासाठी शेतकऱ्याला जसे कोणते पीक, कधी घेतले पाहिजे, कोणत्या पिकाची बेवड चांगली जमेल, हा अभ्यास असतो. तद्वतच ज्ञानेश्वरांनी इथल्या कुणब्यांचा वैचारिक, सामाजिक पाया भक्कम व्हावा

म्हणून, संस्कृतमध्ये असलेली गीता प्राकृत भाषेत आणून लोकांना खऱ्या अर्थाने जागृत केले. याबद्दल ते म्हणतात,

**' पडीत झालेलं रान नांगरून**
**वखरानं ढेकळं फोडून सवान करावं**
**तसं वहितीत नसलेलं माय मराठीचं रान**
**तुम्ही स्वतःच्या हिमतीनं वहितीत आणलं**
**अथक मेहनत करून पाझर फोडले ' (पृ.१८)**

सत्यासाठी आयुष्यभर धडपडणारा कबीर जेव्हा कवीला शेतात भेटतो, कवीशी संवाद साधतो, तेव्हा कबीर आपल्या मनातले गुज कवीला सांगतो. कबीरा प्रमाणेच सत्यासाठी लढणारे गांधीजी गावाकडे भेटायला आले. तेव्हा गावातल्या कुत्र्यांनी कसं गांधीजीला हातात काठी असूनसुद्धा तोडलं ; पण त्याच गावात जेव्हा कबीर येतो तेव्हा तो त्या कुत्र्यांना पुरून उरतो कारण गांधीजींचे जे तत्त्व समजणारा, समजून घेणारा आता गावात कोणीच राहिला नाही म्हणून, आता गांधीजींच्या तत्त्वांनुसार वागणाऱ्यांची नाहीतर कबीरासारखं हातातली काठी प्रसंगी शस्त्र म्हणून वापरायची गरज आहे, हे कबीर आपल्याला सांगतात. कदाचित गांधीजींची भाषा माणसाला समजेल; पण माजलेल्या कुत्र्यांना काठीची भाषा समजते म्हणून कधीकधी काठी उगारणेही महत्त्वाचे आहे, हेच कबीराला सांगायचे आहे. कबीर त्याच्या दोह्यांच्या रूपाने शेतकरी, शेतमजुरांसह, दलितांच्या वाडी-वस्तीत पोहोचलेला आहे आणि तिथे पोहोचून कबीराने दोह्यांमधून सर्व समाजातला जातिभेद मिटवण्याचे काम केले आहे. सत्याने आणि न्यायाने जगण्याचा धडा लोकांना दिला आहे.हे कसे झाले हे सांगताना कवी इंद्रजित भालेराव म्हणतात.

**'कोणी कोणाला जात विचारेना**
**कोणी कोणाला फसवेना**
**कोणी कोणाला गंडवेना**
**कोणी कोणाला दूर हो म्हणेना**
**एका जाणकाराला विचारलं**
**असं कोणतं वादळ आलं होतं तुमच्या गावात**
**तेव्हा तो म्हणाला वादळ-बिदळ काही नाही हो !**
**कबीर येऊन गेला इकडं!!' ( पृ. ३७)**

असे हे समाज जागृत करणारे,आदर्श जगाचं स्वप्न पाहणारे, कवितेला आपला जीव की प्राण मानणारे, सत्यासाठी लढणारे कबीररूपी वादळ अन् अंधश्रद्धा, भोंदूगिरी, सत्याची चाड आणि अन्यायाची चीड असणारे तुकाराम .'मढे झाकूणीया करीती पेरणी ' अशा पद्धतीने शेतकऱ्यांना पेरणीचे महत्त्व सांगणाऱ्या संत तुकारामांची दीर्घ कविता, रवींद्रनाथ टागोर यांची शेती मातीशी सख्य असणारी त्यांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकणारी कविता ही मुळातून वाचण्यासारखी आहे.

आपला खरा धर्म कर्मकांडापासून मुक्त असतो, त्यामुळे रवींद्रनाथांना निसर्गातच समाधी लागायची म्हणूनच ते खरा धर्म कुठे आहे असे म्हटल्यानंतर म्हणतात.

**'मातीतून जे जे उगवते वर**
**खरा तिथे तर धर्म आहे' ( पृ. ५७)**

कट्टर डाव्या विचारांचे पंजाबी कवी अवतार सिंह संधू म्हणजेच कवी पाश. पाश हे मोजक्याच क्रांतिकारी कवींपैकी एक कवी आहेत. त्यांनी आपल्या अल्पशा आयुष्यात फार कमी क्रांतिकारी कविता लिहून, केवळ पंजाबमध्येच नव्हे तर संपूर्ण भारतात एक नवा प्रकाश निर्माण केला. खलिस्तानी अतिरेक्यांनी पाश यांना अवघ्या ३८ व्या वर्षी ठार मारले, कारण त्यांनी नेहमीच गरीब, शेतकरी, शेतमजूर यांच्या हक्कांसाठी व्यवस्थेच्या विरोधात लेखन केले.

'बहिऱ्याला ऐकू येण्यासाठी मोठ्यानेच आवाज करावा लागतो' ह्या न्यायाने लढल्याशिवाय काहीही मिळत नाही. या गोष्टीवर त्यांचा विश्वास होता.

त्यांच्या 'हम लडीगे साथी' आणि 'सबसे खतरनाक होता है अपने सपनो का मर जाना' या कविता खूप प्रसिद्ध आहेत.

कवी पाश हे इंद्रजित भालेराव यांना जणू आपलेच सहोदर वाटू लागतात. त्याचे कारण म्हणजे पाश यांनी ज्या पद्धतीने शेती, मातीसाठी इमानाने जगणाऱ्या कष्टकऱ्यांच्या जीवन जाणिवांच्या कवितांचे लेखन केले. त्याच पद्धतीने कवी इंद्रजित भालेराव यांनी शेती आणि शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी, त्यांच्या विविध जीवन जाणिवा प्रकट करणारे लेखन केले. लेखन करत असताना कवी पाश यांनी ज्या पद्धतीने शेती-मातीसाठी इमानाने जगणाऱ्या जीवन जाणिवा प्रकट करणारे लेखन केले. लेखन करत असताना कवी पाश यांनी ज्या पद्धतीने

कुठल्याही गोष्टीची मनात भीती उत्पन्न होऊ दिली नाही किंवा व्यवस्थेच्या विरोधात लेखन केले. त्यासोबतच आपल्याला कुठल्या कुठल्या संकटांना सामोरे जावे लागेल किंवा त्यांच्या विरोधात लेखन केले म्हणून काही गोष्टी मिळायच्या नाहीत असा स्वार्थी विचार न करता शेतकरी कष्टकरी यांना न्याय मिळावा, या उदात्त हेतूने कवी इंद्रजित भालेराव यांनीही शासन, प्रशासनाची कुठलीही तमा न बाळगता बिनधास्तपणे लेखन केले. म्हणून कवी पाश यांची भूमिनिष्ठा इंद्रजित भालेराव यांना महत्त्वाची वाटते. कवी पाश यांच्या कवितेबद्दल ते म्हणतात,

**'उद्याच्या हिरव्या स्वप्नासाठी**
**सगळ्या शिवाराला**
**आग लावणारी होती तुझी कविता**
**सरकारी पुरस्कारांच्या तुकड्यांची**
**तिला मातब्बरी नव्हती**
**जे सरकारच तिला मान्य नव्हतं**
**ते उलथवणारं उलथनं होती तुझी कविता' (पृ.६६)**

भाकरी करपू न देण्याचं काम, जसं उलथनं करते तशी कवी पाश यांच्या कवितेत सरकारच पालथं करण्याचे सामर्थ्य होते. अनेक राजकीय पक्षांना असे वाटत असते, की व्यवस्थेच्या विरोधात बोलणाऱ्या कवी, कलावंतांना आपण आपल्या सोबत घेतले, तर तो व्यवस्थेच्या विरोधात बोलणार नाही म्हणून, कवी, कलावंतांना काही आमिष दाखवून राजकीय पक्ष त्यांना आपल्या दावणीला बांधायचे काम करत असतात आणि त्यामुळे कवी कलावंतांमधला न्यायासाठी, सत्यासाठी लिहिणारा, बोलणारा कलावंत स्वार्थासाठी मरतो. यामुळे कवी पाश किंवा कवी इंद्रजित भालेराव हे कोणत्याही पक्षाच्या दावणीला कधीही बांधले गेले नाहीत. त्यांनी त्यांच्या तत्त्वांसाठी अनेक मान सन्मानांना सहज ठोकर मारलेली आहे.

महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला ही हाक दिली ती खेड्यापाड्यातील ग्रामीण जनता समृद्ध व्हावी, खेडी स्वयंपूर्ण झाली तरच भारत स्वयंपूर्ण होईल, या अपेक्षेने; परंतु आज शहरी झगमगाटाच्या आकर्षणाने खेड्यातील माणूस शहरांकडे धाव घेऊ लागलेला दिसत आहे आणि त्यामुळे खेड्याचा विकास होण्याऐवजी खेडी भकास होत चाललेली आहेत. गांधीजींचा विचार जर रुजला असता तर नक्कीच खेडी समृद्ध झाली असती; परंतु पाश्चात्त्यांचे अंधानुकरण हे खेड्यांच्या आत्मनाशाला कारणीभूत ठरत असल्याचे दिसत आहे.

महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री असलेले स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. रसिक, साहित्यिक म्हणूनही त्यांचा सर्वांना परिचय आहे. त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी कृषी विषयक विचार मांडताना, शेतीच्या मालकी हक्काचा प्रश्न, भूमिहीनांचा प्रश्न व कृषी विकासासाठी अनेक उपाय योजना केल्या. वाजवीपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या लोकांच्या जमिनी यशवंतरावांनी भूमिहीनांना देऊन अनुत्पादक व पडीक असलेली जमीन भूमिहीनांना देऊन लागवडीखाली आणली. त्यासोबतच नद्यांवर धरणे बांधून शेतीसाठी पाण्याची सोय केली. त्यासोबतच विस्थापित लोकांचे पुनर्वसन केले. शेतकऱ्यांनी कृषी शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, असे यशवंतराव चव्हाण यांना नेहमी वाटायचे. शेती आणि शेतकऱ्यांसाठी यशवंतराव चव्हाणांचा जीव कसा झुरायचा याबद्दल कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

**'रानावनात खेळला,**
**शेती मातीत मळला**
**तिथे राबणाऱ्यासाठी जीव आतून झुरला' (पृ.८९)**

शेतकरी कामगार पक्षाचे नेते आमदार राहिलेले भाई उद्धवराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या अनेक प्रश्नांसाठी नेहमीच लढा दिला. त्या मध्ये शेतकऱ्यांना द्यावा लागणारा चुकीचा कर, जमीन सुधारणा कायदा, कसेल त्याची जमीन या नियमानुसार जमिनीचे पुनर्वाटप, कुळकायदा, कमाल जमीन धारणा, उत्पादन खर्चावर आधारित भाव, शेतमालासाठी स्वतंत्र बाजारपेठ अशा बाबींसाठी त्यांनी नेहमीच लढा दिला. शेतकऱ्यांना जागृत करून, त्यांना एकत्र करून सहकारी साखर कारखाने शेतकऱ्यांच्या ताब्यात आणून दिले. त्यासोबतच सावकारशाहीला त्यांनी कडाडून विरोध केला व शेतकरी सावकार मुक्त झाला पाहिजे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. अशा शेतकऱ्यांसाठी कष्टकऱ्यांसाठी काम करणाऱ्या भाई उद्धवराव पाटलांसारख्या पुढाऱ्यांची आज वानवा पाहायला मिळते. त्यामुळे उद्धवराव पाटलांबद्दल कवी इंद्रजित भालेराव म्हणतात.

**'आज तुझी जास्तच आवश्यकता होती**
**या शेतकऱ्यांच्या आत्महत्या पर्वात**
**आणि जागतिकीकरणाच्या सुनामीत**
**तुझ्या हातातला आसूड पाहून तरी**
**सत्तेच्या गाड्याचे बैल नीट चालले असते**
**शेतकऱ्यांना त्यांच्या खांद्यावरच्या क्रूसाचे निदान**
**ओझे तरी पेलले असते ' ( पृ. ९८)**

शेतकऱ्यांचे नेते असलेले शरद जोशी ज्यांना शेतकऱ्यांचे पंचप्राण म्हणून लोक ओळखतात. त्यांनी शेतकऱ्यांना एकीचे महत्त्व पटवून दिले. शेळ्या-मेंढ्या एकत्र याव्या त्या पद्धतीने पूर्वी अनेकांनी आपल्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांना एकत्र केले आणि स्वतःचे हित साधले, की पुन्हा शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले; परंतु शरद जोशी यांनी शेतकऱ्यांना आपले खरे शत्रू कोण आहेत. त्यांना कसे ओळखायचे हे शिकवले व शेतकऱ्यांना त्यांच्या मुक्तीचा मार्ग कुठून जातो, हे दाखवून दिले. त्यासोबतच फक्त शेतकरी माणूसच नाही तर त्यासोबत गुलामीची गुलाम असलेली स्त्रीही खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाली पाहिजे. यासाठी स्त्रियांच्या मनात स्वातंत्र्याचा विचार त्यांनी पेरला.

विलासराव साळुंखे हे भूमिहीन मजुरांना देखील पाण्याचे समान वाटप व्हावे या मागणीसाठी तीस वर्षे लढा देणारे, तसेच पाणी पंचायत या संकल्पनेने सामूहिक व्यवस्थापनाद्वारे पाण्याची साठवण आणि वितरण करून शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवणारे सामाजिक कार्यकर्ते होते. दुष्काळासारख्या कठीण काळालाही संधी समजून, त्या कठीण काळातही भूमीतल्या प्रश्नांची उत्तरे आपल्याच भूमीत सापडतात या विश्वासावर पाणी पंचायतच्या माध्यमातून खडकाळ माळरानावर हिरवीगार शेती फुलवून शेतकऱ्यांच्या मनात जगण्याची उमेद विलासराव साळुंखे पेरतात. पुढे ते पाणी बाबा म्हणून ओळखले जाऊ लागले म्हणून त्यांच्याबद्दल कवी इंद्रजित भालेराव म्हणतात,

**'घाम आला आणि ग्रामाला प्रतिष्ठा देऊन**
**यांनी पृथ्वीवर स्वर्ग निर्माण केला होता ' ( पृ.११६ )**

कायमच्याच दुष्काळामुळे आपला गाव सोडून जाणाऱ्या लोकांना सोबत घेऊन पोपटराव पवार यांनी आपल्या हिवरे बाजार या गावात अभिनव प्रयोग केले आणि त्या प्रयोगांच्या माध्यमातून निर्जीव खडकांनाही पाझर फोडून कशी हिरवी समृद्धी निर्माण केली, हे या कवितेतून समजते. त्याच दीर्घ कवितेत शेवटी 'लागो बाई लागो साता घरा लागो' (पृ.१२५) ही कविता 'भूमिनिष्ठांची मांदियाळी' या संग्रहातील जणू पसायदानच ठरावी अशी सर्वांचे मंगल व्हावे, ह्या भावनेने ओतप्रोत भरलेली कविता वाटते.

सरदार वल्लभाई पटेल, बराक ओबामा, साधना आमटे आणि गाडगेबाबा यांच्या दीर्घ कवितांमधूनही त्यांची भूमिनिष्ठा आपल्याला दिसून येते.

सरदार जाधव यांचे समर्पक मुखपृष्ठ त्यासोबतच त्या-त्या भूमिनिष्ठ व्यक्तिमत्त्वाचे चित्र व इतर रेखाटने कवितांना अधिकच जिवंत करतात. समीक्षक प्रकाश देशपांडे केजकर यांनी समर्पक शब्दांत; या दीर्घ कविता लेखनाचे जे धाडस कवी इंद्रजित भालेराव यांनी समर्थपणे पेलले आहे त्याबद्दल; त्यांचे कौतुक केलेले आहे.


एकंदरीतच शेती, माती आणि शेतकऱ्यांच्या उत्कर्षासाठी धडपडणाऱ्या 'भूमिनिष्ठांची जणू ही मांदियाळी' आहे. या कविता संग्रहातून आपल्याला भूमीच्या निष्ठेपायी माणूस कोणत्याही क्षेत्रात यशोशिखरावर जरी गेला असला तरीही माणसाच्या मनात असलेली भूमीच्या बद्दलची ओढ या कवितांमधून प्रकर्षाने जाणवते ही ओढच पुढच्या पिढ्यांना भूमी निष्ठा जपण्यासाठी नक्कीच मार्गदर्शक ठरेल हा विश्वास वाटतो.

**शरद ठाकर**
सेलू जि.परभणी
चलभाष : ८२७५४३६६७५

जी. ए. उगले यांच्या 'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील' या ग्रंथाबाबत विस्तृत माहिती देणारा लेख

# सत्यशोधक चळवळीचा दस्तावेज : सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखनसमीक्षा)


## प्रा. डॉ. नाना झगडे


**ग्रंथाचे नाव :** सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखन समीक्षा)
**लेखक :** जी. ए. उगले
**प्रकाशन :** अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे.
**पृष्ठे :** ३३२
**किंमत :** ५००/- रुपये

शूद्रातिशूद्राच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी वर्तमानपत्राची गरज भासू लागली; तेव्हा महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीतून अनेक ब्राह्मणेतर वृत्तपत्रे उदयास आली. ब्राह्मणेतरांची स्वतंत्र पत्रे असल्याशिवाय त्यांच्या भावना, विचार मुक्तपणे मांडले जाणार नाहीत, असे महात्मा फुले यांना सतत वाटत होते. महात्मा फुले यांनी सामाजिक कार्य सुरू असतानाच धार्मिक दास्यातून बहुजनसमाजाची मुक्ती करण्यासाठी पर्यायी संस्कृती म्हणून सत्यशोधक समाजाची स्थापना केली. 'समताधिष्ठित शोषणमुक्त समाज निर्मिती' हे सत्यशोधक चळवळीचे मुख्य सूत्र होते. मात्र या विचारांचा प्रचार-प्रसार करण्यासाठी त्या काळातील मराठी नियतकालिकांचे फारसे सहकार्य मिळत नसे. हा प्रकार लक्षात आल्याने महात्मा फुले यांना बहुजन समाजाच्या मालकीची वृत्तपत्रे असायला हवीत याची जाणीव झाली. या संदर्भात महात्मा फुले म्हणतात, ''एकंदर सर्व भट वर्तमानपत्रकर्त्यांची आणि शूद्र व अतिशूद्रांची जन्मापासून एकदा सुद्धा अशा कामी गाठ पडत नाही. त्यातून बहुतेक अतिशूद्रांस तर वर्तमानपत्र म्हणजे काय, कोल्हा का, कुत्रा का, माकड हे काहीच समजत नाही. तर मग अशा अनोळखी अतिशूद्रांची मते ह्या सर्वज्ञ सोवळ्या

वर्तमानपत्रास कोठून व कशी कळणार'' (''गुलामगिरी : म. फुले समग्र वाङ्‌मय संपादक: कीर, मालशे, पृ.१३९ ) पत्राची आवश्यकता तर आहे; पण फारशी अक्षर ओळख नसलेल्या बहुजन समाजासाठी वर्तमानपत्र काढले तर ते चालेल का? खुद्द म. फुले अशा दु:शंक मन:स्थितीत असताना कृष्णराव भालेकर यांनी १ जानेवारी १८७७ रोजी 'दीनबंधू' हे पत्र सुरू केले. शेतकरी, कामगार, कष्टकरी यांची दु:स्थिती मांडून शोषणमुक्त समाज निर्माण करण्यासाठी 'दीनबंधू' ने काम सुरू केले. महात्मा फुले, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, नारायण मेघाजी लोखंडे, भास्करराव जाधव, भगवंतराव पाळेकर, दिनकरराव जवळकर आदी सत्यशोधकांच्या नेतृत्वातून सत्यशोधक समाजाच्या विचारधारेच्या प्रचार आणि प्रसारासाठी पुढे मग 'दीनमित्र,' 'शेतकऱ्याचा कैवारी,' 'विजयी मराठा,' 'जागृती,' 'राष्ट्रवीर, हंटर,' 'प्रबोधन, 'नवयुग,' 'ब्राह्मणेतर,' 'कैवारी,' 'भगवा झेंडा' इत्यादी नियतकालिके उदयाला आली.

दीनबंधूकार कृष्णराव भालेकर यांचे दत्तक पुत्र मुकुंदराव पाटील यांनी वडलांच्या इच्छेनुसार सत्यशोधक समाजाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी १९१० मध्ये 'दीनमित्र' पुन्हा सुरू केले. आपल्या या पत्रातून त्यांनी सावकार, अधिकारीवर्गाची हुकूमशाही, धर्माच्या नावाखाली भट-भिक्षुक यांचे चाललेले कर्मकांडी थैमान, अंधश्रद्धेचे वाढलेले प्रस्थ, गावकामगारांकडून होणारे शेतकऱ्यांचे शोषण याविषयी वाचा फोडली. बहुजन समाजातील शेतकरी-कष्टकरी, बलुतेदार, शूद्रातिशूद्रांचे दु:ख-दु:स्थिती, अस्पृश्यता आणि धर्माच्या नावाखाली होणारे शोषण याविषयी त्यांनी जनजागृती केली. शिक्षणप्रसार करण्यासाठी, जातीयता, अस्पृश्यता, धर्मभोळेपणा दूर करण्यासाठी त्यांनी तरवडीसारख्या छोट्या गावातून इ. स. १९१० ते १९६७ असे ५८ वर्षे 'दीनमित्र' चालविले व समाजप्रबोधनाचे मोठे काम केले. त्यासाठी त्यांनी अग्रलेख, भाषणे, प्रसंग कथा, कादंबरी असे विविधांगी लेखन केले.

'सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव पाटील (जीवनकार्य आणि लेखन समीक्षा)' या ग्रंथाची जी. ए. उगले यांनी तीन विभागात विभागणी केली आहे. पहिल्या विभागात मुकुंदराव पाटील यांच्या जीवनकार्याचा परिचय करून दिला आहे. दुसऱ्या विभागात मुकुंदराव पाटील यांच्या लेखनाची समीक्षा केली आहे; तर तिसऱ्या विभागात परिशिष्टे दिली आहेत. एकूण दहा प्रकरणांत हा ग्रंथ विभागला आहे. मुकुंदराव पाटील यांचे जीवनकार्य आणि सत्यशोधकीय साहित्यलेखनाची समीक्षा असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथातून वाचकाला मुकुंदराव पाटील यांच्या समग्र जीवनकार्याचा वस्तुनिष्ठ परिचय होत जातो.

पहिल्या भागात लेखकाने सत्यशोधक भालेकर घराण्याचा परिचय करून दिला आहे. त्याचबरोबर कर्तव्यतत्पर प्रतिभावंत मुकुंदराव यांच्या दत्तकविधानाची पार्श्वभूमी सांगत त्यांच्या जीवनाची वाटचाल, कृष्णराव भालेकर यांचा लाभलेला बौद्धिक वारसा, मुकुंदरावांचे लग्न, विठाबाईंचा विवाह, सत्यशोधक दीनमित्रविरुद्ध सनातन्यांच्या कागाळ्या, दीनमित्र प्रेसवर जप्ती, कर्जत अभियोग आणि ब्राह्मणेतर पक्षाची सभा, पहिल्या पत्नीचे निधन, सत्यशोधक समाज प्रतिनिधी सभा, दीनमित्र पत्राचे तरवडीस स्थलांतर, मुकुंदराव पाटलांचा द्वितीय विवाह, सत्यशोधक चळवळीच्या इतिहासलेखनाची मनीषा, अध्यक्ष : माळी शिक्षण परिषद अकोट, रावसाहेब, लोकहितवादींची 'शतपत्रे' आणि 'दीनमित्र पत्र,' दीनमित्र पत्राला नोटीस, मातंग परिषद, जनक मातोश्रींचे निधन, दांडेगाव येथील सत्यशोधक अधिवेशन, चौथी प्रांतिक परिषद आणि रामराव रोखडाजींचे लग्न, नेवासे कोर्ट आणि खटला डिसमिस, डॉ. पंजाबराव देशमुख आणि विमलताईंच्या विवाहाचे जाहीर अभिनंदन, दीनमित्र पत्र आणि कैवारी ट्रस्ट, मुकुंदराव आणि फिच्युला, अध्यक्ष : सत्यशोधक समाज, साहित्य परिषद, दीनमित्र रौप्य महोत्सव : सासवड येथील सत्कार, स्मृतिचित्रेकर्त्या लक्ष्मीबाई टिळक कालाधीन, ज्ञानपिपासू मुकुंदराव, दीनमित्रकारांची ६१ वी, 'दीनबंधू' पत्राचे आद्य संपादक भालेकर, कृष्णराव भालेकर यांच्या चरित्रलेखनाचे प्रयत्न, सत्यशोधक परमस्नेही जाधव-डोंगरे-लट्ठे, महात्मा फुले चित्रपट आणि आचार्य अत्रे यांची तरवडी गावास अकस्मात भेट, पत्नीवर मोठी शस्त्रक्रिया, थोरल्या सूनबाई निवर्तल्या, मुख्यमंत्र्यांची भेट, महर्षी शिंदे आणि मुकुंदराव भेट, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज तरवडीस, जागृतिकार पाळेकरही तरवडीस, पत्रकारितेचा सजग वसा, आजारपण

आणि इहलोकीचा निरोप, म. फुलेपंथीय अखेरचा सत्यशोधक या प्रमाणे मुकुंदरावांचा जीवनपट लेखकाने उभा केला आहे.

लेखनसमीक्षा या दुसऱ्या भागात 'लेखक-विचारवंत मुकुंदराव पाटील' या विभागात मुकुंदराव पाटील यांच्या बहुविध लेखनाची समीक्षा केली आहे. हिंदू आणि ब्राह्मण, शास्त्रोक्त गप्पा, देवांची परिषद, चोरांची परिषद, आसुडाचे फटके, काठीचे सपाटे, पेशवाईतील मौजा, सारासार विचार, टाचेचे गुद्दे, मनोरंजक संवाद, पिंपळाचा पार, धर्मगुरू म्हणविणारांस ताकीद या सदरलेखनांचा सविस्तर परिचय उगले यांनी करून दिला आहे. मुकुंदराव पाटील यांच्या लेखनाचे केंद्र कृषीकेंद्रीतता असून दुष्काळ, अतिवृष्टी, शासनाचे जाचक निर्णय, शासकीय यंत्रणेकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक, शेतीमालाचे योग्य भाव न मिळणे अशा अनेक कारणाने शेती व शेतकऱ्यांची दु:स्थिती, शोषण, पुरुषप्रधान परंपरा, स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक, कुप्रथा ही स्थिती बदलायला हवी यासंबंधीचे विचार मुकुंदराव पाटील यांच्या लेखनातील विचारांचे बीज असल्याचे लेखक स्पष्ट करतात. या प्रकरणात मुकुंदराव पाटील यांची सत्यशोधकीय विचारधारेची सूत्रे विस्ताराने प्रकट झाली आहेत.

कवी मुकुंदराव पाटील या प्रकरणात देशभक्त लीलासार, सुबोध श्लोक, कुळकर्णी लीलामृत, शेटजी प्रताप या काव्यांत मुकुंदराव शेतकरी, शेतमजूर, कुळे, पाटील, कुलकर्णी, शेटजी यांच्या संबंधाचे, शोषणाचे, दु:स्थितीचे वास्तवपूर्ण चित्रण करून सत्यशोधक समाजाचे माहात्म्य, मध्यस्थाचे उच्चाटन, विद्येचे महत्त्व, अनिष्ट कालबाह्य सामाजिक रूढींना व मूर्तिपूजेला विरोध असा सामजिक आशय व्यक्त करणारे वास्तववादी कवी म्हणून मुकुंदराव पाटील यांच्या काव्यलेखनाचे मूल्यमापन करून त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्ट्ये उगले यांनी नमूद केली आहेत. एकंदरीत मराठी कवितेच्या इतिहासातील कवी मुकुंदराव पाटील यांचे योगदान ते निश्चित करतात. नाटककार-सिने पटकथाकार मुकुंदराव पाटील या प्रकरणात राक्षसगण, हेडमिस्ट्रेस, पतीचा पाठलाग : एक चित्रकथा या आधारे लेखकाने मुकुंदराव पाटील यांच्या लेखनाचे वेगळेपण त्यांनी स्पष्ट केले आहे.

कथाकार मुकुंदराव पाटील या प्रकरणात शेतकऱ्यांचे जीवन, धार्मिक रूढी, अंधश्रद्धा, सावकारशाही, भ्रष्ट अधिकारी आणि भिक्षुकशाही यावर आधारित असणाऱ्या व इहवादी विचारांचा प्रसव करणाऱ्या कथांचा समीक्षात्मक परिचय उगले यांनी करून दिला आहे. 'होळीची पोळी,' 'चंद्रलोकीची विलक्षण रूढी अथवा आमच्या दादासाहेबांची फजिती,' 'ढढाशास्त्री परान्ने,' 'तोबा तोबा,' 'राष्ट्रीय तारुण्य' या कादंबऱ्यांची सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय अंगाने लेखकाने चिकित्सा केली आहे. दीनमित्र सिल्व्हर ज्युबली अंकातील वैचारिक लेखनाचा आढावाही लेखकाने घेतला आहे.

अध्यक्षीय भाषणे या प्रकरणात मुकुंदरावांनी प्रसंगोपात्त केलेल्या भाषणांमधील विचारविश्वाचा नेमका मागोवा घेण्यात चरित्रकार उगले यशस्वी झालेले आहेत. या वेगवेगळ्या प्रसंगी दिलेल्या भाषणांतून मुकुंदराव पाटील यांच्या परखड मत प्रतिपादनाचा व ओघवत्या वक्तृत्वशैलीचा प्रत्यय कसा येतो तेही उगले यांनी उलगडून दाखविले आहे. दीनमित्र पत्रातील अग्रलेख या प्रकरणात शेतकऱ्यांसंदर्भात अग्रलेखमाला, धर्मचिकित्सक अग्रलेख, शिक्षणविषयक अग्रलेख, सत्यशोधक समाज : अधिवेशनांवरील अग्रलेख, गुलामगिरीवरील शंकानिवारण (तीन अग्रलेखांची संयुक्तमाला), धनवडे प्रकरण, क्षात्रजगद्गुरू, वेडगळ चळवळ, सत्यशोधकांचे सांगणे, तलाठी नेमणे, केसरीचा दाह!, जिवे मारण्याची धमकी, स्मृतिस्तंभ, गाडगेबाबांच्या निरुपणातील प्रासंगिक विसंगती, धर्मांतर आणि बाबासाहेब इ. अग्रलेखांतून तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय समाजजीवनाचे संदर्भ सापडतात. बहुजन समाजाची सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून मुक्तता करणे हे सूत्र त्यांच्या सर्वच लेखनात सापडते. अग्रलेखातून मुकुंदरावांचा प्रकट होणारा परखड स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणे मत मांडण्याचे कसब दिसून येते. आद्य ग्रामीण पत्रकार म्हणून मुकुंदराव पाटील यांचे योगदान लेखकाने समर्पक रीतीने विशद केले आहे.

ग्रंथाच्या परिशिष्टामध्ये सत्यशोधक दीनमित्रकार मुकुंदराव गणपतराव पाटील यांचा जीवनपट, भालेकर-पाटील घराण्याची वंशावळ, दीनमित्रकारांचे शालेय हजेरी

पुस्तक : हितकारिणी सभा हायस्कूल, जबलपूर, नाम. भास्करराव जाधवांचे मुकुंदरावांना पत्र, दीनमित्र पत्राच्या एका अंकाचे प्रथम पृष्ठ, राजर्षी शाहू महाराज यांनी दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांना पाठविलेली तार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांना पाठविलेले पत्र, कुळकर्णी लीलामृतवरील केसरी आणि दीनमित्र पत्रातील अग्रलेख, दीनमित्र हँडप्रेस, मुकुंदराव पाटील यांची मौजे तरवडी येथील त्यांच्या शेतातील समाधी, ढढ्ढाशास्त्री परान्ने कादंबरीवरील विदुषी रोझॅलिंड ओ हॅनलन यांचा समर्पक अभिप्राय, मुकुंदराव पाटील यांचे हस्ताक्षर, सत्यशोधक जी. ए. उगले यांचा संक्षिप्त परिचय, आधारभूत ग्रंथसूची या सर्व गोष्टींचा समावेश केला आहे. या परिशिष्टामुळे ग्रंथाला संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे.

मुकुंदराव पाटील वृत्तपत्राचे संपादक असल्याने परिणामकारक भाषेचा वापर, भाषाप्रभुत्व, बहुश्रुतता, लेखनातील विदारक वास्तव, विनोदाचा वापर, उपरोध, विडंबनात्मक उपहासगर्भ लेखनशैली या भाषिक सामर्थ्यांना उगले वेळोवेळी अधोरेखित करताना दिसतात.

या ग्रंथाला प्रा. डॉ. सुधाकर शेलार यांची दीर्घ प्रस्तावना लाभली असून सतीश जमोदकर यांनी पाठराखण केली आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेत शेलार यांनी सत्यशोधक विचार हा शाश्वत व वैश्विक असून तो नव्या पिढीसमोर ठेवण्याची गरज स्पष्ट केली आहे. सद्यःस्थितीत जातीय, धार्मिक अस्मिता अधिक तीव्र होत असून त्यातून आपापसात द्वेष, तेढ निर्माण करण्यासाठीचे इंधन नवसमाजमाध्यमांतून पुरवले जात असल्याचे चित्र आहे. अशा परिस्थितीत विवेकवादी, बुद्धिवादी, चिकित्सक विचार रुजविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. ब्रिटिश राजवट, पेशवाई, पुरोहितशाही, धर्माचे प्राबल्य, आधुनिक भौतिकविद्यांचे शिक्षण, महात्मा फुले यांचे कार्य, सत्यशोधक समाजाची स्थापना या सर्व पार्श्वभूमीवर मुकुंदराव पाटील यांच्या लेखनकार्याचे तत्कालिक योगदान त्यांनी विशद केले आहे. डॉ. शेलार यांनी या ग्रंथाची चिकित्सा करून ग्रंथाची प्रस्तुतता विशद केली आहे. ग्रंथाची प्रस्तुतता स्पष्ट करताना ते म्हणतात, ''महात्मा फुले म्हणाले होते, 'विद्येविना मति गेली, मतिविना नीति गेली, नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले...' आज मात्र विद्या प्राप्त होऊनही सांस्कृतिक व धार्मिकदृष्ट्या बहुजनवर्ग खचलेलाच दिसतो. ज्यांनी आपल्यावर पिढ्यान्‌पिढ्या अन्याय केला, अशांच्या प्रतीकांना आणि प्रारूपांना तो आपलेसे करतो आहे. या समाजाला जागे करण्यासाठी पुनश्च एकदा फुले - शाहू- आंबेडकरांच्या विचारांचे जागरण करावे लागणार आहे. असे जागरण करू पाहणाऱ्यांना जनसामान्यांपर्यंत घेऊन जावे लागणार आहे. म्हणूनच मुकुंदराव पाटलांचे हे 'विचारचरित्र' पुढील पिढ्यांपर्यंत जाणे गरजेचे वाटते...'' डॉ. शेलार यांनी व्यक्त केलेले हे मत समकालाकडे बारकाईने पाहिल्यास अगदी समर्पक वाटते.

या ग्रंथाच्या निर्मितिप्रक्रियेसंदर्भात आवर्जून सांगितले पाहिजे. प्रा. डॉ. सुधाकर शेलार व प्रा.डॉ. शिरीष लांडगे यांच्या कल्पनेतून समाजमाध्यमातून या ग्रंथाच्या निर्मितीसाठी अर्थसाहाय्य करण्याविषयी आवाहन करण्यात आले. कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनच्या काळात अशा वैचारिक ग्रंथाच्या निर्मितीचे काम लोकवर्गणीतून हाती घेण्याचे धाडस या दोघांनी केले. महामारीने समाजात नकारात्मक वातावरण तयार झाले होते. समाजमाध्यमे त्यात भर घालत होती. सर्वत्र कोरोनाने निधन झालेल्या मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करणारे संदेश आणि तत्संबंधी पोस्ट फिरत होत्या. एकूणच समाजमनात नकारात्मकता निर्माण होत होती. अशा परिस्थितीत या ग्रंथाच्या निर्मितीसाठी अर्थसाहाय्य करण्याविषयी आवाहनाला प्रतिसाद देत दोन आठवड्यांत महाराष्ट्रभरातून ६१ लोकांनी प्रत्येकी पाच हजार रुपयांचे अर्थसाहाय्य दिले. या घटनेतून बहुजन समाजातील बुद्धिजीवी वर्गाला सत्यशोधक चळवळीबद्दल असलेली आस्था अधोरेखित होते आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

बहुजन समाजाच्या येणाऱ्या पिढ्यांपर्यंत बहुजन समाजजीवनाची तत्कालीन स्थिती व परिवर्तनवादी सत्यशोधक विचार पोहोचविण्यासाठी हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल. सत्यशोधक चळवळीचा इतिहास समजून घेण्यासाठी एक महत्त्वाचा दस्तऐवज या ग्रंथाच्या रूपाने निर्माण झाला आहे. साहित्येतिहासाच्या पुनर्लेखनाच्या दृष्टीने ही बाब लाखमोलाची आहे. त्याचप्रमाणे सत्यशोधकीय साहित्याच्या इतिहासात मोलाची भर घालणारा अभ्यासपूर्ण असा हा मूलगामी ग्रंथ आहे. साहित्येतिहासकारांनी उपेक्षित ठेवलेला एक विचारवंत साहित्यिक या ग्रंथामुळे नव्या पिढीसमोर येतो आहे, ही नक्कीच दखलपात्र गोष्ट आहे.

**प्रा. डॉ. नाना झगडे** मराठी विभागप्रमुख,
वाघीरे महाविद्यालय सासवड, ता.पुरंदर जि. पुणे
भ्रमणभाष : ९४२२६५२१९७

# पालशेतची विहीर : स्त्री वेदनेचा हुंकार

**आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनावर आधारित 'पालशेतची विहीर' या विजय नाईक लिखित नाटकावरील परीक्षण लेख**

**प्रा. चिन्मय मधू घैसास**

**प्रस्तावना**

आद्य महिला नाटककार असा ज्यांचा उल्लेख केला जातो त्या म्हणजे हिराबाई पेडणेकर. कोकणातील सावंतवाडीत २२ नोव्हेंबर १९८६ रोजी जन्मलेल्या हिराबाईंचा जीवनप्रवास कोकणातच, रत्नागिरीतील पालशेत गावी १८ ऑक्टोबर १९५१ या दिवशी थांबला. बालपणापासून मुंबईतील गिरगावात बालपण घालवलेल्या हिराबाईंनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीच्या विरुद्ध जात शिक्षण घेतले. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी शिक्षण हाच उत्तम मार्ग असू शकतो यावर त्यांचा दृढ विश्वास होता. स्वत:च्या कार्यकर्तृत्वाने त्यांनी ही गोष्ट सिद्धही करून दाखवली. घराण्यातच असलेल्या नृत्य, संगीत या कलांचा उत्तम परिचय त्यांना होता. त्याचप्रमाणे साहित्याचीही जाण फार चांगल्या पद्धतीने विकसित झाली होती.

नाटककार गोविंद बल्लाळ देवल यांच्या प्रेरणेने त्यांना मराठी नाटकाची गोडी लागली. नंतरच्या काळात अनेक नामवंत साहित्यिक, नाटककार आणि संगीतकारांशी त्यांचा परिचय झाला आणि त्यातून त्यांची प्रतिभा विकसित झाली. या मंडळींकडून स्फूर्ती घेत हिराबाई स्वत: नाटककार झाल्या. हिराबाईंनी १९०५ साली 'जयद्रथ विडंबन' हे पहिले (संगीत) नाटक लिहिले. प्रकाशनाच्या तब्बल ११६ वर्षांनंतर २०२० साली गोव्यातील फोंडा येथे राजीव गांधी कला मंदिरात दिग्दर्शक विजयकुमार नाईक आणि त्यांची संस्था व्हीटीबीटी (विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर, फोंडा) यांनी या नाटकाचा पहिलावहिला प्रयोग सादर केला. 'संगीत दामिनी' हे त्यांचे नाटक १९०८ साली रंगभूमीवर सादर झाले आणि १९१२ साली ते पुस्तकरूपाने प्रकाशित झाले. हिराबाई पेडणेकर यांनी नाटकासोबतच कविता आणि इतर लेखनही केले. तत्कालीन अव्वल दर्जाच्या नियतकालिकांत त्यांचे लेखन प्रसिद्ध होई. त्यांनी लिहिलेल्या मीराबाईच्या आणि कवी जयदेवाची पत्नी यांच्यावरच्या दोन्ही नाटकांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. हिराबाईंनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'प्रेमशोधन' (१९१०) आणि राम गणेश गडकरी यांच्या 'पुण्यप्रभाव' (१९१६) या नाटकांना संगीत दिल्याचाही दाखला सापडतो.

हिराबाई पेडणेकरांच्या जीवनावर वसंत कानेटकरांनी 'कस्तुरीमृग' हे नाटक लिहिले होते. अलीकडेच 'आद्य महिला नाटककार हिराबाई पेडणेकर' या नावाने शिल्पा सुर्वे यांनी हिराबाई पेडणेकर यांचे चरित्र प्रकाशित केले

आहे. हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनाचे चित्रण करत त्या माध्यमातून तत्कालीन समाज आणि कालखंड यांचे दर्शन 'पालशेतची विहीर' या विजयकुमार नाईक (गोवा) लिखित नाटकातून घडते. प्रस्तुत नाटकाचा आणि त्याद्वारे हिराबाई तसेच तत्कालीन स्त्री वेदनेचा हुंकार यांचा वेध घेण्याचा हा प्रयत्न.

**कथानक**

सदर नाटकाचे कथानक हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनावर बेतलेले आहे. त्यांचा जन्म कलावंत समाजात झाला. आईवडिलांचे छत्र हरपल्यामुळे त्यांचे पालनपोषण त्यांची मावशी करते. त्यांची मावशी स्वत:प्रमाणे लहानग्या हिराला देखील शरीरविक्रयासाठी प्रवृत्त करते. हिराची मावशी हिराचा सौदा पाध्ये या गृहस्थाशी करते. औपचारिक शिक्षणाचा परिचय झाल्यामुळे हिराच्या विचारांना प्रगल्भतेचे कोंदण लाभलेले असते त्यामुळे ती मावशीच्या या प्रस्तावाला कडकडून विरोध करते. यावर मावशी तिला समजावण्याचा प्रयत्न करते. आयुष्याची आर्थिक बाजू सांभाळण्यासाठी ही वाट धरणे आपल्याला भाग आहे हा मुद्दा मावशी तिला समजावण्याचा प्रयत्न करते. दुसरीकडे, कला सादरीकरण करून तसेच नाटके लिहून, सादर करून आपण आपला उदरनिर्वाह करू असा निर्धार हिरा व्यक्त करते; परंतु, आपली जात यात आडवी येईल ही धोक्याची सूचना मावशी तिला देते. मावशीने सांगितल्याप्रमाणेच पुढे अनेक गोष्टी हिराच्या आयुष्यात घडत जातात.

हिराबाईंच्या आयुष्यात अनेक पुरुष येतात आणि जातात; परंतु तिचा पूर्णपणे स्वीकार करण्यास बहुतेक जण नकार देतात. त्यामागे, या पुरुषांच्या मनातील सामाजिक विटाळाची भीती, प्रतिष्ठेची चिंता हे मुद्दे प्रामुख्याने दिसून येतात. हिराच्या कलेचा फायदा आपल्या स्वार्थासाठी बहुतेक पुरुष करून घेतात. त्यांच्यापैकी काही जण तिला, उघडपणे नव्हे तर लपत-छपत, स्वीकारण्याची तयारी दर्शवितात; परंतु, हिराला मात्र हवा असतो तो आयुष्यभराचा जोडीदार, कायमची साथ. अशी साथ न मिळाल्याने हिराचा भ्रमनिरास होतो आणि हळूहळू ती मद्याचा, व्यसनाचा आधार घेऊ लागते. व्यसनाधीनतेमुळे तिची साहित्य/कला प्रतिभा देखील ढासळू लागते.

अशातच कृष्णाजी नारायण नेने या सद्गृहस्थाची मदत, त्यांचा आधाराचा हात हिराबाईंना लाभतो आणि ते तिला रत्नागिरीतील पालशेत या गावी घेऊन येतात. अट मात्र एकच असते की, पुन्हा नाटक वा कलेकडे फिरकायचे नाही. ही अट मान्य करून हिराबाई पालशेतला येतात आणि अखेरच्या श्वासापर्यंत आपले उर्वरित आयुष्य तिथेच घालवतात. याच पालशेत गावात श्री. नेने यांच्याच मदतीने उभारलेल्या त्या विहिरीशी आपले मन मोकळे करत हिराबाईंनी केलेल्या संवादाच्या रूपात नाटक सुरू होते आणि उत्तरोत्तर कथानक उलगडत जाते. एकूणच, पालशेतमधील विहिरीशी संवाद करत असलेल्या हिराबाईंच्या माध्यमातून त्यांचे पूर्वायुष्य आणि त्याचबरोबर तत्कालीन समाज, परिस्थिती, कालखंड यांचे दर्शन या नाटकात घडते.

**भाषाशैली / संवाद**

प्रस्तुत नाटकाची भाषाशैली साधी, सोपी, सरळ आहे. १९ व्या शतकाचे अखेरचे दशक ते २० व्या शतकाचा पूर्वार्ध असा कालखंड या नाटकात दिसून येतो. त्या दृष्टीने तत्कालीन भाषा, बोलण्याचा लहेजा, शैली पात्रांच्या संवादांत आहे. नाटकातील पात्रांचे वय, त्यांची पार्श्वभूमी, त्यांचा शैक्षणिक/ सांस्कृतिक/ सामाजिक/आर्थिक स्तर या घटकांबरहुकूम पात्रांची भाषा आलेली आहे. पात्रांचे संवाद प्रमाण भाषेतील आहेत. त्या-त्या पात्राच्या तोंडचे संवाद ऐकताना त्या पात्राची चौकट स्पष्टपणे लक्षात येते. हिरा आणि विहीर यांच्या संवादाच्या माध्यमातून नाटक सुरू होते आणि पुढे विविध पात्रांच्या मदतीने कथानक पुढे जाते. अनेक ठिकाणी हिराबाईंचा स्वत:शी संवाद होताना दिसतो. हिराबाई, भीमा (मावशी), नेने, पाध्ये, फादर, नानासाहेब, तात्यासाहेब, चिंतोबा, देवलमामा (गोविंद बल्लाळ देवल), गुर्जर, केशवराव, मंदार, विश्वानंद, सदानंद ही पात्रे या नाटकात आहेत. या पात्रांची भाषा सयुक्तिक आहे. पात्रांच्या तोंडी असणारी भाषा काहीवेळा अलंकारयुक्त दिसून येते; परंतु ती समजण्यास कठीण जात नाही. भाषेचा ढंग तत्कालीन परिस्थिती आणि कालखंड डोळ्यांसमोर उभा राहण्यास उपयुक्त असा साजेसा आहे.

**सादरीकरण**

प्रस्तुत नाटकाचे प्रयोग विविध संस्था आणि

व्यक्तींनी केलेले आहेत. वेगवेगळ्या प्रयोगांच्या सादरीकरणातून त्यातील प्रायोगिकता दिसून येते. रुद्रेश्वर, पणजी आणि व्हीटीबीटी (विजयकुमार्स ट्रॅव्हलिंग बॉक्स थिएटर, फोंडा) या संस्थांनी या नाटकाचे प्रयोग केलेले आहेत. रुद्रेश्वर, पणजी निर्मित नाटकात, प्रौढ आणि तरुण अशा दोन अवस्थांतील हिरा दर्शविण्यासाठी दोन स्त्री कलाकार वापरण्यात आलेले आहेत. मात्र, व्हीटीबीटी, फोंडा निर्मित नाटकात हिराची भूमिका चार विविध महिला कलाकार साकारतात. या चार कलाकारांच्या माध्यमातून हिराच्या मनातील घालमेल, विचार, भावना, वैचारिक आणि मानसिक कल्लोळ दर्शवण्यात आलेला आहे. नेपथ्य, प्रकाशयोजना, पार्श्वसंगीत, वाद्ये यांचा वापर समर्पकपणे केला गेला आहे. मंचावर सादर होणारी गीते, पदे कधी ध्वनीमुद्रित, तर कधी प्रत्यक्ष गायनाच्या माध्यमातून रसिकांसमोर प्रस्तुत होतात. नेपथ्याचा वापर कमीतकमी करून सूचकपणे कथानक दाखवण्याचा प्रयत्न केला गेला आहे. एकूण नेपथ्यात मंचाच्या मध्यभागी असणारी विहीर अतिशय महत्त्वाची ठरते. हिराबाईचा विहिरीशी झालेला संवाद हा कथानक आणि नाटकाचा प्राण असल्याने विहिरीचे स्थान केंद्रवर्ती ठरते. इतर प्रसंग आणि स्थळे बहुतांशी सूचकपणे दर्शविण्यात आली आहेत.

**संगीत**

पालशेतची विहीर हे नाटक संगीत नाटक म्हणून जरी प्रदर्शित करण्यात आले नसले तरी त्यात संगीताचा झालेला प्रचंड वापर पाहता त्याला संगीत नाटक म्हणणे महत्त्वाचे ठरेल. एकूणच नाटकाचे कथानक संगीत नाटकाच्या क्षेत्रातील व्यक्तीच्या जीवनावर आधारित आहे आणि कथानकात अनेक ठिकाणी पारंपरिक संगीत नाटकाच्या धर्तीवर नाट्यपदे आणि गीते येतात. या गीतांच्या आणि पदांच्या चालीसुद्धा संगीत नाटकाच्या चौकटीत बसणाऱ्याच आहेत. ही पदे, गीते मंचावरील पात्रे स्वत: सादर करतात आणि ती कथानकाला पूरक आहेत.

**सामाजिक चित्रण आणि स्त्री जाणिवा**

पालशेतची विहीर या नाटकाचा एकूण गाभा हिराबाई पेडणेकर यांच्या जीवनातील दु:ख, वेदना, कारुण्य यांचे दर्शन घडवणारा आरसा आहे. समाजाकडून झालेल्या उपेक्षेमुळे एक हरहुन्नरी कलाकार कसा वेदनादायी नामशेष झाला याचे ज्वलंत चित्रण या नाटकात पाहावयास मिळते. हे नाटक म्हणजे हिराबाई पेडणेकर यांची केवळ जीवनकहाणी नाही. या नाटकातून तत्कालीन समाज, परिस्थिती देखील स्पष्टपणे दिसून येते. तत्कालीन समाजाचे जीवन, सामाजिक भेदांत अडकलेल्या समाजाच्या मनातील स्वार्थी विचार, स्त्री म्हणजे भोगाची वस्तू असा विचार करण्याची वृत्ती, त्यातून हिराबाईंना झालेल्या यातना आणि त्यांची दुर्दैवी पडझड यांचे भयाण चित्रण या नाटकात दिसते. कवी मनाच्या हिराबाईंना केवळ लेखनच नव्हे तर काव्य, संगीत, अभिनय अशा सर्वच स्तरांवर प्रावीण्य प्राप्त झालेले होते; परंतु एका विशिष्ट कुळात/समाजात जन्माला आल्यामुळे त्यांना समाजाकडून अवहेलना सहन करावी लागली. माणसाजवळ कितीही कौशल्य वा योग्यता असली तरी त्याची पारख ही फार मोठ्या प्रमाणात त्याच्या जातीवरून केली जाते हे समाजवास्तव या नाटकातून दिसून येते.

हिराबाईंना आयुष्यात झालेले दु:ख आणि वेदना जशा या नाटकात येतात तसेच त्यांच्या जीवनातील आनंदाचे, सुखाचे क्षणही दाखवण्यात आले आहेत. शिक्षण मिळाल्याचा आनंद, कुणीतरी आपल्याला स्वीकारण्याची तयारी दाखवल्याचा आनंद, आपल्या कलेचे चीज होईल या आशेचा आनंद अशा विविध अवस्था दिसतात; परंतु प्रत्येक प्रसंगी आनंदाचे हे सर्व क्षण औट घटकेचे ठरतात आणि दर वेळी निराशाच त्यांच्या पदरी पडते. एक स्त्री, त्यात कलावंत समाजात जन्माला आलेली या दृष्टीनेच तिच्याकडे प्रत्येक वेळी पाहिले जाते. तिच्या प्रत्येक गुणाचा आपल्या स्वार्थासाठी वापर करून घेणारी माणसे तिच्या आयुष्यात येतात आणि त्यातून हिराबाईंची फक्त पिळवणूकच होते. आपली जात प्रत्येक वेळी आडवी येणे याचबरोबर जवळपास प्रत्येकच पुरुषाच्या डोळ्यांतून आपल्याबद्दल दिसून येणारी पुरुषी, लालसी, वासनामय नजर तिला किळसवाणी वाटते. हेच अनुभव तिच्या मावशीचेही असतात; परंतु, मावशी या सर्वाला विद्रोह न करता मुकाट्याने सर्व काही सहन करते. शिक्षणाच्या अभावामुळे वा धीर न झाल्यामुळे ती कदाचित तसे वागत नसावी; परंतु हिरा मात्र बंड करते. यावरून स्त्री जीवनात शिक्षणाचे असणारे महत्त्व अधोरेखित होते.

कलागुणांची पारख करणाऱ्याबरोबर आपण जावे, आपल्या जीवनाची योग्य दिशा आपण ठरवावी, योग्य-अयोग्य यांच्याविषयी ठामपणे मत व्यक्त करण्याचा धीटपणा हिरा दाखवते त्यावरून तत्कालीन शिक्षित स्त्रीचा कणखरपणा दिसतो. आपली कला, रचना, संगीत चोरणाऱ्याला सज्जड शब्दांत दम देण्याची हिंमत जेव्हा हिरा करते तेव्हा तिचे गुन्हेगार तिच्या नजरेला नजर देऊन बोलूही शकत नाहीत यावरून तिचा अधिकार दिसतो; परंतु हे सर्व त्या एका माडीच्या चौकटीतच बंदिस्त उरते आणि कधीही सार्वजनिक होत नाही त्यामुळे हिरा कायम अज्ञातच उरते. स्त्री जीवनाची ही व्यथा हिराबाईंच्या माध्यमातून प्रतीकात्मक रूपाने दिसते.

समाजात, सर्वार्थाने उपेक्षित राहिलेल्या एका स्त्रीच्या मनातील खदखद, द्वंद्व यांचे दर्शन या नाटकात दिसते. हिराबाईंच्या जीवनाची व्यथा, दाहकता, मनाचे खचलेपण, हतबलता यांच्या माध्यमातून तत्कालीन स्त्रीचे आयुष्य पाहता येते. संगीत दामिनी मंचित न झाल्याचे दुःख हिराबाईंना अधिक प्रमाणात झालेले दिसते; परंतु त्या मानाने जयद्रथ विडंबन नाटक मंचित न झाल्याचे दुःख दिसत नाही. हिराबाईंच्या वाटचालीला हातभार लावणारी माणसे येतात त्यावरून तत्कालीन समाजातील सुष्ट घटकांचाही परिचय होतो. अनेक नाटककार लोकांना मिळालेला त्यांचा मदतीचा हात यावरून त्यांची योग्यता समोर येते. या सर्वांबरोबरच त्यांच्या जीवनातील विद्रोह आणि बंड तेवढेच दाहक आहे. स्वतःच्या अस्तित्वाचा शोध, स्वत्वाची जाणीव आणि प्रत्येक वाईट अनुभवाअंती एक नवी सुरुवात करण्याची केविलवाणी धडपड आणि अखेरीस परिस्थिती समोर लोटांगण असे हिराबाईंच्या जीवनाचे विविध पैलू दिसतात.

सामाजिक बहिष्काराच्या वा डागाळले जाण्याच्या भीतीने हिराबाईंनी देऊ केलेली अर्पणपत्रिकाही जेव्हा तिच्या आजूबाजूची माणसे नाकारतात तेव्हा तिला आपल्याबद्दलच्या लोकांच्या वास्तविक दृष्टीचा साक्षात्कार होतो. स्त्री जीवनाचे वर्णन करताना फक्त एखाद्या विशिष्ट जातीतीलच नव्हे तर सर्वच जातींतून स्त्रीचे आयुष्य कसे कुंठित करून ठेवण्यात आलेले आहे हेही हिराबाई या नाटकातून सांगताना दिसतात. अशा वेळी आपणच एकटे काही अभागी नाही असा स्वतःला दिलासा देण्याचा, आपले दुःख हलके करण्याचा, विसरण्याचा प्रयत्न हिराबाई करतात. यावरून एखादी स्त्री आपल्या जीवनातील कोणत्याही दुःखाकडे कशा नजरेने पाहते आणि स्वतःच स्वतःची समजूत घालून त्यावर फुंकर घालते हे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

**समारोप**

स्वतः प्रतिभावंत नाटककार, कवी, संगीतकार असणाऱ्या हिराबाई पेडणेकर अनेक नाटककार, संगीतकारांसाठी आदर्श ठरल्या. एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे दर्शन घडवणारे चरित्र वा चित्रपट असतो त्याप्रमाणे हिराबाईंच्या जीवनाचे दर्शन घडवणारे हे नाटक - (व्यक्तिचित्रणात्मक नाटक) म्हणावयास हरकत नाही. असुनी नाथ मी अनाथ असे जीवन जगलेल्या हिराबाई पेडणेकर यांच्या आयुष्याची ही दुःखद कहाणी तत्कालीन समाज आणि स्त्रीचे चित्रण करणारी आहे. मनात इच्छा असूनही हिराबाई यांना स्वीकारण्यास अनेकांनी दर्शवलेली असमर्थता वा नकार यांतून त्या काळातील समाजाचे दर्शन घडते. एखाद्या स्त्रीला तिच्या शरीरापलीकडे पाहणारी व्यक्ती भेटणे हे त्या स्त्रीसाठी किती हर्षदायक असू शकते याचा आदर्श वस्तुपाठ या नाटकात दिसतो. तथाकथित सामाजिक बंधने, प्रतिष्ठा यांचा पगडा तत्कालीन समाजजीवनावर किती होता हेही दर्शवण्यात आले आहे. एखाद्या स्त्रीच्या आयुष्याला सर्वार्थाने लाभलेले अपूर्णत्व, एकटेपणा, शारीरिक-मानसिक-वैचारिक-साहित्यिक शोषण किती भयाण असू शकते हे या नाटकात दिसते. एका स्त्रीद्वारे स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेणे, आयुष्याच्या भयाण संघर्षाचा सामना करणे आणि अखेरीस हतबलपणे स्वतःच्या अस्तित्वाच्या खुणा मिटवणे ही स्त्रीजीवनाची व्यथा या नाटकातून प्रदर्शित होते.

**संदर्भ :**

१. पालशेतची विहीर, लेखन : विजयकुमार नाईक
२. आद्य महिला नाटककार : हिराबाई पेडणेकर, शिल्पा सुर्वे, डिंपल पब्लिकेशन (मुंबई), प्रथमावृत्ती : ६ नोव्हेंबर २०१७

**प्रा. चिन्मय मधू घैसास**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, गोवा विद्यापीठ
संपर्क : ९८२३७२८६४०

वाचक, प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार यातील अन्योन्यसंबंधांचा वेध घेणारा संशोधनलेख

# वाचक, प्रसारमाध्यमे व साहित्यव्यवहार

डॉ. देविदास मल्हारी शेटे

मानवी जीवनाचा अविभाज्य भाग म्हणून आज प्रसारमाध्यमांकडे पाहिले जाते. वर्तमानपत्र, दूरदर्शन व आकाशवाणी यांना प्रसारमाध्यमे म्हणून ओळखले जाते; परंतु आज माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. वर्तमानपत्र, दूरदर्शन व आकाशवाणी याच्या पलीकडे साधारणतः इ. स. २०१० पासून समाजमाध्यमांचा (social media) मोठ्या प्रमाणात वापर होऊ लागल्याचे दिसते. यामध्ये फेसबुक, युट्युब, व्हॉटस्‌ॲप, टेलीग्राम, इंस्टाग्राम, ट्विटर, ब्लॉग्ज, इ. माध्यमे मोबाईलच्या माध्यमातून प्रत्येकाच्या हातात आली आहेत. प्रत्येक जण जीवनातील सुख-दुःखाचे, प्रसंगांचे फोटो, माहिती विविध समाजमाध्यमांवर (social media) प्रसारित करत असतो. काही क्षणांत हजारो-लाखो लोक त्या लेखनाला प्रतिसाद देत असतात. इंटरनेटवर मराठी प्रतिलिपी, मायबोली, विकासपीडिया, विकीपीडिया अशी अनेक संकेतस्थळे (website) आहेत ज्यावर विविध विषयांवरील लेख वाचकांसाठी दररोज प्रकाशित होत असतात. या माध्यमांमुळे साहित्यव्यवहाराच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उलथापालथ झालेली दिसते.

लेखक जेव्हा आपल्या भावना साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करत असतो तेव्हा ते साहित्य वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रकाशकाची आवश्यकता असते; परंतु या विविध समाजमाध्यमांमुळे (social media) प्रकाशकाशिवाय लेखकाला हजारो-लाखो वाचकांपर्यंत काही क्षणांत पोहोचणे शक्य झाले आहे. त्यावर कमेंटच्या माध्यमातून वाचकाला प्रतिक्रिया देण्याची सोय उपलब्ध असल्यामुळे या समाजमाध्यमांमुळे लेखक व वाचक यांच्यात थेट संवाद होऊ लागला आहे. या नवीन माध्यमांमुळे साहित्यव्यवहाराचे पारंपरिक संदर्भच बदलले आहेत. प्रकाशन व्यवसाय व वाचनसंस्कृतीवरही याचा परिणाम झालेला पाहायला मिळतो. या नवीन माध्यमांमुळे साहित्यव्यवहारावर नेमका काय परिणाम झाला आहे हे पाहणे आवश्यक आहे.

प्रसारमाध्यमांमुळे विशेषतः आकाशवाणी व दूरदर्शन या माध्यमांचा माणसाच्या जीवनशैलीवर मोठा परिणाम झाला. या माध्यमांमुळे विविध क्षेत्रातील अद्ययावत माहिती समाजापर्यंत पोहोचू लागली. त्याचबरोबर मनोरंजनविषयक विविध कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होऊ लागल्याने वाचनाकडे वाचकांचा कल हळूहळू कमी होऊ लागला. दूरदर्शन आले आणि बहुसंख्य लोक दूरदर्शनपुढे बसायला लागले. त्यातून जे काही थोडे बहुत वाचत होते, ते कमी झाले असे सांगितले जाते. अर्थात ही गोष्ट खरी आहे की, दूरदर्शन पाहणाऱ्यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. दूरदर्शनचा एक

फायदा असा असतो की, प्रेक्षकाला कसल्याही शिक्षणाची गरज नसते. अक्षरओळख नसणारा माणूसही दूरदर्शन पाहू शकतो. पूर्वी सर्व घरकामे आटोपल्यावर नवरा, मुले बाहेर गेल्यावर स्त्रिया दुपारच्या वेळी वाचन करीत असत. त्यांच्यासाठी जुन्या काळात महिलांसाठी म्हणून विशेष मासिके प्रसिद्ध होत असत. आता ती मासिके दिसत नाहीत. तसेच अशा महिलांसाठी लिहिणाऱ्या काही लेखिकाही होत्या. अलीकडे बहुसंख्य महिला नोकरी उद्योग करू लागल्यामुळे त्यांच्यासाठी म्हणून प्रसिद्ध होणारी मासिके प्रकाशित होत नाहीत. आता अर्थातच त्याही दूरदर्शनकडे वळल्या असणार. म्हणजे पूर्वी वाचणाऱ्या महिला करमणुकीसाठीच वाचत असल्या तरी वाचत होत्या हे महत्त्वाचे होते. याशिवाय पांढरपेशा वर्गातील लोकही वाचत असत. वकील, शिक्षक, प्राध्यापक, कारकून इ. मंडळी वाचन करीत असत, हे मान्य करूनही एक प्रश्न असा उपस्थित करावा लागतो की, दूरदर्शन येण्यापूर्वी (म्हणजे १९७४ पूर्वी) साक्षरतेचे आणि शिक्षणाचे प्रमाण काय होते? साधारणतः भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आपल्या राष्ट्राची विकासाच्या दृष्टीने आखणी सुरू झाली. विकासामध्ये शेती, उद्योग हे जसे महत्त्वाचे मुद्दे असतात, त्याप्रमाणेच किंवा त्याहीपेक्षा महत्त्वाचा मुद्दा शिक्षणाचा असतो. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा विस्तार सुरू झाला तरी १९७५ पर्यंत साक्षरतेचे प्रमाण दहा टक्क्यांवर नव्हते. उच्च शिक्षणाचे प्रमाण तर चार-पाच टक्केच होते. म्हणजे साक्षरता आणि उच्च शिक्षण यांचे प्रमाण जर इतके कमी असेल,तर त्या काळात अधिक वाचन होत असे या म्हणण्याला किती अर्थ आहे? १९७५ पूर्वी स्त्रियांमध्ये तर हे प्रमाण नगण्यच होते. म्हणजे दुपारच्या फावल्या वेळात वाचणाऱ्या स्त्रियांचे प्रमाणही अगदीच नगण्य असणार. अशा सगळ्या परिस्थितीत साहित्याचा गंभीरपणे अभ्यास करणारा वर्गही कमीच असणार. दूरदर्शन येण्यापूर्वी असणारे शिक्षणाचे प्रमाण हे नगण्य स्वरूपाचे होते. त्यामुळे वाचकवर्गही अत्यल्पच होता. त्यातही साहित्याचा गंभीरपणे विचार करणारा वर्गही मर्यादितच होता; परंतु दूरदर्शनच्या आगमनामुळे मर्यादित वाचकवर्गातही घट झाल्याचे दिसते. म्हणजेच दूरदर्शन या माध्यमाचे वाचनसंस्कृतीवरील एक प्रकारे आक्रमणच होते. १९९० नंतर इंग्रजी भाषेचे वाढते स्तोम, गुगल, प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे (फेसबुक, ब्लॉग्ज, इंस्टाग्राम, व्हॉटसॲप) यामुळे मराठी लेखकांचे, त्यांच्या पुस्तकांचे अस्तित्व पणाला लागल्याचे दिसून येते. पुस्तकांच्या १००० प्रतींची आवृत्ती संपायला लेखकाला कित्येक वर्षे वाट पाहावी लागते. याचाच अर्थ, लेखकाला लाभणारा जाणकार, प्रगल्भ वाचक वर्ग कमी होत चालल्याचे दिसून येत आहे. याचे मूलभूत कारण म्हणजे समाजमाध्यमांचा (social media) जनमानसावरील वाढता प्रभाव होय! कारण ही माध्यमे वापरायला सोपी असतात.''बहुसंख्य सोशल मीडिया साधने वापरायला अत्यंत सोपी आणि मोफत असतात. सोशल मीडियावर प्रकाशित केलेले विचार, साहित्य, फोटो, व्हिडिओ इ. बहुसंख्य ठिकाणी कुणाच्याही, कोणत्याही नियंत्रण अथवा सेन्सॉरशिपशिवाय प्रकाशित होते आणि प्रकाशित झालेले साहित्य जगभरातील कोणालाही क्षणात दिसू शकते. जे प्रकाशित झालं आहे त्यावर कोणताही वाचक बरी-वाईट प्रतिक्रिया तिथल्या तिथे देऊ शकतो. आपल्याला आवडलेले लिखाण आपल्या वर्तुळामध्ये शेअर करू शकतो आणि न आवडलेल्या, न पटलेल्या साहित्य वा विचारांचं उघड स्पष्ट खंडनही करू शकतो.''[२] म्हणजेच विविध समाजमाध्यमांमध्ये (social media) कोणीही आपल्या भावना लिखित स्वरूपात व्यक्त करून प्रसिद्ध करत असतो. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे लेखक व वाचक यांच्यात थेट संवाद होऊ लागल्याचे दिसते. फेसबुक, ट्विटर, ब्लॉग्ज या इंटरनेटवरील समाजमाध्यमांवर साहित्य प्रकाशित करण्यासाठी कुणा प्रकाशकाची आवश्यकता नसते. हे साहित्य एका क्षणात जगभरातील कोट्यवधी वाचकापर्यंत पोहोचते. सदर साहित्यावर तेथेच थेट प्रतिक्रिया (comment) देण्याची सोय वाचकांना उपलब्ध करून दिलेली असते. आपल्या साहित्याबद्दल वाचक काय विचार करतात हे विविध प्रतिक्रियांच्या माध्यमातून लेखकाला थेट समजते. यासाठी प्रकाशक व समीक्षक यांची आवश्यकता भासत नाही. या समाजमाध्यमांमुळे लेखक व वाचक यांचा थेट संवाद होत असतो. या समाजमाध्यमांचा जगातील जनमानसांवर मोठा प्रभाव आहे. जगात सुमारे दोन अब्ज लोकांपर्यंत इंटरनेट पोहोचले आहे. यापैकी साधारण निम्मे लोक फेसबुकचे सदस्य आहेत. (९०कोटी) ''जगात साधारण ५० कोटी लोक ट्विटरद्वारे मायक्रोब्लॉगिंग करतात. तर अंदाजे १८ कोटी ब्लॉग्ज आहेत. सोशल मीडियाच्या वापरकर्त्यांची आकडेवारी, जेवढी अवाढव्य आहे त्याहून जास्तच चक्रावून टाकणारी, आकडेवारी त्यावरून होणाऱ्या साहित्य आणि संवादाच्या देवाण-घेवाणीची आहे. फेसबुकवर दर दिवशी एक अब्ज पोस्ट्स प्रकाशित होतात तर

ट्विटरवर ४० कोटी ट्विट्स! वर्डप्रेसवर तीन कोटी नवे लेख दर महिन्याला प्रकाशित होतात आणि ४० कोटी वाचक ४ अब्ज पानं वाचतात.''[३] म्हणजेच या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. समाजमाध्यमांवर सुमारे एक अब्ज पोस्ट प्रसिद्ध होतात. त्यावरील प्रतिक्रियाही वाचकांकडून लेखकाला तात्काळ समजतात. म्हणजेच लेखकाने व्यक्त केलेल्या विचारांना तात्काळ प्रतिसाद हा समाजमाध्यमांतून मिळण्यास मदत होते. फेसबुकसारख्या समाजमाध्यमावर व्यक्तिगत आयुष्यातील घडामोडींशी संबंधित पोस्ट्स असतात तसेच राजकीय घडामोडींवर भाष्य करणाऱ्या पोस्ट्स असतात. ''फेसबुक व त्यासारख्या सोशल नेटवर्कवरच्या बहुसंख्य पोस्ट्स या स्वतःच्या आयुष्यात काय चाललंय ते सांगणं यासाठीच असतात किंवा मित्रांबरोबर कट्ट्यावरच्या गप्पांच्या स्वरूपाच्या असतात. एखादी मोठी राजकीय अथवा सामाजिक घटना घडली तर त्यावर स्वतःची टिप्पणी करणाऱ्या पोस्टही फेसबुकवर मोठ्या प्रमाणावर येतात. ट्विटरचा वापर बहुसंख्य युजर्स आपल्या आजूबाजूच्या घडामोडींवर टिप्पणी करण्यासाठी करताना दिसतात. फेसबुक आणि ट्विटर हे दोन्ही मर्यादित हेतूनं केलेल्या संक्षिप्त आणि तात्कालिक लेखनासाठीची माध्यमे म्हणून वापरली जातात. जास्त गांभीर्याने केलेल्या लिखाणाचे ठिकाण म्हणजे ब्लॉग्ज. ब्लॉग्जच्या माध्यमातून माहितीपूर्ण अथवा वैचारिक लेख, कथा, कविता, फोटो, चित्र, व्यंगचित्र अशी वेगवेगळ्या प्रकारची, वेगवेगळे विषय आणि आशयाची संपन्न अभिव्यक्ती आपल्याला दिसते.''[४] फेसबुक, ट्विटर या माध्यमांवर व्यक्तिगत जीवनातील माहिती व राजकीय सामाजिक घटना व त्यावरील विश्लेषण पोस्ट केले जाते. साहित्यविषयक व गांभीर्याने केले जाणारे लेखन हे ब्लॉग्जच्या माध्यमातून वैचारिक लेख, कथा, कविता, वेगवेगळ्या विषयाचे लेख प्रसिद्ध केल्याचे दिसून येते म्हणजेच ब्लॉग्ज हे समाजमाध्यम साहित्यव्यवहाराचे म्हणजेच लेखक-वाचक यांच्यातील दुवा ठरत आहे. सुमारे १० ते १२ कोटी लोक मराठी भाषेचा, दैनंदिन व्यवहारात समाजमाध्यमांचा वापर करतात; परंतु इंटरनेटवर ब्लॉग्जची संख्या काही हजारांतच आहे. ''मराठी ही भाषा वापरकर्त्या लोकांच्या संख्येनुसार जगातील १५ वी भाषा आहे. सुमारे १० ते १२ कोटी लोक मराठी जाणतात/वापरतात. यापैकी सुमारे दीड ते दोन कोटी मराठी लोक इंटरनेटचे वापरकर्ते आहेत आणि सुमारे साठ ते सत्तर लाख फेसबुकचे वापरकर्ते आहेत. मात्र अत्यंत आश्चर्य आणि खेदाची गोष्ट म्हणजे मराठी ब्लॉग्ज केवळ काही हजारांमध्ये आहेत. मराठी ब्लॉग्ज डॉट नेट या वेबसाईटच्या नोंदणीनुसार केवळ २२०० मराठी ब्लॉग्ज आहेत. (त्यावर नोंदणी न झालेले, त्याच्या दुप्पट/तिप्पट असतील असे धरले तरी दहा हजारांहून कमीच.) दीड-दोन कोटी वाचकसंख्या शक्य असतानाही त्यांच्यासाठी केवळ काही हजार ब्लॉग्ज का असा प्रश्न पडतो.''[५] इंटरनेटचे वापरकर्ते वाढत असले तरीसुद्धा त्यांची आवड साहित्य लेखनापेक्षा इतर बाबींकडे अधिक दिसते. ब्लॉग्जवर जे साहित्य प्रसिद्ध होते त्या साहित्याला प्रतिसाद देणारा वर्ग कमी आहे; परंतु बहुसंख्य ब्लॉग्जवर वाङ्मयचौर्य केलेले साहित्य प्रसिद्ध केल्याचे पाहायला मिळते. मराठी वर्तमानपत्रे, नियतकालिके पुस्तके यांतील साहित्यही ऑनलाईन स्वरूपात मराठीत येण्याचे प्रमाणही अल्प आहे. ''मराठी वर्तमानपत्र, नियतकालिकं आणि पुस्तकं याच्या हाती खरंतर प्रचंड प्रमाणात नवं साहित्य नेमानं प्रकाशित होताना दिसतं. अर्थातच यामध्ये दर्जेदार आणि प्रभावी नवनिर्मिती निश्चितच येत असणार. मात्र छापील रूपात अजूनही निर्माण होत असलं तरी त्याचं ऑनलाईन रूपात ब्लॉग्जविश्वात येण्याचं प्रमाण मराठीमध्ये नगण्यच आहे.''[६] म्हणजेच मराठी साहित्याकडे गांभीर्याने पाहणारा जो वर्ग आहे यामध्ये लेखक, प्रकाशक, वाचक यांनी समाजमाध्यमे (social media) ब्लॉग्ज या माध्यमांचा साहित्यव्यवहारासाठी प्रभावी वापर केलेला दिसत नाही. हे घटक अजूनही पारंपरिक दृष्टिकोनातूनच साहित्यव्यवहाराकडे पाहताना दिसतात. दर्जेदार साहित्य निर्माण करणारे बहुसंख्य लेखक ब्लॉग्ज आणि इतर समाजमाध्यमांपासून (social media) दूर राहणेच पसंत करत आहेत, तर ज्या लोकांनी आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात केले आहे ते वाङ्मयचौर्य करून स्वतःच्या नावाने ब्लॉग्जवर साहित्य प्रकाशित करताना दिसत आहेत. असे असले तरीसुद्धा अनेक ब्लॉग्ज पोस्ट्स, व इंटरनेटवरील विविध संकेतस्थळे (web side) दर्जेदार साहित्य प्रकाशित करण्यासाठी पुढाकार घेत आहेत. या निराशाजनक परिस्थितीत आशेचे किरण बनलेले अनेक ब्लॉग्ज, पोस्ट्स आणि सोशल नेटवर्कही मराठीत आहेत. मायबोली डॉटकॉम, मनोगत डॉटकॉम सारख्या अत्यंत लोकप्रिय युजर फोरम्सवर प्रकाशित होणारं सर्वस्वी नव्या स्वरूपाचं लेखन, या आणि इतर अनेक वेबसाईटनी खास तयार केलेले, फक्त ऑनलाईनच असलेले दिवाळी अंक, अनुभव मासिकात सलग दोन वर्षे आयोजित केलेलं ई-साहित्यसंमेलन दर्जेदार

वैचारिक लेखांचा खजिना असलेलं थिंक महाराष्ट्र, मराठी गझल डॉटकॉमने भरवलेला ऑनलाईन मुशायरा, असे कित्येक प्रयोगही सोशल मीडियावर मराठी तरुण करत आहेत.''[७] साहित्याच्या प्रसारासाठी इंटरनेटवर जी संकेतस्थळे (website) आहेत. त्यावरून कविता, कथा, वैचारिक लेख, ललित लेखन, ई-संमेलन अशा उपक्रमांच्या माध्यमातून मराठी वाचकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातोय. याचा परिणाम लेखक, प्रकाशक, वितरक, विक्रेते या साहित्यव्यवहाराच्या पारंपरिक साखळीवर होताना दिसतो. ''लेखक, प्रकाशक, वितरक, विक्रेते या साहित्यव्यवहाराशी संबंधित घटकांमध्ये या नव्या माध्यमामुळे काहीशी भीती आणि असुरक्षितता निर्माण झाली आहे असंही सध्या दिसून येत आहे. सगळेच जण लिहायला लागले आणि कोणत्याही मध्यस्थाशिवाय ते लिखाण थेट वाचकांपुढे जायला लागलं, तर साहित्यव्यवहाराशी संबंधित व्यक्ती आणि संस्थांच्या आर्थिक हितसंबंधांची जपणूक कशी होणार हा प्रश्न मोठा आहे. लेख, कथा, कवितांचा नुसताच प्रसार होऊन लेखकांचं पोट भरणार नाही आणि छापील साहित्य विकता आलं नाही तर मुद्रक, प्रकाशक, विक्रेता ही साहित्य-अर्थ-साखळी कोलमडून पडेल.''[८] म्हणजेच आधुनिक समाजमाध्यमांमुळे (social media) लेखक-वाचक यांच्यात थेट संवाद होतो. वाचकाला थेट कमेंट करता येते. लेखक-वाचकाचा थेट संवाद होत असला तरीसुद्धा वाचकाला या माध्यमातून दर्जेदार साहित्यच नेहमी वाचायला मिळेल याची खात्री देता येत नाही. पारंपरिक साहित्यव्यवहारात समीक्षक हा लेखक व वाचक यांच्यात मध्यस्थाची भूमिका बजावतो. तसेच साहित्यकृतीतील सौंदर्यस्थळे वाचकाच्या निदर्शनास आणून देतो, साहित्यकृतीचे सामर्थ्य व मर्यादा समीक्षेतून स्पष्ट करतो. यामुळे वाचकाला साहित्यकृतीबद्दलचे मार्गदर्शन प्राप्त होते; परंतु आजच्या आधुनिक प्रसारमाध्यमांमुळे प्रकाशक, समीक्षक यांचे महत्त्व तर कमी झालेच पण वाचकांच्या पुढ्यात दुय्यम दर्जाचे साहित्य समोर आल्याचे दिसते. यामुळे साहित्यव्यवहारातील पारंपरिक संदर्भ मोडून पडत आहेत व नवीन व्यवस्थांचा उदय होत आहे. पारंपरिक प्रकाशकांबरोबर ई-बुक तयार होत आहेत. ॲमेझॉन, फ्लिपकार्ट यांसारख्या कंपन्या कोट्यवधी रुपयांची उलाढाल करत आहेत, मराठीमध्ये बुकगंगाच्या रूपाने घरपोच पुस्तके मिळत आहेत. म्हणजेच ई- बुकचा मोठा पर्याय निर्माण झालेला दिसतो. ज्या ब्लॉग्जला वाचकांची पसंती अधिक असते अशा ब्लॉग्जवर गुगल आपल्या जाहिराती प्रसारित करत असते. त्यातून सदर लेखकाला उत्पन्न मिळण्याचा मार्गही मोकळा झालेला दिसतो. साहित्य-अर्थ-व्यवहार टिकवण्यासाठी व तो वाढवण्यासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत; परंतु त्यासाठी पारंपरिक दृष्टिकोन बदलून नव्या दृष्टीने या साहित्यव्यवहार व प्रसारमाध्यमांकडे पाहणे आवश्यक आहे.

### संदर्भ सूची


१) कोत्तापल्ले नागनाथ, जागतिकीकरण आणि वाचन,अंतर्भूतः कोठावळे केशवराव (संपा.) ललित (मासिक) जुलै २०१८ पृ.२० व २१.
२) शिरगांवकर प्रसाद, ब्लॉग विश्व आणि मराठी वाचक, अंतर्भूतः कोठावळे केशवराव, (संपा.) ललित (मासिक) जाने २०१३ प्र.८५ .
३) तत्रैव पृ. ८६.
४) तत्रैव पृ. ८६.
५) तत्रैव पृ. ८७ व ८८.
६) तत्रैव पृ.८८ .
७) तत्रैव पृ. ८७ व ८८.
८) तत्रैव पृ.८८ .



**डॉ. देविदास मल्हारी शेटे**

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख ,
सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा.
ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर
मोबाईल- ९४२०९५०११४

महाराष्ट्रातील आदिवासी चळवळीविषयी मूलगामी चर्चा करणारा लेख

# महाराष्ट्रातील आदिवासी चळवळ

प्रा.डॉ. राहुल गोंगे

'आदिवासी' या शब्दाला मूळचे रहिवासी, आदिम समूह, मूलनिवासी वा वनवासी असे अनेक पर्याय दिले जातात. भारतीय संविधानाच्या ३४२ कलमातील तरतुदीनुसार आदिवासी, अनुसूचित जमाती असे वर्गीकरण केले जाते. जंगलात राहून शेती, शिकार जंगलातील किरकोळ वनौपज मदतीने आपले पोट भरणारा समाज घटक आदिवासी नावाने ओळखला जातो. भारतीय संविधानाने जवळपास साडेपाचशे जातींना (sheduled tribes) दर्जा दिलेला आहे. अश्मयुगापासून स्वतंत्रपणे जीवन जगण्यासाठी या समूहाची कुटुंब, कुळ, जमात अशा टप्प्यांमधून जडणघडण झालेली आहे. जंगलात टोळ्यांच्या रूपात राहणाऱ्या समाज घटकावर वाढती लोकसंख्या, भौगोलिक विचार व आधुनिकता याचा परिणाम झाला. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार समाज रचना, जीवनशैली, व्यवसायांची तंत्र पातळी, भाषा, धर्म या सगळ्या अंगांबाबत रानटी, अडाणी अशी विशेषणं ज्यांना लावता येतील असे नागरसमाज व संस्कृती यांच्यापासून दूर जंगलात व डोंगरदऱ्यांत राहणारे लोक म्हणजे आदिवासी होय. वेगळे आयुष्य जगणारे ज्यांची जीवनशैली संस्कृती, बोलीभाषा, सामाजिक ढाचा, रीतिरिवाज, मूल्य असलेला वेगळा जीवनक्रम जगणारा असा हा समाजघटक आहे.

प्राचीन व मध्ययुगीन राजवटींनी आदिवासींच्या या जीवनक्रमात हस्तक्षेप केला नाही. ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांनी आपले साम्राज्यवादी हेतू साध्य करण्यासाठी आदिवासींच्या जीवनात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. भांडवल उद्देश साध्य करण्यासाठी जंगललाकूड, खनिजे यांच्या आवश्यकतेपोटी बेसुमार हस्तक्षेप केले जाणारे कायदे करण्यात आले. याचा आदिवासींच्या जीवनशैलीवर परिणाम होऊन त्यांच्या स्थापत्तेला धक्का लागला, आदिवासी मुखियांचे अधिकार रद्द केले. आदिवासी राज्ये बरखास्त करणे याचा परिणाम म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळातच आदिवासी चळवळीने मूळ धरले. भारतीय राज्यकर्त्यांनी ब्रिटिशांचीच धोरणे चालू ठेवल्याने स्वातंत्र्योत्तर काळातही आदिवासींची चळवळ गतिमान बनली. शासनाचे कायदे, वनविभाग, वनाधिकारी यांचा वाढता हस्तक्षेप तसेच राजकीय नेतृत्व, नोकरशाही, जंगल ठेकेदार यांच्या अभद्र युतीमुळे आदिवासींचे शोषण अधिकच तीव्र बनल्याने गतिमान चळवळ आकारास आली.

परंपरेने कसत असलेली शेत जमीन कसताना त्यांचा कसण्याचा अधिकार काढून घेण्यात आला. परिणामी शेती करणारे अदिवासी उद्ध्वस्त झाले. वनअधिकाऱ्यांनी वनकायद्यांची कठोर अंमलबजावणी सुरू केल्याने जंगलातील वनौपज गोळा करण्यावर मर्यादा आल्या. अज्ञान व गरिबीमुळे त्यांची संघटित चळवळ उभी करण्यात मर्यादा

होत्या. सेवाभावी, परिवर्तनवादी संघटनांच्या माध्यमातून आदिवासी चळवळीचे विविध प्रवाह अस्तित्वात आले. यामध्ये साम्यवादी पक्षाची भूमिका संघटना, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, गोदाताई परुळेकरांनी उभा केलेला आदिवासींचा लढा यातून आदिवासी चळवळीची ताकद उभी राहिली. परिणामी आदिवासी जंगल २००६ कायदा अस्तित्वात आला; परंतु त्याच्या अंमलबजावणी संदर्भात प्रश्न निर्माण झाले. या कायद्याने कसत असलेल्या जमिनीचा सातबारा नावावर करून देणे आवश्यक होते मात्र त्याची अंमलबजावणी शासन व अधिकारी करत नव्हते शिवाय प्रस्तुत कायद्यात कमतरता होत्याच. उदा. महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील सुझलॉन कंपनीने पवनचक्क्या उभारण्यासाठी आदिवासी व वनखात्याच्या सरकारी जमिनी बळकावल्या. याचा वेध प्रस्तुत निबंधात घ्यायचा आहे.

आदिवासींच्या प्रश्न व चळवळीला ब्रिटिश कालखंडापासून सुरुवात झाली. आदिवासींच्या प्रश्नांची पाळेमुळे या कालखंडात रुजलेली आहेत. जंगलातील वास्तव व नागरी जीवनात संपर्काचा अभाव, स्वतंत्र जीवनशैली, संस्कृती यांच्यामुळे आदिवासी समाज स्वायत्त होता. प्राचीन व मध्ययुगीन राजवटींनी आदिवासींच्या जीवनक्रमात कोणताच हस्तक्षेप केला नव्हता. जंगल-जमीन, जलसंपत्ती यावर परंपरेने प्राप्त नैसर्गिक हक्कांच्या आधारे आदिवासी आपले जीवन जगत होते. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी हेतूमुळे लाकूड, खनिजे, इ. घटक जंगलात असल्याने आदिवासींच्या जीवनात हस्तक्षेप सुरू झाला. या हस्तक्षेपाला कायद्याचे अधिष्ठान देताना वनखात्याची निर्मिती करण्यात आली. हे कायदे म्हणजे जलसंपत्ती लुटण्याची व्यवस्था होती. महात्मा फुले यांनी ब्रिटिशांनी स्थापन केलेले वनखाते बरखास्त करण्याची प्रथम मागणी केली. 'अन्याय्य कायदे, तत्कालीन उच्चवर्णीय नोकरशाही यांच्या शोषणांमुळे आदिवासींच्या हक्कांवर आलेली टाच हे महात्मा फुले यांच्या भूमिकेमागील कारण होते. ब्रिटिश पूर्व काळातील स्वायत्त व्यवस्था ब्रिटिशांच्या अडचणींची ठरू लागली. ब्रिटिश धोरणाविरुद्ध १८२५ मध्ये दक्षिण भारतामध्ये खानदेश, नगर याही भागातील टोळ्यांनी बंडे केली.' परिणामी ब्रिटिशांनी आदिवासींची राज्ये बरखास्त करण्यास सुरुवात केली. आदिवासी राजांना सत्ता, संपत्ती, व प्रतिष्ठा यांना मुकावे लागले. या सुरुवातीच्या चळवळींना 'मेलिॲनिक चळवळी' म्हणतात. परकीयांना हुसकून पुन्हा आपल्या राज्यांची स्थापना करणे, आपली आदिवासी संस्कृती पुन्हा स्थापन करणे ही या चळवळींची उद्दिष्टे होय. बिरसा मुंडाचे बंड याच भूमिकेतून होते. १८८० साली मध्य प्रदेशात तंट्या भिल्लाने सावकारशाही विरुद्ध उठाव केले. चुअरा उठाव, भूनिजा उठाव, संसाधनांचा उठाव ही या चळवळींची प्रातिनिधिक उदाहरणे होय.

ब्रिटिशांच्या माध्यमातून आदिवासींच्या जीवनात कठोर हस्तक्षेप झाले. ख्रिश्चन मिशनरी अत्यंत दुर्गम भागात जाऊन आदिवासींची भाषा शिकून सेवाभावी भूमिकेतून सुधारणांचा प्रयत्न केला. त्यांच्या हितसंवर्धनासाठी संरक्षित क्षेत्र जाहीर करणे, त्या क्षेत्रात कारभार प्रांतिक गव्हर्नरच्या हातात ठेवणे, १८७४- THE SHEDULED DISTRIC ACT माध्यमातून आदिवासी वस्ती असलेल्या जिल्ह्याची यादी प्रसिद्ध करून त्यांचा कारभार विशिष्ट अधिकाऱ्यांच्या हाती सुपूर्त करणे, आदिवासीबहुल सीमांची तटबंदी करून सुधारणांसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे करणे, सक्तीचे ऊर्जानिवारण, मजुरीचे दर निश्चित करणे, दारूबंदी, शिक्षण, राजकीय प्रतिनिधित्व इ. संदर्भात काही सुधारणा ब्रिटिश कालखंडात झाल्या. एका बाजूने भांडवली साम्राज्यवादी राजकीय सत्तेला आवश्यक धोरणाच्या अनुषंगाने आदिवासी कल्याणाचे कायदे आणि धोरणे असे दुहेरी धोरण आणण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आदिवासींच्या प्रश्नांची दखल राज्यकर्ता वर्ग व सत्ताधारी पक्षाने घेतली नाही. जातीव्यवस्थेला बळी पडलेल्या आदिवासींना नव्या राज्यकर्त्यावर्गाने साकारलेल्या शोषणव्यवस्थेला बळी पडावे लागले. परिणामी जंगलाचे खरे हक्कदार असलेल्या आदिवासींना १९४७ नंतरही पारतंत्र्यातच राहावे लागले. स्वतंत्र आदिवासी राज्यांच्या स्थापनेचे आश्वासन देऊनही ते पाळले गेले नाही. परंपरेने कसत असलेली जमीन व जंगलात राहत असताना प्राप्त झालेले परंपरागत हक्कांचे कायद्यांमध्ये संहितीकरण न होणे ही मुख्य समस्या होती. महाराष्ट्रात याबाबत साम्यवादी पक्ष, आदिवासींच्या विविध चळवळी यांनी प्रदीर्घ लढा उभा केला. संविधानाने पूरक कायदे केलेले असूनही अज्ञान, दारिद्र्य यामुळे ते अंमलात आणण्यासाठी योग्य दबाव टाकता येत नव्हता. कायद्याच्या प्रस्थापनेतून न्याय मिळतो व प्रश्न सुटतात हे समीकरण सर्वथा अयोग्य आहे, हे आदिवासींच्या प्रश्नांकडे पाहिल्यावर लक्षात येते. संविधानिक कायद्यांची, धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकारी अर्थात

नोकरशाहीची होती. भारतातील जातीव्यवस्थेचा परिणाम म्हणून नोकरशहा उच्च जातवर्णीय होता. नोकरशहांच्या उदासीनतेचा परिणाम आदिवासींच्या विकासावर झाला. मात्र आदिवासींच्या लढ्यातून, ताकदीतून २००६ मध्ये आदिवासी हक्क जंगल कायदा अस्तित्वात आला; परंतु प्रस्थापितांची तो अमलात आणण्याची इच्छा नव्हती. महाराष्ट्रात सुझलॉन कंपनीने पवनचक्क्या उभारून आदिवासी व वनखात्यांची जमीन लुबाडण्याचा प्रयत्न केला. सेझ, विमानतळ, यासाठी गरीब शेतकरी व आदिवासी यांच्या जमिनी लाटण्याचा प्रयत्न झाला. याविरुद्ध प्रदीर्घ संघर्ष करावा लागला. या संघर्षाचे फलित म्हणजे ३१ डिसेंबर २००७ रोजी केंद्रशासनाला 'आदिवासी जंगल हक्क कायदा' अमलात आणावा लागला. आदिवासींची चळवळ प्रामुख्याने दोन कालखंडात विभागता येते. स्वातंत्र्यानंतर आदिवासींची जी चळवळ झाली ती जल, जमीन, व जंगल यामध्ये असलेल्या पारंपरिक हक्कांची पुनर्स्थापना करण्यासाठी होती. आदिवासी परंपरेने कसवणूक करत असलेल्या जमिनीचा सातबारा त्यांच्या नावाने मिळावा हा या चळवळीतील मुख्य मुद्दा होता. २००६ च्या कायद्याने ही मागणी पूर्ण झाली. मात्र त्या चळवळीला प्रदीर्घ पार्श्वभूमी प्राप्त झालेली होती. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या आदिम जाती सेवक संघाचे ठक्कर बाप्पा यांच्या नेतृत्वाखाली एक समिती स्थापन करण्यात आली. स्वातंत्र्योत्तर भारतात आदिवासींसाठी कसे धोरण असावे याबाबत काही शिफारशी सुचवण्यात आल्या. संविधानाने आदिवासींना राजकीय प्रतिनिधित्व उपलब्ध करून द्यावे, जंगल-जमीन इत्यादी बाबतचे परंपरागत हक्क सुरक्षित राहावे यादृष्टीने पूरक कायदे करण्या संदर्भात मागणी केली होती. मसुदा समितीचे अध्यक्ष असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांप्रमाणेच अत्यंत मागासलेल्या आदिवासी समाजासाठी राखीव जागा ठेवण्यासाठी आग्रह धरला. या सर्व प्रयत्नांचा एकत्रित परिणाम म्हणजे आदिवासींना राजकीय प्रतिनिधित्वाबरोबरच शासकीय व निमशासकीय नोकऱ्यांमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मिळाला. आदिवासी संस्कृतीच्या जोपासणुकीतून व संवर्धनाबाबतचे मुद्दे लक्षात घेऊन एक संरचनात्मक व्यवस्था निर्माण झाली. त्यातूनच राष्ट्रीय अनुसूचित आयोग स्थापन झाला. संविधानातील तरतुदींमुळे आदिवासींच्या विकासाची चौकट निर्माण झाली.

जल-जंगल-जमीन व त्यावर होणारी वनौपज हा पारंपरिक हक्क असतो. ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी हेतूमुळे हे हक्काचे उद्ध्वस्त झाले. आदिवासींसाठी स्वातंत्र्य म्हणजे हे पारंपरिक हक्क पुन्हा उपभोगास मिळणे होय. समतेच्या अनुषंगाने धोरणांच्या अंमलबजावणीत आदिवासींना प्राधान्यक्रम असावा. जंगलातील जमीन कसणे हा परंपरागत हक्क असतो मात्र ही जमीन कागदोपत्री आदिवासींच्या मालकीची नव्हती. ती करण्यासाठी पूरक पुरावे व कागदपत्रे त्याच्याकडे नव्हते. दारिद्र्य आणि अज्ञान यामुळे संघर्ष व न्यायालयीन लढाई करण्याची मानासिकता नव्हती. परंपरागत शेतीपद्धती आदिवासी जंगलातील एका तुकड्यावरचे जंगल साफ करीत. त्या जमिनीवर शेती करत. दोन-तीन वर्षानंतर नवीन तुकडा साफ करून त्यावर शेती करीत. सलग शेती केल्यावर जमिनीचा कस कमी होत जातो तिचे पुन्हा नैसर्गिक भरण करणे हा त्यामागील हेतू असायचा. काही कालानंतर ती जमीन पुन्हा कसायला घेतली जात असे. याबाबतचे अनुभवजन्य ज्ञान उपयुक्त होते. मात्र नागरी समाजाचा याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असल्याने आदिवासी जंगल तोडून शेती करतात असे गृहीत मांडले. जंगल उद्ध्वस्त होऊ नये म्हणून अशी शेती बेकायदेशीर ठरवली. असे निर्णय, कायदे, आदिवासी शेती करणाऱ्यांची कोंडी करणारे ठरतात. ब्रिटिशांनी शेतीवर कर लावल्याने आदिवासी तो भरण्यासाठी सावकाराकडून कर्ज घेत. कायद्याने सावकारबंदी झाली तरी अज्ञानी, दरिद्री आदिवासींची ही पिळवणूक थांबली नाही. जंगल नष्ट होत होते म्हणून गुरे चरणे, फळे-मध-डिंक इ. लहान उत्पादने, शिकार यावर बंदी घालण्यात आली यामुळे आदिवासींच्या कोंडीत भर पडली.

राज्यकर्त्या वर्गाचे भांडवलशाहीच्या कच्छपी लागण्याचे धोरण आदिवासींवर अन्याय करणारे ठरले स्वातंत्र्यानंतर साम्यवाद्यांनी आदिवासींच्या प्रश्नांची दाखल घेत त्यांचे प्रश्न राजकीय व्यवस्थेच्या ऐरणीवर आणले. तेलंगणात आदिवासींनी शोषणाविरुद्ध उठाव केले. आदिवासींच्या या अवस्थेला वैज्ञानिक सिद्धांत आणि क्रांतीकारी नेतृत्व उभे करून योग्य कार्यक्रम आखला. महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील वारली जमातीला संघटित करून आदिवासींची चळवळ उभी राहिली. यासाठी डॉ. शामराव व डॉ. गोदाताई परुळेकर यांचे योगदान महत्त्वाचे ठरते. शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, हक्कांची जाणीव नसणे इथपासून आदिवासी चळवळ सुरू झाली.

महाराष्ट्रातील आदिवासींच्या चळवळीची समकालीन

संदर्भातील भौगोलिक भागात विभागणी करता येते. एक मराठवाडा व विदर्भ, दोन खानदेश (धुळे-नंदुरबार-नाशिक) कोकण (ठाणे, रायगड) व पश्चिम महाराष्ट्र. पहिल्या विभागातील चळवळीला नक्षलवादी वळण प्राप्त झाले. धुळे व नंतर निर्माण झालेल्या नंदुरबार जिल्ह्यात साम्यवादी पक्ष प्रणीत भूमिका, संघटना व सत्यशोधक कम्युनिस्ट ग्रामीण आदिवासी महासभा यांनी आदिवासींच्या चळवळी संघटित केल्या. पिढ्यांनी परंपरागत पद्धतीने कसत असलेल्या जंगल जमिनीचा सात-बारा कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावावर व्हावा, यासाठी सत्याग्रह, जेल भरो आंदोलन या मार्गाचा उपयोग झाला. या संदर्भात पहिली रिट पिटीशन परिधान सर्वोच्च न्यायालयात सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभेने प्रथम दाखल केली. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्ष, साम्यवादी पक्ष त्यांच्या खासदारांचा दबाव गट व जनसंघटना यांच्या दबावातून केंद्र सरकारला आदिवासी हिताचा कायदा करण्याचा निर्णय घ्यावा लागला. २००५ सालच्या स्वातंत्र्य दिनी लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना पंतप्रधानांनी आदिवासींवरील अन्यायाची कबुली दिली. त्यातून आदिवासी जंगल कायद्याची सुरुवात झाली.

**आदिवासी जंगल कायदा २००६**

हा कायदा म्हणजे आदिवासी चळवळीला प्राप्त झालेल्या यशाचा पहिला टप्पा होता. वनखात्याचा प्रचंड भ्रष्टाचार त्यांना नोकरशहा व राज्यकर्त्या वर्गाची साथ यातून एक दहशत निर्माण झालेली होती. आदिवासींवर होणाऱ्या अन्यायाच्या विरुद्ध उभ्या राहिलेल्या देशभरातील संघटना, कार्यकर्त्यांच्या लढाऊ भूमिका यांचे फलित म्हणजे हा कायदा होय. या कायद्याने जंगलात राहणाऱ्या आदिवासी, इतर भटक्या व स्थानिक जमातींचा राहत व कसत असलेल्या जमिनीवर कायमचा मालकी हक्क स्थापन केला. जंगलातील वहिवाट, किरकोळ वनौपज, गुरांसाठी राखीव कुरणांचा वापर, नद्या व तलावांमधील मासे, पाड्यावर वस्ती करण्याचा हक्क, जैव विविधतेबाबतचा परंपरागत हक्क या कायद्याने मान्य केले. अर्थात जंगलाचे संरक्षण व पर्यावरण समतोल राखण्याचे कर्तव्यही सोपविण्यात आले. कायदा केल्याने न्यायाची प्रस्थापना होत नाही हे भारतात वारंवार अनुभवायला आले आहे. शिक्षण-प्रशिक्षणाच्या अभावामुळे शोषितांच्या अभद्र युतींचा या कायद्याने फायदा व्हायला नको म्हणून आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या सेवाभावी, मान्यताप्राप्त व नामांकित संघटनांना या प्रक्रियेत सामावून घेण्याची आवश्यकता स्पष्ट होते.

या कायद्याचे वैशिष्ट्य म्हणजे जंगलात राहणाऱ्यांच्या शेतजमिनी चौकशी, पुरावा या माध्यमातून मालकीच्या करण्यासाठी तसेच जल-जंगल-जमीन या साधनसंपत्तीची व जंगल वहिवाट यासाठी तरतुदी करण्यात आल्या. जंगलातील सामायिक साधनसंपत्ती, जंगलजमीन, ग्रामसभा, किरकोळ वनौपज, शाश्वत उपयोगिता इ. व्याख्या करण्यात आली. याबाबतचे हक्क कायमचे प्रदान करण्यात आले. अतिरिक्त वनहक्क जमिनींपैकी चार हेक्टर नावावर करणे, विस्थापितांना पर्यायी जमीन देणे, तसेच या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासकीय यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्यासाठी ग्रामसभेला व्यापक अधिकार देण्यात आले.

**आदिवासी जंगल हक्क अंमलबजावणी**

भारताने १९९१ सालच्या नवीन आर्थिक धोरणांच्या माध्यमातून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाउजा) धोरण स्वीकारले. त्यानुसार ऊर्जा क्षेत्र खाजगी उद्योजकांना खुले करण्यास सुरुवात झाली. आदिवासींच्या प्रदीर्घ संघर्षानंतर झालेल्या २००६ च्या कायद्याने वहिवाटीच्या जमिनी ताब्यात मिळवण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र याच जमिनीवर पवन ऊर्जा कंपन्यांनी अतिक्रमण केले. वनखाते व प्रशासन यांनी कंपन्यांना जमिनी देण्यात आलेल्या आहेत त्यावर आदिवासींचा हक्क नाही, असे सांगण्यास सुरुवात केली. यावर 'कोई नही हटेगा, टॉवर नही बनेगा' अशी घोषणा देत विरोध केला. एन. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डाव्या पक्ष संघटनांच्या पुढाकाराने पवनऊर्जा कंपन्यांच्या विरोधात लढाई उभी राहिली. या विश्लेषणातून समकालीन आदिवासी चळवळीचा चढता आलेख स्पष्ट होतो. आदिवासी हिताचे सर्व कायदे बिनदिक्कत तुडवत पवनऊर्जा कंपन्यांनी आपली वाटचाल सुरू केली. आदिवासींना कायदे, अनुभव असूनही अनेक वर्षे सातबारा नावावर होत नाही; पण पवनऊर्जा कंपन्यांना ते एका रात्रीत कसे मिळतात असा प्रश्न उपस्थित करणारी समकालीन आदिवासी चळवळ उभी राहिली. कंपनीचे मालक उच्चजातवर्णीय असतात. त्यामुळे जमिनीचा सातबारा नावावर करून मिळणे, स्थानिक शेतकरी व आदिवासींच्या विकासासाठी पाच टक्के खर्च करण्याच्या बंधनाला सवलत मिळणे यातून भारतीय भांडवलदार वर्गाचे वर्ग चारित्र्य स्पष्ट होते. यात भांडवलदार युरोपप्रमाणे साम्राज्यशाही (भारताच्या संदर्भात जातीप्रणीत साम्राज्यवाद) नष्ट करणारी

चळवळ उभी केली नाही. यातून या वर्गाचे शोषणकारी स्वरूप स्पष्ट होते. १८७१ सालापासून महात्मा ज्योतिबा फुलेंसारखा शेतकरी बुद्धिजीवींनी समाजसुधारणेची चळवळ सुरू केली. स्त्री, शूद्रातिशूद्र विरुद्ध शेटजी-भटजी हा फुलेसूत्राचा विकास समकालीन आदिवासी चळवळी करणे क्रमप्राप्त ठरते. भू सुधारणांऐवजी जमिनीचे केंद्रीकरण करणारे सेझ कायदे भांडवली शोषणाचे नवे रूप आहे.

२००६ कायद्याची जडण-घडण होत असतानाच अगोदरच्या दहा वर्षांत (१९९८-२००६) पवनऊर्जा कंपन्यांनी शेतकऱ्याच्या जमिनी फसवणुकीने लुबाडल्या यासंदर्भात लाल निशाण पक्षाचे हिलाल महाजन यांनी सतत चिकित्सा केली. कंपनीचे दलाल, सामूहिक बनावट कुलमुखत्यार या माध्यमातून फसवणुकीचे व्यवहार केले गेले. जंगल सेझ कायदे, शासकीय जंगल जमीन राज्यकर्त्या व भांडवलदार वर्गाने विकत घेतले. त्यामुळे विकासाच्या नावाने उभ्या राहणाऱ्या प्रकल्पासंदर्भात लोकहिताचे प्रश्न उपस्थित करणे आदिवासी चळवळीचे आद्य कर्तव्य ठरते. युनोच्या हवामान संघटनेच्या अंदाजानुसार जगात ७४, २२१ मेगावॅट ऊर्जा निर्माण होऊ शकते. यात जर्मनी, स्पेन, अमेरिका यानंतर भारताचा चौथा क्रमांक लागतो. महाराष्ट्र यासाठीचे अग्रेसर राज्य आहे. सातारा, सांगली, नगर, धुळे या जिल्ह्यात पवनऊर्जेसाठी अनुकूल वातावरण आहे. त्यातून अपारंपरिक ऊर्जेचा मोठा स्त्रोत उभा राहतो. पर्यावरण खाते शासकीय नियम पाळून जनहित व न्याय्य विकास या अनुषंगाने ऊजास्त्रोताचा विकास करण्यासाठी कोणतीही हरकत नसावी; पण खाजगीकरणाच्या प्रक्रियेत शासनाने खाजगी कंपन्यांना पवनऊर्जा क्षेत्र उपलब्ध करून दिले. NEG, मायक्रोन, सुझलॉन या कंपन्या पवनचक्क्यांसाठी काम करण्यासाठी पुढे आल्या. सरकारच्या पाठिंब्या आधारे काम सुरू केले. नवीन जमिनीवर चक्क्या उभारण्याच्या जाहिराती देऊन वाहितीखालच्या, सपाटीवरच्या जमिनी खरेदी करून अर्थबळाच्या आधारे गायरान जमिनी, सरकारी पड जमिनी, वन जमिनी तसेच आदिवासी हस्तांतर कायद्यांचा भंग करीत जंगल जमिनीवर अतिक्रमण केले. पिळवणूक, लुबाडणूक, बनावट व्यवहार या माध्यमांतून कंपन्यांनी जमिनी ताब्यात घेतल्या. यातून गावाची नाकेबंदी, आवाजाचे प्रदूषण, फसवणुकीतून अत्यल्प किंमतीत जमिनी घेणे (३४ आर ऐवजी दहा ते वीस एकर) जमिनी ताब्यात घेणे रेडीरेकनर भावाने खरेदी न करता कुलमुखत्यार पत्रावर जमिनीचा ताबा घेणे, सरकारचा महसूल बुडवणे, भूसंपादन कायद्याची पायमल्ली करणे. या विरोधात सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा, धुळे यांनी २७ फेब्रुवारी २००७ रोजी मोर्चा काढला. तेव्हा प्रांताधिकाऱ्याने या कंपनीने सरकारी जमीन लाटल्याचे मान्य केले. महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी शेतजमिनीच्या किमती देण्याबाबत प्रचंड भेदाभेद करण्यात आला होता. या चळवळीचे नेतृत्व कॉ. किशोर ढमाले, कॉ. करणसिंग कोंकणी, कॉ. हिलाल महाजन, कॉ. वंजी गायकवाड यांनी केले. साकी, नागपूर, धुळे तहसिलांवर मोर्चे, साकी तहसील कचेरीला घेराव घालून कामकाज बंद पाडले. एन. डी. पाटील, भाई वैद्य, कॉ. गोविंद पानसरे यांच्या उपस्थितीत परिषद रॅली काढल्या. डाव्या पक्षांच्या परिवर्तनवादी पुढाऱ्यांनी या आदिवासी चळवळीला पाठिंबा दिला. ग्रामसभेला अधिकार मिळाल्याने त्यांच्या परवानगीशिवाय पवनचक्की उभारली जाऊ शकत नाही. अशिक्षित सरपंच स्त्रियांच्या इंग्रजी सहीचा दाखला जोडून प्रस्ताव दिले. वनखात्याने तीस वर्षांच्या कराराने पवनऊर्जा कंपन्यांना जंगल जमीन बहाल करताना सर्व नियम धाब्यांवर बसवले. चळवळीच्या नेते व कार्यकर्त्यांना दहशत बसावी असे हल्ले करणे, भाडोत्री पोलिसांच्या मदतीने दहशत निर्माण करण्यातून समकालीन आदिवासी चळवळींसमोरची आव्हाने स्पष्ट होतात.

पवनकंपन्यांनी निर्माण केलेली ऊर्जा बेहिशेबी मामला ठरला, उदा. सुझलॉन कंपनीचा धुळे, नंदुरबार भागातील टॉवर ६५० मेगॅवॅट विद्युत निर्मिती क्षमतेचा आहे; पण तेथे खरोखर किती वीज निर्माण होते त्याबद्दल स्थानिक अधिकारी माहिती देण्यात असमर्थता व्यक्त करतात. निर्मित वीज थेट ग्रीडमध्ये जाते. त्यामुळे त्याच्या क्षमतेचा अंदाज येत नाही, गुंतवणूक करून वीजनिर्मितीचा परतावा मिळत नाही. म्हणजे या कंपन्यांना झालेला नफा जमिनीची फसवणुकीत खरेदी व सरकारी सबसिडी यांचा परिणाम आहे हे स्पष्ट होते. पवनऊर्जा कंपन्यांच्या या आर्थिक गैरव्यवहाराप्रमाणे पर्यावरणाचे प्रश्न गंभीर बनले आहेत. प्रकल्पांना मंजुरी देताना वनजमिनीत झाडांची घनता किती? त्यात दुर्मिळ जाती व प्रजाती किती? परागकणांच्या स्थलांतर प्रक्रियेचे काय? वनजीवप्राणी यांच्या माहितीचा अभाव असे अनेक प्रश्न आदिवासींच्या चळवळीतून उपस्थित करून शासनाने त्याबाबतची माहिती तात्काळ जाहीर करावी अशी मागणी केली. पवनचक्क्यांच्या पंखांना आग लागण्यातून संपूर्ण जंगल जाळून खाक होण्याचा धोका संभवतो.

याशिवाय पवनऊर्जेच्या एकूणच मर्यादा श्री. मुकुंद कोंडविलकर, जयंत वैद्य यांच्या 'पवनचक्कीची नाचक्की' या अभ्यासपूर्ण मांडणीतून स्पष्ट होतात.

यावरून आदिवासी चळवळीच्या संदर्भात पुढील मुद्दे स्पष्ट होतात.

१. स्वायत्त आदिवासी राज्याची मागणी कॉ. शरद पाटील यांनी पश्चिम आदिवासी स्वायत्त राज्याबाबतची भूमिका मांडून आदिवासी राज्याची गरज अधोरेखित केली. आदिवासी विद्यार्थी संघाने मोर्चा (तीर कामठे) काढून आंदोलन केले.

२. आदिवासी एकता परिषदेने सर्वच राजकीय पक्ष व चळवळीमधील कार्यकर्त्यांनी आदिवासी साहित्य संमेलने घेऊन (सलग पंधरा वर्षं) आदिवासी चळवळीचे मुद्दे नेटाने समाजापर्यंत पोहोचवले. आदिवासी हे आदिधर्माचे पाईक असून ते निसर्गपूजक आहेत. त्यांचा आत्मसन्मान ठेवला पाहिजे. आदिवासींचे धर्मांतर ब्राह्मणीकरण नाकारण्याचा मुद्दा पुढे आणला. आदिवासी स्त्री पुरुषांनी विद्रोही साहित्य संमेलनात सक्रिय सहभाग घेऊन आदिवासींचे प्रश्न ऐरणीवर आणले.

३. बोगस आदिवासी शोध चळवळ–भारतीय संविधानाने सरकारी व सार्वजनिक उपक्रमात नोकऱ्यांमध्ये राखीव जागा उपलब्ध केल्या. आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन अनेक बिगर आदिवासींनी बोगस प्रमाणपत्रे घेऊन आदिवासींसाठीच्या राखीव जागा पटकावल्या. त्या विरोधी आंदोलन उभे केले.

४. आदिवासींमधील कुपोषणाचा प्रश्न हा ब्रिटिशकालीन वसाहतीतील साम्राज्यवाद ते उच्चजातवर्णीय सत्ताधाऱ्यांच्या शासन घोषणाचा परिणाम आहे हे या चळवळीने पुढे आणले. शासनाने वनौपज गोळा करणे, जनावरांना जंगलात चरण्यास प्रतिबंध, शिकारीस बंदी, मासेमारीवर अंकुश आणल्याने जंगलातून आदिवासींना मिळणारे पौष्टिक अन्न मिळणे बंद झाले. परिणामी कुपोषण हा आदिवासींमधील गंभीर प्रश्न बनला.

५. आदिवासी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप ही महागाई निर्देशाकांनुसार मिळावी अशी मागणी सत्यशोधक विद्यार्थी संघटनेने केली. त्यामुळे उच्च शिक्षण घेणे सुलभ झाले.

६.आदिवासींना हस्तांतरित झालेल्या जमिनीचा प्रश्न महत्त्वाचा आहे. हस्तांतरित जमिनी त्यांना पुन्हा मिळवून देणे व पुढे आदिवासींच्या जमिनी बिगर आदिवासींनी घेण्याबाबत बंधने घालणारे कायदे गठीत करणे व त्याची कडक अंमलबजावणी करणे.

**संदर्भ:**

१) पाटील शरद, 'पश्चिम भारतीय स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका' संशोधन मार्क्सवादी प्रकाशन, धुळे. प्र. आ. १९८९, पृ. १२.
२) सूर्यवंशी निर्मलकुमार, 'जंगल हक्क कायदा२००६', ग्रामीण कष्टकरी सभा महाराष्ट्र राज्य नागपूर.पृ.२.
३) नक्षलवाद (पुस्तिका) प्र. आ. जानेवारी १९९३, पृ.१६ .
४) परुळेकर गोदावरी, 'जेव्हा माणूस जागा होतो.' पृ१३.
५) सूर्यवंशी निर्मलकुमार, 'जंगल हक्क कायदा २००६', ग्रामीण कष्टकरी सभा महाराष्ट्र राज्य नागपूर. पृ २६, उक्त पृ९.
७) पाटील शरद, 'सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे धोरणात्मक निवेदन व घटना, धुळे. पृ३.
८) काकुस्ते सुभाष 'पवन ऊर्जा : खुल जा सिम सिम' सत्यशोधक ग्रामीण कष्टकरी सभा प्रकाशन, नावापूर २००८,. पृ ९.
९) उक्त पृ १७.
१०) उक्त पृ १८

**प्रा. डॉ. राहुल गोंगे**
९८५००९१६४३

# मुस्लिम मराठी साहित्य : एक दृष्टिक्षेप

**मुस्लिम मराठी साहित्यप्रवाहाचा विवेचक आढावा घेणारा लेख**

**शेख शफी बोल्डेकर**

मराठी साहित्य विश्वात अनेक साहित्य प्रवाह रूढ झाले आणि हे सर्व एकाएकी घडले असे नाही. या प्रवाहांच्या पाठीमागे वैचारिक बैठक आहे. ह्या आधुनिक मराठी साहित्य प्रवाहांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. तत्त्वतः काही परिवर्तनेही घडविली आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाचा प्रसार व प्रचार वाढत गेला. निरनिराळे समाजस्तर शिक्षणाच्या कक्षेत येत होते. अभ्यासक्रमाच्या निमित्ताने किंवा आवड म्हणून साहित्य वाचले जायचे; पण त्या साहित्यातून आपला गांव, आपली माणसे, आपला समाज, आपला शिवार, आपली माती, आपली सुखदुःखे, आनंद, यशापयश, विचार, आंदोलने, आणि भावना यांचे दर्शन होत नव्हते. गावगाड्यात माणुसकीचा धडा शिकवणारा मुसलमान साहित्याचा नायक होऊ शकलेला नाही. म्हणूनच १९५० नंतरच्या काळात साहित्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलत गेला व नवनवीन प्रवाह निर्माण झालेत, त्यामुळे एकूणच मराठी साहित्य विकसित होण्यास मदत झाली आहे. 'मुस्लिम मराठी साहित्य' हा साहित्याचा प्रमुख साहित्य प्रवाह आहे, तर ग्रामीण मुसलमान हा त्याचा प्रमुख मूलाधार आहे. मुस्लिम मराठी साहित्य ही संज्ञा साहित्य व्यवहारात रूढ करणारे सांगलीचे आद्य साहित्यिक पहिले आमदार सय्यद अमीनसाहेब यांची चोवीस पुस्तके प्रकाशित आहेत, तर अनेक मुस्लिम मराठी संतकवींनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. ग्रामव्यवस्थेमधील प्रमुख घटक असणारा ग्रामीण मुसलमान गावगाड्यात इतर धर्मीयांशी सहजीवन जगत आला आहे. गावगाड्यात तो शेती व शेतीची कामे, गवंडीकाम, कुठे कुठे मुलाण्याचा व्यवसाय करताना दिसतो. ज्या ग्रामव्यवस्थेमध्ये कवी, लेखक राहतो, ती ग्रामव्यवस्था त्यांच्या साहित्यातून अजाणता का होईना, प्रकट होत राहते. या अर्थाने ग्रामीणत्वाच्या स्पष्ट खुणा मुस्लिम मराठी साहित्यिकांच्या वाङ्मयात सापडतात.

भारत हा मुळात शेतीप्रधान आणि खेड्यापाड्यांचा देश आहे. बहुजनांची साहित्यपरंपरा येथल्या ग्रामजीवनाभोवती गुंफलेली आहे. त्यामुळे अनेक समूहाच्या अनेक भाषा आहेत. त्यात बोली भाषा व व्यवहारी भाषा अशा भिन्न भाषा अनेक समूहात बोलल्या जातात. ग्रामीण मुस्लिम समाजात बोलीभाषा व व्यवहारी भाषा अशा भिन्न भाषा आहेत. हा समाज घरी दखनी-उर्दू तर दारी मराठी भाषेत व्यवहार करताना दिसतो. शहरी भागात क्वचितच घरी मराठी भाषेत बोलतो. तसे पाहता ग्रामीण मुसलमान घरी-दारी मराठीतून व्यवहार करताना दिसतो. नव्वदच्या दशकानंतर मुस्लिम समाजात मोठ्या प्रमाणात परिवर्तने घडली. हा समाज मराठीतून मोठ्या

प्रमाणात शिक्षण घेताना दिसतो आहे. त्याचाच परिणाम म्हणून तो मराठी भाषा उत्तम बोलू लागला, वाचू व लिहू लागला म्हणूनच साहित्य ही एक सामाजिक घटना आहे, हे त्याला कळायला लागले. याचाच परिपाक म्हणजे १९९० साली सोलापुरात अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. स्वर्गीय हाजी अब्दुल लतीफ नल्लामंदू (कासिदकार), स्वर्गीय डॉ. फकरोद्दीन बेन्नूर, स्वर्गीय डॉ. मीर इसहाक शेख, गझलकार ए. के. शेख, डॉ. अजीज नदाफ, कवी मुबारक शेख , शाहीर विश्वासराव फाटे , कॉ. विलास सोनवणे, डॉ. इक्बाल मिन्ने, उदय टिळक यांनी सोलापुरात दोन दिवसीय अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन २३, २४ मार्च १९९० ला हुतात्मा स्मृती मंदिर (नामकरण शहीद कुर्बान हुसेननगर) सोलापूर येथे प्रा. फ. म. शहाजिंदे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या संपन्न केले. या संमेलन यशातून अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची कायदेशीर नोंदणी करून महाराष्ट्रात आठ संमेलने स्वबळावर घेऊन साहित्याचा इतिहास रचला. पुढे वैचारिक मतभेद निर्माण झाले व परिषदेचे कार्य मंदावले. पुन्हा कालांतराने डॉ. शेख इक्बाल मिन्ने यांच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय मुस्लिम मराठी साहित्य व सांस्कृतिक मंडळाची स्थापना झाली व साहित्यिक उपक्रमाला गती मिळाली. असे असले तरी ग्रामीण भागातील साहित्यिकापर्यंत खेड्यापाड्यात साहित्याची चळवळ पोहोचली पाहिजे, या ध्येयाने सन २००१ साली ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळ सुरू झाली. आजघडीला महाराष्ट्रात ही चळवळ महाराष्ट्रभर ओळखली जाते.

ग्रामीण भागामध्ये खेड्यात मुस्लिमांची मोजकीच घरे असली तरी खेड्यातून मोठ्या प्रमाणात मुस्लिम समाज राहतो. त्यांच्या सभोवतालचा संपूर्ण परिसर मराठीमय असतो यात शंका नाही. त्यामुळे तो शहरी भागातील मुस्लिमांपेक्षा मराठी उत्तम बोलतो, उत्तम लिहितो. ग्रामीण भागामध्ये साजरे होणारे सण- उत्सव, पिराचा-वलींचा उरूस, ग्रामदैवतांची जत्रा यांच्याशिवाय ग्रामसंस्कृती पूर्ण होत नाही. हे ग्रामसंस्कृतीचे घटक त्या त्या गावचे एक मानसविश्व निर्माण करतात. सर्व धर्मांच्या सर्व मराठी संतांच्या अभंगाची भाषा ग्रामीण भागात बोलली जाणारी आहे. अभंगसृष्टीमधून बोलीचा सहज वापर होताना दिसतो.

ग्रामीण परिसरातून झपाट्याने पुढे येणारा नवा उत्साही लेखकवर्ग आपल्या जीवनसमूहातील सुख-दुःख, सामाजिक समस्या यांचे चित्रण आपल्या बोलीभाषेतून अभिव्यक्त करू लागला. अशा साहित्याच्या दरबारात जे मागे मागे उभे आहेत. त्यांच्याकडे आता लक्ष दिले पाहिजे. त्यांना आत्मविश्वास दिला पाहिजे, मराठी साहित्याचा दुर्लक्षित मध्यवर्ती ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य प्रवाह प्रवाही व्हावा, त्यात नवे नवे अनुभव व्यक्त व्हावेत, त्याचे सामर्थ्य वाढावे, भाषाविषयक सामर्थ्य अधिक गतिमान व्हावे, आणि इथल्या संस्कृतीशी असलेले नाते दृढ व्हावे आणि एकूणतः मराठी साहित्य सर्व बाजूंनी समृद्ध व श्रीमंत व्हावे.

ग्रामीण मुस्लिम साहित्याची चळवळ सांस्कृतिक चळवळ आहे, मुस्लिम मराठी साहित्य हे परिवर्तनवादी साहित्य आहे. त्याची स्वतःची एक जीवनदृष्टी आहे, अशी भूमिका घेऊन ग्रामीण भागातून लिहिणाऱ्या मुस्लिम मराठी साहित्यिकांची ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळ प्रवर्तक / संस्थापक तथा केंद्रीय कोषाध्यक्ष शेख शफी बोल्डेकरांनी निर्माण केली.

ज्यांच्या घरात शेकडो वर्षांपासून अज्ञान व दारिद्र्य नांदत असेल अशा प्रतिभावंताना या चळवळीची आवश्यकता निश्चितच अधिक असणार आहे यात शंका नाही. महंमद पैगंबर, सुफी संत, संत कबीर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांचे विचार ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्याचे मानदंड आहेत. ही चळवळ हक्काने बोलतो ही मराठी आणि लिहितोही मराठी अशी मराठीची सर्वांगाने साक्ष देणारी आहे. या ऐतिहासिक ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीला मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश या क्षेत्रात अधिक गतिमान करण्यासाठी अनेक मान्यवर साहित्यिकांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते. ही चळवळ १ मे २००१ ला स्थापन झाली आहे. आता चळवळीतून (शासन नोंदणीकृत) 'ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य' या नावाने संस्था स्थापन करण्यात आली आहे. गेल्या काही दशकापासून मुस्लिमांविषयी जाणीवपूर्वक द्वेष पसरविला जातो. त्याचाच परिणाम म्हणून एकनाळी गावात मुस्लिमांना प्रवेशबंदी करणे, त्यांच्यापासून माल विकत न घेणे, माल लुटणे, अपमानित करणे अशा घटना

दिवसेंदिवस वाढत आहेत. अशा परिस्थितीत साहित्यिकांनी जागृत राहून अशा घटनांना शब्दबद्ध करून कविता, कथा, कादंबरी, नाटक, असे साहित्याचे विविध प्रकार हाताळणारे साहित्याचं साहित्यपण जपून गुणवत्तापूर्ण साहित्य निर्माण करणारे साहित्यिक निर्माण होत आहेत. ही चळवळीच्या दृष्टीने अत्यानंदाची बाब आहे.

ग्रामीण मुसलमान हा गावगाड्यात रमणारा समाज असला तरी जाणीवपूर्वक अभिजनांनी कानाडोळा केलेला दुर्लक्षित समाज आहे. खुल्या प्रवर्गात असल्यामुळे त्याला कुठल्याच शासकीय योजनेचा फायदा होत नाही. राहायला घर नाही, टोपलं टेकवायला जमीन नाही. मग जगायचं कसं? नेहमीच संघर्षात असल्यामुळे त्याची दैन्यदशा झाल्याचे दिसून येते व सोबतच भरीसभर म्हणून वाढलेले धार्मिक कर्मकांड, हिंदूमुस्लिम तणाव अशा परिस्थितीत अज्ञानी आणि मूढ लोकांचे उद्बोधन करणे, मुस्लिम साहित्यिकांना मोठे विचारपीठ मिळवून देणे, साहित्याद्वारे समाजाचे प्रश्न मांडणे व सोडवणे, भाषिक ऐक्य निर्माण करणे, समतावादी संविधानिक समाजाच्या निर्मितीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे, ग्रामीण मुस्लिम समाजात शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे व मराठी राजभाषेतून शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे हे या चळवळीचे प्रमुख उद्देश आहेत. वाङ्मयीन चळवळ ही वाङ्मयापुरती असत नाही, तर ती जीवनसंघर्षाचा एक अपरिहार्य भाग बनते. ग्रामीण जीवनातील आज निर्माण झालेले बहुसंख्य प्रश्न जातीव्यवस्थेने निर्माण केले आहेत. तसेच अर्थव्यवस्थाही कारणीभूत आहे, याची जाणीव करून देणे गरजेचे आहे.

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्थेचे सर्वच पदाधिकारी साहित्यिक आहेत. संस्थेचे अध्यक्ष कवी हाशम इस्माईल पटेल लिखीत 'संग्राम' २०१३ व 'डोंगराचा आक्रोश' २०२१ हे कवितासंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. त्यांची 'शांतीगीत' या शीर्षकाची कविता आंतरभारती इयत्ता नववी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली आहे. संस्थेचे संस्थापक शेख शफी बोल्डेकर यांचा 'आम्ही मराठी मुसलमान' २००७ हा काव्यसंग्रह ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्यातला एक महत्त्वाचा काव्यसंग्रह आहे. तसेच 'डिझेलगाडी' २०१४ हा बालकवितासंग्रह बालसाहित्यातला पहिला दीर्घ बालकवितासंग्रह म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस यांनी या संग्रहाचा जाहीर गौरव केला आहे. औरंगाबादचे डॉ. हबीब भंडारे यांचे 'माळावरची पेरणी', 'ढेकळाचा गंध', 'मरणाच्या दारात जगण्याचा अर्थ शोधणारी माणसं', 'जगणं विकणाऱ्या माणसाच्या कविता' हे काव्यसंग्रह महत्त्वाचे संग्रह आहेत. गझलकारांमध्ये बदिऊज्जमा खावर यांचे नाव अग्रेसर आहे. मूलत: कोकणातले उर्दू भाषी असलेले हे शायर, यांच्यामुळे मराठी गझल समृद्ध झाली. त्यांच्या गझलांचे संकलन डॉ.राम पंडित यांनी केले आहे. सोलापूरचे सरफराज अहमद हे महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे मध्ययुगीन इतिहासकार म्हणून प्रसिद्ध आहेत. ते स्वातंत्र्यवीर टिपू सुलतान स्थापित 'सल्तनत-ए-खुदादाद' या पुस्तकाचे लेखक आहेत. आत्तापर्यंत या पुस्तकाच्या पाच आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. सोलापूरचे बदीऊज्जमा बिराजदार उर्फ साबीर सोलापुरी हे प्रख्यात गजलकार व समीक्षक आहेत. उस्मानाबादचे कवी डि. के. शेख हे उत्तम लावणीकार आहेत. अहमदपूर येथील साहित्यिक प्रा. डॉ. अकबर लाला यांचा 'जिद्दीचे पंख' २०१९ हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. बुलढाणा येथील शेख बिस्मिल्ला सोनोशी यांचा 'मीच त्याचं बोट धरलं' हा काव्यसंग्रह विशेष गाजला. बार्शीचे शब्बीर मुलाणी यांच्या नावावर विपुल ग्रंथसंपदा आहे. त्यांनी मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचा लेखाजोखा शब्दबद्ध करून स्मृतिग्रंथ प्रकाशित केले आहेत. मेहबूब जमादार यांचे 'ऊरूस' २००९ ,'माया ' २०११, 'माफी' २०१२ हे कथासंग्रह प्रकाशित आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील शौकत नदाफ यांची 'आनंदचक्र' २०२० ही कादंबरी अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आली. प्रा. सैय्यद अल्लाउद्दीन, कवी मुबारक शेख, अजीम नवाज राही, प्रा. डॉ. रफीक सूरज, फारूक काजी, प्रा. रसूल सोलापूरे, डि. के. शेख, साहिल शेख, रमजान मुल्ला, सफरअली इसफ यांचे लेखन महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. मुस्लिम मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष बशीर मुजावर, पुणे यांच्या नावे १४ कथासंग्रह आहेत. समाजवास्तवाच्या जाणिवा प्रकट करणारा चंद्रपूरचा युवा कवी इरफान शेख यांचा ' माझ्यातला कवी मरत चाललाय' हा कवितासंग्रह प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित झाला आहे. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्यात मुस्लिम स्त्री साहित्यिकांचे योगदान दखलपात्र आहे. अनिसा सिकंदर शेख व

दिलशाद यासीन सय्यद संपादित 'फातिमाबी शेख' २०२१ हा ऐतिहासिक प्रातिनिधिक काव्यसंग्रह ठरला आहे. सोलापूरच्या नुरजहाँ शेख यांचा 'माझं शिवार' २०१४ काव्यसंग्रह, अनिसा शेख लिखित 'संवाद हृदयाशी ', 'सांगाती ' २०२१ , तर दिलशाद सय्यद लिखित 'रंग उन्हाचे' २०२१ रायगडच्या कवयित्री सायराबानू चौगुले यांचा 'चांदण शब्दांचं' २०२१ हे कवितासंग्रह, परवीन कौसर लिखित 'मानसी' २०२१ कथासंग्रह, नसिम जमादार लिखित बालकथासंग्रह 'सारिका' २०२१ ही पुस्तके उल्लेखनीय आहेत. कवयित्री निलोफर फणिबंद यांचे सूत्रसंचालन प्रभावी असते. जस्मिन शेख बालकवयित्री म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचा 'गट्टी मुळाक्षरांशी' ला हा बालकाव्यसंग्रह २०१७ प्रकाशित झाला. जबीन शेख यांचा 'नदी आणि मी' २०२० ला, तर सिन्नरच्या कवयित्री मलेका शेख यांचा 'मानसमेघ' काव्यसंग्रह २०११ ला प्रकाशित झाला, तर अहमदपूरच्या कवयित्री शाहिदा सय्यद यांचा 'प्रतिबिंब' हा काव्यसंग्रह सन २०१८ साली प्रसिद्ध झाला. लातूरच्या तहेसीन मसुदअली सय्यद यांचा ' घन बरसुन गेले' हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या सदस्य राहिलेल्या फरझाना इकबाल लिखित 'हुंदका' २००७ व 'इमान मातीशी' २००९ ह्या कवितासंग्रहाच्या आवृत्ती प्रकाशित आहेत. नेरूळच्या शबाना मुल्ला, शगुफ्ता शेख, हसीना पठाण, रेश्मा नदाफ, आयशा नदाफ, नजमा शेख, शबाना शेख, शरीफा तांबोळी, ॲड. शबाना मुल्ला, रजिया दबीर, डॉ. सामिया शेख, कमरूनिसा शेख, हसिना मुलाणी, परविन मीठागरी ह्या उत्तम कवयित्री आहेत. ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीची संरचना गावप्रमुख, तालुकाप्रमुख, जिल्हाप्रमुख, विभागप्रमुख अशा पद्धतीची असून महाराष्ट्रात ही चळवळ अधिक गतिमान होताना दिसते आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात चळवळीसाठी पदाधिकारी निवडले जात आहेत. केंद्रीय अध्यक्ष तथा मराठवाडाप्रमुख हाशम इस्माईल पटेल, मार्गदर्शक प्रा. मैनोद्दीन मुल्ला साहेब, केंद्रीय सचिव डॉ. सय्यद जब्बार पटेल हे संत नामदेव चरित्राचे अभ्यासक असून कवी आहेत. केंद्रीय कार्याध्यक्ष डॉ. महंमद रफी शेख यांनी मुस्लिम मराठी साहित्यावर संशोधन केले आहे. केंद्रीय सदस्य इस्माईल कादरसाहाब शेख हे दर्जेदार कवी आहेत. कवी वाय. के. शेख यांचा 'चांदण फुले' २०२१ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. केंद्रीय सदस्य महासेन शंकर प्रधान हे सामाजिक जाणिवेचे कवी आहेत. खानदेश विभागप्रमुख विधीतज्ज्ञ जमील देशपांडे हे मुस्लिम मराठी साहित्याचे अभ्यासक म्हणून ओळखले जातात. केंद्रीय उपाध्यक्ष तथा पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख खाजाभाई बागवान हे नव्या दमाचे कवी आहेत. पुणे जिल्हाध्यक्ष बा. ह. मगदूम यांचे 'नक्षत्रपेरणी',२०२१ 'अक्षरकाकरी' हे काव्यसंग्रह प्रकाशित आहेत. बुलढाणा जिल्हाध्यक्ष कवी बी. एल. खान यांचा 'नवरंग' हा गीतकाव्यसंग्रह २००२ साली प्रकाशित झाला. नांदेड जिल्हाध्यक्ष शेख निजाम गवंडगांवकर यांची 'प्रेमप्रबोधन' २०२० ही कादंबरी प्रसिद्ध आहे. लातूर जिल्हाप्रमुख ॲड. शेख इक्बाल रसूलसाब यांचा 'सावली' कवितासंग्रह प्रकाशित असून 'भरकटलेले जीवन' हा आगामी कथासंग्रह प्रकाशित होणार आहे.परभणी जिल्हाप्रमुख सय्यद चाँद तरोडकर हे ग्रामीण कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. इचलकरंजीचे विद्रोही कवी रशिद बाबू तहसीलदार लिखित 'आरसा शोध अंतरमनाचा' २०२० हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. सांगलीचे मुबारक उमराणी, सिराज शिकलगार, अहमदनगरचे लतीफ मोहम्मद पटेल, रज्जाक शेख, रत्नागिरीचे इम्तियाज सिद्दीकी, पालघरचे गौसपाशा शेख यांच्या कविता दखलपात्र आहेत. भंडारा येथील ज्येष्ठ कवी दौलतभाई पठाण यांची झाडीबोली भाषेतील कविता सामाजिक प्रश्नांच्या संदर्भाने गंभीर चिंतन मांडणारी आहे. त्यांचे 'आघात' व 'भीमा तुझा शब्द' २००५, 'वेदना' २०२०, 'यातना' २०२१ हे चार कवितासंग्रह आहेत.

सांगलीचे लेखक आदम युसूफ पठाण लिखित 'स्वातंत्र्य संग्रामातील मुस्लिम सैनिक' हा ग्रंथ मुस्लिमांचे स्वातंत्र्य संग्रामातील योगदान नव्या पिढीला सांगतो. औरंगाबाद जिल्हाध्यक्ष हबीब भंडारे, सोलापूर जिल्हाप्रमुख जाकीर मोहम्मद तांबोळी, दक्षिण सोलापूर तालुका प्रमुख सौ. शाहीन शेख, बार्शी तालुका प्रमुख गौस शेख, वैराग विभाग प्रमुख मोहीद्दीन नदाफ यांच्या मुस्लिम जाणिवा प्रगल्भ आहेत. अहमदनगर जिल्हाध्यक्ष सौ. दिलशाद यासीन सय्यद ह्या उत्तम सूत्रसंचालन करतात, त्यांचे प्रभावी वक्तृत्व चैतन्य निर्माण करते. जळगाव जिल्हाप्रमुख मोहसीन मुनाफ शेख यांचे शैक्षणिक

व साहित्यिक कार्य सातत्याने सुरू असते. हिंगोली जिल्हाध्यक्ष अहमद पिरनसाहाब शेख हे नाटककार म्हणून प्रसिद्ध आहेत. 'गिळली माणसं हुंड्यानं' हे सामाजिक नाटकाचे पुस्तक प्रकाशित आहे. औरंगाबादचे आसेफ शेख (अन्सारी) हे बालनाटककार यांची 'आम्ही नाटक करीत आहे' २००७, 'कस्तुरी' २०१३ आदी बालनाट्ये प्रसिद्ध आहेत. निपाणी येथील सलीम शेख यांचा १९९२ साली 'वळवाचा पाऊस' हा कथासंग्रह प्रकाशित झाला . उस्मानाबाद जिल्हाप्रमुख शेख शाहीद हे उत्तम कवी, गझलकार आहेत. गोंदिया जिल्हाप्रमुख डॉ. नूरजहाँ पठाण यांच्या कविता महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहेत. चिपळूणचे शाहीर शाहिद खेरटकर हे कोकणातील एकमेव शाहीर म्हणून प्रसिद्ध आहेत. पंढरपूर तालुकाप्रमुख फिरोजखान बन्सीलाल बागवान हे उदयोन्मुख कवी आहेत. केंद्रीय सहसचिव तथा दौंड तालुकाप्रमुख अनिसा सिकंदर शेख यांची चळवळीमध्ये अग्रणी भूमिका असते. केंद्रीय सदस्य तथा नांदेड तालुकाप्रमुख शेख जाफर राजेसाहाब यांची गीते खूपच मंजुळ असतात, त्यांनी ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीचे गीत लिहिले आहे. कंधार तालुकाप्रमुख शेख युसूफसाहाब व बिलोली तालुका प्रमुख जाफर आदमपूरकर हे युवा कवी यांचे लेखन आशावादी आहे. देगलूर तालुकाप्रमुख फजल मुल्ला, नायगाव तालुका प्रमुख पिंजारी गौस साहाब, सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ येथील कवी, गीतकार सिकंदर मुजावर यांचा 'आपली माणसं आपल्या कविता' हा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. कळमनुरी तालुका प्रमुख फय्याज शेख यांचे योगदान चळवळीसाठी मोलाचे आहे. नागपूरचे प्रख्यात साहित्यिक प्रा. जावेद पाशा कुरेशी यांची ग्रंथसंपदा विपुल आहे. 'भारतीय शोषितांचा विद्रोही आवाज-इस्लाम ' हा त्यांचा बहुचर्चित ग्रंथ नवी प्रेरणा देणारा आहे. ख्यातनाम कवी खलील मोमीन यांचे वृत्तबद्ध काव्यलेखन मनमोहक असते. सोलापूरचे लक्षवेधी साहित्यिक डॉ. इ. जा. तांबोळी यांनी विपुल ग्रंथलेखन केले आहे. ठाण्याचे युसुफ शेख यांची डिसेंबर २०२१ मध्ये प्रकाशित झालेली 'हुसेनभाईचा कुणी नाद न्हाय करायचा !' ही कादंबरी ग्रामीण मुस्लिम समाजाचे वास्तव चित्रण करणारी आहे. साप्ताहिक 'कासिद'चे संपादक अयुब नल्लामंदू हे साहित्याचे उत्तम जाणकार असून साहित्य संमेलन आयोजनात पुढाकार घेतात. 'स्पंदन' त्रैमासिकाचे संपादक इंतेखाब फराश हे समीक्षक म्हणून ओळखले जातात. मुस्लिम मराठी साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शेख इक्बाल मिन्ने महाराष्ट्रातले नामवंत गजलकार आहेत. सोलापूरचे प्रा.डॉ. शकील शेख लिखित 'जुबा' कादंबरी प्रसिद्ध असून मुस्लिम साहित्यिकांच्या आत्मचरित्रावरील त्यांचे संशोधन प्रसिद्ध आहे. प्रख्यात वऱ्हाडी साहित्यिक मिर्झा रफी अहमद बेग, चिपळूणचे मुझफ्फर सय्यद हे सर्व मान्यवर मुस्लिम मराठी साहित्यिक आहेत. मुस्लिम मराठी साहित्यिक कसा ओळखावा याविषयी शफी बोल्डेकर म्हणतात, ''मराठी मुलखात जगत असताना साहित्याच्या अंगाने आपले अनुभव विश्व निर्भीडपणे मराठीतून अभिव्यक्त करणारा तोच खरा मुस्लिम मराठी साहित्यिक होय.'' ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य चळवळीसाठी अन्य भारतीय साहित्यिक बंधू आगे बढोचा सल्ला देत आहेत. त्यात एकोणनव्वदाव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस सरांचा वाटा महत्त्वाचा असून त्यांनी अखिल भारतीय स्तरावर मुस्लिम मराठी साहित्य पोहोचवले. मुस्लिम मराठी समीक्षेने मराठी साहित्यात मोलाची भर घातली आहे. ते मूल्यवान ग्रंथ पुढीलप्रमाणे ) प्रा. फ. म. शहाजिंदे संपादित ' मुस्लिम मराठी साहित्य : परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची') स्व. प्रा. डॉ. अक्रम पठाण लिखित 'मुस्लिम मराठी साहित्य') जळगाव येथील प्रा. डॉ. नसीमा देशमुख लिखित 'मुस्लिम मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा') प्रा. फ. म. शहाजिंदे व प्रा. फारुख तांबोळी संपादित 'मुस्लिम मराठी साहित्य प्रेरणा आणि स्वरूप' हे ग्रंथ मुस्लिम मराठी साहित्याचे वेगळेपण सिद्ध करण्यासाठी सज्ज आहेत.

**शेख शफी बोल्डेकर,**
संस्थापक , ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था,
भ्र. : ७७९८९६७७९३ इमेल - skshafi3344@gmail.com

▪▪

# पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये मिळून साऱ्याजणी मासिकाचे स्थान

**‘मिळून साऱ्याजणी’ या स्त्रीवादी विचारांना वाहिलेल्या नियतकालिकाचे महाराष्ट्राच्या समाजजीवनातील आणि मराठी वाङ्मयेइतिहासातील स्थान– अधोरेखित करणारा लेख**

**पवार मंदाबाई सोपान**

**प्रस्तावना :**

स्त्रीवादी विचारसरणी मांडणारा स्वतंत्र प्रवाह नियतकालिकांच्या क्षेत्रात अवतरला. ही बहुतांशी नियतकालिके स्त्रियांनीच सुरू केली. महिला आंदोलन पत्रिका, प्रेरक ललकारी, स्त्री उवाच, बायजा, मिळून साऱ्याजणी अशी काही नावे सहज सांगता येतील. जागतिक स्तरावरील स्त्रीच्या संदर्भात विकासाच्या आणि परिवर्तनाच्या दिशा या मासिकांतून दिग्दर्शित होत आहेत. वंचित स्त्रिया, विधवा, परित्यक्त्या, वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, कामगार आणि दलित स्त्रिया, ग्रामीण स्त्रिया अशा अनेक वर्गातील स्त्रियांचे प्रश्न या नियतकालिकांनी मांडले आणि अजूनही मांडत आहेत. या नियतकालिकांनी स्त्रीला आत्मभान दिले आणि परिवर्तनाची दिशाही सूचित केली. पुरुषप्रधान संस्कृतीमधील स्त्री–पुरुष समानतेची जाणीव, स्त्रीवर होणारा अन्याय, स्त्रीच्या विविध समस्या, तिची समाजात होणारी अवहेलना, ढासळती कुटुंब व्यवस्था, यंत्रयुगाचा रेटा, शहरीकरण, ढासळती ग्रामसंस्था त्यातून माणसापुढे अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याचा परिणाम अपरिहार्यपणे नियतकालिक साहित्यात झालेला दिसतो.[१] स्त्रियांची नियतकालिके स्त्रियांचे मानसिक उद्बोधन, वैचारिक संवर्धन करीत आली आहेत. स्त्री मनाचे उद्बोधन करणारी मासिके काळाबरोबर स्त्रियांचे व्यासपीठ बनत गेली. यात स्त्रीवादी विचार देणाऱ्या पूर्वार्धामध्ये सरस कथा मांडणाऱ्या वसुंधरा पटवर्धन, गीता साने, मालतीबाई बेडेकर, सरिता पदकी, ज्योत्स्ना देवधर, तारा वनारसे, विजया राज्याध्यक्ष, अनुराधा वैद्य तर उत्तरार्धात स्त्रीवादी विचार देणाऱ्या कथा सानिया, गौरी देशपांडे, आशा बगे, उर्मिला पवार, मेघना पेठे अशी बरीच नावे यामध्ये घेता येतील. स्त्रियांच्या लेखनाबरोबरच त्यांचे सामाजिक कार्य, सांस्कृतिक उपक्रम, स्त्री परिषदांचे वार्तांकन अहवाल इत्यादींतून स्त्रियांच्या वैचारिक विकासाबरोबरच सांस्कृतिक कार्याचा विकास विक्रमही अभिव्यक्त होताना दिसतो आहे.


**वाळवंटातील हिरवळ**

‘मिळून साऱ्याजणी’ हे फक्त मासिक नाही तर सहकार, बांधिलकी आणि मैत्रभाव जपणारे भाषेचे संस्कृतीशी, परंपरेशी जवळीक, नातं दर्शविणारे

दिशादर्शक होय. स्त्री प्रश्नांच्या वाळवंटात सर्वदूर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष ढोबळ किंवा तरल अशा विविध रूपांत असणाऱ्या घरांपासून, गावांपासून, समाजापर्यंत सर्वत्र भरून राहिलेल्या स्त्रीला अडवणाऱ्या, तिच्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या, तिच्या आत्मसन्मानाला, प्रतिष्ठेला छिलणाऱ्या अन्याय्य घटना, घडामोडींना शब्दरूपात आणण्याचं काम साऱ्याजणींनी अथकपणे केलं. स्त्रियांसाठी हे मासिक ओॲसिस, वाळवंटातील हिरवळ बनलं.'[२] आपल्या समाजव्यवस्थेत, या पुरुषप्रधान संस्कृतीत वेगवेगळ्या पातळीवर आणि वेगवेगळ्या तऱ्हेनं बाईचं शोषण होत आहे. याची कल्पनाही नसणाऱ्या स्त्रियांना या शोषणाची जाणीव करून देण्याबरोबरच स्वतःही बोलता येतं, स्वतःला शोधून पाहता येतं, हे माहीत नसलेल्या बाईला स्वतःशी संवाद करता यावा म्हणूनच विद्या बाळ यांनी हे मासिक सुरू केले आहे. या मासिकाने स्त्री-पुरुष दोघांनाही एकमेकांशी संवाद साधण्याचे कसब दिलं. तसंच लेख, कविता, वैचारिक साहित्याबरोबरच अनेक कथांचाही अंतर्भाव या मासिकात दिसून येतो.

### कथाविश्व

मध्यमवर्गीय कुटुंबात स्त्रीवर फारसे अन्याय अत्याचार होत नाहीत. ते झोपडवस्तीत, ग्रामीण भागात होतात. हे तपासण्याचे काम तसेच पारंपरिक सामाजिक-सांस्कृतिक, मध्यमवर्गीय चौकट एकदम मोडून न टाकता हळूहळू ती वापर करणं हे महत्त्वपूर्ण आहे. हे पुरुषप्रधान व्यवस्थेने हजारो वर्ष केलेले; परंतु आज अर्थहीन, पोकळ, गैरलागू ठरणारे हे संस्कार गळून पडून वाचकांच्या मनात अपेक्षित असलेले अनेक प्रश्न येऊन अस्थिरता, अस्वस्थता निर्माण होते. स्त्रीपण, पुरुषपण ओलांडून माणूसपणाची समृद्ध वाटचाल करताना आजही या मासिकातील ललित साहित्य मनाचा हळवा हळुवार कोपरा जपताना दिसत आहे. कथांमधील उत्कट भावना, उत्स्फूर्तता, तरल संवेदना, स्त्री जीवनाची स्थिती, संवेदनशील गाभ्याला स्पर्शणाऱ्या अनेक अनुभवांमुळे मासिकातील कथा मनाला भिडणाऱ्या, खोलवर विचार करण्यास भाग



पाडतात. स्त्री-पुरुष नातं, त्यातले ताण-गुंते, त्यातलं सत्ताकारण, स्त्री-पुरुष मैत्री, त्यातले भावनिक ताण, हळुवार जागा, स्त्रीनिष्ठ अनुभवांबरोबरच मुलांना आपल्या मनाप्रमाणे वागायला लावणारे आणि त्यांच्या आयुष्यात हिरावून घेणारे वडील, लग्न आणि लग्नानंतरची मैत्री सांभाळताना तारेवरची कसरत करणाऱ्या स्त्रिया, लेखनाचा बाजार मांडणारे लेखक, स्त्री शिक्षण, पर्यावरणाचे तसेच वृद्धांचे प्रश्न, स्त्रियांच्या मनाचा विचार न करणारे विषय, स्त्री शोषण, पुरुषांचे वर्चस्व असणाऱ्या कथा, स्त्रियांची संवेदना, मनातील अनेक भाव-भावना, मानसिकता आणि त्यावर उभे राहिलेले नातेसंबंध इत्यादी विषयांना मिळून साऱ्याजणींचे कथा विश्व मनाला भिडताना दिसते आहे. 'स्त्रिया तडजोडी संबंधी बोलू लागल्या तेव्हा घर सांभाळणे, मुलांची जोपासना व पत्नीची भूमिका निभावणे, आणि त्याच वेळी व्यवसायिक आव्हाने पेलणे यांची सांगड घालत असताना सर्वांनाच तडजोड करण्याची गरज भासली. एका बाजूने त्यांची वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कल्पनेशी बांधिलकी आहे. स्वायत्तता, स्वतंत्रता या महत्त्वाच्या वाटतात, तर दुसऱ्या बाजूने आदर्श मुलगी किंवा कर्तव्यतत्पर माता व पत्नी म्हणून

त्यांची भूमिका असते'.[३] 'परंपरागत पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रीला वस्तुमूल्य दिल्यामुळे पुरुषांच्या नजरेतून स्त्री ही वंशवृद्धी, कामोपभोग अशा त्याच्या दैनिक नित्याच्या गरजा भागविणारी एक वस्तू' असा सतत तिचा दर्जा राहिला, त्यामुळे स्त्री आणि पुरुष ही दोन स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं असा त्यांचा एका पातळीवर विचार करण्यात आला नाही. आज एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला या विचार पद्धतीमध्ये फारसा बदल झालेला नाही. काही अपवादात्मक माणसांनी परंपरेच्या विरोधात जाऊन स्त्री-पुरुष नात्याविषयी काही सांगण्याचा प्रयत्न केला. तेव्हा या विषयासंबंधी विचार करण्याऐवजी समाजाने बदनामी आणि निंदानालस्तीच केली.[४] मराठीतील अनेक नामवंत मासिकं आणि प्रकाशन संस्था बंद पडत असताना १९८९ च्या ऑगस्टला मराठी मासिकांत 'मिळून साऱ्याजणी' हे विद्या बाळ यांचे नवीन होतकरू मासिक म्हणजे एक धाडसी प्रयोगच म्हणता येईल. त्यात एक चैतन्यदायी प्रेरणा, एक लक्षणीय घटना, एक आवाज आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बऱ्याच अंशी स्त्रियांच्या मनात रुजलेली चळवळ होती कारण हे मासिक स्त्रियांशी संबंधित कुटुंबात आणि समाजात स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणारे असून त्यात स्त्रियांच्या जीवनकथा वेगळ्या होत्या. त्या काही सांगायचा प्रयत्न करीत होत्या. त्यांचे ऐकणारे कोणी नव्हते. तसेच शोषित, अदृश्य अशा वर्गातील सर्वच स्त्रिया आपल्या व्यथा कथांमधून मांडताना दिसत होत्या. मासिकातील कथेचे विषय व्यक्तिचित्रण, मांडणी, एकूण परिणाम अशा वेगवेगळ्या कोनातून जाणाऱ्या अतिशय सुंदर, वाचनीय, स्मरणीय, बोधामृत पाजण्याच्या आविर्भावात लिहिलेल्या किंवा एखाद्या अनुभव कथांतून प्रत्ययास येतो. शुभारंभ अंकातील अनुवादित कथा अप्रतिम, मुलांना कसं वाढवायचं, त्यांच्यावर संस्कार करताना स्वतःची प्रगती कशी करावी या विषयावर भाषण ऐकून त्याच अवस्थेत घरी परतलेल्या स्त्रीला नवरा, सासू, मुलं कसे टोमणे मारतात. याचं चित्रण एकूण स्त्रीला साधं मनाप्रमाणे एखादं भाषण ऐकण्याची मोकळीक मिळू न देणाऱ्या मानसिकतेची कथा ही सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वीची; परंतु आजही परिस्थिती पूर्णपणे बदललेली दिसत नाही. हा विचार अतिशय क्लेशदायक. अनेकविध लेखकांनी मासिकात कथालेखन केलेले दिसले. आशा बगे, प्रिया तेंडुलकर, दीपा गोवारीकर, नीता गद्रे, मिलिंद बोकील, पंकज कुरुलकर सुप्रसिद्ध लेखक विशेषांकात भेटतात, तर डॉ. अजिता काळे, विद्युल्लेखा अकलूजकर तसेच ग्रामीण वास्तवाचे भान देणाऱ्या प्रतिमा इंगोले, अनुवादित कथा लेखनात महादेवी वर्मा, आशापूर्णा देवी, रजिया सज्जाद झहीर, माया प्रधान तर अनुवादक म्हणून मंदाकिनी भारद्वाज, विद्युत भागवत, रंजना गिरीधर गोपाल अशा अनेकविध लेखक-लेखिका दिसून येतात. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या सुधारक विचारसरणीच्या नायकापासून ते भिन्न धर्मीय जातीच्या उतरंडीच्या पुरुषप्रधान समाजातल्या स्त्री चित्रणापर्यंत विविधतेने नटलेल्या भारतीय समाजाचा आरसा या अनुवादित कथांमुळे बघावयास मिळाला, तर नातेसंबंधावर आधारित कथांचे प्रमाण हे अधिक असलेले दिसून येते. या शिवाय सामाजिक परंपरा, स्त्री अत्याचार, या कथांमध्ये आर्थिक विवंचनेबरोबरच, अज्ञान, व्यसनांचा जबरदस्त पगडा यामुळे उद्‌भवलेले प्रश्न जास्त दिसून आले. कुटुंबातल्या बहुपदरी नात्यांचे ताणे बाणे सांभाळणाऱ्या कथा बहुतांशी स्त्रियांनी लिहिलेल्या आहेत, तर 'स्त्रीवादाच्या विशेष अभ्यासक डॉ. विद्युत भागवत यांनी ताराबाई शिंदे यांना भारतातील पहिली स्त्रीवादी साहित्य समीक्षक असण्याचा बहुमान दिला.[५]

**साहित्यातील बहुरंगी रूपांचा उत्कट भावबंध :**

मिळून साऱ्याजणी या मासिकाने महाराष्ट्राच्या वाङ्मयीन इतिहासामध्ये विशिष्ट स्थान निर्माण केलेले दिसते. स्त्री-पुरुष समानता हा विचार रुजवायला सुरुवात केली. 'बायकांनी बायकांशी साधलेला संवाद' किंवा 'स्त्री-पुरुषांनी स्वतःशी नव्याने साधलेला संवाद' महत्त्वपूर्ण ठरतो. स्त्रिया या घर मोडणाऱ्या असतात अशी धारणा असलेल्या वातावरणात हे मासिक सुरू करणे आणि अनेक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय स्थित्यंतरामध्ये आजतागायत टिकवून ठेवणे हे जोखमीचे काम या मासिकाने केलेले दिसते. आज

स्त्रीवादी सैद्धांतिक विवेचनामध्ये आपण खूपच पुढे आलो आहोत. सुरुवातीच्या काळात स्त्री-पुरुष भेद हा नैसर्गिक नसून सामाजिक, सांस्कृतिक आहे. अनेक दैनंदिन व्यवहारांमध्ये स्त्री-पुरुष विषमता रुजवली जाते आणि ती दृढदेखील केली जाते, हे या मासिकाने सामान्य मध्यमवर्गीय स्त्रियांना बघायला शिकवले. स्त्री आणि पुरुष या दोन टोकाच्या अस्मितांच्यामध्ये अनेक अस्मिता घडतात आणि त्या सर्वच आपल्याला समजून घ्यायची गरज आहे. असे स्त्रीवाद मानतो. 'स्त्री-पुरुष एक द्वैत म्हणून न बघता लैंगिक अस्मितांचा पूर्ण किंवा संपूर्ण पट उलगडून बघण्याची गरज आहे. ही स्त्रीवादाची मांडणी मासिकात विविध सदरांमधून मांडलेली दिसते.' स्त्री-पुरुषांचा स्वतःशी नव्याने चाललेला संवाद यापासून 'ती', 'ते' आणि 'तो' यांचा स्वतःशी आणि परस्परांशी नव्याने संवाद होण्यासाठी 'मासिक नव्हे चळवळ' हा प्रवास समाजाविषयीच्या सम्यक आकलनाचा देखील आहे हे लक्षात घेतले पाहिजे'.[६]

तसेच मासिकात अनेक सदरांमधील विषय सहजीवन समाजशास्त्रीय, राजकारण, सिनेमा, सांस्कृतिक पर्यावरण, वेश्या व्यवसाय, अपंगत्व, स्त्रीभान आणि पुरुषभान, आत्मभान, समाजभान आणि विश्वभान, आधुनिकता आणि परिवर्तनवादी चळवळी, अशी चर्चासत्रे, दलितांचे प्रश्न, भटक्या समुदायातील महिला, 'आम्हीही इतिहास घडवला' या पुस्तकाच्या निमित्ताने उर्मिला पवार व मीनाक्षी मनू या लेखिका तर लोकसाहित्याचे सामाजिक महत्त्व ठसविण्याचा प्रयत्न तारा भवाळकर यांनी याच मासिकातून केलेला दिसतो. तसेच मासिकाची मुखपृष्ठंही आशयघन आणि बोलकी, वैविध्यपूर्ण, सुंदर, सर्वसमावेशक आणि प्रयोगशील असलेली. सर्वांना साहित्यिक ऊब देणारी उबदार गोधडी हे पहिल्या अंकाचे मुखपृष्ठ सर्वांचे मन वेधून घेते. तसेच संवादात समोरच्याची बैठक समजून घेऊन आपले म्हणणे मांडण्याचा खुलेपणा लवचीक, मृदुपणा असलेला संवाद विचारांचा, भावनांचाही पाहावयास मिळतो. संवादाने पितृसत्तेचा नेहमीच्या सर्वसामान्य अशा व्यवहारांवर बोट ठेवून नैसर्गिक, नॉर्मल वाटणारे पितृसत्तेचे रूप उघड केले. कुटुंबामध्ये सुधारणा आणण्यासाठी पुरुषांना आपल्या संवादाच्या कक्षेत आणले. तसेच वाचणारे लिहितात, वाचायला हवं ही सदरेही अप्रतिम. विद्या ताईंचे संपादकीय लेखन भाषा सोपी, विषयाला अनुरूप, अनुभवलेले क्षण, विवाह संस्था, स्त्रियांवरील अत्याचार, लैंगिक अशा वैविध्यपूर्ण विचार, संघर्षाची गाथा मांडणारी सदरे, व्यंगचित्रे, जनजागरण करणारे वृत्तांत, राजकीय भान, दिवाळी अंकाचे विशेष विभाग हे वैशिष्ट्यपूर्णतेने नटलेले दिसतात, तर 'मैतरणी गं मैतरणी' हे सदर स्त्री विश्वाचे अनुभव सरळपणे मांडताना दिसतात. म्हणूनच मिळून साऱ्याजणी हे मासिक एखाद्या भरजरी वस्त्रासारखे अनेक कलाकृतींनी विणलेले दिसून येते.

### 'स्त्रीजीवनातील वेगवेगळी स्थित्यंतरे'

आजही आपल्याला अनेक चळवळींतून स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधी जागृती होताना दिसते आहे. स्त्री संघटना ग्रामीण, शहरी आणि राजकीय पातळीवर कार्यरत असल्या तरीही स्त्री-पुरुष विषमता आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारी परिस्थिती मात्र अद्यापही चिंताजनक असल्याचे दिसते. स्री शिक्षणामुळे स्त्रियाही स्वतःच्या स्थितीविषयी विचार मांडू लागल्या. वर्तमानपत्रांतून, नियतकालिकांतून लिहू लागल्या; परंतु स्त्रीत्वाचे दर्शन, स्त्री शिक्षण, स्त्रियांचे कुटुंबसंस्थेतील प्रश्न, स्त्रियांचे हक्क या गोष्टी आजही त्यांना मिळतात का? हे प्रश्न मात्र अनुत्तरितच राहतात. विज्ञानयुग आले, स्त्रिया अवकाशात जाऊ लागल्या असल्या तरी आजही त्यांना त्यांच्या हक्कांसाठी मात्र झगडावे लागत आहे. त्यांचा राजकारणातील, समाजकारणातील सहभाग आजही चर्चेचा विषय होतो. नियतकालिकांचा हेतूच मुळी स्त्रियांच्या सुधारणेबाबत स्त्री-पुरुष यांच्यात जागृती निर्माण करणे हा होता. त्याचप्रमाणे सुशिक्षित स्त्रियांना लेखनाला व वाचनाला उद्युक्त करणे, लेखनाची परंपरा नसतानाही स्त्रिया नियतकालिकात लिहू लागल्या. आपले अनुभव, कथा मांडू लागल्या. वर्षानुवर्ष दुय्यमपणाचे जिणे जगलेल्या परिस्थितीशी झगडत असलेल्या स्त्रियांच्या मनातील कमीपणाची भावना नियतकालिकांनी हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न केलेला

दिसतो. स्त्री जीवनातील सामाजिक स्थित्यंतरे त्यांच्या लेखनातून प्रतिबिंबित होताना दिसत आहेत. स्त्री ही कुटुंब उभारणीमध्ये महत्त्वाची जबाबदारी उचलत असते. आजी, आई, काकू, आत्या, मामी, वहिनी, बहीण इत्यादी भूमिकेतून तिचा पुरुषांशी संबंध येत असतो. अपवाद वगळता जवळजवळ प्रत्येक स्त्रिया विविध भूमिका बजावत असतात; परंतु तिची ही बाजू विचारात घेतली जात नाही. स्त्रियांच्या अंगी दुर्गुण व सद्‌गुण मात्र पुरुषांच्या ठायी. स्त्री आणि पुरुष या दोन जाती निसर्गतः निर्माण झाल्या असल्या तरी मनुष्य म्हणून पुरुष आणि स्त्री यांच्यात फारसा भेद नाही. एकच जीवन शक्ती दोघांमध्ये असून 'संस्कृतीच्या विकासात पुरुषप्रधान समाज रचना प्रचलित आणि स्त्रियांना घरादारात दुय्यम दर्जा प्राप्त झाला. पुरुषांनी आपल्या स्वार्थासाठी स्त्रियांना देवत्वाची पदवी बहाल करून त्यांच्यावर पातिव्रत्याच्या पावित्र्याची बंधने घातली. या बंधनाला प्रेमबंध समजून स्त्रियांनी नकळत गुलामी पत्करली व आपले जीवनक्षेत्रही संकुचित, मर्यादित केले. शतकानुशतकांच्या अशा परिस्थितीने स्त्रीला संकुचित जीवनाची एवढी सवय झाली, की तिची दृष्टी कोती होत गेली. तिच्या भावनादेखील बलवान असल्या तरी आकुंचित राहिल्या. या उलट पुरुषांनी मात्र जीवनात विविधता अनुभवली. त्यांचे क्षेत्र विस्तारित झाले. त्यांनी अनेक आघाड्यांवर यश मिळवले. परिणामी स्त्री आणि पुरुष या दोन जातीतील विकास व्यस्त प्रमाणात होत राहिला. पुरुष सबल झाले, तर स्त्रिया दुर्बल झाल्या. स्त्रियांना त्यांच्या सदस्यत्वाचा मूळ अर्थही समजेनासा झाला'. [७] 'पुरुषांची तयारी झाल्याखेरीज स्त्रीवादाला येणे शक्य नाही. हे होण्यासाठी पुरुषांना पुढे काहीतरी ठोस आदर्श ठेवला जाणे आवश्यक आहे असा आदर्श म्हणजे स्त्रीवादी पुरुष ही संकल्पना असावी असे सुचवावेसे वाटते.' असे मत डॉक्टर साळुंके यांनी व्यक्त केले. [८] स्त्रीवादी विचारांची ही पेरणी सातत्याने होणे गरजेचे आहे.

''स्त्री मुक्तीची अभिप्रेत व्याख्या-स्त्रियांच्या मार्गातील आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक धोरण नष्ट होतील तेव्हा त्या स्त्रीची मानसिक गुलामगिरी

**'संस्कृतीच्या विकासात पुरुषप्रधान समाज रचना प्रचलित आणि स्त्रियांना घरादारात दुय्यम दर्जा प्राप्त झाला. पुरुषांनी आपल्या स्वार्थासाठी स्त्रियांना देवत्वाची पदवी बहाल करून त्यांच्यावर पातिव्रत्याच्या पावित्र्याची बंधने घातली. या बंधनाला प्रेमबंध समजून स्त्रियांनी नकळत गुलामी पत्करली व आपले जीवनक्षेत्रही संकुचित, मर्यादित केले. शतकानुशतकांच्या अशा परिस्थितीने स्त्रीला संकुचित जीवनाची एवढी सवय झाली, की तिची दृष्टी कोती होत गेली. तिच्या भावनादेखील बलवान असल्या तरी आकुंचित राहिल्या. या उलट पुरुषांनी मात्र जीवनात विविधता अनुभवली. त्यांचे क्षेत्र विस्तारित झाले. त्यांनी अनेक आघाड्यांवर यश मिळवले. परिणामी स्त्री आणि पुरुष या दोन जातीतील विकास व्यस्त प्रमाणात होत राहिला. पुरुष सबल झाले, तर स्त्रिया दुर्बल झाल्या. स्त्रियांना त्यांच्या सदस्यत्वाचा मूळ अर्थही समजेनासा झाला'.**

संपवण्यासाठी अनुकूल वातावरण तयार होईल असे आम्ही मानतो. स्त्रीमुक्ती होण्यासाठी समाजाच्या सर्व व्यवहारांमध्ये तिला पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क मिळवण्यासाठी लिंगभेदावर आधारित श्रमविभागणी नष्ट होणे, ही स्त्रीमुक्तीची पायाभूत गरज आहे. स्त्रीच्या दुय्यम स्थानाचा उगम पुरुषप्रधान विषमतेवर आधारित समाज व्यवस्थेत आहे हे लक्षात घेता संपूर्ण समाज परिवर्तनाच्या क्रमातून स्त्री मुक्ती होणे शक्य आहे असे आम्ही मानतो.'' [९]

जागतिक महिला वर्षानंतरच्या काळात स्त्री जीवनात सुद्धा वेगाने बदल झालेत. स्त्रियांचा शैक्षणिक स्तर उंचावला. उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढलेले दिसते. सर्वच ज्ञानशाखांमध्ये स्त्रिया स्वतःची गुणवत्ता सिद्ध करू लागल्या. संशोधक म्हणूनही स्त्रियांना ओळख

मिळाली. नोकरी आता फक्त आर्थिक गरजेपुरती न राहता स्त्रीच्या संपन्न सक्षम व्यक्तिमत्त्वाची ओळख बनली. प्रस्तुत काळाच्या टप्प्याच्या प्रारंभी 'करियर वुमन' म्हणून पुढे येत होती. स्त्रीची करियर वुमन ही प्रतिमा विस्तारत होती. लेखन, कलाक्षेत्राबरोबर, विचारवंत, संशोधक, शास्त्रज्ञ क्रीडापटू, प्रशासकीय अधिकारी, लष्करी अधिकारी अगदी सौंदर्यवती स्त्री म्हणून प्रतिमा तयार होऊन कोणत्याही क्षेत्रात स्त्रियांना प्रवेश नाकारला जात नाही. काळाबरोबर समाज मनाचेही प्रबोधन होत होते. हे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन हळूहळू बदलत होता. स्त्रीचे जीवनमान या काळात निश्चितपणे उंचावलेले दिसते. सरकारी, शासकीय स्तरावरसुद्धा स्त्रियांचे हक्क आणि अधिकार या दृष्टीने नव्याने विचार सुरू झाला. स्त्रियांसाठी अनेक कल्याणकारी योजना जाहीर झाल्या.७३/७४ व्या घटना दुरुस्तीनंतर स्त्रियांना स्थानिक स्वराज्य पातळीवर राजकीय क्षेत्रात ३३ % आरक्षण मिळाले. १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोग, तर १९९४ मध्ये महाराष्ट्र शासनाचा महिला आयोग अनेक कायदेशीर तरतुदींचा आधार स्त्रियांना मिळाला. अगदी २००६ मध्ये घरगुती छळाच्या संदर्भात सुद्धा कायदा झाला; परंतु या बदलत्या काळाने अनेक प्रश्नही उभे राहिले. १९७५ या टप्प्यावर व नंतरही हुंड्याचा प्रश्न, हुंडाबळीचा प्रश्न तीव्र होत होता. अनेक हुंडाबळीच्या केसेस आजही गाजताना दिसतात. लैंगिक अत्याचाराच्या घटनांना स्त्रियांना तोंड द्यावे लागत आहे. अजूनही स्त्रिया पुरुषी वासनेला बळी पडत आहेत. तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास आणि गर्भजल तपासणी यंत्राच्या दुरुपयोगा यामुळेच स्त्रीगर्भाची हत्या करण्याची प्रवृत्ती विकसित झाली. घातक कुटुंब नियोजनाच्या साधनांची स्त्रियांवर प्रसंगी सक्ती होऊ लागली. मदरहुड म्हणजे स्त्रीचे गर्भाशय भाड्याने घेण्यापर्यंत विकसित तंत्रज्ञानाने स्त्रियांसमोर प्रश्न उभे केले. सामाजिक आर्थिकदृष्टीने पुरुषांचे वर्चस्व आजही दिसते. विधी, उपचार संस्कृती यांसाठी स्त्रियांवरच दबाव आणला जातो. [१०] फक्त तिने काम करावे अर्थव्यवहार मात्र स्त्रीला नको यातून आर्थिक प्रापंचिक व्यवहारांमध्ये दुय्यम स्थान पाहावयास मिळते. तिला स्वतःचे मन मारून जगावे लागते. सर्वांचे करण्यात सर्व जबाबदाऱ्या सांभाळत मी कोणी हेच ती विसरून जाते. त्यामुळे तिची उंच भरारी घेणारे पंख पुरुषी अहंकारामुळे छाटून जातात. बेगडी प्रेम, वात्सल्य, मातृत्व, जिव्हाळा, नातेसंबंध टिकविण्यासाठी स्त्रियांचे शोषण होताना दिसते आहे. जीवनाच्या विकासाचा आलेख चढता-वाढत असल्याचे समाधान मानताना अनेक मान वर काढणारे, काळाबरोबर पुढे येणारे प्रश्न, प्रसिद्धी माध्यमातून स्त्रियांचा होणारा वापर इत्यादी अनेक गोष्टी समाधान काळवंडून टाकणाऱ्या दिसत आहेत.

**संदर्भ :**


१) मार्गदर्शन डॉ. सरोजनी वैद्य : 'स्त्री साहित्याचा मागोवा', खंड २ १९५१ ते २०००, साहित्यप्रेमी भगिनी मंडळ पुणे, प्रथमावृत्ती डिसेंबर २००२ (पृ.१८)

२) डॉ. गीताली वि.म., उत्पल व. बा, मानसी घाणेकर : 'गोष्टी साऱ्याजणींच्या मिळून साऱ्याजणीतल्या निवडक कथा', मेनका प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती ऑगस्ट २०१३ (पृ.६)

३) रानडे प्रतिभा : 'स्त्री मुक्तीच्या महाराष्ट्रातील पाऊलखुणा', स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक पॉप्युलर प्रकाशन, मुंबई पहिली आवृत्ती १९९१/१९९२

४) लांडे सुमती (संपा) : 'स्त्री -पुरुष नातेसंबंध', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, प्रथमावृत्ती नोव्हेंबर २००७ (पृ.४)

५) शुभांगी गोरे : ताराबाई शिंदेकृत 'स्त्री-पुरुष तुलना' समीक्षेची समीक्षा सुगावा प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती डिसें २००८. (पृ.११)

६) मृणालिनी शहा (संपा) : 'स्त्रीचा आत्मशोध', स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १८ जून २००० (पृ.१७)

७) संपा.गिताली वि. म. : 'मिळून साऱ्याजणी' अंक जानेवारी २०२२ युनिक ऑफसेट पुणे, (पृ.२१)

८) डॉ. विलास साळुंके: 'स्त्रीवादी पुरुष संकल्पना आणि वास्तव',. मिळून साऱ्याजणी ऑगस्ट २००२ पृ. (५४)

९) स्त्री मुक्ती आंदोलन : ८ मार्च चर्चासत्र अहवाल स्त्री मुक्ती संपर्क समिती, प्रकाशन पृ.(११)

१०) डॉ. स्वाती कर्वे: 'स्त्रियांच्या नियतकालिकांचा इतिहास', डायमंड पब्लिकेशन्स पुणे, पहिली आवृत्ती जुलै २००७ (पृ.१७०)



**पवार मंदाबाई सोपान**

पीएच्. डी. संशोधक विद्यार्थिनी. के.टी.एच.एम.कॉलेज नाशिक (मराठी विभाग)

# महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे

## इतर शाखा कार्यवृत्तांत

### पिंपरी चिंचवड शाखा

**कार्ग्रक्रम अहवाल ऑक्टोबर २०२१ ते डिंसेबर २०२१**

**'शांताबाई शेळके जन्मशताब्दी महोत्सव'**

**(१२ ऑक्टोबर २०२१)**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आयोजित कवयित्री शांताबाई शेळके यांच्या जन्मदिनानिमित्त 'शांताबाई शेळके जन्मशताब्दी काव्यमहोत्सव' सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाचे उद्घाटन १२ ऑक्टोबर २०२१ रोजी सांयकाळी ५.०० वाजता ऑनलाइन गुगल मीट व्यासपीठावर करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक मा. प्रवीण दवणे (प्रसिद्ध कवी गीतकार) तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. रामचंद्र देखणे (संत साहित्याचे गाढे अभ्यासक) हे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. अनुराधा मराठे (प्रसिद्ध गायिका) आणि मा. सुधीर गाडगीळ (प्रसिद्ध निवेदक व लेखक) तसेच कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. प्रा. मिलिंद जोशी हे होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी केले, सूत्रसंचालन सीमा गांधी यांनी केले, तर आभार प्रदर्शन मसाप पिंपरी चिंचवडच्या कार्याध्यक्ष- विनिता ऐनापुरे यांनी केले. प्रांजली बर्वे यांनी स्वागतगीत गाऊन सर्वांचे स्वागत केले. कार्यक्रम नियोजनात कार्यवाह संजय जगताप, उपाध्यक्षा रजनी शेठ, कार्यकारिणी सदस्य माधुरी मंगरुळकर, किशोर पाटील यांनी सहभाग नोंदवला.

**'वाचन प्रेरणा दिनानिमित्त अभिवाचन कार्यक्रम'**

**(१६ ऑक्टोबर २०२१)**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम १६ ऑक्टोबर २०२१ रोजी सायंकाळी ५.०० वाजता महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड कार्यालय चिंचवड येथे संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे मा. डॉ. प्रभाकर देसाई (मराठी विभाग प्रमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ) आणि मा. किरण वैद्य (व्यवस्थापकीय संचालक ऑटोक्लस्टर पिंपरी चिंचवड) हे होते. वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित अभिवाचन कार्यक्रमात अनेक मान्यवर लेखकांच्या प्रसिद्ध पुस्तकातील निवडक उताऱ्यांचे वाचन रसिकांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी, सूत्रसंचालन माधुरी मंगरुळकर यांनी तर आभार प्रदर्शन कार्याध्यक्षा विनिता ऐनापुरे यांनी केले. कार्यक्रम नियोजनात कार्यवाह संजय जगताप, उपाध्यक्षा रजनी शेठ, कार्यकारिणी सदस्य किशोर पाटील यांनी सहभाग घेतला.

**दिवाळी पहाट कार्यक्रम - 'काव्य रंगे उषःकाल संगे'**

**(३ नोव्हेंबर २०२१)**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवड आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रम- 'काव्य रंगे उषःकाल संगे' हा कार्यक्रम ३ नोव्हेंबर सकाळी ६.३० वाजता संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे हे होते. तर उद्घाटक मा. रामचंद्र देखणे (संत साहित्य अभ्यासक) होते. प्रमुख उपस्थितीत मा. नंदकिशोर कपोते (प्रसिद्ध राष्ट्रीय नृत्य दिग्दर्शक) उद्योजक मा. अतुल इनामदार, मा. राजन लाखे (अध्यक्ष मसाप. पिं. चिं), मसाप शाखा पिंपरी-चिंचवडच्या सल्लागार ॲड. मनाली गाडगीळ ह्या होत्या.

दीपावली पहाट निमित्त सभागृह प्रांगणात दिवे लावून सर्वांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आपला जीवनप्रवास उलगडून रसिकांना परिस्थितीशी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली, तर उद्घाटक मा. रामचंद्र देखणे यांनी दिवाळीविषयी आध्यात्मिक दाखले देऊन रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे कार्यक्रम निवेदन- संजय जगताप (कार्यवाह) यांनी केले तर प्रास्ताविक शाखेचे अध्यक्ष मा. राजन लाखे यांनी केले, सूत्रसंचालन- सीमा गांधी यांनी तर आभार प्रदर्शन मसाप पिंपरी- चिंचवडच्या कार्याध्यक्षा- विनीता ऐनापुरे यांनी केले.

**'पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे यांची प्रकट मुलाखत' (१४ नोव्हेंबर २०२१)**

पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे यांना नुकताच राष्ट्रपतींच्या हस्ते पद्मश्री प्रदान करण्यात आल्याबद्दल त्यांचा सत्कार व प्रकट मुलाखत कार्यक्रम महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी- चिंचवडच्या वतीने पुनरूत्थान गुरूकुलम आश्रम येथे दि. १४ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आला. प्रसिद्ध मुलाखतकार श्रीकांत चौगुले व मा. राजन लाखे यांनी विशेष शैलीत ही मुलाखत घेऊन उपस्थितांची मने जिंकली. तसेच पद्मश्री मा. गिरीश प्रभुणे यांनी आपल्या मुलाखतीमधून आपल्या अनुभवांचा खजिना श्रोत्यांसमोर रिता केला. बालपणापासून ते पद्मश्री पर्यंची वाटचाल त्यांनी सुख-दुःखाचे अनुभव सांगत सर्वांपुढे मांडली.

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवडच्या वतीने बालदिनानिमित्त पुनरुत्थान गुरुकुलम आश्रमातील विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्यात आली. उपस्थित रसिकांना आश्रमाच्या वतीने दिवाळी फराळ देण्यात आला. कार्यक्रमाचे निवेदन संजय जगताप यांनी केले. प्रास्ताविक मा. राजन लाखे यांनी केले तर कार्याध्यक्ष विनीता ऐनापुरे यांनी आभार प्रदर्शन केले.

**साहित्य प्रवास लेखक कवींचा (२६ डिसेंबर २०२१)**

महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी-चिंचवडच्या वतीने साहित्य प्रवास लेखक कवींचा हा कार्यक्रम ऑनलाईन गुगल मीट वर दि. २६ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष मा. विनीता ऐनापुरे ह्या होत्या.

कार्यक्रमात १. अरुंधती वैद्य यांनी कवी अनिल यांचा साहित्य प्रवास उलगडला. २) प्रतिभा विश्वास यांनी इंदिरा संत यांचा साहित्य प्रवास उलगडला. ३) अंजना भोकरे भंडारी यांनी किशोर पाठक यांचा साहित्य प्रवास उलगडला. ४) ज्योत्स्ना जोशी यांनी सिंधू वसंत कानिटकर यांचा साहित्य प्रवास उलगडला. ५) नंदिनी चांदवले यांनी संजय चौधरी यांचा साहित्य प्रवास उलगडला. ६) विवेक विश्वरूपे यांनी बालकवी यांचा साहित्य प्रवास उलगडला. ७) प्रशांत थोरात यांनी सुरेश भट यांचा साहित्य प्रवास उलगडला. यानिमित्ताने रसिकांना अनेक लेखक व कवींच्या साहित्य प्रवासाविषयी माहिती मिळाली.

कार्यक्रमाचे निवेदन संजय जगताप यांनी केले. प्रास्ताविक मा. राजन लाखे यांनी केले तर माधुरी मंगरुळकर यांनी सूत्रसंचालन केले. कार्याध्यक्ष विनीता ऐनापुरे यांनी आभार मानले.

## डोंबिवली शाखा :

**१)** डोंबिवली शाखेतर्फे २ ऑक्टोबर २०२१ रोजी ज्येष्ठ रंगकर्मी श्री. रमेश भिडे यांच्या एकपात्री कार्यक्रमाचे आयोजन ऑनलाईन करण्यात आले होते. हा आमचा १९ वा ऑनलाईन कार्यक्रम. श्री. भिडे यांना त्यांच्या नाट्य प्रवासात अनेक मोठमोठ्या कलाकारांचा सहवास आणि मैत्र लाभले होते. त्यातील एक म्हणजे काशीनाथ घाणेकर! घाणेकरांच्या असंख्य आठवणी भिडे यांच्याकडे आहेत. त्यावर आधारित 'मी आणि डॉ. काशीनाथ घाणेकर' हा एकपात्री कार्यक्रम ते सादर करतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागत आणि आभार श्री. विलास सुतवणे यांनी केले.

**२) १३ फेब्रुवारी २०२२ :** नाटककार आणि लेखक, अभिनेते श्री. अभिराम भडकमकर यांच्या अतिशय गाजलेल्या आणि अनेक पारितोषिक मिळवलेल्या

'इन्शाअल्लाह' या कादंबरीवर आधारित व्याख्यान विनायक सभागृहात आयोजित करण्यात आले होते. हिंदू मुस्लिम या नाजूक संवेदनशील विषयावर त्यांनी उद्बोधक भाष्य केले.श्रोत्यांनी गर्दी केलेल्या या कार्यक्रमास ज्येष्ठ दिग्दर्शक कुमार सोहनी उपस्थित होते. प्रास्ताविक सुरेश देशपांडे यांनी केले,तर सूत्रसंचालन उमा आवटे-पुजारी यांनी केले.

३) **९ जाने २०२२** : ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने डॉ. नीलिमा गुंडी यांचा वसंत बापट यांचे साहित्यातील योगदान या विषयावर २० वा ऑनलाईन कार्यक्रम आयोजित केला होता. डॉ. नीलिमा गुंडी या आजारी पडल्यामुळे त्यांच्याऐवजी मा. श्री वामनराव देशपांडे यांनी कविवर्य वसंत बापट यांच्या साहित्यावर अतिशय सुंदर असे भाषण केले. प्रास्ताविक सुरेश देशपांडे.

**६ मार्च २०२२: समीक्षा संमेलन डोंबिवली**

संमेलनाध्यक्ष : **डॉ. सुधीर रसाळ**

रविवार, दिनांक ६ मार्च रोजी २०२२ डोंबिवली येथे माउली हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या समीक्षा संमेलनाचे वर्णन करावयाचे झाले तर असे म्हणता येईल की दिखाऊपणा नसलेले देखणेपण आणि भपकेबाजपणा नसलेली भव्यता असा सुरेख संगम या संमेलनात झाला होता.

डॉ. सुधीर रसाळ ज्यांना आज समीक्षा प्रांतातील भीष्माचार्य म्हणत येईल असे या संमेलनाचे अध्यक्ष होते यातच संमेलनाचे मोठेपण दिसून येते.

या संमेलनाला मसाप केंद्रीय कार्यकारिणीचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह मा. प्रकाश पायगुडे आणि कोषाध्यक्ष मा. सुनिताराजे पवार, निमंत्रक मा. शिरीष चिटणीस आवर्जून उपस्थित होते. संमेलनातील दोन परिसंवादांत डॉ. अनंत देशमुख, प्रा. विजय तापस, डॉ. प्रतिभा कणेकर, डॉ. भारती निरगुडकर, प्रा. दीपक घारे आणि मसाप डोंबिवलीचे अध्यक्ष मा. वामनराव देशपांडे ही मान्यवर मंडळी सहभागी झाली होती. समारोपाच्या वेळी नवी समीक्षा हवी या विषयावर बोलण्यासाठी मा. विनय हर्डीकर खास आले होते.

या संमेलनाच्या निमित्ताने भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. रसाळ सर यांनी केल्यावर दीप प्रज्वलन करून संमेलनाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या स्वागतानंतर मसाप डोंबिवली शाखेचे कार्याध्यक्ष सुरेश देशपांडे यांनी प्रास्ताविक करताना संमेलनातून कोणते विषय मांडले जाणार आहेत ते सांगितले. समीक्षेने वाचकांना साहित्य साक्षर करावे,क्लिष्ट, बोजड समीक्षेमुळे वाचक वाचनापासून दूर जाऊ नयेत ही अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रभावी वक्ते प्रा. मिलिंद जोशी यांनी आपल्या भाषणात असे सांगितले, की वाचकांनी आता आपली अभिरुची वाढवायला हवी. वाचनाच्या क्षेत्रात आज अशी परिस्थिती आहे की, जर आपले वडील निधन पावले असतील तर पुढची पिढी सदस्यत्वाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी येत नाही. ही परिस्थिती बदलायला हवी.

या संमेलनाचे निमंत्रक श्री. शिरीष चिटणीस यांनी संमेलन भरविण्यामागची भूमिका विशद केली. त्याचप्रमाणे महत्त्वाचे म्हणजे या संमेलनातील विचारांचे एक पुस्तकही प्रकाशित करण्याचे श्री. चिटणीस यांनी जाहीर केले.

डॉ.सुधीर रसाळ बीजभाषणात म्हणाले,की वाङ्ममय व्यवहाराच्या आरोग्यासाठी समीक्षा अतिशय आवश्यक आहे, असे असले तरी आज तिला नगण्य स्थान आहे. आज समीक्षा ही लेखकाला अडचणीची ठरत आहे. समीक्षेसाठी वाहिलेली नियतकालिके नाहीत अशी खंत त्यांनी व्यक्त केली. ललित साहित्याची परीक्षणे ही वाचकांसाठी असतात. वाङ्मयाभ्यास हा समीक्षेचा पाया आहे. समीक्षा समजण्यासाठी त्यामागील संकल्पना माहीत असणे गरजेचे असते आणि वाङ्मय अभ्यासात कलाकृतीचे समग्र विवेचन असते. (आंतररचना ते लेखकाच्या वाङ्मयाचा अभ्यास आणि त्याच्या जडणघडणीचा अभ्यासदेखील! अशा वाङ्मयाभ्यासाची परंपरा मराठीत निर्माण होऊ शकली नाही याबद्दल डॉ. रसाळ यांनी खेद व्यक्त केला. ज्या लेखकांनी लेखनाचे नवीन प्रयोग केले त्याकडे आमच्या समीक्षकांनी दुर्लक्ष केले,असेही ते म्हणाले.

(याच अंकात अन्यत्र डॉ. रसाळ सरांचे भाषण दिले आहे ते अभ्यासकांनी आवर्जून वाचावे.)

डॉ. रसाळ यांच्या बीजभाषणानंतर 'समीक्षेची विविध रूपे आणि उपयोजन' या परिसंवादात प्रा. विजय

तापस यांनी नाट्यसमीक्षेवर, संहिता आणि अभिनय अशा दृष्टिकोनातून अतिशय छान असे रोचक विचार मांडले, तर डॉ. भारती निरगुडकर यांनी कथेच्या अंगाने जात विश्लेषण केले. डॉ. अनंत देशमुख यांनी संशोधनात्मक आणि चरित्रात्मक समीक्षा असा विषय मांडला.

भोजनोत्तर दुसरा परिसंवाद 'समीक्षा वाचकाभिमुख हवी का?' या विषयावर डॉ. प्रतिभा कणेकर. प्रा. दीपक घारे यांनी विचार व्यक्त केले. समीक्षा आता रंजनवादी साहित्याकडे वळते आहे असेही ते म्हणाले, तर मा. वामनराव देशपांडे यांनी आपल्या खुसखुशीत भाषणात समीक्षकांनी वाचकांना कशा प्रकारे वाचनाकडे वळवावे हे सांगितले.

मा. विनय हर्डीकर यांनी आपल्या तासभरच्या भाषणात, काहीशा खेळकर भाषेत समीक्षकांना सुनावले. अगदी बा. सी. मर्ढेकर ते मौज संप्रदाय या सर्वांवर त्यांनी खुसखुशीत टीका केली. ''समीक्षेच्या प्रांतात आता नवीन काही यायला हवे,'' असे ते म्हणाले.

या समीक्षा संमेलनाच्या निमित्ताने मसाप डोंबिवली शाखेने वाचकांसाठी 'मला आवडलेले मराठी पुस्तक' या विषयावर ५०० शब्दांत विचार व्यक्त करण्याची स्पर्धा घेतली होती. या स्पर्धेला अक्षरश: प्रचंड प्रतिसाद मिळाला. देश-परदेशातून २०० च्या वर लेख आले आणि या सर्व लेखांचे परीक्षण डॉ. मीनाक्षी ब्रह्मे यांनी करून चार सर्वोत्कृष्ट आणि सहा उत्तेजनार्थ असे दहा पुरस्कार दिले. या स्पर्धेच्या पुरस्काराच्या कार्यक्रमाचे संचालन डॉ. धनश्री साने, कार्यवाह , मसाप, डोंबिवली शाखा यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मसाप डोंबिवली शाखेच्या उपाध्यक्ष दीपाली काळे यांनी केले, तर सर्व मान्यवरांचा परिचय उमा आवटेपुजारी, डॉ. वृंदा कौजलगीकर यांनी केले, गीता नवरे, आनंद गोसावी, प्रज्ञा जोशी, महेश देशपांडे, अशोक नाईक, शीतल दिवेकर या सर्व कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेऊन संमेलन यशस्वी केले.

## जुळे सोलापूर शाखा :

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर आणि आनंद श्री प्रतिष्ठानने दिनांक १६ जानेवारी २०२२ रोजी आनंद श्री हॉलमध्ये ज्येष्ठ कवी नारायण काका कुलकर्णी यांना, 'स्व. डॉ. वासुदेव रायते स्मृती मसाप जीवन गौरव पुरस्कार २०२१म हा ज्येष्ठ साहित्यिका डॉ. स्वर्णलता भिशीकर यांचे शुभहस्ते आणि अश्विनी ग्रामीण रुग्णालयाच्या माजी अधिष्ठाता डॉ. माधवी रायते यांचे अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आला.रुपये १०,०००/- रोख, मानपत्र, शाल, पुस्तक, गुलाबपुष्प असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याच वेळी वरील मान्यवरांच्या हस्ते नारायण काका कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'सुबोध श्रीविष्णू सहस्त्र नामग्रंथाचे प्रकाशनही करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांनी केले, तर सूत्रसंचालन आणि ज्येष्ठ पत्रकार रजनीश जोशी यांनी लिहिलेल्या मानपत्राचे वाचन प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीकांत कुलकर्णी यांनी केले. या वेळी सर्व कार्यकारिणी सदस्य, तसेच डॉ. इरेश स्वामी, सौ. निर्मला कुलकर्णी, शामराव कुलकर्णी, माजी आकाशवाणी अधिकारी सुनील शिनखेडे, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शिल्पकार भगवान रामपुरे, पत्रकार अरविंद जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, कवी मारुती कटकधोंड, नितीन वैद्य, प्रेमचंद मेने, महादेवी उडचान, रामचंद्र धर्मसाले, या मान्यवरांसह, साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ निरुपणकार विवेकजी घळसासी यांचा संदेश संदीप कुलकर्णी यांनी वाचून दाखवला.

दि.२८/१/२०२२

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई, आणि मनपा शिक्षण मंडळ, सोलापूर संयुक्तपणे मराठी भाषा पंधरवड्याचे निमित्ताने विद्यार्थी आणि शिक्षक यांचेसाठी काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती, त्याचा पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर महानगरपालिकेच्या महापौर कक्षाबाहेरील हॉलमध्ये घेण्यात आला. महापौर श्रीकांचना यन्नम यांचे हस्ते आणि महापालिका उपायुक्त

धनराज पांडे यांचे प्रमुख उपस्थितीत विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी यांनी, सूत्रसंचालन शिक्षण मंडळाच्या सुवर्णा गुरव यांनी तर आभार प्रदर्शन प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी केले. यावेळी कार्याध्यक्षा सौ. सायली जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, श्रीकांत कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य, तसेच विरोधी पक्षनेते अमोल बापु शिंदे, माजी उपायुक्त अनिल विपत, शिक्षण मंडळ प्रशासनाधिकारी कादर शेख, शिक्षण मंडळ पर्यवेक्षक मनीष बांगर, सुरेश कासार, यांचे सहशिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते. दि.२७/२/२०२२

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर, आयोजित ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी राज भाषा गौरवदिनाचे औचित्य साधून आनंदश्री हॉल येथे दिनांक २७ फेब्रुवारी २०२२ रोजी 'जागर मराठीचाम हा निमंत्रित कवी आणि काही बालकवी यांचा काव्य संमेलनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला आकाशवाणी सोलापूर केंद्राचे कार्यक्रम प्रमुख श्री. राजेंद्र दासरी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक पद्माकर कुलकर्णी यांनी तर सूत्रसंचालन प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे यांनी आणि आभार प्रदर्शन रामचंद्र धर्मसाले यांनी केले. या कविसंमेलनापूर्वी मसाप जुळे सोलापूर शाखेतर्फे सोलापुरातील ज्येष्ठ लेखक प्रा. डॉ. अर्जुन व्हटकर यांचा त्यांना मध्यप्रदेश शासन साहित्य अकादमीचा रू.५१,०००/- चा भा. रा. तांबे पुरस्कार त्यांच्या कथासंग्रहाला जाहीर झाल्याबद्दल श्री. राजेंद्र दासरी यांचे हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ कवी माधव पवार यांच्या अध्यक्षतेखाली आणि सुंदर मार्मिक सूत्रसंचालनात झालेल्या कविसंमेलनात ज्येष्ठ कवी मारुती कटकधोंड, ज्येष्ठ लेखिका डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, कवी गिरीश दुनाखे, डॉ. सौ. माधुरी भोसले-फंड, सौ.प्रांजली मोहीकर, सौ. योजनगंधा जोशी, रामचंद्र धर्मसाले, सौ. चित्रा रामपुरे, साक्षी हौदे, आरोही कुलकर्णी हे सर्व जण सहभागी झाले होते. या वेळी कार्याध्यक्षा सौ. सायली जोशी, उपाध्यक्ष प्रशांत जोशी, उद्योगपती दत्ता अण्णा सुरवसे, रवींद्र नाशिककर, विद्या लिमये,सौ.रेणुका बुधाराम, तसेच उत्तर सोलापूर पंचायत समिती सहायक प्रशासन अधिकारी राजेंद्र बरगड यांचे सहकार्यकारिणी सदस्य आणि साहित्य रसिक उपस्थित होते. दि.२७/२/२०२२

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूरतर्फे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट यांचेसह कोरोना काळातील दिवंगत साहित्यिक तसेच मसाप आजीव सदस्य, ज्ञात-अज्ञात दिवंगतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.
दि.१९/३/२०२२

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर, आणि संतोषी महिला मंडळ,शिव गंगानगर, जुळे सोलापूर, संयुक्तपणे महिला दिनाच्या निमित्ताने 'टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणेम आणि 'कोरोनाने आपल्याला काय शिकवलेम तसेच 'घरातील नातेसंबंधम या विषयावर ऑनलाईन निबंध स्पर्धा घेण्यात आली होती, त्याचा पारितोषिक वितरण समारंभ दिनांक १९ मार्च २०२२ रोजी शिवगंगा मंदिर हॉलमध्ये पद्माकर कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली, सौ. सायली जोशी कार्याध्यक्षा यांचे शुभहस्ते आणि प्रमुख कार्यवाह गिरीश दुनाखे, तसेच ज्येष्ठ कार्यकारिणी सदस्य श्रीकांत कुलकर्णी यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन सौ. रोहिणी कुलकर्णी यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. शांताबाई क्षीरसागर यांनी केले. 'टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू बनवणेम या स्पर्धेत १४ महिला स्पर्धक सहभागी झाले होते, त्यातील प्रथम सौ.राजश्री म्हमाणे, द्वितीय सौ.संध्या साळुंके, तृतीय सौ.अनितासंग शेट्टी यांना तर सौ. सुनीता पाटील आणि सौ. अनिता पाटील यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले, तर ऑनलाईन स्पर्धेतील विजेत्या सौ. स्मिता गुरव, सौ. संजीवनी पवार यांना पारितोषिक मिळाले. सौ. शांताबाई क्षीरसागर, सौ. संध्या साळुंके, सौ. रोहिणी कुलकर्णी, सौ. कांचन चलवादी यांचेसह महिला मंडळ सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, या वेळी सौ. सायली जोशी आणि पद्माकर कुलकर्णी यांनी त्या सर्वांना मार्गदर्शन केले.

## दामाजीनगर शाखा

शाखेच्या वतीने देण्यात येणारे पुस्तक पुरस्कार लेखकांना पोस्टाने पाठवण्यात आले. पुरस्कार प्राप्त लेखक पुढीलप्रमाणे

**इंदुमती शिर्के पुरस्कार–** जालीयनवाला बाग, कादंबरी– अमेय जाधव

**पद्मिनी यादव पुरस्कार–** विजेने चोरलेले दिवस, कादंबरी– संतोष जगताप

**इंदुमती जडे पुरस्कार**–अधोरेखित, समीक्षा– डॉ. मधू सावंत

**मसाजी शिवशरण पुरस्कार–** आळ आणि काळ, कथासंग्रह– ज्ञानेश्वर हंडरगुळीकर

**सिद्धमाला ढगे पुरस्कार–** परतीचा प्रवास, कथासंग्रह– राजेंद्र भोसले

**मारुतीराव पंडित पुरस्कार–** इजु, आत्मकथन– विजय वडवेराव

**ज्ञानोबा सलगर पुरस्कार–** ओळ तुझ्या माझ्या स्वातंत्र्याची, कवितासंग्रह–डॉ. महेश खरात

**ज्योती जाधव पुरस्कार** – डोहतळ, कवितासंग्रह– मारुती कटकधोंड

**शहीद राजकुमार ठोंबरे पुरस्कार–** कालाभूत, कवितासंग्रह– सूर्याजी भोसले

**कलावती वाकळे–साहित्यप्रेमी पुरस्कार–** ॲड. नंदकुमार पवार

गणेशोत्सवात हस्ताक्षर, नृत्य, उखाणे स्पर्धा घेण्यात आल्या. बालाजी शिंदे यांचे व्याख्यान, प्रा. विश्वनाथ ढेपे यांचे प्रवचन, भारती धनवे यांचे कथाकथन व डी. वाय. एस. पी. राजश्री पाटील यांच्याशी संवाद इ. कार्यक्रम झाले.

**३० ऑगस्ट–** शाखेच्यावतीने तीन दिवसीय सूत्रसंचालन व संवाद कौशल्य कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचा समारोप मसाप सोलापूर जिल्हा प्रतिनिधी कल्याण शिंदे यांचे हस्ते झाला तर उद्घाटन पत्रकार अरविंद जोशी यांचे हस्ते झाले. या कार्यशाळेस बालाजी शिंदे, अशपाक काझी व स्मिता जडे यांनी मार्गदर्शन केले.

**१० ऑक्टोबर –** प्रकाश जडे लिखित ‘वात्सल्यसूक्त’ या कवितासंग्रहावर महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे सदस्य प्रा. प्रदीप पाटील यांचे अध्यक्षतेखाली परिसंवाद झाला. त्यात सुभाष कवडे (भिलवडी), वसंत पाटील पणुब्रेवारुण मिनाक्षी पाटील (देशिंग) यांनी सहभाग घेतला. या वेळी मसाप सोलापूर जिल्हा प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे व डॉ. शरद शिर्के उपस्थित होते.

**२० ऑक्टोबर–** संगीत साहित्याला पूरक भूमिका बजावते– असे मत पत्रकार गायक दिगंबर भगरे यांनी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त आयेजित गीत–काव्य मैफलीत व्यक्त केले.

**२५ ऑक्टोबर–** मसाप दामाजीनगर शाखेशी माझं घनिष्ट नातं आहे– असे भावपूर्ण विचार कवयित्री डॉ. स्वाती शिंदे यांनी शाखा भेटीत व्यक्त केले.

**३१ ऑक्टोबर–** दिवाळीनिमित्त ‘सुरेल दीपसंध्या’ साजरी झाली. या वेळी प्रा. कल्पेश कांबळे, राजेंद्र घाडगे, प्रिती केंकरे, प्रा. विनय ताम्हणकर, स्मिता जडे यांनी प्रकाशगीते सादर केली.

**१७ जानेवारी–** राज्यस्तरीय एकपात्री अभिनय स्पर्धेतील विजेत्या भारती धनवे यांचा सत्कार करण्यात आला.

**२५ जानेवारी–** संत परंपरा लाभलेल्या संतभूमीत साहित्य चळवळ वृद्धिंगत होत आहे, असे मत प्रा. डॉ. महेश खरात यांनी शाखा भेटीत व्यक्त केले. या प्रसंगी ज्येष्ठ कवी गोविंद काळेही उपस्थित होते.

**२९ जानेवारी–** साऊ ते जिजाऊ य शीर्षकांतर्गत काव्याविष्कार सादर करण्यात आला. कवयित्री संगीता फासाळ यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कविसंमेलनात शुभदा जोशी, सरस्वती क्षीरसागर, रेखा जडे, रेश्मा गुंगे, भारती धनवे, स्मिता जडे, अर्चना सलगर, प्रांजली तोडकरी, त्रिधा जडे ह्या सहभागी झाल्या.

**३१ जानेवारी–** शाखेच्या पसायदान या ई–नियतकालीकाचे प्रकाशन शाखा अध्यक्ष प्रकाश जडे यंचे हस्ते झाले.

**१४ फेब्रुवारी** –विविध पुरस्कार प्राप्त शाखा सदस्य लक्ष्मी माने, सुरज सलगर, गोरक्ष जाधव, प्रा. दत्ता सरगर, रेश्मा गुंगे, माणिक गुंगे यांचा सत्कार प्रा. डॉ. सुभाष कदम यांचे हस्ते करण्यात आला.

**२२ फेब्रुवारी–** शाखेस १०,००० रु. देणगी देणाऱ्या जेष्ठ लेखिका वासंती मेरु यांचा सत्कार अध्यक्ष प्रकाश जडे यांचे हस्ते करण्यत आला.

**६ मार्च–** मसाप दामाजी नगर शाखा म्हणजे साहित्य चळवळीतला आदर्श आहे– असे गौरवोद्गार जिल्हां प्रतिनिधी पद्माकर कुलकर्णी यांनी शाखेच्या सर्वसाधारण सभेत बोलताना व्यक्त केले.

**२७ फेब्रुवारी–** मराठी भाषा गौरव दिन न.पा. मंगळवेढाचे मुख्यधिकारी निशिकांत परचंडराव याचे अध्यक्षतेखाली जल्लोषात साजरा झाला. अवंती पटवर्धन प्रमुख वक्त्या होत्या. या वेळी सरस्वती क्षीरसागर, दिगंबर यादव, गोरक्ष जाधव, पंढरीनाथ जोशी, स्मिता जडे, यतिराज वाकळे, गायत्री परचंडराव, रेश्मा गुंगे, सूर्यमाला सरगर, प्रा. दत्ता गरगर, भारती धनवे, राजनंदिनी सरवदे व सूरसंगम ग्रुप यानी कवितावाचन, कथाकथन, अभिवाचन. गायन, नृत्य असे बहुविध सादरीकरण केले.

**६मार्च–** शाखेचे दुसरे शिवार साहित्य संमेलन धर्मगाव येथे प्रा. डॉ. महेश खरात यंचे अध्यक्षतेखाली झाले. संमेलनाचे स्वागताध्यक्ष तायप्पा टकले होते. उदघाटन माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे. सरपंच अप्पासाहेब पाटील, डॉ. राजलक्ष्मी गायकवाड, पद्माकर कुलकर्णी, कल्याण शिंदे, निशिकांत परचंडराव यांचे उपस्थितीत झाले. बैलगाडीतून शोभायात्रा काढण्यात आली.

कवयित्री संगीता फासाळ यांच्या 'गावाकडचा पाऊस' या कवितासंग्रहाचे प्रकाशन जेष्ठ कवी गोविंद काळे यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. एम आर. टकले होते. डॉ. राजेश्वरी कोरे यांनी कवितासंग्रहावर भाष्य केले.

ग्रामीण कथालेखक प्रा. भास्कर बंगाळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कथाकथनात भारती धनवे, दिगंबर यादव, बालाजी शिंदे स्मिता जडे सहभागी झाले. डॉ. स्मिता पाटील यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कविसंमेलनात प्रा. डॉ. महेश खरात. मारुती कटकधोंड, गिरीश दुनाखे, डॉ.अतुल निकम, वंदना कुलकर्णी, प्रा. दत्ता सरगर, सूर्याजी भोसले, संगीता फासाळ, गोरक्ष जाधव, रेश्मा गुंगे यतिराज वाकळे यांनी कविता सादर केल्या.

समारोपात सूरसंगम ग्रुपचा 'शेती मातीतील गाणी' हा मराठी गीतांचा बहारदार कार्यक्रम झाला. या वेळी प्रगतीशील शैतकरी वैभव मोडक यांची प्रमुख उपस्थिती होती.

**९ मार्च–** दामाजीनगर शाखा, शाहू परिवार व सावली फाऊंडेशन यांनी संयुक्तपणे 'वात्सल्यसूक्त' या प्रकाश जडे लिखित कवितासंग्रहातील निवडक कवितांच्या सादरीकरणाचा कार्यक्रम आयेजित करण्यात आला होता. या वेळी– 'वात्सल्यसूक्त' ही प्रत्येक बापाच्या काळजाजवळची कविता आहे

असे मत प्रा. लक्ष्मण ढोबळे यानी व्यक्त केले. कवितांचे सादरीकरण स्मिता जडे व अवंती पटवर्धन यांनी केले.

**३१ मार्च–** गझलक्षेत्रातील अभ्यास संशोधक, पुणे विद्यापाठाचे माजी मराठी विभाग प्रमुख प्रा, डॉ. अविनाश सांगोळेकर याच्या अविनाशपासष्टीया गझलसंग्रहावर – अविनाशपासष्टीमधील मी आणि माझी गझल या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी ॲड. नंदकुमार पवार होते. प्रास्ताविक प्रकाश जडे यांनी, सूत्रसंचालन बालाजी शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन रेश्मा गुंगे यांनी केले.




महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कै. वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाच्या नूतनीकरणाचा शुभारंभ करताना दुबईस्थित प्रसिद्ध उद्योजक विनोद जाधव व मसापचे पदाधिकारी

# महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या ग्रंथालयाच्या नूतनीकरणाचा शुभारंभ


महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कै. वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाच्या नूतनीकरणाचा शुभारंभ दुबईस्थित प्रसिद्ध उद्योजक विनोद जाधव यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष राजीव बर्वे, कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे, कोषाध्यक्ष सुनिताराजे पवार, वास्तूदेखभाल कार्यवाह ॲड. प्रमोद आडकर, उद्धव कानडे, माधव राजगुरू, वि दा. पिंगळे, डॉ. सतीश देसाई, शिरीष चिटणीस, रवींद्र बेडकिहाळ, विशाल जाधव या वेळी उपस्थित होते.


या संदर्भात अधिक माहिती देताना प्रा. मिलिंद जोशी म्हणाले,''साहित्य परिषदेच्या कै. वा. गो. आपटे संदर्भ ग्रंथालयाचे नूतनीकरण करण्यात येणार असून तेथे येणाऱ्या वाचकांना आणि अभ्यासकांना सर्व अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. तसेच परिषदेत कै. रामचंद्र जाधव अभ्यासिकाही विद्यार्थ्यांसाठी सुरू होणार आहे. हे काम दुबईस्थित प्रसिद्ध उद्योजक विनोद जाधव यांच्या पुढाकाराने होणार आहे. या नूतनीकरणाच्या कामामुळे परिषदेचे ग्रंथालय २२ फेब्रुवारी ते ३१ जून या कालावधीत बंद राहणार आहे, याची वाचकांनी नोंद घ्यावी,'' असे आवाहन महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी केले आहे.


या वेळी मनोगत व्यक्त करताना विनोद जाधव म्हणाले, ''मी अतिशय कठीण परिस्थितीत महानगरपालिकेच्या शाळेत माझे शिक्षण पूर्ण केले. त्या काळात वाईट आर्थिक स्थिती असलेल्या मुलांना कोणत्या परिस्थितीतून जावे लागते हे मी अनुभवले आहे, त्यामुळे उद्योजक म्हणून यश मिळाल्यानंतर सतत समाजासाठी काय करता येईल याचा विचार मी केला. ग्रंथालये ही ज्ञानमंदिरे आहेत, ती समृद्ध झाली तर पुढच्या अनेक पिढ्या त्यातून घडतील. साहित्य परिषदेत सुरू होणाऱ्या अभ्यासिकेचा लाभ स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच संशोधकांना निश्चितच होईल.''

Maharashtra Sahitya Patrika Quarterly : March 2022
Registered with the Register of Newspaper for India under No 6398/57
Book Pkt. Periodical category. Publishing Date : March 2022

## पुस्तक सूची




- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड १ : रु. ५००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ (भाग २) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ३ : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४ : रु. ४००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ५ (भाग २) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग १) : रु. ३५०/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ६ (भाग २) : रु. ३००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग १) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग २) : रु. ८००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ३) : रु. ७००/-
- मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ७ (भाग ४) : रु. ७००/-
- भारतीय भाषांतील स्त्रीवादी साहित्य : रु. ८००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड १ : रु. ५००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड २ : रु. ३००/-
- भाषा व साहित्य संशोधन खंड ३ : रु. २००/-
- म. सा. पत्रिका लेख - सूची : रु. ४००/-

**सर्व खंड २५ टक्के सवलतीत!**

## महाराष्ट्र साहित्य परिषद

**डिमांड ड्राफ्टने आगाऊ पैसे पाठविल्यास संपूर्ण संच** आमच्या खर्चाने रेल्वे अगर एस.टी. पार्सलने पाठवू. (वरील संचातील सुटे भाग हवे असल्यास ग्रंथविक्रेत्यांना २५ टक्के सूट. व्यक्तिगत ग्राहकांना व संस्थांना १५ टक्के सूट. टपालखर्च वेगळा.)

मागणीसाठी संपर्क : महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०
दूरभाष : ०२०- २४४७ ५९ ६३

प्रेषक ।
**प्रमुख कार्यवाह,**
**महाराष्ट्र साहित्य परिषद,**
टिळक रस्ता, पुणे ४११०३०,
दूरभाष : ०२०-२४४७ ५९ ६३